*(कार्यालयीन उपयोगासाठी)*

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.

## *(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६(३) अन्वये*

## *मुख्य लेखापरीक्षक यांचा लेखा परीक्षण अहवाल*

वार्षिक लेखापरीक्षण अहवाल

सन २०१८-२०१९

## : अ नु क्र म णि का ::

## लेखा परीक्षण अहवाल : सन २०१८-२०१९

**मुख्य लेखा परीक्षक यांचे लेखापरीक्षणाबाबत निवेदन :** (पृ.क्र. ४ ते ६ )

### भाग -अ

**(अ) विभागनिहाय लेखापरीक्षण तपशिल :**



| अ.क्र. | विभागाचे नांव | लेखापरीक्षण कालावधी | लेखापरीक्षण अहवालातील एकूण परिच्छेद | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | लेखा विभाग | | | ७ ते १२ |
| २ | झोन क्रमांक -१ (वॉर्ड - अ) | २०१५-१६ ते २०१६-१७ | ३४ | १३ ते ४२ |
| | (वॉर्ड अभियंता-अ) | | ०५ एकूण ३९ | ४३ ते ४६ |
| ३ | झोन क्रमांक -४ (वॉर्ड -४) | २०१७-२०१८ | १५ | ४७ ते ७९ |
| | (वॉर्ड अभियंता -४) | | २७ एकूण ४२ | ८० ते ११८ |
| ४ | झोन क्रमांक -६ (वॉर्ड -ई) | २०१६-२०१७ | २० | ११९ ते १४५ |
| | (वॉर्ड अभियंता -ई) | | १४ एकूण ३४ | १४६ ते १६३ |
| ५ | झोन क्रमांक -९ वॉर्ड कार्यालय-९ | २०१७-२०१८ | ३० | १६४ ते १९६ |
| | वॉर्ड अभियंता -९ | | १ एकूण ३१ | १९७ |
| ६ | उद्यान विभाग | २०१६-२०१७ | १६ | १९८ ते २१४ |

| **भाग -ब** | **विशेष चौकशी अहवाल.** | |
|---|---|---|
| १ | अग्निशमन विभागामार्फत देण्यात आलेल्या कामाची चौकशी करणे बाबत. सन २०१८. | **२१६ ते २३०** |
| २ | पैठण रोड येथे डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या संचिकेतील वाढीव अंदाजपत्रकाबाबत प्राथमिक तपासणी अहवाल. | **२३१ ते २३३** |
| ३ | राठी टॉवर, दशमेशनगर येथील नाल्यावर बॉक्स कल्व्हेट पुल बांधणे बाबतच्या संचिकेतील वाढीव अंदाजपत्रकाबाबत प्राथमिक तपासणी अहवाल. | **२३४ ते २३७** |
| ४ | बांधा वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील पथदिवे बदलणे व ८ वर्ष देखभाल दुरूस्ती करणे. प्राथमिक तपासणी अहवाल. | **२३८ ते २४४** |
| ५ | कृषी उत्पन्न बाजार समिती जाधववाडी येथील मोकळ्या जागेच्या मालमत्ता करामध्ये झालेल्या दुरूस्तीबाबतचा अहवाल. | **२४५ ते २४८** |
| ६ | दिनांक १ जानेवारी २०१८ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीतील वॉर्ड क्र.१ ते ९ वॉर्ड कार्यालयातील वसूल रकमांच्या ताळमेळ बाबतचा अहवाल. | **२४९ ते २५४** |
| ७ | आस्थापना -१ व २ या विभागाच्या कामकाजाचा चौकशी अहवाल. (परिशिष्ट A ते I पर्यंत ) | **२५५ ते २६१** |

जा.क्र.मनपा/मुलेप/२०२०/
कार्यालय महानगरपालिका,औरंगाबाद.
दिनांक : / /२०२०

प्रति,
**मा.प्रशासक**
महानगरपालिका,औरंगाबाद.

विषय :- **सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबादचा लेखापरीक्षणाचा वार्षिक अहवाल.**

**महोदय,**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०६ (३) अन्वये लेखापरीक्षण विभागाच्या कामकाज विषयक आणि हिशेब तपासणीबाबतचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठीचा वार्षिक अहवाल या सोबत सादर करीत आहे.

अ) अहवाल वर्षात लेखापरीक्षण विभागात खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी कार्यरत होते.

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत कर्मचारी / अधिकारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य लेखापरीक्षक | ०१ | ०१ | |
| २ | उप मुख्य लेखापरीक्षक | ०१ | -- | |
| ३ | कार्यालयीन अधिक्षक | ०१ | ०१ | |
| ४ | कनिष्ठ लेखापरीक्षक(वरीष्ठ लिपीक संवर्ग) | ०४ | ०१ | |
| ५ | कनिष्ठ लिपीक | ०४ | ०५ | |
| | **एकूण** | **११** | **०८** | |

१. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेचे निव्वळ महसूली उत्पन्न हे रू.**६५९.२५** कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू.**१०६.७०** कोटी) इतके असून खर्च रू.**५३६.६३** कोटी इतका आहे.

२. मुख्य लेखापरीक्षक या पदाचा पदभार स्विकारल्यानंतर कामकाज पाहत असतांना महानगरपालिके अंतर्गत विविध विभागाकडून वेतन निश्चिती पडताळणीस्तव सादर होणा-या बहुतांश प्रकरणांमध्ये १९८६,१९९६,२००६ व २०१६ चे असतात. वेतन आयोगानुसार अनुज्ञेय सुधारित वेतननिश्चिती बाबतची प्रकरणे ही कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर पडताळणीस्तव सादर होत आहेत. असे निदर्शनास आले आहे की, सेवानिवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्ती नंतरचे लाभ हे विलंबाने प्रदान केले जातात. भविष्यात सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सेवापुस्तक वेळोवेळी नियमाप्रमाणे तात्काळ तपासणी करून सादर करणे बाबत संबंधित विभागास सूचित करण्यात आले आहे. जेणे करून सेवानिवृत्तांना वेळेवर निवृत्ती नंतरचे सर्व लाभ प्रदान करता येतील.

सेवानिवृत्तीनंतर अतिप्रदान रकमा वसूलीच्या कार्यवाही विरूध्द बरेचशे कर्मचारी मा.न्यायालयात महानगरपालिकेच्या विरूध्द दावे दाखल करीत आहेत. तसेच मा.न्यायालयाच्या आदेशानुसार अतिप्रदान वसूल रक्कम वेळेत म्हणजे ५ वर्ष अगोदर कर्मचारी सेवेत असतांना वसूल करण्याचे निर्देश आहे. महानगरपालिका स्तरावर लेखापरीक्षण विभागात केवळ एकच कर्मचारी वेतन पडताळणी करीत आहे. परंतू ५ वर्षाचे सेवा शिल्लक असलेल्या कर्मचा-याचे वेतन पडताळणीसाठी वेतन पडताळणी पथक स्थापन होणे आवश्यक आहे. सन २०२२ पर्यंत सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या संख्येचा विचार करतांना आस्थापना विभागाने तातडीने वेतन पडताळणी पथकासाठी कर्मचारी वर्ग नियुक्त करावा असे लेखापरीक्षण विभागाचे मत आहे.

३. महानगरपालिका स्तरावरील लेखापरीक्षणाचे स्वरूप आणि व्याप्ती विचारात घेता लेखापरीक्षण विभागासाठी पुरेसा कर्मचारी उपलब्ध व्हावा या दृष्टीने जा.क्र.मनपा/मुलेप/२४, दिनांक २४.०१.२०१३ अन्वये एकूण २६ नविन पदांसाठी मान्यता मिळविण्याच्या दृष्टीने शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. दरम्यानच्या काळात औरंगाबाद महानगरपालिकेच्या आकृतीबंध अंतीम करण्याचे काम सुरू आहे. लेखापरीक्षण विभागासाठी आकृतीबंधात एकूण ३४ पदांची आवश्यकता असल्याबाबत प्रस्तावित आहे. तरी अस्तित्वात असलेल्या कर्मचारी वृंदाकडून अहवाल वर्षात एकूण **०५** विभागाचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आलेले आहे. शिवाय मा.महापौर, मा.सभापती, स्थायी समिती ,मा.आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार एकूण **७** चौकश्या करून त्याबाबतचे अहवालही विहित वेळेत संबंधित महोदयांना सादर करण्यात आलेले आहेत. अहवाल वर्षात पूर्ण करण्यात आलेल्या लेखापरीक्षणाबाबतचा अहवाल व चौकशी बाबतचा अहवाल हा या अहवालामध्ये अनुक्रमे भाग १ व भाग २ या स्वरूपात सादर करण्यात आलेला आहे. लेखापरीक्षण विभागाद्वारे दैनंदिन कामकाज करीत असतांना निदर्शनास आलेल्या गंभीर स्वरूपाच्या आक्षेपार्ह / अपहार / अनियमित बाबी या वेळोवळी मा.आयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या आहेत.

४. शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये १ नोव्हेंबर २००५ व तद्नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन अनुज्ञेय असणार नाही. औरंगाबाद महानगरपालिके मध्ये दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्ती दिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना नियुक्ती आदेशात या अर्थाची अट नमूद केलेली असते, परंतू प्रत्यक्षात योजना लागू करणेबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. शासन परिपत्रक क्र.अंनियो/१००७/६७/सेवा-४, मंत्रालय, मुंबई - ४०००६२, दिनांक ३० ऑक्टोबर २००७ अन्वये उक्त योजना गेल्या १२ वर्षापासून अंमलात आणणे आवश्यक होते. तथापि प्रशासनाने सदरील योजनेची अंमलबजावणी केलेली नसल्याने अधिकारी /कर्मचारी यांच्या सोबतच महानगरपालिकेवर सुध्दा योजना अंमलबजावणीसाठीच्या खर्चाचे दायित्व वाढलेले आहे. या दरम्यान एखाद्या कर्मचा-याचा आकस्मित मृत्यू झाल्यास अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या सर्व बाबींचे गांभिर्य प्रशासनाने लक्षात घेवून तात्काळ योजनेची अंमलबजावणी करावी.

५. अहवाल वर्षात असे विशेषत्वे करून निदर्शनास आले आहे की, महानगरपालिकेच्या मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत मालमत्ता कर असून याचे वसूलीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. तसेच महानगरपालिकेचे प्राप्त उत्पन्न आणि खर्च याबाबतचे ताळमेळ लेखा शाखेने घेणे आवश्यक ठरते.

६. लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, तांत्रीक विभागाच्या खर्चाच्या संचिका मध्ये अंदाजपत्रकीय मंजूरीच्या वर्षात खर्च होत नाही. सदरील काम २/३ वर्षानंतर पूर्ण झाल्यानंतर सदरील कामाचा खर्च केला जातो. त्यामुळे ज्या वर्षात अंदाजपत्रकास मान्यता दिली त्याच वर्षात खर्च न होता, सदरील खर्च पुढील आर्थिक वर्षात समाविष्ठ होतो. त्यामुळे स्पील ओव्हरच्या कामांची संख्या वाढत राहते. उक्त बाबत तांत्रिकी विभागाने कामाच्या आवश्यकतेनुसारच अंदाजपत्रके तयार करावीत तसेच खर्च सुध्दा त्याच वर्षात होईल याबाबत दक्षता घेणे आवश्यक ठरते.

आपली विश्वासू,

**(दि.मा.देवतराज)**
मुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका,औरंगाबाद.

**औरंगाबाद :**
**दिनांक** :

# लेखा विभाग
# सन २०१८-२०१९
# लेखापरीक्षण अहवाल.

अहवाल वर्षात महानगरपालिका अंतर्गत जमा व खर्चाचा आढावा हा लेखा विभागाकडील अभिलेख्यांच्या आधारे घेण्यात आला आहे. त्यानुसार सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष जमा प्रारंभीच्या शिल्लक रकमेसह रक्कम रू. **६५९.२५ कोटी** इतकी असून प्रत्यक्ष खर्च रू.**५३६.६३ कोटी** इतका आहे.

**परिच्छेद क्र.१ : अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रकमेतील तफावतीबाबत:**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९४ अन्वये महापालिकेचे अपेक्षित उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक प्रतीवर्ष तयार करण्यात येते. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाची अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्च याबाबत तपासणी केली असता असे दिसून आले की, महापालिकेस प्रत्यक्षात प्राप्त रकमा आणि महापालिकेद्वारा करण्यात आलेला प्रत्यक्ष जमा खर्च हा अर्थसंकल्पिय तरतूदीपेक्षा २०.७०% ते २६.६% कमी झालेला आहे. त्याबाबतचा तपशिल हा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| वर्ष | जमा (रूपये) | | | | आकडे कोटीत |
|---|---|---|---|---|---|
| | मूळ अर्थसंकल्पिय तरतूद | सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद | प्रत्यक्ष जमा | कमी अथवा जादा रक्कम | टक्केवारी |
| २०१८-२०१९ | १८६४.७५ | ८३१.४३ | ६५९.२५ | -१७२.१८ | २०.७०% |
| | | | | | |
| वर्ष | खर्च रूपये | | | | |
| २०१८-२०१९ | १८६३.४१ | ७३१.२२ | ५३६.६३ | -१९४.५९ | २६.६१% |

वरील तपशिलाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वार्षिक अंदाजपत्रक तयार करतांना मागील वर्षीच्या प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या प्रमाणात तरतूद ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार जमा व खर्चाची रक्कम आणि प्रत्यक्ष जमा व खर्च यामध्ये तफावत दिसून येते.

मागील वार्षिक अहवालात भविष्यात अशी तफावत होणार नाही याची दक्षता घेण्याविषयी सूचित करण्यात आले होते. तरीही लेखा शाखेने अंदाजपत्रकातील तफावती बाबतची बाब गांभिर्याने घेतलेली नाही.

**लेखा विभाग**

**परिच्छेद क्र.२ : अधिकारी/कर्मचारी यांचेकडील कार्यालयीन कामासाठी/ औषधोपचारासाठी देण्यात आलेल्या प्रलंबित अग्रिम रकमेबाबत.**

महापालिका अधिकारी /कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजास्तव व औषधोपचारासाठी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमेपैकी सन २०१८-२०१९ मधील रक्कम रूपये **७६,६४,७१०/-** इतक्या अग्रीम रकमेचे समायोजन अद्यापपावेतो करण्यात आलेले नाही. अग्रीम रक्कम प्रदान करतांना कायम स्वरूपी कर्मचा-यास प्रदान करण्यात यावे. तसेच कर्मचारी सेवानिवृत्तीपूर्वी त्यांच्याकडील अग्रीम रकमेचे समायोजनाबाबत लेखा विभागाने दक्षता घ्यावी.

## अधिकारी / कर्मचारी यांचेकडील प्रलंबित अग्रिम रकमेबाबतचा तपशिल : सन २०१८-२०१९

| Sr.No. | Date | Names | Amount (Rs.) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९.४.२०१८ | अहेमद तौसिफ ,पीआरओ | १,००,०००/- | जनसंपर्क विभाग | SWM Expenses |
| २ | २२.४.२०१८ | असलम कादरी | १,००,०००/- | वॉर्ड अधिकारी-२ | SWM Expenses |
| ३ | ७.५.२०१८ | अहेमद तौसिफ ,पीआरओ | १०,००,०००/- | जनसंपर्क विभाग | बशर नवाज नाईट |
| ४ | १८.५.२०१८ | प्रसाद देशपांडे | ७,००० | -- | महाराष्ट्र दिन |
| ५ | १८.५.२०१८ | अनिल तनपुरे | २०,००० | -- | Office Expenses |
| ६ | २१.५.२०१८ | आस्थापना अधिकारी | १०,०००/- | आस्थापना | Postal Expenses |
| ७ | २२.५.२०१८ | अनवरउद्यीन कुरेशी | २५,०००/- | बीओटी | PMAY Enterview |
| ८ | २२.५.२०१८ | बी.एस.नाईकवाडे | ३०,०००/- | प्राणीसंग्रहालय | CZA New Delhi |
| ९ | ३०.५.२०१८ | बी.डी.राठोडकर | १०,०००/- | आरोग्य विभाग | Medicine purchase |
| १० | ४.०६.२०१८ | अर्चना राणे | ५,०००/- | आरोग्य विभाग | जागतिक मलेरिया दिन |
| ११ | ६.०६.२०१८ | सुनिल कासेवाड | २०,०००/- | आस्था-१ | एससी,एसटी कमिटी मिटींग |
| १२ | ७.०६.२०१८ | एस.बी.राठोड | २,५०,०००/- | झोन क्र.४ | नाला सफाई |
| १३ | ७.०६.२०१८ | एस.ए.काथार | २,५०,०००/- | झोन क्र.४ | नाला सफाई |
| १४ | ८.०६.२०१८ | के.एन.काथार | ३,००,०००/- | झोन क्र.१ | नाला सफाई |
| १५ | ८.०६.२०१८ | एस.डी.मोटे | ३,००,०००/- | झोन क्र.१ | नाला सफाई |
| १६ | ८.०६.२०१८ | आर.पी.वाघमारे | ४,००,०००/- | झोन क्र.७ | नाला सफाई |
| १७ | ८.०६.२०१८ | एस.एस.पाटील | ३,००,०००/- | झोन क्र.६ | नाला सफाई |
| १८ | ८.०६.२०१८ | एम.व्ही.चौधरी | ३,००,०००/- | झोन क्र.६ | नाला सफाई |
| १९ | ८.०६.२०१८ | एस.ए.गायकवाड | ३,००,०००/- | झोन क्र.६ | नाला सफाई |
| २० | २१.६.२०१८ | व्ही.आर.भोये | ३,००,०००/- | झोन क्र.८ | नाला सफाई |
| २१ | २१.६.२०१८ | मिलिंद जहागिरदार | ३,००,०००/- | झोन क्र.८ | नाला सफाई |

**लेखा विभाग**

| Sr.No. | Date | Names | Amount (Rs.) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| २२ | २५.६.२०१८ | नाना झेड पाटील | २,५०,०००/- | झोन क्र.९ | नाला सफाई |
| २३ | २५.६.२०१८ | जे.व्ही.पाडाळकर | ३,००,०००/- | झोन क्र.५ | नाला सफाई |
| २४ | २.७.२०१८ | जे.बी.गाढेकर | ५,००,०००/- | झोन क्र.२ | नाला सफाई |
| २५ | २.७.२०१८ | हंसराज बन्सवाल | १,३०,०००/- | कला दालन | अपंगाची स्पर्धा |
| २६ | १७.७.२०१८ | बी.डी.राठोडकर | ५०००/- | आरोग्य विभाग | मेडीसिन ट्रान्सपोर्ट |
| २७ | २१.७.२०१८ | बंडू एस साबळे | २०,०००/- | झोन क्र.१ | SWM |
| २८ | २५.७.२०१८ | मा.आयुक्तांचे स्वीय सहाय्यक | ५०००/- | मा.आयुक्त दालन | स्टेशनरी ॲण्ड पोस्टल एक्सपेन्सेस |
| २९ | ३०.७.२०१८ | असलम कादरी | १,५०,०००/- | वॉर्ड अधिकारी-२ | SWM |
| ३० | ३०.७.२०१८ | बाबु सांडु जाधव | ७,०००/- | सुरक्षा विभाग | स्वातंत्र्य दिन |
| ३१ | ३०.७.२०१८ | अविनाश निकम | २०,०००/- | उपायुक्त दालन | Initative of change |
| ३२ | ३१.७.२०१८ | सुनिल एम जाधव | ४,००,०००/- | झोन क्र.५ | नाला सफाई |
| ३३ | १०.८.२०१८ | आस्थापना अधिकारी | १०,०००/- | आस्थापना | पोस्टल एक्सपेन्सेस |
| ३४ | ८.८.२०१८ | प्रकाश खंदारे | ३६,२३६/- | शिक्षण | १५ ऑगस्ट २०१८ |
| ३५ | २०.८.२०१८ | सी.एम.अभंग | १०,०००/- | मालमत्ता अधिकारी | मुंबई दौरा |
| ३६ | २१.८.२०१८ | अजय एस.म्हस्के | ५,०००/- | आरोग्य विभाग | फॉगींग |
| ३७ | २४.८.२०१८ | ए.जे.जाधव | ३०,०००/- | प्राणीसंग्रहालय | बकरी ईद |
| ३८ | २४.८.२०१८ | रत्नाकर एम साबळे | ५,०००/- | आरोग्य विभाग | फॉगींग |
| ३९ | २७.८.२०१८ | बंडू एस साबळे | १०,०००/- | झोन क्र.१ | १५ ऑगस्ट २०१८ |
| ४० | २७.८.२०१८ | वामन जोगदंड | ५,०००/- | **--** | **झेरॉक्स** |
| ४१ | ३१.८.२०१८ | डॉ.शैलजा ए मापारी | २२,५००/- | आरोग्य विभाग | जन्म-मृत्यू |
| ४२ | ११.९.२०१८ | बालय्या संजिव प्रसाद | १,७०,०००/- | क्रिडा विभाग | अपंग क्रीडास्पर्धा १८-१९ |
| ४३ | ११.९.२०१८ | अपर्णा थेटे | १,५०,०००/- | विधी विभाग | रॅम्के कोर्ट अपिल फीस |
| ४४ | १८.९.२०१८ | प्रेरणा संकलेचा | ५,०००/- | आरोग्य विभाग | झेरॉक्स |
| ४५ | २१.९.२०१८ | मा.आयुक्तांचे स्वीय सहाय्यक | ७५,०००/- | मा.आयुक्त दालन | -- |
| ४६ | ३.१०.२०१८ | विनोद जी पवार | ५०,०००/- | गुंठेवारी कक्ष | अपंग |
| ४७ | ३.१०.२०१८ | विष्णू डी रगडे | १०,०००/- | आरोग्य विभाग | मेडीकल एक्सपेन्सेस |
| ४८ | १५.१०.२०१८ | मुख्याध्यापक इंदिरा नगर शाळा | २५,०००/- | शिक्षण विभाग | जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धा |
| ४९ | १५.१०.२०१८ | देवेन्द्र सोळुंके | २५,०००/- | शिक्षण विभाग | जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धा |
| ५० | १५.१०.२०१८ | मुख्याध्यापक यशोधरा कॉलनी शाळा | २५,०००/- | शिक्षण विभाग | राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा |
| ५१ | १५.१०.२०१८ | ऊर्मिला लोहार | २५,०००/- | शिक्षण विभाग | राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा |
| ५२ | १६.१०.२०१८ | आस्थापना अधिकारी | १०,०००/- | शिक्षण विभाग | पोस्टल एक्सपेन्सेस |
| ५३ | २९.१०.२०१८ | मुख्याध्यापक सीपीएस किराडपुरा | ४०,०००/- | शिक्षण विभाग | राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा |
| ५४ | १२.११.२०१८ | सचिन मिसाळ | ३०,०००/- | SWM | गणपती विसर्जन |
| ५५ | २६.११.२०१८ | तिलोत्तमा मापारी | ३,१३,३००/- | शिक्षण विभाग | नृत्य स्पर्धा दिल्ली |

**लेखा विभाग**

| Sr.No. | Date | Names | Amount (Rs.) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| ५६ | ७.१२.२०१८ | संजिव सोनार | १,००,०००/- | शिक्षण विभाग | महानगरपालिका वर्धापन दिन |
| ५७ | १०.१२.२०१८ | डी.आर.निंबाळकर | ३०,०००/- | उद्यान विभाग | महानगरपालिका वर्धापन दिन |
| ५८ | १३.१२.२०१८ | अन्वर कुरेशी | १५,०००/- | स्लम विभाग | अग्रिम फॉर पीएएमवाय |
| ५९ | १५.१२.२०१८ | अन्वर कुरेशी | १५,०००/- | स्लम विभाग | अग्रिम फॉर पीएएमवाय |
| ६० | १०.१.२०१९ | सदाशिव ए बाबर | ५,०००/- | लेखा विभाग | डॉ.बाबासाहेब आंबेडकर नामविस्तार दिन |
| ६१ | २३.१.२०१९ | बालय्या संजिव प्रसाद | ३०,०००/- | क्रिडा विभाग | २६ जानेवारी -२०१९ |
| ६२ | २५.१.२०१९ | शफिक अहेमद | ५०,०००/- | वॉर्ड अभियंता कार्यालय -क्र.३ | बांबु खरेदी |
| ६३ | २८.१.२०१९ | अजय सी भोसले | ४०,६७४/- | शिक्षण विभाग | २६ जानेवारी खाऊ वाटप |
| ६४ | ०६.२.२०१९ | वामन जोगदंड | २५,०००/- | -- | चहा -कॉफी खर्च |
| ६५ | १८.२.२०१९ | हंसराज बन्सवाल | १,४३,०००/- | कला दालन | ऐतिहासिक दौरा |
| ६६ | ०८.३.२०१९ | मा.आयुक्तांचे स्वीय सहाय्यक | ७,०००/- | मा.आयुक्त दालन | चहा-कॉफी खर्च |
| ६७ | १४.३.२०१९ | डॉ.शैलजा ए मापारी | ३,०००/- | आरोग्य विभाग | जन्म -मृत्यू |
| | | | **७६,६४,७१०/-** | | |

**परिच्छेद क्र. ३ :सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात कर्मचा-यांना वितरीत केलेल्या अतिप्रदान रकमांबाबत.**

सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात महानगरपालिका कर्मचा-यांना अतिप्रदान रकमा वितरीत केल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे स्वतंत्र देण्यात येत आहे. अतिप्रदान केलेली रक्कम **रू. ७,४३,९९६/-** अद्यापपर्यत वसूल करण्यात आलेली नाही.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | | अतिप्रदान रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.एकबाल अहेमद मो.बशीर | वाहन चालक | अतिप्रदान | १८,६४१/- |
| २ | श्रीमती गंगाबाई रोशन चावरिया | स्वीपर | अतिप्रदान | २२,३०९/- |
| ३ | श्री.राजकिरण प्रल्हाद चावरिया | स्वीपर | अतिप्रदान | १८,४६५/- |
| ४ | श्री.दिपक वसंत जोशी | वॉर्ड अधिकारी | पेन्शन कॉन्ट्रीब्युशन | ६,५०३/- |
| ५ | श्री.मारोती नामदेव शेंडगे | माळी | मनपा निवासस्थान | ३६,३४८/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | श्री.विजय बाबुराव मुळे | कनिष्ठ लिपीक | अतिप्रदान | १८९३/- |
| ७ | श्री.रमेश बाबु लक्ष्मण चव्हाण | एमपीडब्ल्यू | अतिप्रदान | २२२३७/- |
| ८ | श्री.शामलाल हनुमान मोदी | चौकीदार | अतिप्रदान | ५६६७९/- |
| ९ | श्री.शेरखान सरदार खान | वाहन चालक | अतिप्रदान | ८२४६४/- |
| १० | श्रीमती हिराबाई विश्वनाथ साळवे | मजूर | अतिप्रदान | १४,८३५/- |
| ११ | श्रीमती रफिकाबेगम कुतुबोद्यीन | सहशिक्षिका | अतिप्रदान | ६९२३/- |
| १२ | शांताबाई वसंत अहिरे | सफाई मजूर | अतिप्रदान | १६,९९२/- |
| १३ | श्रीमती मंगला भास्करराव जोशी | शिक्षिका | अतिप्रदान | ७१,४२४/- |
| १४ | श्री.जालिंदर साळुबा देहाडे | वाहन चालक | अतिप्रदान | १३,३८२/- |
| १५ | श्री.उत्तम शेनफडू कांबळे | मजूर | अतिप्रदान | ८२,०००/- |
| १६ | श्रीमती द्वारकाबाई नाना डोंगरे | मजूर | अतिप्रदान | १६,०६६/- |
| १७ | राजु जगन्नाथ गायकवाड | मजूर | अतिप्रदान | १७,७३९/- |
| १८ | द्वारकाबाई कान्हुजी नवगिरे | मजूर | अतिप्रदान | १६,०४०/- |
| १९ | प्रकाश आबाजी गाडे | मजूर | अतिप्रदान | १,०८,१२०/- |
| २० | श्री.बाबुराव पांडुरंग बत्तीसे | मजूर | अतिप्रदान | १,१४,९६३/- |
| | | | **एकूण** | **७,४३,९९६** |

उपरोक्त रकमेचे समायोजन करून, महानगरपालिका फंडात भरणा करणे आवश्यक आहे. सदरील रकमा भरणा झाल्याची खात्री करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सेवानिवृत्तीपूर्वी सादर केलेल्या संचिकेत अभिप्राय नोंदविले आहे.

**परिच्छेद क्र.४: महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमा चे कलम १०५ अन्वये लेखापरीक्षण विभागास साप्ताहिक लेखे तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतूदीनुसार महानगरपालिकेचा साप्ताहिक अहवाल मा.स्थायी समितीसमोर सादर करणे बंधनकारक असते. त्यानुषंगाने लेखा शाखेने लेखापरीक्षण विभागाकडे अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक असून तशी अधिनियमात तरतूद आहे. तथापि लेखा शाखेस वारंवार पत्रव्यवहार करूनही लेखे उपलब्ध झालेले नाहीत. ही बाब गंभीर स्वरूपाची आहे.

**लेखा विभाग**

## परिच्छेद क्र.५ : महानगरपालिकेच्या मुख्य रोखकीर्द (General cash Book) व बँक खात्यातील रकमांच्या ताळमेळबाबत.

औरंगाबाद महानगरपालिकेचे विविध लेखाशिर्ष निहाय बँकेत खाते उघडण्यात आलेले आहेत. बँकेमध्ये वेळोवेळी संबंधित विभागामार्फत चलनाद्वारे रकमा भरणा होतात. प्रामुख्याने नगररचना विभाग, मालमत्ता विभाग यांचा समावेश आहे. बँकेत जमा होणा-या रकमांचा लेखा शाखेने ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तसेच मालमत्ता कराच्या वसूली रकमांचाही ताळमेळ बहुतांश प्रकरणात घेतलेला नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. लेखा शाखेने जमा व खर्चाच्या वेळीच ताळमेळ साधणे आवश्यक आहे. याबाबत कार्यवाही करून लेखे अद्ययावत ठेवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**लेखा विभाग**

## वॉर्ड कार्यालय - १ (अ)

लेखापरीक्षण अहवाल

सन २०१५-२०१६ ते सन २०१६-२०१७

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गतच्या वॉर्ड-अ कार्यालयाचे सन २०१५-१६ ते सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्याकरीता कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा /मुलेप /२४०, दिनांक २१.११.२०१७ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. वॉर्ड कार्यालयाचे लेखापरीक्षण करतांना वॉर्ड अभियंता आणि वॉर्ड अधिकारी विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांनुसार चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करण्यात आले.

लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड अधिकारी कार्यालयातील सन २०१५-२०१६ ते सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील जमा रकमांच्या संगणकीय पावत्यांचा व पावत्यांच्या संक्षिप्त अहवाल आणि वसूली/खिडकीनुसार पावत्यांचा तपशिल अहवालाशी चाचणी स्वरूपात तपासणी करण्यात आली. तसेच विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या सन २०१५-१६ ते सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील संचिका, नामांतर संचिका, बे-बाकी प्रमाणपत्राच्या संचिका, वैद्यकीय परिपूर्ती संचिका, न वटलेल्या धनादेशाची वर्षनिहाय याद्या, मालमत्ता मागणी रजिस्टरमध्ये नोंदविलेल्या नोंदी दंडात्मक कार्यवाही अंतर्गत वटविण्यात आलेल्या पावत्या, मासिक पगार पत्रके, पुरवणी देयके इत्यादीचे उपलब्ध अभिलेख्यानुसार चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करण्यात आले.

वॉर्ड- कार्यालयातील जमा बाजूचे परिच्छेद वॉर्ड अभियंता यांचे बी-वन निविदा कामाच्या संचिका, उपलब्ध अभिलेख्यानुसार चाचणी स्वरूपात तपासणी करून आढळून आलेल्या अनियमिततेबाबत जमा बाजूचे **<u>३४</u>** व खर्च बाजूचे **<u>०५</u>** असे एकूण **<u>३९</u>** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

### वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता यांच्या कार्यकाळाबाबत.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | श्री.एन.एल.चव्हाण | कार्यालय अधिक्षक तथा प्र.वॉर्ड अधिकारी | १५.१.२०१५ ते १७.५.२०१६ |
| २ | श्री.भालचंद्र पैठणे | वॉर्ड अधिकारी | १८.५.२०१६ ते आजपावेतो |
| | | | |
| १ | श्री.पि.एल.विटेकर | शाखा अभियंता तथा प्र.उपअभियंता | -- |

सदरचे लेखापरीक्षण मुख्य लेखापरीक्षक सौ.दिपाराणी माणिकराव देवतराज यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले. प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांची नांवे पुढील प्रमाणे -

१. श्री.संजय जक्कल, कार्यालयीन अधिक्षक  तथा पथक प्रमुख

२. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक

३. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक

४. श्री.विष्णु धोंडिबा ओळेकर, कनिष्ठ लिपीक

५. श्रीमती पंचशिला खरात, कनिष्ठ लिपीक

**परिच्छेद क्र.०१ : आर्थिक वर्ष २०१५-२०१६ ते २०१६-१७ या कालावधीतील अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

वॉर्ड -अ कार्यालयातील अनुषंगिक लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यात दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून द्यावे.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | मालमत्ता कर पाणीपट्टी व अकृषीक कर याबाबतचे मागणी रजिस्टर. | उपलब्ध करून दिले. |
| २ | विवाह नोंदणी संचिका. | उपलब्ध करून दिले. |
| ३ | जन्म-मृत्यू नोंद अभिलेखे. | उपलब्ध करून दिले. |
| ४ | अधिकारी-कर्मचारी सेवापुस्तके , सेवापट , हजेरीपत्रक , दैनंदिन -अहवाल, मासिक पगारपत्रके,पुरवणे देयके इत्यादी. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध. |
| ५ | वैद्यकीय प्रतीपूर्ती संचिका. | उपलब्ध करून दिले. |
| ६ | नामांतर संचिका. | उपलब्ध करून दिले. |
| ७ | रोख किर्द | उपलब्ध करून दिले. |
| ८ | न वटलेल्या धनादेशाची वर्षनिहाय यादी. | उपलब्ध करून दिले. |
| ९ | आर्थिक वर्ष २०१५-२०१६ ते २०१६-२०१७ या कालावधीतील रद्द मालमत्ता कर पावती व जनरल कर पावतीचे विवरण उपलब्ध करून देणे बाबत. | अप्राप्त. |
| १० | जड संग्रह नोंदवही. | अप्राप्त. |
| ११ | स्टॉक रजिस्टर (१०९,११०,१११) | अप्राप्त. |
| १२ | नविन /दुरूस्त कर आकारणी संचिका. | अप्राप्त. |
| १३ | बचतगटा मार्फत नियुक्त कर्मचा-यांच्या देयक संचिका. | अप्राप्त. |

| | | |
|---|---|---|
| १४ | अनुषंगिक वॉर्ड अधिकारी यांच्यामार्फत झालेल्या सर्व संचिका. | अप्राप्त. |
| १५ | कर्मचा-यांचा जॉबचार्ट. | अप्राप्त. |
| १६ | विभागा अंतर्गत कार्यरत एकूण कर्मचारी यांची पदनिहाय यादी. | अप्राप्त. |
| १७ | बे-बाकी प्रमाणपत्र अभिलेखे. | अप्राप्त. |
| १८ | धनादेश पावती पुस्तके व स्टॉक रजिस्टर. | अप्राप्त. |
| १९ | स्वच्छता साहित्याची माहिती. | अप्राप्त. |

लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने मुद्दा क्र.०९ ते १९ पर्यंतचे अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नसल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही. अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. विभागाने उक्त नुसार कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.०२ : नामांतर करणे बाबत.**

वॉर्ड कार्यालय अंतर्गत नामांतर संचिका तपासली असता मालमत्ताधारक डॉ.विशाल अर्जून महाजन, डॉ.सोनाली पिता स्मरण दहिवले यांनी औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील शिट नं.५९, व ६० सि.स.नं.२६३३/१ या मधील बांधीव आकृती एनक्लेव या इमारती पैकी तिस-या मजल्यावरील फ्लॅट नं.बी-१२ ज्याचे विक्री क्षेत्रफळ ७१.७९ चौ.मी. (बाल्कनी व बॉक्ससह) व स्वतंत्र टेरेस क्षेत्र १३.६४ चौ.मीटर खरेदी केले आहे.

नामांतरासाठी महानगरपालिकेकडे रितसर अर्ज दिनांक १३.१०.२०१५ रोजी केला आहे. एनएस-०१ वर दर्शविल्या प्रमाणे संबंधिताचे कागदपत्र दाखल केले असून बे-बाकी प्रमाणपत्र व मालमत्ता कर भरणा पावती पाहिली असता मूळ मालक विठ्ठलराव बळवंतराव घाटे हे असल्याचे दिसून येते. मात्र दस्त क्रमांक ३०२४/२०१५/३०.४.२०१५ फ्लॅटचे खरेदीखत नुसार मालक श्री.नितीन पिता हरीष घोरपडे यांनी संबंधिताला खरेदीखत करून दिल्याचे दिसते. नामांतर करतांना प्रथम खरेदी केलेल्या मालक नितीन हरीष घोरपडे यांनी विठ्ठलराव घाटे यांचे नावे दस्त करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

**विभागाने खात्री करून याचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०३ : मालमत्तेचे नामांतर करतांना कमी रक्कम वसूल केल्याबाबत.**

वॉर्ड अंतर्गत नामांतर संचिका श्री.शेख जब्बार शेख हमीद, २) हसीना बी रईस मिर्झा घर क्रमांक १-१२-३८/P सि.स.नं.२०३५/९ मालमत्ता क्रमांक A००२१०२७ प्रगती कॉलनी, मकई गेट रोड घाटी यांची संचिका पाहतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) प्रगती कॉलनी, मकई गेट रोड घाटी घर क्र.१-१२-३८/P Plot no.७ ह्या घराचे मालक श्री.ओमप्रकाश किशनराव पेंडकर यांच्या मालकीचा असून याचा खरेदी खत क्र.२९२८ आहे. प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ १५०० चौ.फूट असून १३९.४० चौ.मी.आहे.

२) संबंधिताने प्लॉटची विक्री केली असून पूर्वेकडील अर्धा भाग ६९.७० चौ.मी.असून तो श्री.शेख जब्बार शेख हमीद यांना विकला आहे. त्याचा खरेदी खत क्रमांक २९२८ दिनांक ९.६.२००८ आहे.

३) पश्चिमेकडील अर्धा भाग ६९.७० चौ.मी.असून तो मुगल हसीनाबाी कालु बेग, (शासन राजपत्राने) हसीना बी रईस मिर्झा यांना विकला आहे. त्यांचा खरेदी खत क्रमांक २९२९ दिनांक ९.६.२००८ आहे.

अशा दोन वेगवेगळ्या मालमत्ताधारकांना मालमत्ता विक्री केली आहे. व त्यांचे नामांतर जा.क्र./नामांतर/वॉर्ड-अ/३७५/१५ दिनांक २२.१२.२०१५ रोजी एकत्र दर्शवून एकच आदेश निर्गमित करून नामांतर फिस रक्कम रू.१५००/- पा.क्र.३२०२७ दिनांक १७.१२.२०१५ रोजी वसूल केली आहे. ही बाब आक्षेपार्ह असून संबंधिताकडून १५००/- कमी वसूल केले आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून खुलासा सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. कमी वसूल रक्कम रू.१५००/- चा महानगरपालिका फंडात भरणा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०४ : नामांतर करणे बाबत.**

सन २०१५-२०१६ ते सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून आर्थिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये श्रीमती नजमा बेगम रोषन खान Plot No.५२/ पार्ट क्षेत्रफळ ५२५ sq.foot मोहल्ला बिसमिल्ला कॉलनी यांनी NPO करणे बाबत. दिनांक १.२.२०१६ रोजी अर्ज सादर केला आहे. खरेदी खतानुसार मालक श्रीमती सायरा बेगम भ्र एजाज अहेमद पि.इब्राहीमखान यांच्या मालकीचा असल्याचे दिसून येते.

संचिकेतील बेबाकी प्रमाणपत्र मालमत्ता पावती पाहिली असता त्यावर शहनाज बेगम D/o मो.इब्राहीम NPO मोहम्मद सिद्यीक शेख महेमुद हे नाव असल्याचे दिसून येते. हे संयुक्तिक वाटत नाही.

**करिता विभागाने प्रत्यक्ष खात्री करून याबाबतचा लेखी खुलासा सादर करावा असे विभागास सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०५ : पाणीपट्टी भरणा NOC न घेताच नामांतर करणे बाबत.**

नामांतर बाबतचे उपलब्ध संचिकाचे अवलोकन केले असता श्री.अब्दुल अलीम खान पिता मन्नान खान CTS NO.६५५२ घर क्र. १-२३-८१ देवडी बाजार यांनी अर्ज दिनांक १०.९.२०१५ अन्वये नामांतर करणे हिबानामा (मुस्लीम व्यक्तीगत कायद्यांतर्गत) कागदपत्र सादर आहे.

संबंधिताकडून पाणीपट्टी कर भरणा करून न घेताच मालमत्ता नामांतर आदेश क्र./नामांतर/वॉर्ड-अ/३३०/२०१५ दिनांक १४.११.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. ही बाब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे. याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून पाणीपट्टी वसूलीची कार्यवाही करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त प्रकरणातील महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०६ : नामांतर करतांना रू.३०००/- न घेता कमी रक्कम वसूल करणे बाबत.**

वॉर्ड कार्यालया अंतर्गत नामांतर संचिका तपासली असता मालमत्ता धारक श्री.मोहम्मद मसर्रत मो.सिद्यीकी रा.काझीवाडा भडकलगेट यांनी औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सिटी सर्व्हे नं.२५४७/३ शिट नं.२७ येथील ब्लु स्टार अपार्टमेंट येथील बिल्डींग नंबर A मधील दुकान नं.०१ ज्याचे एकूण क्षेत्र १९.२२ चौ.मी. आहे.

नामांतरासाठी महानगरपालिकेकडे रितसर अर्ज दिनांक ३०.५.२०१५ रोजी केला आहे. सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. श्रीमती शे.मुझहत सुल्ताना मोहम्मद असलम काझीवाडा भडकलगेट औरंगाबाद यांचे नावे खरेदी खत केलेले दिसून येते.

सदरील मिळकत ही व्यावसायिक स्वरूपाची असून नामांतर फिस रू.३०००/- न घेता १५००/- फिस भरून घेतल्याचे दिसून येते.

करिता विभागाने खात्री करून याचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**रक्कम रू.१५००/- चा कमी भरणा झालेला आहे. सदरील रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०७ : कागदपत्राची पूर्तता न करताच नामांतर करणे बाबत.**

विभागा अंतर्गत मालमत्ता नामांतरचे उपलब्ध प्रकरण श्री.मनिष सत्यनारायण नवलू CTS No.६९५, फ्लॅट नं.६, नंदनवन कॉलनी ,यांना आदेश क्र./नामांतर/वॉर्ड-अ/२५०/२०१५ दिनांक २.८.२०१५ अन्वये मालमत्ता नामांतर आदेश पारित केलेले आहे. प्रकरणाचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास येतात.

१. संबंधित मालमत्ता धारकांनी सन २०१५-२०१६ पर्यंत पाणी पट्टीचा भरणा/NOC करून घेतलेला नाही.

२. नामांतर फी रू.१५००/- इतकी असतांना रू.१०००/- इतक्याच रकमेचा भरणा करून घेतलेला आहे. म्हणजेच रू.५००/- कमी भरणा आहे.

३. मालमत्ता कर भरणा केल्याचे प्रमाणपत्र सन २०१४ पर्यंतच भरणा दर्शविलेले आहे. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षापर्यंत कर भरणा करून न घेतल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी बाब आहे.

वरील आक्षेपित मुद्यांबाबत विभागाने तपासून खात्री करावी, प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही/पूर्तता करून तसा लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केला नाही.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून मुद्या क्र. २ मधील कमी भरणा रक्कम रू.५००/- महानगरपालिका फंडात भरणा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.०८ : New Property Owner (N.P.O.) कडून शुल्क वसूल करतांना कमी शुल्क वसूल केले बाबत.

अर्जदार शैलेन्द्र मोहनराव तायडे, भिमनगर भावसिंगपुरा संगणक क्र.A००२५६४२ यांनी ही मिळकत विकत घेतली आहे. NPO करण्यासाठी दिनांक २९.१२.२०१४ रोजी अर्ज सादर केला आहे. त्यानुसार NPO साठी आवश्यक कागदपत्रे सादर केले आहे.

संचिकेची तपासणी करतांना खालील आक्षेपित बाबी निदर्शनास आल्या.

१. संबंधित मालमत्ता ही व्यावसायीक असून करयोग्य मूल्य ११८१५/ एवढे असतांना रक्कम रूपये ९०००/- शुल्क वसूल करणे आवश्यक होते. मात्र रक्कम रूपये ४०००/- F/०४/१४६७७ दिनांक १७.७.२०१५ अन्वये भरणा केले आहे. म्हणजेच ५०००/- चा कमी भरणा झाला आहे.

२. जा.क्र.मनपा/वॉर्ड-अ/१०७ दिनांक ९.१.२०१५ अन्वये बेबाकी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले असून सन २००६ ते २०१५ दिनांक २७.१२.२०१४ रोजी रूपये १६५५५/- भरणा केल्याचे प्रमाणपत्र वॉर्ड अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले आहे. मात्र AS/३२४८८ दिनांक ११.१२.२०१४ रोजी रक्कम रूपये ७०४३०/- सन २०१४-२०१५ पर्यंत भरणा केल्याचे दर्शविण्यात आले आहे. प्रत्यक्षात बे-बाकी दर्शविलेली रक्कम व भरणा रक्कम यामध्ये ताळमेळ दिसून येत नाही.

३. NPO आदेश जा.क्र.मनपा/वॉर्ड अ/२४७/ दिनांक ३१.७.२०१५ देतांना संपूर्ण रक्कम भरणा करणे आवश्यक असतांना सन २०१५-२०१६ चा मालमत्ता कर भरणा केलेला नाही.

**याबाबत प्रत्यक्ष खातरजमा करून विभागाने खुलासा सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. रक्कम रू.४५००/- चा महानगरपालिका फंडात भरणा करून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०९ : आर्थिक वर्ष २०१५-२०१६ व २०१६-२०१७ मधील वॉर्ड- अ (१) कार्यालया अंतर्गत मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कर भरणा केल्यानंतर अनादर झालेल्या (Dishonour) चेक बाबत.**
**रक्कम रू.४,५५,३७७/- (सन १५-१६) रक्कम रू.५,१२,३७८/- (१६-१७)**

वॉर्ड कार्यालयात सन २०१५-२०१६ या वर्षातील मालमत्ता कर वसूल करतांना रक्कम **रू.४,५५,३७७/-** चे धनादेश अनादर (Dishounour) झालेले आहे. (**सविस्तर यादी खालील प्रमाणे**) यादीतील अ.क्र.३ वरील रक्कम रू.४७,३२१/- ही संगणकीय मालमत्ता पावती क्र.As-१०५५०८, दिनांक २६.३.२०१८ अन्वये आक्षेपाअंती भरण्यात आल्याचे कळविण्यात आलेले आहे. उर्वरीत रक्कम रू.४,०८,०५६/- अद्यापही महानगरपालिका फंडात भरणा करण्यात आलेली नाही.

**सन २०१५-२०१६**
**धनादेश अनादर यादी.**

| अ.क्र. | मालमत्ता क्र. व जुना मालमत्ता क्र. | मुल्य निर्धारण नांव आणि पत्ता | पावती क्र. व दिनांक | धनादेश क्र. व दिनांक | बँकेचे नांव | रक्कम रू. | धनादेश अनादर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | A०००२४५६ २/९ pg/२९८ | अ.वाजीद कुरैशी व इतर जयसिंगपुरा १-९-४९/P औरंगाबाद | ६८३१३ १६.०२.२०१६ | ४४३०८१ ३०.०१.२०१६ | YES Bank Ltd. | १२०००/- | १.३.२०१६ |
| २ | A०००२४५९ २/९ pg/३०४ | ठोंबरे भाऊसाहेब किसनराव पडेगांव P.no.१०, | ६५०७८ ०४.०२.२०१६ | ९९६०९८ ०४.०२.२०१६ | Punjab National Bank | ३२९८७/- | १७.२.२०१६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | A०००२८०० २/c pg/१७४ | फिजाबाई भ्र सादीक हुसैन २) शिरीन बानो ३) नसरीन बानो ४) वाखर ५) शरफुद्दीन पिता सादीक हुसैन बोहरी कठडा ३-७-८२ औरंगाबाद | ६९०४४ १७.२.२०१६ | ३०५५६१ १६.२.२०१६ | State Bank of India | ४७३२१/- | १.३.२०१६ |
| ४ | A०००१८४५६ WA/११/११/ pg-२७४ | म्हस्के वच्छलाबाई प्रल्हाद पडेगांव,औरंगाबाद. | ७७१०९ १०.३.२०१६ | ३४१५१२ १०.३.२०१६ | Axis Bank Ltd. | १००००/- | १९.३.२०१६ |
| ५ | A००२२९८५ WA/c G/२५५ | सचिन मधुकर चांबुरकर चिनार गार्डन D-३९ औरंगाबाद. | ८९१२४ ३१.३.२०१६ | ०७५३२२ ३०.३.२०१६ | Axix Bank | ५९३५.०० | ४.४.२०१६ |
| ६ | A००२५७४१ ४४९४/२०१२-१३ | लक्ष्मणराव रामराव झरे पहाडसिंगपुरा,आर्यन गारमेंट औरंगाबाद. | ६३९५४ ३०.१.२०१६ | ०२५६६५ ३०.१.२०१६ | Development Credit Bank Ltd. | १०४६९४/- | १६/०२/२०१६ |
| ७ | A००२९४६० ५/१,२,३ PG-२९५ | श्रीमती गेंदाबाई मोहनलाल अग्रवाल सराफा ३-५-४३, औरंगाबाद. | ६६८२० ११.२.२०१६ | ८४३२५४ ११.२.२०१६ | ICICI Bank | १५००००/- | १७/०२/२०१६ |
| ८ | A००३२३०४ Reg.pg No. १०/११-३६३ | श्री.श्रीधर मुरलीधर शिंदे H.No.१-१८-५२/P, Z.P.क्वॉर्टरशेजारी नारळीबाग औरंगाबाद. | ५७३६७ ३१.१२.२०१५ | ०००३९७ ३१.१२.२०१५ | Janata Sahkari Bank Ltd | ५३८५/- | ०२/०१/२०१६ |
| ९ | -- | श्री.शरीफ अली तय्यब अली H.No.३-४-१ चौक,औरंगाबाद. | ७३४०६ ०१.०३.२०१६ | ३०६९६३ २६.०२.२०१६ | Dena Bank | १४२२२/- | ०९/०३/२०१६ |
| १० | -- | श्री.शरीफ अली तय्यब अली H.No.३-४-१ चौक,औरंगाबाद. | ७३४१२ ०१.०३.२०१६ | ४७९५७८ २१.०२.२०१६ | Bombay Mercantile Co-Op Bank Ltd. | १५२२२/- | ०९/०३/२०१६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | -- | श्री.शरीफ अली तय्यब अली H.No.३-४-१ चौक,औरंगाबाद. | ७४६६१ ०४.०३.२०१६ | ६७२१३८ २२.०२.२०१६ | Malkapur Urban co-op Bank | ७६११/- | १०/०३/२०१६ |
| १२ | A००३२९२९ Reg.No.४/C pg-२६३ | श्रीमती गंगुबाई घरणे ३-४-४९, चौक,औरंगाबाद | ७२२५४ २७/०२/२०१६ | १०४६६५ २४/०२/२०१६ | State Bank of Patiala | ५००००/- | १९/३/२०१६ |
| | | | | | | **४,५५,३७७/-** | |

सन २०१६-२०१७ या वर्षातील मालमत्ता कर वसूल करतांना रक्कम **रू.५,१२,३७८/-** चे धनादेश अनादर (Dishounour) झालेले आहे.**(सविस्तर यादी खालील प्रमाणे)** यादीतील अ.क्र.१ वरील रक्कम रू.२५,०००/- ही संबंधिताने डीडी क्र.००११७९५, दिनांक १८.१.२०१८ अन्वये मालमत्ता पावती क्र. As-८४७४६, दिनांक १९.१.२०१८ अन्वये आक्षेपाअंती भरण्यात आल्याचे कळविण्यात आलेले आहे. उर्वरीत रक्कम रू.४,८७,३७८/- अद्यापही महानगरपालिका फंडात भरणा करण्यात आलेली नाही.

## सन २०१६-२०१७
## धनादेश अनादर यादी

| अ.क्र. | मालमत्ता क्र. व जुना मालमत्ता क्र. | मुल्य निर्धारण नांव आणि पत्ता | पावती क्र. व दिनांक | धनादेश क्र. व दिनांक | बँकेचे नांव | रक्कम रू. | धनादेश अनादर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | A०००२८०६ २/c pg/१८६ | श्रीमती गुलाबबाई मगनसा साहुजी व इतर ३-७-८४,Cts No.६१२५ गुलाब कुंज बिल्डींग बोहरी कठडा (सराफा रोड) (भ्र.क्र.९८२२०४९३३१) औरंगाबाद. | ८७२८७ ३१/०३/२०१७ | ००१४८३ ०१/०२/२०१७ | ICICI Bank Ltd. | २५००० | ११/०४/२०१७ |
| २ | A०००४३१६ ११/१ pg/२३६ | जयश्री भ्र दिलीप पवार २) जयश्री पिता संतुकराव कोलते पडेगांव P.No.९२ | ६९९५२ ०९/०२/२०१७ | ०००७३६ ०९/०२/२०१७ | HDFC Bank Ltd. | १४०४१ | १७/०२/२०१७ |

| अ.क्र. | मालमत्ता क्र. व जुना मालमत्ता क्र. | मुल्य निर्धारण नांव आणि पत्ता | पावती क्र. व दिनांक | धनादेश क्र. व दिनांक | बँकेचे नांव | रक्कम रू. | धनादेश अनादर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | A०००५४१०<br>५/३ pg/२९९ | महेमुदउल्ला खान अहेमदउल्ला खान, मंजुरपुरा १-२७-३३/p औरंगाबाद. | ६३६५६<br>१९/१२/२०१६ | ०६०८१४<br>१९/१२/२०१६ | Bombay Mercantile Co-op Bank | ७५०५ | २३/१२/२०१६ |
| ४ | A०००८७९४<br>११/२ pg-**२४५** | राना साहेबराव मन्नुलाल पडेगांव २३१,औरंगाबाद. | ६२६४५<br>०९/१२/२०१६ | १२७१३१<br>०९/१२/२०१६ | Saraswat Co-op Bank Ltd. | ८५९७५ | १७/१२/२०१६ |
| ५ | A००१८४५६<br>WA/११/११/pg-२७४ | म्हस्के वच्छलाबाई प्रल्हाद पडेगांव औरंगाबाद. | ६१७५८<br>०१/१२/२०१६ | ३३९३७५<br>२०/११/२०१६ | Bank of Baroda | १००००/- | ०५/१२/२०१६ |
| ६ | A००२५२७५ | श्रीमती लक्ष्मी पुनमचंद भाटी १-१६-८०/p धनमंडी जुना बाजार, CTS No.३३९७/२, औरंगाबाद. | ७९६७४<br>१९/०३/२०१७ | ०२८७६१<br>१५/०३/२०१७ | JAnta Sahkari Bank Ltd.Pune | ४५४५५/- | २९/०३/२०१७ |
| ७ | A००३४७६५<br>WA/३२ A/२१४ | प्रसन्नकुमार सुर्यकांत सुराणा प्रणव प्लाझा औरंगपुरा shop no.२, औरंगाबाद. | ७६५७६<br>१२/०३/२०१७ | ७५६६७१<br>०९/०३/२०१७ | Malkapur Urban Co-Op Bank | ६६४७/- | २२/०३/२०१७ |
| ८ | A००३५१६७<br>Ass No.१७९४/ २०१४-१५ | मूळ मालक उपआयुक्त महानगरपालिका औरंगाबाद भाडेकरू कर भरणार श्री.राधेशाम एम.वर्मा shop no.१३, पिया मार्केट मनपा व्यापारी संकुल (तळ) | ८८९९६<br>३१/०३/२०१७ | ३०३६३९<br>३१/०३/२०१७ | Lokvikas Nagri Sahkari Bank | ६४७९/- | ११/०४/२०१७ |

| अ.क्र. | मालमत्ता क्र. व जुना मालमत्ता क्र. | मुल्य निर्धारण नांव आणि पत्ता | पावती क्र. व दिनांक | धनादेश क्र. व दिनांक | बँकेचे नांव | रक्कम रू. | धनादेश अनादर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | मूळ मालक उपआयुक्त महानगरपालिका औरंगाबाद भाडेकरू कर भरणार श्री.राधेशाम एम.वर्मा shop no.१३, पिया मार्केट मनपा व्यापारी संकुल (तळ) | ८८९८० ३१/०३/२०१७ | ३०३६४० ३०/०३/२०१७ | Lokvikas Nagri Sahkari Bank | ५०००/- | ११/०४/२०१७ |
| १० | A००३५१७३ Ass No.१७९९/ २०१४-१५ | मूळ मालक उपआयुक्त महानगरपालिका औरंगाबाद भाडेकरू कर भरणार श्री.पंकज प्रकाशचंद shop no.१८, पिया मार्केट मनपा व्यापारी संकुल (तळ) | ८९०२५ ३१/०३/२०१७ | ००४२५४ ३०/०३/२०१७ | Khamgaon Urban Co-Op Bank Ltd | १५३०८/- | ११/०४/२०१७ |
| ११ | A००३५१७५ Ass No.१८००/ २०१४-१५ | मूळ मालक उपआयुक्त महानगरपालिका औरंगाबाद भाडेकरू कर भरणार श्री.पंकज प्रकाशचंद shop no.१९, पिया मार्केट मनपा व्यापारी संकुल (तळ) | ८९०१७ ३१/०३/२०१७ | ००४२५४ ३०/०३/२०१७ | Khamgaon Urban Co-Op Bank Ltd | १५३०८/- | ११/०४/२०१७ |
| १२ | A००३५१७६ Ass No.१८०१/ २०१४-१५ | मूळ मालक उपआयुक्त महानगरपालिका औरंगाबाद भाडेकरू कर भरणार श्री.पंकज प्रकाशचंद shop no.१९, पिया मार्केट मनपा व्यापारी संकुल (तळ) | ८९०२० ३१/०३/२०१७ | ००४२५४ ३०/०३/२०१७ | Khamgaon Urban Co-Op Bank Ltd | १५३०८/- | ११/०४/२०१७ |

| अ.क्र. | मालमत्ता क्र. व जुना मालमत्ता क्र. | मुल्य निर्धारण नांव आणि पत्ता | पावती क्र. व दिनांक | धनादेश क्र. व दिनांक | बँकेचे नांव | रक्कम रू. | धनादेश अनादर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | A००३५१७८ Ass No.१८०७/ २०१४-१५ | मूळ मालक उपआयुक्त महानगरपालिका औरंगाबाद भाडेकरू कर भरणार अभय shop no.२७, पिया मार्केट मनपा व्यापारी संकुल (तळ) | ८९०२२ ३१/०३/२०१७ | ००४२५४ ३०/०३/२०१७ | Khamgaon Urban Co-Op Bank Ltd | १०३५२/- | ११/०४/२०१७ |
| १४ | A००३४६४६ | श्री.फुलचंद पोपटराव तुपे साई पॅलेस पडेगांव औरंगाबाद. | ८८९१९ ३१.३.२०१७ | ९४७५२२ २६.०३.२०१७ | State Bank of India | २५००००/- | ११/०४/२०१७ |
| | | | | | | **५,१२,३७८/-** | |

निगोशिएबल इन्स्टुमेन्ट ॲक्ट १९८८ कलम १३८ अन्वये धनादेश अनादर झाल्यानंतर काय कार्यवाही केली याबाबत अभिलेखे उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही बाबत खातरजमा करता आलेली नाही. विभागाने प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून अनुपालन दर्शवावे.

**अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने अनुपालन दर्शविलेले नाही. याबाबत विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू. ४,०८,०५६+४,८७,३७८=८,९५,४३४/- संबंधिताकडून वसूल करावे. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१० : नामांतर बाबत.**

वॉर्ड कार्यालयातील नामांतर संचिका जा.क्र./नामांतर/वॉर्ड-अ/३६, दिनांक २०.५.२०१६ (१६-१७) मोहल्ला प्रगती कॉलनी, घर नं.१-१२-९२ सिटी सर्व्हे नं.२१५३ ही श्रीमती सय्यदा खिजर आरा मोहम्मद अब्दुल रहीम यांनी खरेदी केली असून संचिका पाहतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. नामांतरसाठी संबंधीताचा अर्ज नाही. नामांतरासाठी नोटीस मध्ये मिळकत विकणाराचे नांव श्रावण त्रिंबक शेंडगे आहे. मालमत्ता कर भरणा पावती क्रमांक As/७०५४ २३.५.२०१४ वर सन (१४-१५) पर्यंत कर भरणा केला आहे.

२. मालमत्ता पत्र क्र.२१५३ वर श्री.श्रावण त्रिंबक रोडगे इतर यांचे नांव आहे. खरेदी खत आधारे लिहून देणार रोडगे यांनी खरेदी खत करून दिले आहे. म्हणजेच अ.क्र. १ व २ मध्ये वेगवेगळे नांव असतांना नामांतर करण्यात आले आहे.

३. नामांतर करतांना सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ चा मालमत्ता कर पाणीपट्टी भरणा न करता नामांतर करण्यात आले आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष तपासणी करून खुलासा सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११ : नामांतर करतांना शुल्क कमी घेतले बाबत.**

अर्जदार शिवकन्या शामसुंदर लड्डा, चेतन शामसुंदर लड्डा मोहल्ला प्रणव प्लाझा औरंगपुरा घर क्रमांक A-१, A-२ यांनी नामांतरासाठी अर्ज सादर केला असल्याचे सादरीकरणात नमूद आहे.

संचिकेची पाहणी करतांना खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. अर्जदारानी दर्शविलेली मालमत्ता ही व्यावसायीक असून वॉर्ड कार्यालयातील रजिस्टर नोंदी नुसार करयोग्य मूल्य १८७२८ एवढे असून त्यानुसार नामांतर शुल्क रू. ९०००/- घेणे आवश्यक असतांना ३०००/- रू.शुल्क वसूल केले आहे. म्हणजेच ६०००/- चा कमी भरणा केला आहे.

२. संचिकांची तपासणी करतांना त्यामध्ये अर्ज सादर केलेला नाही, नोटीस नाही, वारसा हक्कांबाबत सक्षम कागदपत्रे नाही.

करीता, वरील मुद्यांबाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास लेखी अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता मुद्या क्र. १ मधील आक्षेपित रक्कम रू.६०००/- चा भरणा संगणकीय जनरल पावती क्र.F१०४/४७०३७,दिनांक ६.१.२०१८ अन्वये भरणा केला आहे. मुद्या क्र.२ बाबत अद्यापही खुलासा अप्राप्त आहे. **उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२ : विवाह मंडळाची नोंदणी बाबत.**

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८,१९९९ व सा.आ.वि.अधिसूचना क्रमांक विनोका २००७/९३८/प्र.क्र.२३७/ कु.क.२, दिनांक १ नोव्हेंबर २००७ अन्वये आपल्या कार्यक्षेत्रातील विवाह जुळविणारी वधु वर सुचक मंडळे अथवा व्यक्तींनी विवाह निबंधकाकडे नोंदणी करणे अनिवार्य व कायद्याने बंधनकारक आहे. तसेच विवाह मंडळाच्या नोंदणीसाठी विवाह मंडळ चालविणारे व्यक्ती किंवा व्यक्तीचा गट अशा विवाह मंडळाच्या नोंदणी करीता, नमुणा -अ मध्ये विवाह निबंधकाकडे लेखी अर्ज किती प्राप्त झाले व या अर्जासोबत नोंदणी शुल्क रू.२०००/- प्रमाणे किती प्राप्त झाले याबाबतची सविस्तर माहिती लेखापरीक्षणास आवश्यक असल्याने ती माहिती उपलब्ध करून देण्यात यावी असे सूचित केले असता **विभागाने जा.क्र.मनपा/वॉर्ड-अ/६६/२०१८, दिनांक ११.१.२०१८ रोजी पत्र देवून डिसेंबर २०१७ अखेरपर्यंत एकही विवाह मंडळाची नोंदणी केलेली नाही असे कळविले आहे.**

**परिच्छेद क्र.१३ : सन २०१५-२०१६ या वर्षातील नामांतर फी रक्कम कमी वसूली बाबत. (रक्कम रू.४५००/-)**

सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त/कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर मुल्यावर आकारावयास पाहिजे असलेली रक्कम रू.१५००/- वसूल न करता विभागाने रक्कम रू.१०००/- वसूल केलेली आहे.

| अ.क्र. | नांव व पत्ता | नामांतर आदेश क्र. | घ्यावयास पाहिजे असलेली रक्कम रू. | घेण्यात आलेली रक्कम | कमी रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.राजु गोविंद मस्के घर क्र.५-१-९६/२ कोतवालपुरा | आदेश क्र./नामांतर/वॉर्ड अ/२४२/ २०१५ दि.२२.७.२०१५ | १५००/- | १०००/- | ५००/- |
| २ | श्रीमती रंजना बन्सी साळवे घर क्र.११२, मो.गुलाबवाडी घाटी | आदेश क्र./नामांतर/वॉर्ड अ/१९३/ २०१५ दि.२.५.२०१५ | १५००/- | १०००/- | ५००/- |
| ३ | श्रीमती रईसा बेगम अब्दुल खलील, CTS No.६६०७, F.No.८, रोहिला गल्ली | आदेश क्र./नामांतर/वॉर्ड अ/१८६/ २०१५ दि.११.५.२०१५ | १५००/- | १०००/- | ५००/- |
| ४ | डॉ.नासेरखान मुनिर खान संबिहा सुलताना भ्र. डॉ.नासेर खान CTS No.१३३५०, घर क्र.२-८-६६/P | आदेश क्र./नामांतर/वॉर्ड अ/१९४/ २०१५ दि.२०.५.२०१५ | १५००/- | १०००/- | ५००/- |
| ५ | रमेश मन्नुलाल कंदे CTS.No.१७५८ H.No.१-३-१४, बेगमपुरा | आदेश क्र./नामांतर/वॉर्ड अ/१८३/ २०१५ दि.५.५.२०१५ | १५००/- | १०००/- | ५००/- |
| ६ | वर्षा पिता विरसेत श्रीसुंदर सर्व्हे नं.५९४ H.No.८/१,शातीपुरा | आदेश क्र./नामांतर/वॉर्ड अ/१९६/ २०१५ दि.२७.५.२०१५ | १५००/- | १०००/- | ५००/- |
| ७ | सय्यद फईमोद्दीन गाझीयोद्दीन बियाबानी CTS.No.४००२ H.No.१-२३-४१ | आदेश क्र./नामांतर/वॉर्ड अ/१९०/ २०१५ दि.२०.५.२०१५ | १५००/- | १०००/- | ५००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | प्रकाश रंगनाथ शिंदे<br>CTS NO १३१७<br>H.No.१-८-४१<br>बेगमपुरा | आदेश क्र./नामांतर/वॉर्ड अ/१८२/<br>२०१५ दि.२.५.२०१५ | १५००/- | १०००/- | ५००/- |
| ९ | श्री.मनिष सत्यनारायण नवालू<br>रा.Flat No.६ P.No.१८<br>नंदनवन कॉलनी | -- | १५००/- | १०००/- | ५००/- |
| | | | **१३५००/-** | **९०००/-** | **४५००/-** |

**तरी रक्कम रू.४५००/- वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करून तसा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. रक्क्म रू.४५००/- चा महानगरपालिका फंडात भरणा करून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१४ : नामांतर शुल्क कमी आकारले बाबत.**

मालमत्ताधारक अर्जदार गणेश पुंडलिक सोनवणे २) मणेश पुंडलिक सोनवणे, मोहल्ला हर्सूल, औरंगाबाद plot no.१८७/१/D संगणक क्र.A००३१२१९ यांनी नामांतर करणे संबंधी दिनांक ११.८.२०१५ रोजी अर्ज सादर केला आहे.

सदर मिळकत प्रेमराज दुलीचंदसा साहुजी यांची असून नोंदणीकृत खरेदीखत अं.ग.ग-५/८०५१/१/२८/२०१३ आधारे श्री.गणेश पुंडलिक सोनवणे, मणेश पुंडलिक सोनवणे यांनी खरेदी केली आहे.

नामांतर करतांना मालमत्तेचे करयोग्य मूल्य ३६०००/- असून त्यानुसार रक्कम रूपये ४५००/- शुल्क वसूल करणे आवश्यक होते. तसे न करता १५००/- रू. वसूल करण्यात आले. म्हणजेच ३०००/- रू. कमी वसूल केले आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष तपासणी करून लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. रक्क्म रू.३०००/- चा महानगरपालिका फंडात भरणा करून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१५ : जनरल पावती क्रमांक ७०२ च्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड कार्यालयात जनरल पावती क्रमांक ७०२ महानगरपालिका अंतर्गत भांडार विभागातून निर्गमित करण्यात आले असून पावती क्रमांक ७०१०१ ते ७०२०० पर्यंत पावत्या स्वच्छता निरीक्षक यांनी वापरले आहे. दिनांक ७.४.२०१६ ते २२.६.२०१६ या कालावधीत जनरल पावती पुस्तक वापरण्यात आले आहे.

मात्र पावती क्रमांक ७०१९५ वर खाडाखोड करून रक्कम रू.५००/- चा भरणा दिनांक ८.७.२०१६ रोजी केल्याचे दर्शविले आहे. ही बाब गंभीर स्वरूपाची आहे.

**याबाबत विभागाने खात्री करून लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती खुलासा सादर करावा.**

**परिच्छेद क्र.१६ : जनरल पावती क्रमांक ४०१ मध्ये पावती क्रमांक ४००४५ नसले बाबत.**

जनरल पावती पुस्तक क्रमांक ४०१ ची तपासणी केली असता पावती क्रमांक ४००४५ च्या मूळप्रत, सत्यप्रत पावती पुस्तकात नाही. जनरल पावती पुस्तक कोणी वापरले आहे. याबाबत विभागाकडे स्टॉक रजिस्टर नाही, ही बाब गंभीर स्वरूपाची आहे. विभागाने प्रत्यक्ष खात्री करून याबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती खुलासा सादर करावा.**

**परिच्छेद क्र.१७ : मालमत्ता कर भरणा पावतीची रक्कम व धनादेश रकमेत तफावतीबाबत.**

जमा बाजूचे लेखापरीक्षणा अंतर्गत मालमत्ताधारक यांनी दिलेले धनादेश रक्कम व प्रत्यक्ष मालमत्ता कर भरणा केल्याची पावती मध्ये रकमेची तफावत दिसून आली. याबाबत खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मालमत्ताधारक श्री.हरासिंग पन्शीसिंग राजपूत, हॉटेल योगेश ज्युब्ली पार्क मालमत्ता क्र. A००२५८६९, धनादेश क्र.५८१६२८ दिनांक १२.३.२०१६ रक्कम रू.२०,०००/- इतक्या रकमेचा धनादेश दिलेला आहे.

   तथापि प्रत्यक्ष मालमत्ता कर भरणा पावती क्र.As/७८१५४ दिनांक १२.३.२०१६ रक्कम रू.६३५२/- अशी आहे. सोबत कॅश रजिस्टर नोंद तपासली असता रू.२०,०००/- भरणा केल्याची नोंद घेतलेली आहे. सदर बाब ही संयुक्तिक वाटत नाही.

२. मालमत्ताधारक श्री.मोहन दत्तात्रय पावटेकर, मालमत्ता क्र.A०००६९८६, धनादेश क्र.२१७८१३ दिनांक २०.६.२०१६ रू.१४,१८१/- इतक्या रकमेचा धनादेश दिलेला आहे.

तथापि, मालमत्ता कर भरणा पावती क्र.As/२९९८८, दिनांक २०.६.२०१६ रू.११,१९९/- अशी असून सोबत कॅश रजिस्टरची नोंद तपासली असता रू.१४,१८१/- अशी दर्शविलेली दिसून आली. सदर बाब ही संयुक्तिक वाटत नाही.

३. मालमत्ताधारक श्री.नईमोद्दीन मुनीरोद्दीन वॉर्ड-अ मालमत्ता क्र.A०००६९२० च्या मालमत्ता करापोटी रू.१७,१५०/- इतक्या रकमेचा भरणा केल्याची नोंद आहे. मालमत्ता कर भरणा पावती दिनांक २४.३.२०१३ क्र. As/८२७८९ वर रू.१४,१६८/- अशी नोंद आहे.

तसेच मालमत्ता पावती क्र.As/८२७८९ दिनांक २४.३.२०१७ रू.१७,१५०/- सोबत कॅश रजिस्टरची तपासणी केली असता रू.१७,१५०/- इतक्या रकमेची नोंद दिसून येते. ही बाब संयुक्तिक वाटत नाही. तथापि विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्रीअंती खुलासा करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती खुलासा सादर करावा.**

**परिच्छेद क्र.१८ : श्री.एस.डी.कुलकर्णी कनिष्ठ लिपीक यांचे वडीलांचे वैद्यकीय खर्च परतावा रक्कम रू.४०,७४३/- बाबत.**

विभागाने उपलब्ध करून दिलेल्या वैद्यकीय खर्चाच्या परतावा बाबतच्या एकूण (६) संचिका तपासल्या असता यामध्ये श्री.एस.डी.कुलकर्णी कनिष्ठ लिपीक वॉर्ड-अ यांनी त्यांचे वडीलांच्या औषध उपचाराकरीता रू.४०,७४३/- इतकी रक्कमेचा प्रस्ताव दाखल करून वैद्यकीय परताव्याचा लाभ घेतलेला दिसून आला.याबाबतची संचिका तपासली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाब दिसून येते.

१. श्री.एस.डी.कुलकर्णी, कनिष्ठ लिपीक वॉर्ड-अ कार्यालय यांनी आई/वडील निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारक नाहीत असे स्वाक्षरीने दाखला दिलेला आहे.

तथापि संबंधिताचे वडील नामे श्री.दिगंबरराव कुलकर्णी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सेवानिवृत्त झालेले असून सेवानिवृत्ती वेतन घेत असल्याचे कळते. म्हणजेच संबंधिताने लिहून दिलेला दाखला बरोबर नसून वडीलांकरीता वैद्यकीय खर्च परतावा कार्यालयीन आदेश क्र./मनपा/वॉर्ड-अ/२०३१/२०१५, दिनांक १६.६.२०१५ अन्वये रू.४०,७४३/- लाभ दिलेला आहे, जो की अनुज्ञेय ठरत नाही. विभागाने सदरची बाब पुन्हा तपासून खात्री करावी रू.४०,७४३/- वसूल करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१९ : नामांतर शुल्क कमी आकारणे बाबत.**

आर्थिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये अर्जदार कृष्णा राजेंद्र मालु P.No.३ व ४ मोहल्ला भावसिंगपुरा औरंगाबाद यांनी नामांतर करणेसाठी दिनांक २.१.२०१७ रोजी अर्ज सादर केला असून सदर मिळकत ही आपल्या मागणी रजिस्टर नुसार श्री.मोहम्मद युसुफ मोहमद इसाक यांच्या मालकीची आहे. खरेदी खत क्रमांक अ.ग.ग.-२/६१०८/२०१६, दिनांक ८.९.२०१६ अन्वये अर्जदार कृष्णा राजेंद्र मालु यांनी विकत घेतलेली आहे.

भूखंड क्र.Plot No.४ मालमत्ता क्र.A००३३६२३
भूखंड क्र.Plot No.३ मालमत्ता क्र.A००३३६२२ हे वेगवेगळे असतांना प्रतिज्ञापत्र Plot No.३ चे संचिकेत दर्शविण्यात आले आहे.

नामांतर शुल्क वसूल करतांना रक्कम रू.१५०० पावती क्रमांक F/०४/३२९२८ दिनांक २५.०१.२०१७ रोजी भरणा केला आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

करिता, याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून कमी वसूल रक्कम रू.१५००/- वसूल करून अहवाल सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**कमी वसूल रक्कम रू.१५००/- संबधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२० : मालमत्ता कर पाणीपट्टी कर भरणा नसतांनाही नामांतर करणे बाबत.**

**परिच्छेद क्र.१० : सन २०१७-२०१८ या वर्षात दिनांक १३.१०.२०१७ रोजी विवाह नोंदणी फी रू.२१५/- महानगरपालिका फंडात कमी भरणा केल्याबाबत.**

दिनांक १३.१०.२०१७ रोजी झोन क्र.४ मध्ये जमा झालेल्या विवाह नोंदणीच्या संक्षिप्त अहवाल व पावत्यांच्या तपशिल यामधील रक्कम व बँकेत जमा केलेली रक्कम यामध्ये रू.२१५/- कमी भरणा केल्याचे निदर्शनास आले. संबंधित रोखपालास याबाबत विचारणा केली असता वॉर्ड कार्यालयाने संगणक विभागास पत्र देवून MRD ३६७ दिनांक १३.१०.२०१७ रक्कम रू.२१५/- ची पावती डबल झाल्यामुळे रद्य करण्याचे कळविले आहे. परंतू अद्याप पावेतो पावती रद्य झालेली नाही. तसेच महानगरपालिका फंडात अद्यापही रू.२१५/- चा भरणा विभागाने केलेला नाही.

सदरील प्रकरणी विभागाने तातडीने आपल्या स्तरावर अंतीम निर्णय घ्यावा. तसेच महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने संबंधिताकडून रू.२१५/- वसूल करावे. महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११: सन २०१७-१८ या वर्षात फेब्रुवारी महिन्यातील मालमत्ता कराच्या पावत्यांच्या रकमेतील तफावतीबाबत.**

झोन क्र. ४, दिनांक ९.२.२०१८ रोजी कर निर्धारण विभाग मालमत्ता कराच्या पावत्यांचा संक्षिप्त अहवाल एकूण रक्कम रू.२,२२,९९५/- अशी आहे. पावत्यांच्या संक्षिप्त अहवाल तपशिल अहवालामध्ये सुध्दा हीच रक्कम नमूद आहे.

| | | |
|---|---|---|
| दिनांक ९.२.२०१८ ची एकूण वसूल रक्कम | | **५,९३,९६६/-** |
| मालमत्ता कर रू. | २,२२,९९५/- | |
| पाणीपट्टी व इतर रू. | ३,७०,९७१/- | |
| **एकूण रक्कम रू.** | **५,९३,९६६/-** | |

**बँकेत भरणा रक्कम**

| | | |
|---|---|---|
| **रोख** | **-** | **रू.५,२७,७०८/-** |
| **धनादेश** | **-** | **रू.६६,२५८/-** |
| **एकूण** | **-** | **रू.५,९३,९६६/-** |

परंतू उक्त तारखेस खालील क्रमांकाच्या पावत्या झोन क्र.४ ने निर्गमित केल्या. ज्यांचा समावेश पावत्यांच्या तपशिलात व संक्षिप्त अहवालात नाही. पावत्यांचे विवरण खालील प्रमाणे-

| अ.क्र. | पावती क्र. | तपशिल | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | As/८९२६६ दि.९.२.२०१८ | मोहम्मद करारखान मोहम्मद शहाबाजखान रोजाबाग, प्लॉट क्र.१८ H000५४८८ | रू.१३०३१, धनादेश BMC Bank क्र.५, दि.९.२.२०१८ | धनादेशाद्वारे भरणा |
| २ | As/८९२७२ दि.९.२.२०१८ | सुनिल नेमीनाथ इंद्राने, मयुरपार्क P.No.५, H000८७५६ | रू.३,४२१/- रोख | रोख भरणा |
| ३ | As/८९२७३ दि.९.२.२०१८ | मुरलीधर खंडू थोरात, फ्लॅट नं.५, सुरेवाडी हर्सूल, B000४२९२ | रू.२,३३६/- रोख | रोख भरणा |

उक्त पावत्यांचा रोख व धनादेश मार्फत व्यवहार झालेला आहे.

रोख रक्कम रू.६८७०/- झोन क्र.४ मधून दिनांक १६.२.२०१८ रोजी S.No.९३०३६८ अन्वये H.D.F.C. बँकेत परस्पर जमा केलेली आहे. याबाबत कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड४/२०१८/२५० दिनांक १६.२.२०१८ अन्वये सिस्टीम मॅनेजर यांना पत्राद्वारे कळविण्यात आले. त्याची प्रत कर निर्धारक व संकलक यांना दिली आहे. लेखा शाखेला कळविले नाही.

तसेच धनादेशाद्वारे स्विकारलेली रक्कम रू.१३०३१/- बाबत H.D.F.C बँकेत जमा केल्याची पावती कॅश जमाच्या पावती सोबत नाही. झोन क्र.४ कार्यालयातील पावत्यांच्या संक्षिप्त अहवालावर टिप लिहून सदरील रकमेचा धनादेश दिनांक ९.२.२०१८ रोजीच पाठविण्यात आल्याचा उल्लेख केलेला आहे.

जर धनादेश दिनांक ९.२.२०१८ रोजी जमा केला तर रोख रक्कम १६.२.२०१८ रोजी उशिराने जमा करण्याचा हेतू काय होता, तसेच धनादेश जमा केल्याची बँकेची पोच पावती अभिलेख्यात आढळून आलेली नाही. त्यामुळे रू.१३०३१/- महानगरपालिका फंडात जमा झाल्याची खात्री झाली नाही.

उक्त बाबत तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त प्रमाणे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे व महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२: वॉर्ड एच, झोन क्र.४ येथील मागणी नोंदवहीतील नोंदीतील अनियमिततेबाबत.**

वॉर्ड कार्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या मागणी नोंदवहीतील नोंदी तपासल्या असतांना खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

१. वॉर्ड कार्यालयाकडे वर्ग झालेल्या प्रभागांचे मालमत्ता नोंदवह्या वॉर्ड - ब आणि वॉर्ड -अ कार्यालयाकडून प्राप्त झाल्या त्यावर वॉर्ड एच कार्यालयाचा संगणकीय मालमत्ता क्रमांक नोंदविलेला नाही.

२. मागणी नोंदवही क्र.१६, पान क्र.१९१, जुना संगणकीय मालमत्ता क्र.B०००३०९६ नविन संगणकीय मालमत्ता क्र.H०००८४३७, एन -९, एच ७३/२ या मालमत्तेची कर आकारणी करतांना मालमत्तेचा वापर R+C असा नोंदवहीत नोंदविलेला आहे. परंतू सद्यस्थितीत (online system) संगणकीकृत अभिलेख्यांमध्ये सदर मालमत्तेचा वापर निवासी दिसत आहे.

३. मागणी नोंदवही क्र.१६ पान क्र.१९९ जुना संगणकीय मालमत्ता क्र.B०००३१०० नविन संगणकीय मालमत्ता क्र.H०००८४४१, एन-९ एच ७४/२ या मालमत्तेची कर आकारणी करतांना मालमत्तेचा वापर R+C असा नोंदवहीत नोंदविलेला आहे. परंतू सद्यस्थितीत संगणकीय अभिलेख्यात (online system) निवासी वापर दिसत आहे.

४. मागणी नोंदवही क्र.१९, पान क्र.६ जुना संगणकीय मालमत्ता क्र.B००२०१७६ नविन संगणकीय मालमत्ता क्र.H००१३९७, एन-९ M-२ १/३ या मालमत्तेची कर आकारणी करतांना मालमत्तेचा वापर R+C असा नोंदवहीत नोंदविलेला आहे. परंतू (Online system) संगणकीय अभिलेख्यां मध्ये वापर निवासी दिसत आहे.

५. मागणी नोंदवही क्र.१९, पान क्र.१०८ जुना संगणकीय मालमत्ता क्र.B००३२८९० नविन संगणकीय मालमत्ता क्र.H००१८१५७ एन-९, M-२,१४/१ या मालमत्तेची कर आकारणी करतांना मालमत्तेचा वापर R+C असा नोंदवहीत नोंदविलेला आहे, परंतू (online system) संगणकीय अभिलेख्यामध्ये वापर निवासी दिसत आहे.

प्रत्यक्षात विभागाने अ.क्र. २ ते ५ बाबत कर आकारणीच्या वेळीचे अभिलेखे व (online नोंदी ) संगणकीकृत अभिलेखे तसेच प्रत्यक्ष स्थळपाहणी करून संबंधितांना देण्यात येत असलेली मालमत्ता कराची मागणी योग्य असल्याची खातरजमा करावी.

सदरील नोंदी नाममात्र तपासण्यात आलेल्या असून इतर अभिलेखे विभागाने आपल्या स्तरावर तपासणी करून नोंदी अद्ययावत करून प्रमाणपत्रासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.१३: सन २०१७-१८ या वर्षात वॉर्ड क्र.४ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या नामांतर /N.P.O. नविन भोगवटा प्रमाणपत्रातील अनियमिततेबाबत.

झोन क्र.४ कार्यालयाचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, वॉर्ड कार्यालयाला प्राप्त अधिकारानुसार त्यांच्या कार्यक्षेत्रातील नामांतर प्रकरणे मंजूर करण्यात आलेली आहे. विभागाने उपलब्ध करून दिलेली प्रकरणे तपासली असतांना नामांतर प्रकरणात आढळून आलेल्या अनियमितता पुढील प्रमाणे -

१. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड क्र.४/१९४४/२०१७, दिनांक ३०.११.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H०००६५०४ म्युनिसिपल घर नं.६८,प्लॉट क्र.६८, वानखेडेनगर मालमत्तेचे नामांतर करण्यात आलेले आहे. सदरील नामांतर काळे यांचे नावावरून अनिता दिपक गोरे व दिपक भगवान गोरे यांचे नावे झालेले आहे.

उक्त नामांतर प्रकरणाची संचिका तपासली असतांना खालील बाबींची पूर्तता झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

१. श्री.काळे यांचे नावावरून श्रीमती अनिता दिपक गोरे व दिपक भगवान गोरे यांचे नावाचा फेर झालेल्या ७/१२ ची प्रत संचिकेत नाही.

२. अकृषीक कर भरणा केल्याची पावतीची प्रत नाही.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम २ चे पोटनियम ३ नुसार मिळकतीचे नामांतर करण्यासाठी विहीत नमुना संचिकेत नाही.

४. नळ कनेक्शन नसल्याबाबत तांत्रिक विभागाचे अभिप्राय नाहीत.प्रतिज्ञापत्र आहे.

२. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड क्र.४/१९२६/१७, दिनांक २३.११.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.A००३३७३३ निवासी व H०००६७१५ व्यावसायीक प्लॉट क्र.१२ एन-१३ या मालमत्तेचे मोहमद अजीज अहमद यांचे नावावरून Gift deed नुसार मोहमद शकील अहमद यांचे नावे नामांतर आदेश निर्गमित केले आहे. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. संगणकीय मालमत्ता क्र.A००३३७३३ वॉर्ड ‘A’ मधून ‘H’ वॉर्ड मध्ये Transfer न करताच नामांतर आदेश निर्गमित केले. सद्यस्थितीत सदरील मालमत्तेची नोंद अद्यापही वॉर्ड - A मध्येच आहे.

२. वॉर्ड क्र. A- मधून मालमत्ता वॉर्ड H’ मध्ये Transfer न करता संबंधित कार्यक्षेत्र नसलेल्या मालमत्तेचे नामांतर करणे ही बाब दुस-या वॉर्ड अधिका-याच्या अधिकारावर अधिक्रमीत झालेली आहे.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम २ चे पोटनियम ३ नुसार मिळकतीचे नामांतर करण्यासाठी विहीत नमुना नोटीस संचिकेत नाही.

३. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड ४/२९/२०१७, दिनांक १८.९.२०१७ संगणकीय मालमत्ता क्र.H००००६५ घर क्र. २-१०-९२/P, हर्षनगर येथील मालमत्ता स.मसूद स.यासीन यांच्या नावावरून N.P.O. म्हणून मो.इरशाद पिता मो.गुल यांच्या नावे केल्याचे आदेश निर्गमित केले आहे. संचिकेची तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील मालमत्ता स.मसूद स.यासीन यांचेकडून शे.जमीर शे.अमीर व मो.इरशाद पिता गुल मोहमंद यांचे नावे आहे. नविन खरेदीदार यांनी आपसात वाटणीपत्र केले आहे. परंतू महानगरपालिका अभिलेख्यातील नावानंतर N.P.O. म्हणून एकच नावाचा उल्लेख केलेला आहे.

२. अकृषीक कर भरणा केल्याची पावती संचिकेत नाही.

३. नळ कनेक्शन नसल्याचे प्रतिज्ञापत्र आहे. परंतू तांत्रिक विभागाकडून खातरजमा/अभिप्राय संचिकेत नाही.

४. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड-४/१८९७/२०१७, दिनांक २०.११.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H०००५१५० रो हाऊस क्र.D-१०, ग्रीन व्हॅली रोजेबाग मो.युनुस मो.पाशा देशमुख यांचे नावावरून मो.मोजम यांचे नावे नविन भोगवटाधारक म्हणून नोंद घेण्याचे आदेश निर्गमित झालेले आहे. संचिकेच्या तपासणीत खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. सदरील मालमत्तेचे अभिलेखे तपासणी केली असता मालमत्तेच्या ७/१२ उता-यामध्ये नविन भोगवटाधारकाच्या नावाची नोंद आढळून आली नाही.

२. जेव्हा ७/१२ उतारा ही कागदपत्रे महसूल विभागाचे वैध कागदपत्रे उक्त मिळकतीस असतांना नामांतर ऐवजी N.P.O. नविन भोगवटाधारक आदेश निर्गमित करण्यात आले ही बाब अनाकलनीय आहे.

३. संबंधितांनी पाणीपट्टी व अकृषीक कर भरणा केल्याच्या पावत्या संचिकेत नाही.

५. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/१७६१/२०१७, दिनांक ३०.१०.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००००४८९ घ.नं.२-१०-७ फाजलपुरा या मालमत्तेचे बळवंतसींग सुंदरसिंग यांचे नावावरून (१) सय्यद मारूफ सय्यद अ.रऊफ (२) लईक अहमद (३) शे.फैजल शे.सिराज सौदागर यांचे नावे नामांतर आदेश निर्गमित करण्यात आले. संचिकेच्या तपासणीअंती खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील मालमत्तेचा वापर व्यावसायीक असतांना निवासी दराने नामांतर शूल्क वसूल करण्यात आले, त्यामुळे महानगरपालिकेचे रू.१५००/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

२. संचिकेत पाणीपट्टी व अकृषीक कर भरल्याचे अभिलेखे नाहीत.

३. महानगरपालिकेच्या अभिलेख्यांत उक्त मालमत्ता बलवंतसिंग सुंदरसिंग या नावाने नोंदविलेली आहे. तद्नंतर सीटी सर्व्हे क्र.७४०६ च्या मालमत्ता पत्रकात दिनांक २८.१०.२००५ वारसाने फेर, दि.१४.१.२०१३ रोजी बक्षीसपत्राने फेर,दि.७.४.२०१४ रोजी खरेदीने फेर व दि.१७.१०.२०१५ रोजी खरेदीने फेर होवून सद्यस्थितीत नामांतर मंजूर झालेल्या व्यक्तींच्या नावे नोंद आहे, त्यामुळे यापूर्वी ३ वेळा नामांतर न होता चौथ्या वेळी मूळ महानगरपालिका अभिलेख्यातील व्यक्तीच्या नावावरून नामांतर मंजूर करण्यात आले ही बाब कायदेशीर योग्य आहे का? तसेच प्रत्येकवेळी नामांतर फी बाबत महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी ठरत आहे.

४. सद्यस्थितीत नामांतर ज्या खरेदीखता आधारे केले यांच्या नावाचा महानगरपालिका अभिलेख्यात उल्लेख नाही.

५. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम -२ चे पोटनियम ३ नुसार मिळकतीचे नामांतर करण्यासाठी विहित नमुना नोटीस संचिकेत नाही.

६. कार्यालयीन आदेश क्र.नामांतर /वॉर्ड ४/१७३०/२०१७,दिनांक १८.१०.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्रमांक B०००८७९२,N-११ H-१८/७ नवनाथनगर या मालमत्तेचे नामांतर शारदा विनायक जाधव यांचे नावे करण्यात आले. संचिकेतील त्रुटी पुढील प्रमाणे -

१. संबंधित मालमत्ता B वॉर्डातील असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. जर मालमत्ता online H वॉर्डात हस्तांतर झालेली नसतांनासुध्दा नामांतर आदेश निर्गमित करणे योग्य आहे का? याबाबत खुलासा अपेक्षित आहे.

२. संबंधिताकडून पाणीपट्टी व एन-ए फी वसूल केली आहे किंवा नाही याबाबत संचिकेत अभिलेखे नसल्याने खात्री झालेली नाही.

७. कार्यालयीन आदेश क्र.नामांतर/वॉर्ड४/१६६१/१७, दिनांक ६.१०.२०१७, अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.B००१०२३०, N-११,E-११/७ सिडको या मालमत्तेचे नामांतर विष्णु विठ्ठलराव गि-हे यांचे नावावरून गंगाधार नानाराव ठोंबरे यांच्या नावावर झालेले आहे. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. संबंधित मालमत्ता B वॉर्डातील असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. जर मालमत्ता online H वॉर्डात हस्तांतर झालेली नसतांनासुध्दा नामांतर आदेश निर्गमित करणे योग्य आहे का याबाबत खुलासा अपेक्षित आहे.

२. सन २०१७-२०१८ या वर्षात नामांतर आदेश निर्गमित झालेले असल्याचे आढळून आले. परंतू मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या रकमा २०१७ पर्यंतच वसूल केल्या आहेत. एक वर्षाचे कर वसूल न करताच महानगरपालिके तर्फे नामांतर आदेश निर्गमित केलेले आहेत.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम -२ पोट नियम ३ नुसार मिळकतीचे नामांतर करण्यासाठी विहीत नमुना नोटीस संचिकेत नाही.

८. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/नामांतर/वॉर्ड क्र.४/२७, दिनांक ३१.८.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H000२८२१ हर्सूल प्लॉट क्र.३१ येथील मालमत्तेचे नामांतर गंगाराम केशवचंद बमणे यांच्या नावावरून सोमनाथ गंगाराम बमणे यांचे नावावर झालेले आहे. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. पाणीपट्टी भरलेली नाही, यासाठी अर्जदाराने नळ कनेक्शन नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. परंतू विभागाने प्रतिज्ञापत्रानुसार तांत्रिक विभागाचा अभिप्राय घेतलेला नाही.
२. एन.ए.टॅक्स भरल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.
३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम -२ पोट नियम ३ नुसार मिळकतीचे नामांतर करण्यासाठी विहीत नमुना नोटीस संचिकेत नाही.

९. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड क्र.४/२७, दिनांक ३१.८.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H०००५८०१ हर्सूल घ.क्र.८-३१-११७०, ८-२८-१६५१/१ या मालमत्तेचे नामांतर रंगनाथ सदाशिव मालशिखरे यांचे नावावरून दिनकर रघुनाथ मालशिखरे यांचे नावे केलेले आहे. संचिकेत निम्न त्रुटी निदर्शनास आल्या.

१. महानगरपालिका अभिलेख्यात घर क्र.८-२८-१६५१/१ असा नमूद आहे, संबंधितांनी सादर केलेली अभिलेखे घर क्र.८-३१-११७० या घराची आहे.तेंव्हा महानगरपालिका अभिलेख्यात ज्या घरांचे क्रमांक आहे त्या ऐवजी दुस-या घराच्या क्रमांकाच्या अभिलेख्याप्रमाणे नामांतर करणे योग्य नाही.

२. सदरील मालमत्तेची पाणीपट्टी व एन.ए.टॅक्स भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम -२ पोट नियम ३ नुसार मिळकतीचे नामांतर करण्यासाठी विहीत नमुना नोटीस संचिकेत नाही.

१०. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड क्र.४/१८, दिनांक २२.६.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H०००२२१३ रो हाऊस क्र.D-२२, हर्सूल सारावैभव जटवाडा रोड या मालमत्तेचे नामांतर आत्माराम बबन बिडवे यांचे नावावरून शिवानंद रामचंद्र शेळके यांचे नावे करण्यात आले आहे. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम २ पोटनियम ३ नुसार मिळकतीच्या नामांतराची नोटीस अपूर्ण स्वरूपात आहे. संबंधितास नोटीस बजावतांना त्यावर सक्षम प्राधिकरणाची स्वाक्षरी नाही.

२. पाणीपुरवठा कनेक्शन नाही असे नमूद आहे, तथापि तांत्रिक विभागाचा अभिप्राय नाही.

३. एन.ए.टॅक्स भरणा केल्याची पावती संचिकेत उपलब्ध नाही.

११. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड क्र.४/४४/२०१८, दिनांक ६.१.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्रमांक H०००६४७८ रो हाऊस क्र.३९,छत्रीबाग वानखेडेनगर या मालमत्तेचे नामांतर सत्येंद्र रजनीकांत कर्णीक यांचे नावावरून अजयकुमार नारायण ठाकुर यांचे नावे करण्यात आले. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. पाणी पुरवठा व एन.ए.टॅक्स भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाही.

१२. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड-४/१२/२०१७, दिनांक १३.६.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्रमांक H००००४५९,घ.क्र.२-१०-९२/P फाजलपुरा या मालमत्तेचे NPO नविन भोगवटाधारक म्हणून सुखदेव नामदेव जाधव यांचे नावा वरून शकुंतलाबाई दादाराव खरात अशी नोंद करण्यात आली. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. उक्त मालमत्ता सुखदेव नामदेव जाधव यांचे नावे आहे. शकुंतलाबाई दादाराव जाधव यांनी देवीदास सुखदेव जाधव यांचे कडून खरेदीने मालमत्ता हस्तांतर केल्याचे संचिकेतील कागदपत्रावरून दिसून येते. प्रथमत: देवीदास सुखदेव जाधव यांचे नावे महानगरपालिका अभिलेख्यात नसतांनाही NPO आदेश निर्गमित केले गेले ही बाब योग्य नाही, तसेच महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

२. संचिकेत पाणीपट्टी व एन.ए.टॅक्स भरल्याचे अभिलेखे उपलब्ध नाहीत.

१३. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर वॉर्ड ४/११ दिनांक १२/६/२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.A००१०७३५ महात्मा फुले हौसींग सोसायटी या मिळकतीचे नामांतर निवृत्ती पांडुरंग त्रिभूवन यांचे नावावरून दुर्गेश सुंदर प्रसाद तिवारी यांचे नावे झाले आहे. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. उक्त मालमत्ता नामांतर संचिकेत खरेदीखत व ७/१२ उतारामध्ये एस.एम.गायकवाड यांचे नावाचा उल्लेख आहे. त्रिभूवन यांचे नावाचा उल्लेख नाही. त्यामुळे काही कायदेशीर अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. पाणीपट्टी व एन.ए.कर भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाहीत.

३. सन २०१६-१७ पर्यंतच मालमत्ता कर भरला आहे, नामांतर वर्ष २०१७-१८ असे आहे.

१४. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड क्र.४/१०, दिनांक ३.६.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H०००२२३४, सारा वैभव हर्सूल या मालमत्तेचे नामांतर पृथ्वीराज मानकर यांचे नावावरून १) प्रिती गंगाधर रोकडेवाडे २) पवन लालासाहेब देवकर यांच्या नावे झालेले आहे. संचिकेच्या तपासणीत खालील त्रुटी दिसून आल्या.

१. सदरील मालमत्तेच नळ कनेक्शन नसल्याचे प्रतिज्ञापत्र आहे, तथापि याबाबत तांत्रिक विभागाचा अभिप्राय नाही.

२. संबंधित मालमत्तेचे एन.ए.टॅक्स भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाहीत.

१५. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड ४/१९०, दिनांक १५.५.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H०००५१२१, B-११ ग्रीनवेली, रोजेबाग या मालमत्तेचे नामांतर फेरीयल बानो मर्दासी यांचे नावावरून शे.अहसान बेगम यांच्या नावे झालेले आहे. संचिकेत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहे.

१. सदरील मालमत्तेत नळ कनेक्शन नसल्याचे प्रतिज्ञापत्र आहे, तथापि याबाबत तांत्रिक विभागाचा अभिप्राय नाही.

२. संबंधित मालमत्तेचे एन.ए.टॅक्स भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाहीत.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम २ पोटनियम नुसार मिळकतीचे नामांतर करण्यासाठी विहीत नमुन्यात नोटीस नाही.

१६. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/८/वॉर्ड क्र.४, दिनांक ३०.५.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.B००३८२३० N११B३७/३ सुभाषचंद्र बोस नगर, हडको औरंगाबाद या मालमत्तेचे नामांतर गोपाल रामचंद्र दातार यांचे नावावरून रविकांत गोपाल दातार यांचे नावे झालेले आहे. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. सादरीकरणात सिडकोचे TTO चा क्र. CIDCO ADM/AEO/Aur/२०१७/१९७, दिनांक ९.२.२०१७ अन्वये नामांतर आदेश निर्गमित केल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात उक्त आदेशात गोपाल रामचंद्र दातार यांच्या नावाचा उल्लेख नाही.

२. अर्जदाराच्या अर्जात वारसाने नामांतर करण्याबाबत उल्लेख आहे. परंतू संचिकेत वारसाने नामांतर करण्यासाठी सिडको प्राधिकरणाचे TTO आदेश नाहीत.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम २ पोटनियम नुसार मिळकतीचे नामांतर करण्यासाठी विहीत नमुन्यात नोटीस नाही.

१७. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड अधिकारी/वॉर्ड -४/७/२०१७ दिनांक ३०.५.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००००६८७ हर्षनगर २-१०-९२/३६ या मालमत्तेचे अ.रज्जाक अ.करीम यांचे नावावरून अशोक भिमराव खरात यांचे नावे NPO नविन भोगवटाधारक म्हणून नोंद घेतली आहे. संचिकेत तपासणी अंती खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेतील खरेदी खत करारनाम्या मध्ये घर क्र.१-२६-२८७ दर्शविलेला आहे. महानगरपालिका अभिलेख्यात २-१०-९२/३६ असा आहे. वेगवेगळा क्रमांक असतांना NPO आदेश निर्गमित झालेले आहेत.

२. सदरील मालमत्तेत नळ कनेक्शन नसल्याचे प्रतिज्ञापत्र आहे, तथापि याबाबत तांत्रिक विभागाचा अभिप्राय नाही.

३. संबंधित मालमत्तेचे एन.ए.टॅक्स भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाहीत.

४. अ.रज्जाक अ.करीम यांचे निधन झाल्याचे नमूद आहे. परंतू वारस प्रमाणपत्र संचिकेत नाही.

१८. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/४१ वॉर्ड क्र.४, दिनांक २३.५.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H०००१५४३, घ.नं.५४८/१, हर्सूल येथील मालमत्तेचे नामांतर बकले भोलानाथ दौलत यांचे नावावरून गोरखनाथ रामभाऊ बकले यांचे नावावर करण्यात आले. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम /२ पोट नियम ३ नुसार अर्जदाराने दिलेल्या नोटीस वर स्वाक्षरी नाही.

२. नोटीस मध्ये नमूद प्रमाणे सदरील मालमत्तेचा व्यवहार खरेदीने झाल्याचे दिसून येते. नादराबाई आसाराम फुले यांचेकडून अर्जदाराने खरेदी केलेली आहे. ज्यांचे कडून खरेदी केली त्यांचे नावच महानगरपालिका अभिलेख्यात नसतांना नामांतर झाले आहे. त्यामुळे भविष्यात कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. पाणीपट्टी व एनए टॅक्स भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

१९. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड क्र.४/५, दिनांक २४.५.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००१४५२७ घ.नं. २२/६, सिडको या मालमत्तेचे नामांतर अनंतराव गंगाधर देवडे यांच्या नावावरून गजानन बाबुराव ढाले यांचे नावे झाले आहे. संचिकेत निम्न त्रुटी निदर्शनास आल्या.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ नियम २ पोटनियम ३ प्रमाणे मिळकत नामांतरासाठी विहित नमुना नोटीस संचिकेत नाही.

२. महानगरपालिका अभिलेख्यात अनंतराव गंगाधर देवडे यांच्या नावाचा उल्लेख आहे. गजानन ढाले यांनी अनुप्रीया अनंत देवडे यांच्याकडून खरेदीने मालमत्ता संपादन केली आहे. जेव्हा महानगरपालिका अभिलेख्यात अनुप्रीया अनंत देवडे यांचे नाव नाही. तरीसुध्दा नामांतर आदेश निर्गमित झाले आहे.

२०. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/३/वॉर्ड क्र.४, दिनांक २२.५.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००२१६४२ N-११,६१२, सिडको या मालमत्तेचे नामांतर प्रमीला रामचंद्र भोंग यांचे नावावरून रंगराव सोमा कांबळे यांचे नावे करण्यात आले. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. संचिकेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ नियम २ पोटनियम ३ प्रमाणे विहीत नमुना नोटीस नाही.

२. महानगरपालिका अभिलेख्यात प्रमीला यांचे नावाची नोंद आहे. तथापि रंगराव सोमा कांबळे यांनी सदरील मालमत्ता मुरलीधर व्यंकटेश उर्फ व्यंकटराव कुलकर्णी यांचे कडून खरेदी केली आहे. तथापि महानगरपालिका अभिलेख्यात सदरील नावाचा उल्लेख नाही. तसेच प्रमीला यांचे कडून मालमत्ता खरेदी केलेली नसतांनाही नामांतर आदेश निर्गमित केले.

३. एन ए टॅक्स भरल्याची पावती संचिकेत नाही.

२१. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड अधि ४/२/२०१७, दिनांक १७.५.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००००५०७,२-१०-२४/१ फाजलपुरा या मालमत्तेचे नारायण रावजी तारू या नावावरून नविन भोगवटाधारक सौ.संगिता विनोद कांबळे यांच्या नावाची नोंद घेण्यात आली. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. सदरील मालमत्तेचा वापर व्यवसायीक असतांना निवासी दराने नामांतर /NPO शूल्क आकारले, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

२. सदरील संचिकेतील खरेदीखत करारनाम्यातील घर क्र.१-२६-८/१३ असा नमूद आहे. नमुना नोटीस मध्ये सुध्दा अर्जदाराने तोच नमूद केला आहे. परंतू महानगरपालिका अभिलेख्यात घ.क्र.२-१०-२४/१ असा आहे. तेंव्हा विभागाने दोन वेगवेगळे घर क्रमांकाची शहानिशा केलेली नाही.

३. संबंधितांनी नळ कनेक्शन नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. परंतू विभागाने तांत्रिक विभागाचा अभिप्राय घेतलेला नाही.

४. एन ए टॅक्स भरणा अभिलेखे संचिकेत नाहीत.

२२. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड क्र.४/७८९/२०१७, दिनांक १५.५.२०१७ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H०००१५०३ घ.नं.५०७, हर्सूल या मालमत्तेचे NPO नविन भोगवटाधारक म्हणून साहेबराव विश्वनाथ मोरे यांचे नावाऐवजी लक्ष्मण विश्वनाथ मोरे यांच्या नावाची नोंद आहे. संचिकेच्या तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. पाणीपट्टी व एन ए टॅक्स भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

२३. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड-४/५७/२०१८ दिनांक ८.१.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्रमांक H००११४५८, फ्लॅट क्र.११, अथर्व आर्केड मयूरपार्क हर्सूल या मालमत्तेचे नामांतर निलीमा विजय कुमार कुलकर्णी यांचे नावावरून १)जयेश एकनाथ भारंबे २) एकनाथ पंढरीनाथ भारंबे यांचे नावे झाले आहे. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. नामांतर करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ नियम २ पोटनियम ३ अन्वये दिलेल्या नोटीसीवर, नामांतराच्या अर्जावर / प्रतीज्ञापत्रावर केवळ जयेश एकनाथ भारंबे यांच्याच स्वाक्ष-या आहेत. श्री.एकनाथ पंढरीनाथ भारंबे यांची विनंती /स्वाक्षरी नाही.

२. ७/१२ उता-यामध्ये निलीमा विजयकुमार कुलकर्णी यांच्या नावाची नोंद आहे. परंतू खरेदीखत झाल्यानंतरचा जयेश एकनाथ भारंबे व एकनाथ पंढरीनाथ भारंबे यांच्या नावाचा फेर झाल्याचा ७/१२ संचिकेत नाही.

३. सदरील मालमत्तेमध्ये संबंधितांचे प्रतीज्ञा पत्रानुसार नळ कनेक्शन नसल्याचे नमूद आहे.तसेच संबंधित लिपीकाचा स्थळ पाहणी अहवाल सुध्दा आहे. परंतू तांत्रिक विभागाचा अभिप्राय नाही.

४. एन ए कर भरल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

२४. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/झोन ४/६०९/२०१८, दिनांक ७.३.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००१३९४७ सदनिका क्र.C-५ फ्लॅट क्र.३ मयूरपार्क हर्सूल या मालमत्तेचे नामांतर (१)पाटील मधुकरराव गला २) संतोष गोपीनाथ जाधव यांचे नावावरून दिनेश गुलाब कमलजा या नावे झालेले आहे. संचिकेच्या तपासणीत खालील त्रुटी आढळल्या.

१. महानगरपालिका अभिलेख्यात १) पाटील मधुकरराव गला व २) संतोष गोपीनाथ जाधव यांचे नावे आहेत. खरेदी खत व ७/१२ उता-यात सदरील मालमत्ता संतोष गोपीनाथ जाधव यांचेच नाव आहे. त्यामुळे पाटील मधुकरराव गला यांनी खरेदीखत केलेले नसतांना सुध्दा त्यांचे नाव कमी केले आहे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम २ पोटनियम ३ अन्वये नामांतरासाठी अर्जदाराने विहित नमुन्यात नोटीस दिलेली नाही.

३. एन ए टॅक्स भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

२५. कार्यालयीन आदेश क्र.नामांतर/वॉर्ड-४/८४/२०१८, दिनांक १५.१.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००२२६८५, जुना मालमत्ता क्र.२३,सिटी सर्व्हे नंबर १९१/२, हर्सूल श्री.चेतन दिनकर कोळंबे यांच्या नावावरून श्री.योगेश शांताराम खरात यांचे नावे हस्तांतरीत करण्यात आले. संचिकेमध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. पाणीपट्टी कराचा भरणा झाला आहे अथवा नाही याबाबत संचिकेत कुठलेही दस्तऐवज नाही.

२६. कार्यालयीन आदेश क्र.नामांतर/वॉर्ड-४/४०५/१८, दिनांक १३.३.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००१४९७६, जुना मालमत्ता क्र.F No.C/८/९ भगतसिंग नगर हर्सूल श्री.सुनिल गुलाबराव पाटील यांच्या नावावरून श्री.विजय चांगो इंगळे यांच्या नावावर करण्यात आले. संचिका तपासणीत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. पाणीपट्टी कराचा भरणा संबंधिताकडून भरून घेतला अथवा नाही याबाबत संचिकेत दस्तऐवज नाहीत.

२. अकृषी कराचा भरणा संबंधिताकडून करून घेण्यात आल्याबाबतचे दस्तऐवज संचिकेत आढळून आले नाही.

२६. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/झोन क्र.४/६१०/१८, दिनांक ७.३.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००१०१४९ इमारत क्र.B/४ Flat क्र.३/२ एस.बी.ओ.ए.शाळेसमोर, मयुरपार्क, हर्सूल परीसर या मालमत्तेचे नामांतर मेघा संजय जोशी यांचे नावावरून विप्लव परीमल डे यांचे नावे झाले आहे. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. विप्लव परीमल डे यांच्या नावे ७/१२ असल्याची अभिलेखे संचिकेत नाही.

२. एन.ए.टॅक्स भरल्याची अभिलेखे नाही.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम २ पोटनियम ३ नुसार विहीत नमुन्यात नोटीसचे अभिलेखे संचिकेत नाही.

२७. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/वॉर्ड क्र.४/४४९/२०१८ दिनांक २२.३.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००१९११६ इमारत क्र.A/५ फ्लॅट क्र.६, भगतसिंगनगर, हर्सूल या मालमत्तेचे नामांतर ए.बी.भोसले यांचे नावावरून नितीन उत्तमचंद सारवला यांचे नावे झाले आहे. संचिकेत खालील त्रुटी आढळली.

१. पाणीपट्टी भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

२८. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/४५०/२०१८, दिनांक २२.३.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र. H००१७७१२ मयूरपार्क B/३, २/२ हर्सूल या मालमत्तेचे नामांतर संजय लक्ष्मण बोराडे व मनिषा संजय बोराडे यांचे नावावरून शिवाजी त्रिंबकराव थोटे व अजय शिवाजी थोटे यांचे नावे करण्यात आले आहे. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. महानगरपालिका अभिलेख्यात संजय लक्ष्मण बोराडे,सुनिता संजय बोराडे या नावाचा उल्लेख आहे. नामांतर करतांना संजय लक्ष्मण बोराडे, मनिषा संजय बोराडे या नावे केलेले आहे.

२. खरेदी खता नुसार महसूल अभिलेख्यात फेर होवून ७/१२ उता-याची अद्यावत प्रत संचिकेत नाही.

३. एन.ए.टॅक्स भरणा केल्याची अभिलेखे संचिकेत नाही.

२९. कार्यालयीन आदेश क्र.नामांतर/३६१/२०१८, दिनांक ८.३.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००२२३०३, तेजल संकुल भगतसिंगनगर रोड हर्सूल या मालमत्तेचे (A-०१+B-०१)नामांतर अमित लक्ष्मणराव भोसले यांचे नावावरून उमेश दत्तात्रय सरोदे व रिता उमेश सरोदे यांच्या नावे करण्यात आले. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम पोटनियम ३ नुसारच्या नोटीसीवर मिळकत धारकाची स्वाक्षरी नाही. नोटीस मध्ये एकाचेच नांव आहे. नामांतर दोघांचे नावे मंजूर केले.

२. पाणीपट्टी व एन ए भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

३. अद्यावत ७/१२ उतारा प्रत संचिकेत नाही.

३०. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/ झोन क्र.४/६११/२०१८, दिनांक ७.३.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००१९१९१ भगतसिंगनगर फ्लॅट क्र.C-२/१ या मालमत्तेचे नामांतर एम.पी.गायकवाड यांचे नावावरून गणेश लक्ष्मण पवार यांचे नावे करण्यात आले आहे. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. पाणीपट्टी व एन ए भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

२. अद्यावत ७/१२ उतारा प्रत संचिकेत नाही.

**वॉर्ड - क्र. ४ (एच) कार्यालय**

३१. कार्यालयीन आदेश क्र.नामांतर/९५/वॉर्ड क्र.४/२०१८, दिनांक १७.१.२०१८ अन्वये संगणकीय मालमत्ता क्र.H००१३८७३ मयूरपार्क इमारत क्र.C-३ फ्लॅट क्र.१/४ या मालमत्तेचे नामांतर जितेंद्र नथ्थुसिंग पाटील यांचे नावावरून गिरीश बाळासाहेब तामटे यांच्या नावे करण्यात आले आहे.

१. महानगरपालिका अभिलेख्यात गुजर संदीप रमाकांत यांचे नाव आहे. गुजर संदीप रमाकांत यांनी योगेश सुखदेव जगदाळे यांना सदरील मालमत्ता विक्री केल्याचे दस्तऐवज संचिकेत आहे. तद्नंतर योगेश सुखदेव जगदाळे यांनी उक्त मालमत्ता जितेंद्र नथ्थुसिंग पाटील यांना विक्री केली.जितेंद्र नथ्थुसिंग पाटील यांनी उक्त मालमत्ता गिरीष बाळासाहेब तामटे यांना विक्री केली. एकूण चार वेळा सदरील मालमत्तेचे खरेदी विक्रीचे व्यवहार झालेले असतांना महानगरपालिका अभिलेख्यात एकदाच नामांतर मंजूर करण्यात आले, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. पाणीपट्टी व एन ए भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

३. सादरीकरणात गुजर संदीप रमाकांत यांचे नावावरून गिरीष बाळासाहेब तामटे यांच्या नावाचा उल्लेख नामांतर प्रक्रिया करण्यासाठी नमूद आहे. परंतू प्रत्यक्ष नामांतर आदेशात जितेंद्र नथ्थुसिंग पाटील यांचे नावाचा उल्लेख आहे.

३२. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/झोन क्र.४/६१२/२०१८, दिनांक ७.३.२०१८ अन्वये, संगणकीय मालमत्ता क्र.H०००८६४१ मयूरपार्क B-२/०१ या मालमत्तेचे नामांतर तांबोळी मंजुषा अशोक यांचे नावावरून अनिल बाबुराव निकम यांचे नांवे झाले आहे. संचिकेत खालील त्रुटी आढळल्या.

१. एन.ए.टॅक्स भरणा केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

२. ७/१२ उता-याची अद्ययावत प्रत संचिकेत नाही.

उक्त मुद्यांबाबत विभागाने आपल्या स्तरावर तपासणी करावी. मुद्या क्र.५ व २१ नुसार प्रत्येकी रू.१५०० प्रमाणे रू.३०००/- चे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असून संबंधितांकडून वसूलपात्र आहेत.

उक्त प्रकरणे नाममात्र तपासली असून वॉर्ड कार्यालयातील इतर प्रकरणे आपल्या स्तरावर तपासून झालेल्या अनियमिततेबाबत कार्यवाही अंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने रू.३०००/- संबंधिताकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - क्र. ४ (एच) कार्यालय**

**परिच्छेद क्र.१४ : सन २०१७-१८ या वर्षात वॉड क्र.४ या कार्यालयातून निर्गमित केलेल्या विवाह प्रमाणपत्र प्रकरणांमधील अनियमिततेबाबत.**

सन २०१७-२०१८ या वर्षात वॉर्ड एच (झोन क्र.४) मधून निर्गमित झालेल्या विवाह प्रमाणपत्रांची प्रकरणांपैकी विभागाने उपलब्ध करून दिलेली नाममात्र प्रकरणे लेखापरीक्षण पथकास तपासणीसाठी प्राप्त झाली. विवाह नोंदणी प्रकरणात प्रामुख्याने खालील अनियमितता प्रथम दर्शनी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. विवाह प्रमाणपत्राच्या संचिकेत प्रमाणपत्राची कार्यालयीन प्रत उपलब्ध नाही, संबंधितांना विचारणा केली असता विवाह नोंदणीच्या software मधून एकच प्रत निर्गमित होते त्यामुळे संचिकेत झेरॉक्स प्रत जोडली असे तोंडी सांगण्यात आले. विवाह नोंदणीची अभिलेखे कायम अभिलेखे असल्याने संचिकेत कार्यालयीन प्रत असणे आवश्यक आहे.

२. प्रमाणपत्र क्रमांक, पावती क्रमांक, संदर्भ क्रमांक इत्यादींचा विवाह नोंदणी अभिलेख्यांशी ताळमेळ साधत नाही.

३. आकारण्यात आलेली फी बाबत शासनाचे फी चे दर उपलब्ध करून दिलेले नाही.

४. विवाह नोंदणी प्रकरणांत सुनिल ताराचंद उबाळे व सविता लक्ष्मण उबाळे यांच्या संचिकेत वैद्यकीय अधिकारी यांनी दिनांक २०.७.२०१७ रोजी वधू वरांचे रहिवासी प्रमाणपत्र सादरीकरणाच्या अटीवर नोंदणी मान्य केली आहे. तद्नंतर संबंधिताने लाईटबील व रेशनकार्डची प्रत रहिवाशी पुरावा म्हणून सादर केल्याचे सादरीकरणावरून आढळून येते. तथापि यास सक्षम प्राधीकरणाची मान्यता नाही. तसेच विवाह ज्ञापनावर पुरोहिताचे नाव, पत्ता, स्वाक्षरी नाही.

५. विवाह नोंदणी प्रकरणांत परशुराम गायकवाड व कोमल विजयानंद ढगे यांच्या संचिकेत वैद्यकीय अधिकारी यांनी वधू वरांचे रहिवासी प्रमाणपत्र सादरी करणाच्या अटीवर नोंदणी मान्य केली आहे. तद्नंतर संबंधितांने लाईटबील व रेशनकार्डची प्रत रहिवासी पुरावा म्हणून दाखल केल्याचे सादरीकरणावरून दिसते. तथापि यास सक्षम प्राधीकरणाची मान्यता नाही.

६. विवाह नोंदणी प्रकरणांत सुरज अशोक तिखे व तेजल हरिश्चंद्र मोरे यांनी सादर केलेल्या विवाह ज्ञापन नमूना अर्जावर पुरोहिताचे नांव, पत्ता व स्वाक्षरी नाही.

७. विवाह नोंदणी प्रकरणांत सचिन अशोकराव गायकवाड व दिपाली भगवानराव म्हस्के यांच्या संचिकेत वैद्यकीय अधिकारी यांनी वधू वरांचे रहिवासी प्रमाणपत्र सादरी करणाच्या अटीवर नोंदणी मान्य केली आहे. तद्नंतर संबंधितांचे लाईटबील व रेशनकार्डची प्रत संचिकत रहिवासी पुरावा म्हणून दाखल केल्याचे सादरीकरणावरून दिसून येते. तथापि यास सक्षम प्राधीकरणाची मान्यता नाही.

८. विवाह नोंदणी प्रकरणांत उत्तम पन्नालाल हरणे व प्रतिभा राजू सुरे यांनी सादर केलेल्या विवाह ज्ञापन नमूना अर्जावर पुरोहिताचे नांव,पत्ता व स्वाक्षरी नाही.

**वॉर्ड - क्र. ४ (एच) कार्यालय**

९. विवाह नोंदणी प्रकरणांत स्वप्नील दादाराव पगारे व आरती अंबादास लोखंडे यांनी सादर केलेल्या विवाह ज्ञापन नमूना अर्जावर पुरोहिताचे नांव,पत्ता व स्वाक्षरी नाही.

१०. विवाह नोंदणी प्रकरणांत राजेंद्र भाऊसाहेब तांदळे व प्रतीमा अन्नासाहेब दिवटे या संचिकेत लग्नाविषयक बॉन्डपेपर सादर केल्यावर प्रमाणपत्र देणे असे अभिप्राय वैद्यकीय अधिकारी यांनी दिले. त्यानुसार कार्यालयाने संबंधितांना दिनांक २९.५.२०१७ रोजी पत्र दिले. संबंधितांनी स्वयं घोषणापत्र सादर केले परंतू त्यानंतर वैद्यकीय अधिकारी तथा रजिस्टार यांची संचिकेत मान्यता नाही.

११. विवाह नोंदणी प्रकरणांत अभिषेक अशोक चौधरी व मोनिका सुनिल देशमुख यांनी सादर केलेल्या शपथपत्रावर संबंधितांच्या स्वाक्ष-या नाही.

१२. विवाह नोंदणी प्रकरणांत विकास अनिल निषाद व विजया दशरथ सहानी यांच्या विहित अर्जावर साक्षीदार क्र.२ व ३ ची स्वाक्षरी नाही.

१३. विवाह नोंदणी प्रकरणांत गणेश सुपडू धनवई व स्वाती पांडुरंग भागवत यांनी सादर केलेल्या विवाह ज्ञापन नमूना अर्जावर पुरोहिताचे नांव,पत्ता व स्वाक्षरी नाही.

१४. विवाह नोंदणी प्रकरणांत गणेश अर्जून पिढेकर व रोहिणी राजु चौघुले यांनी सादर केलेल्या नमुना -ड विहीत अर्जावर साक्षीदार क्र.१ ची स्वाक्षरी नाही.

१५. विवाह नोंदणी प्रकरणात मोरे श्रीकांत साहेबराव व पवार ललीता विश्वास यांनी सादर केलेल्या नमुना -ड विहीत अर्जावर पुरोहिताची स्वाक्षरी नाही. संचिकेत जोडलेल्या लग्नपत्रिकेत विवाह दिनांक ३१.१२.२०१६ असे नमूद आहे. परंतू अर्जात अर्जदाराने विवाह दिनांक ३१.१२.२०१७ दर्शविली, त्यानुसार विवाह प्रमाणपत्र निर्गमित केले. विवाह दिनांकाची शहानिशा केलेली नाही. तसेच आकारलेली फी कमी आकारली. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

१६. विवाह नोंदणी प्रकरणांत शेवरे दिपक प्रभाकर व गुंड कोमल रत्नाकर यांनी सादर केलेल्या नमूना (ड) विहीत अर्जावर पुरोहिताचे नांव, पत्ता व स्वाक्षरी नाही.

१७. विवाह नोंदणी प्रकरणांत दिपक दिगंबर बाब्रस व शोभा पंडीत बावीस्कर यांनी सादर केलेल्या नमूना घ्डङ वर वधूची स्वाक्षरी नाही. तसेच साक्षीदार क्र.-२ ची स्वाक्षरी नाही.

उक्त प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत. विवाह नोंदणीचे नाममात्र प्रकरणे तपासली असून इतर सर्व प्रकरणे, विवाह निबंधक यांचे स्तरावर तपासून अनियमितता आढळल्यास दुरूस्त्या करण्यात याव्यात. त्यानुसार उक्त मुद्यासहीत केलेल्या कार्यवाहीच्या अनुपालनासह लेखापरीक्षण विभागास खुलासा सादर करावा असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - क्र. ४ (एच) कार्यालय**

**परिच्छेद क्र.१५ : झोन क्र.४ वॉर्ड एच मध्ये कार्यरत कर्मचा-यांच्या सेवापुस्तक/सेवापट अद्यावत नसल्याबाबत.**

झोन क्र.४ वॉर्ड एच मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या सेवापुस्तक/सेवापट मधील नोंदी अद्यावत नाहीत. विभागाने खालील सेवापुस्तके/सेवापटे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून दिली. त्यामधील निदर्शनास आलेल्या बाबींची विभागाने पूर्तता करावी. तसेच याव्यतीरीक्त झोन कार्यालयातील इतर सेवापुस्तके/सेवापटे अद्यावत करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.

**१. महादू भावसिंग ब्राम्हणे, लिपीक टंकलेखक -**

अ) जात वैधता प्रमाणपत्राची सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठावर लालशाईने नोंद घेतलेली नाही.

ब) सेवापुस्तकात सेवाकाळाची नोंद नाही.

क) रजेच्या नोंदी सेवापुस्तकात अद्यावत नाही.

ङ) इंग्रजी, मराठी टंकलेखनाची नोंद सेवापुस्तकात नाही.

इ) कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड ब/१५०४/२०१५ नुसार देय वेतन, दिलेले वेतन व फरक वेतनाबाबतचा तक्ता संचिकेत नाही.

ई) बदली आदेशाची नोंद सेवापुस्तकात नाही.

उ) चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

**२. जावेदखान मुसाखान, कनिष्ठ लिपीक -**

अ) सेवापुस्तकात रजेच्या आदेशाच्या नोंदी अद्यावत नाही.

ब) जा.क्र.मनपा/आस्था-१/२००८/१८२४, दि.२१.११.२००८ अन्वये १४ दिवसांची परावर्तीत रजा एकूण रजेच्या खात्यातून वजा केलेली नाही.

क) कार्यालयीन आदेश क्र.वॉर्ड अ/१५२९/२०१०, दि.३०.१०.२०१० नुसार दि.१.१.२००६ पासून करण्यात आलेल्या वेतन निश्चिती मध्ये दुरूस्ती केली. सदरील आदेशात दि.१.७.२००६ व दि.१.७.२००७ या दोन वर्षासाठी एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा प्रकारे थांबविलेली आहे. प्रत्यक्षात संबंधितांना आर्थिक फायदे दिलेले नाही. याबाबत संचिकेत Due Drawn Difference चे statement नाही. त्यामुळे खात्री झाली नाही.

ड) संचिकेत CS-९८ वर अर्जीत रजेचे आवेदन पत्र आहे. दि.१८.८.२०१० ते १६.९.२०१० (३०) दिवस या कालावधीचा आवेदन पत्रात उल्लेख आहे. प्रत्यक्ष रजा मंजूरीबाबत संचिकेत सादरीकरण आदेश उपलब्ध नाही.संबंधितांनी उक्त कालावधीत रजा उपभोगली की नाही याची खात्री झाली नाही.

इ) चारीत्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

## ३. <u>भिमराव जाधवराव पाटील, स्वच्छता निरीक्षक -</u>

अ) जात वैधता प्रमाणपत्राची नोंद लालशाईने सेवा पुस्तकात घेतलेली नाही.

ब) सेवाकाळ अद्यावत नोंदविलेला नाही.

क) चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

ड) रजेच्या नोंदी अद्यावत नाही.

## ४. <u>बिरजूलाल मथुरादास मामोडे, कनिष्ठ लिपीक व टंकलेखक-</u>

अ) जात वैधता प्रमाणपत्राची नोंद लालशाईने सेवा पुस्तकात घेतलेली नाही.

ब) सेवाकाळ अद्यावत नोंदविलेला नाही.

क) चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

ड) रजेच्या नोंदी अद्यावत नाही.

## ५. <u>जयश्री विजय पगारे, मजूर</u>

अ) चारीत्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

ब) वैद्यकीय पडताळणी अहवाल नोंद नाही.

क) रजेच्या नोंदी अद्यावत नाही.

ड) सेवाकाळ अद्यावत नाही.

इ) कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वि.क्र.१/५४७/९९,दि.०३/५/९९ अन्वये ७ वर्षानंतरची निवडश्रेणी दि.७.२.९९ पासून लागू केली आहे. निवडश्रेणीची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (वेतन) मधील तरतूदीनुसार केलेली असल्याबाबत खात्री करावी,आवश्यकतेनुसार दुरूस्ती करून योग्य ती कार्यवाही व्हावी.

ई) जा.क्र.मनपा/आस्था-२/६३५/९८,दिनांक २२.२.१९९८ अन्वये ५ दिवसांची अर्जीत रजा वजा केली नाही.

फ) कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-२/२०१०/१४४२, दिनांक ९.२.२०१० अन्वये दि.६.२.२००४ पासून १२ वर्षाची समयश्रेणी लागू केली. सदरील कर्मचा-यास ७ वर्षाची निवडश्रेणी लागू केली असतांना पुनश्च १२ वर्षाची वेतनश्रेणी लागू करणे ही बाब आक्षेपार्ह आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (वेतन) मधील तरतुदीनुसार दुरूस्ती करणे योग्य.

६. **विमलबाई मारोती हिवराळे, सफाई मजूर.**

अ) चारीत्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

ब) रजेच्या नोंदी अद्यावत नाही.

क) सेवाकाळ अद्यावत नाही.

ड) कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड अ/३२७९/१४,दि.१९/११/२०१४ अन्वये १२ वर्षाची समयश्रेणी लागू केली आहे. शासन निर्णय क्रमांक बेपूर/१२१०, प्र.क्र.२४/सेवा-९ दिनांक १.९.२०१५ मधील तरतूदी नुसार दुरूस्ती अपेक्षित आहे.

७. **स.अथरउल हक शमीउल हक, शिपाई -**

अ) जात वैधता प्रमाणपत्राची नोंद लाल शाईने सेवा पटात घेतलेली नाही.

ब) चारीत्र्य पडताळणी अहवाल नोंद नाही.

क) संबंधिताच्या संचिकेत नेताजी सुभाष हायस्कूल यांच्या Tc क्र.८३ अ/९३/ दि.१५.६.९३ वर जातीचा उल्लेख मुस्लीम छप्परबंद म्हणून केला आहे. परंतू सेवापटाच्या पहिल्या पानावर छप्परबंद या शब्दास तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांनी आळे करून स्वाक्षरी केलेली आहे. संबंधित कर्मचारी कोणत्या वर्गवारीत आहे याचा बोध होत नाही. विभागाने उक्त बाबींची खातरजमा करून खुलासा करावा.

ड) रजेच्या नोंदी अद्यावत केलेल्या नाहीत.

इ) सेवाकाळ नोंदविलेला नाही.

ई) जा.क्र.मनपा/वॉर्ड ब/२०११/१५६, दि.२१/१/२०११ अन्वये १२ वर्षाची समयश्रेणी दि.२४.९.२०१४ पासून लागू केली आहे. सदरील प्रमाणे वेतन निश्चितीमध्ये दि.१.७.२०११ रोजी दिलेली वेतनवाढीत दुरूस्ती निदर्शनास येते. विभागाने खातरजमा करून योग्य ती कार्यवाही करावी.

८. **शशिकला नामदेव मोटे, सफाई मजूर**

अ) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापटात नाही.

ब) चारीत्र्य पडताळणी अहवाल नोंद सेवापटात नाही.

क) सेवाकाळ नोंदविलेला नाही.

ड) रजेच्या नोंदी अद्यावत नाही.

इ) जा.क्र.मनपा/वॉर्ड अ/७४६/२०१२, दि.१८.५.२०१२ अन्वये सलग दोन वेतनवाढ मध्ये सुधारणा करून सुधारीत वेतन आदेश आहेत. तथापि सुधारीत वेतन आदेश चूकीचे आहेत. योग्य ती दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

ई) जा.क्र.मनपा/वॉर्ड अ/३३७०/१४, १८/११/२०१४ अन्वये बारा वर्षाच्या समयश्रेणीची वेतन निश्चिती मध्ये दुरूस्ती आहे. दुरूस्तीसह कार्यवाही करावी.

**९. तमीजबी शेख जहूरखान पठाण, सफाई मजूर-**

अ) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापटात नाही.

ब) चारीत्र्य पडताळणी अहवाल नोंद सेवापटात नाही.

क) सेवाकाळ नोंदविलेला नाही.

ड) रजेच्या नोंदी अद्यावत नाही.

इ) जा.क्र.मनपा/वॉर्ड अ/३२६३/२०१४, दिनांक १८.११.२०१४ अन्वये बारा वर्षाची समयश्रेणी दिली. वेतन निश्चिती करतांना शासन निर्णय क्रमांक वेपूर/१२१०/प्र.क्र./सेवा-९,दिनांक १/९/२०१५ मधील तरतूदीनुसार दुरूस्ती अपेक्षित आहे.

**विभागाने वॉर्ड कार्यालयातील कार्यरत कर्मचारी / अधिकारी यांचे सेवापुस्तके व सेवापट अद्ययावत करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.**

**लेखापरीक्षण अहवाल.**
**झोन क्र. ४ (वॉर्ड एच) अभियंता कार्यालय**
**सन २०१७-२०१८**

**परिच्छेद क्र.०१ : आर्थिक वर्ष २०१७-२०१८ या कालावधीतील अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

झोन क्र.४ (वॉर्ड एच) या कार्यालयातील अनुषंगिक लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यात दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून द्यावे.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात बी-१ कामाच्या संचिका उपलब्ध करून देणे. (रस्ते,जलनि:सारण , पाणीपुरवठा,बांधकाम,इमारत बांधकाम उद्यान बांधकाम,नाला सफाई, स्मशानभूमी विकास, शहर सौंदर्यीकरण व इतर बाबी) | **अपूर्ण स्वरूपात** |
| २ | मोजमाप पुस्तके,प्रोव्हीजन रजिस्टर, रजिस्टर इ. | **अपूर्ण स्वरूपात** |
| ३ | स्टॉक बुक रजिस्टर (१०९,११०,१११) | **अप्राप्त** |
| ४ | डेड स्टॉक रजिस्टर. | **अप्राप्त** |
| ५ | शासकीय अनुदानातून करण्यात आलेल्या कामांच्या संचिका. | **अप्राप्त** |
| ६ | वॉर्ड अभियंता कार्यालयात कार्यरत कर्मचा-यांचा जॉबचार्ट. | **अप्राप्त** |

**विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत उक्त माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत साशंकता निर्माण होते. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२ : सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२९ श्रीकृष्णनगर सिडको येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर हौसींग सोसायटी मधील रस्त्यांचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे बाबत. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.१६,५९,५२८/-)**
**निविदा रक्कम रू. १५,८०,५०३/- ( खर्च रक्कम रू. १५,४७,२१७/-)**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२९, श्रीकृष्णनगर, सिडको येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर हौसींग सोसायटी मधील रस्त्यांचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे बाबतच्या कामासाठी ई निविदा मागविण्यात आली होती. सात वेळा सदरील निविदेस प्रतिसाद न मिळाल्यामुळे जा.क्र.मनपा/झोन-४/२३०/२०१७, दिनांक १२.५.२०१७ अन्वये स्थानिक वृत्तपत्रात दरपत्रक सूचना (Closed offer) प्रसिध्दीस देण्यात आली.

दरपत्रके दि.२९.५.२०१७ पर्यंत मागविली. दिनांक ३.६.२०१७ रोजी लेखा विभागात निविदा पेटी उघडण्यात आली. एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.८०% कमीचे असून मे. अरजीत कन्स्ट्रक्शन या एजन्सीचे आहेत.एजन्सीचे उक्त दर स्वीकृत करण्यात आले. एजन्सीने महानगरपालिके सोबत करारनामा केल्यानंतर एजन्सीला कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभियंता झोन क्र.४/११५/२०१७ दिनांक २१.७.२०१७ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत ४ महिने ठेवण्यात आली. सदरील काम दिनांक २९.८.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.४७३७ लेखापरीक्षण कामी विभागाने उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण होऊ शकले नाही.
२. दरपत्रक सूचना (Closed offer)मधील अटी/शर्ती नुसार सदर कामाची निविदा किंमत देयकातून वसूल केली जाईल असे नमूद आहे. प्रत्यक्षात देयकातून निविदा किंमत कपात केलेली नाही, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.
३. विभागाने सदरील कामाचे मत्ता नोंदवही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेली नाही.
४. सदरील कामाची ई निविदेद्वारे सात वेळा प्रसिध्द करूनही प्रतिसाद मिळाला नाही. याबाबत निविदेतील अटी/शर्ती निविदा दर योग्य आहेत याबाबत closed offer मागविण्यापूर्वी सादरीकरण होणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्याचे संचिकेत दिसून येते.

उक्त मुद्यांवर तपासणी /शहानिशा करून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.२ प्रमाणे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३ : सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.३० पवननगर अंतर्गत सेक्टर के व रंजनवन हौसिंग सोसायटी येथे जलनि:सारण वाहिन्या बदलणे बाबत.**
**(अंदाजपत्रकीय रक्कम रू. ४,०६,९७४/-)**
**खर्च रक्कम रू. ३,८४,१३८/-**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.३० पवननगर अंतर्गत सेक्टर के व रंजनवन हौसींग सोसायटी येथे जलनि:सारण वाहिन्या बदलणे बाबतच्या कामाची निविदा मागविण्यात आली. अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा विक्री होवून निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी १०% Below दराची निविदा मे.ओम कन्स्ट्रक्शन यांची होती. संबंधित कंत्राटदाराची निविदा स्वीकारण्यात आली. एजन्सीने महानगरपालिके सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालया मार्फत कार्यालयीन पत्र क्र.मनपा/झोन क्र.४/३५/२०१६ दिनांक ९.११.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

कामाची मुदत ३ महिने ठेवण्यात आली. सदरील काम दि.१४.१२.२०१६ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद आहे.

संचिकेची सविस्तर तपासणी अंती खालील मुद्दे आक्षेपार्ह निदर्शनास आले.

१. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.४१८९ विभागाने उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. ॲटम क्र.१ चे परीमाण ४०१.५१ दर्शविले आहे. उक्त भागातील जूनी जलनि:सारण वाहिणीचा व्यास १५०mm होता, त्याच जागी २०० mm व्यासाची वाहिनी अंथरली. तरीसुध्दा ॲटम क्र.१ च्या परिमाणा एवढेच परीमाण ॲटम क्र.१६ Refilling the trenches साठी वापरण्यात आले.

३. ॲटम क्र.१ चे परीमाण व ॲटम क्र.१६ चे परिमाण एकच असून पुन्हा शिल्लक material चे Tran ॲटम क्र.१४ अन्वये १२.१५ परीमाण दर्शविले यावरून २०९.४६ प्रमाणे रू.२५४४ खर्च झालेला आहे. सदरील खर्च जास्तीचा झाल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

४. ॲटम क्र.१४ Trans of surplus material बाबतचे परीमाण योग्य असतील तर ॲटम क्र.१६ Refilling the trenches बाबतचे परीमाणाबाबत खुलासा व्हावा.

५. निविदा नियम ३८ प्रमाणे ॲटम निहाय २५% पर्यंत परीमाणात वाढ अनुज्ञेय आहे. तथापि खालील ॲटम मध्ये त्यापेक्षा जास्त वाढ झाल्यामुळे जास्तीचा खर्च झालेला आहे. जास्तीच्या खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसल्यामुळे झालेला जास्तीचा खर्च अमान्य का करण्यात येवू नये, याबाबत खुलासा व्हावा.

| ॲटम क्रमांक | विवरण | देयकातील परीणाम | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परिणाम | दर | जास्तीचा खर्च रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | Ex.for pipe trenches in earth soil | ४०१.५१ | १४६.७० | २५४.८१ | १४३.३६ | ३६५३०/- |
| १० | Raising existing man hole chamber | २६ | १० | १६ | ९०२ | १४४३२/- |
| ११ | Pro./Rep.existing man hole chamber | २६ | १० | १६ | ७२० | ११५२०/- |
| १२ | Pro/supplying SFRC Frame Cover १०००X७००X७५ | १६ | ०६ | १० | १७५९.५० | १७५९५/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | Fixing of SFRC Frame Cover | २६ | ०६ | २० | ११०.१६ | २२०३/- |
| १५ | Prov./constructiong brick masonary in cement mortor १:६ for intercepting trap chamber ९०x४५ cm | २२ | ०८ | १४ | ४०६० | ५६८४०/- |
| | | | | | **एकूण** | **१,३९,१२०/-** |

६. सदरील कामाचे अंदाजपत्रक प्रथम रू.४,९९,१३२/- चे तयार केले. तद्नंतर परिच्छेद (७) नुसार तांत्रिक कक्ष प्रमुख यांनी रू.४,२७,३२३/- चे दुरूस्ती अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठी प्रस्तावित केले. प्रत्यक्षात सदरील कामाचे शेड्यूल्ड B रू.४,०६,९७४/- इतक्या रकमेचे आहे. एकूणच अंदाजपत्रक तयार करतांना जास्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याचा हेतू समजू शकत नाही.

७. निविदा उघडतांना संबंधित कंत्राटदाराचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र संचिकेत नाही. त्यामुळे एजन्सी पात्र होती का याचा खुलासा व्हावा.

उक्त मुद्यांवर तपासणी / शहानिशा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे कळविण्यात आले होते. अहवाल अंतिम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

**विभागाने मुद्या क्र. ३ नुसार रू.२५४४/- वसूल करावे तसेच इतर अनियमिततेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. विभागातील अधिकारी/कर्मचा-यांवर उक्त बाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४ : सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.३० एन-९ अंतर्गत पाणी वाहून जाण्यासाठी आर.सी.सी.पाईप टाकून चेंबर बांधणे बाबत.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू. ९९,९२२/- (खर्च रक्कम रू.९६,६००/-)**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.३० एन-९ अंतर्गत पाणी वाहून जाण्यासाठी आर.सी.सी.पाईप टाकून चेंबर बांधणे बाबत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ३ निविदांची विक्री झाली. निविदा स्वीकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या यामध्ये सर्वात कमी दराची निविदा मे.ओम कन्स्ट्रक्शन यांची १.९९% Below ची आहे. एजन्सीला १% अतिरिक्त सुरक्षा अनामत भरण्यासाठी कळविण्यात आले असतांना एजन्सीने १% अतिरिक्त सुरक्षा ठेवींचा भरणा महानगरपालिका फंडात केला.एजन्सीची निविदा स्विकारण्यात आली. संबंधितांना महानगरपालिके सोबत करारनामा व २% अनामत रक्कम भरणा करण्याबाबत कळविले.

एजन्सीने पत्र देवून २% अनामत रक्कम देयकातून कपात करण्याची विनंती केली. कार्यालयाने संबंधितांची विनंती मान्य करून कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभियंता झोन ४/८३/२०१७ दिनांक १५.३.२०१७ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. कामाची मुदत एक महिन्याची होती. तद्नंतर सदरील कामे करण्यासाठी स्थानिक नागरीकांनी विरोध दर्शविला. स.सदस्य यांनी सदरील कामाचे स्थळ बदलासाठी मागणी केली. स्थळ बदलामुळे कामाची मुदत दिनांक १५.८.२०१७ पर्यंत वाढविण्याबाबत प्रस्तावित झाले. काम दिनांक ११.८.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद आहे.

संचिकेतची सविस्तर तपासणी अंती खालील मुद्दे आक्षेपार्ह निदर्शनास आलेले आहेत.

१. कार्यादेश देण्यापूर्वी २% रकमेचा भरणा होणे आवश्यक ठरते. तसे न होता विभागाने कंत्राटदाराची विनंती मान्य करून देयकातून कपात केली ही बाब नियम बाह्य ठरते. तसेच यामुळे महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले आहे.

२. लेखा शाखेने देयक पारीत करतांना विमा रक्कम देयकातून कपात करण्यात येईल असे संचिकेत नमूद आहे. परंतू देयकातून रू.९६६/- कपात न केल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले असून संबंधिताकडून रक्कम वसूल करून शासनाकडे भरणा करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

३. मोजमाप पुस्तिका क्र.४७३६ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

४. निविदा नियम ३८ प्रमाणे ॲटम मध्ये २५% वाढ अपेक्षित आहे. तथापि ॲटम क्र.१२ मध्ये Prov.st.stell work in rolled section etc प्रत्यक्ष परीमाण ०.२९४ अंदाजपत्रकीय परिमाण ०.१२०५ फरक परीमाण ०.१७३५ असून परिमाणात २५% पेक्षा जास्त वाढ झालेली आहे. ०.१७३५x रू.७१६७२.९६= १२४३५/- जास्तीचा खर्च झालेला असून त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

५. संचिकेत सदरील कामाच्या शेड्यूल्ड B ची प्रत उपलब्ध नाही.

करीता उक्त मुद्यांवर सविस्तर तपासणी अंती आवश्यक त्या कार्यवाहीसह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.२ प्रमाणे शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.५: सन २०१७-१८ या वर्षात वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर अंतर्गत नाल्याची दुरूस्ती करणे. (एच.डी.सेक्टर अंतर्गत)**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,४९,०००/-( खर्च रक्कम रू.२,४१,३७२/-)**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर अंतर्गत नाल्याची दुरूस्ती करणे (एचडी सेक्टर अंतर्गत) च्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. चौथ्या वेळी एकच निविदा मे.ओम कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९९% कमी दराची प्राप्त झाली. संबंधितांची निविदा स्विकारण्यात आली. कंत्राटदाराने महानगरपालिके सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयाने कार्यालयीन पत्र क्र.मनपा / उपअभियंता झोन क्र.४/८२/२०१७,दिनांक १५.३.२०१७ अन्वये कामाचे कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत २ महिने देण्यात आली. सदरील काम दिनांक २०.४.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे काम पुर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. विभागाने लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.४७४० लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. देयकातून विमा रक्कम कपात असा शेरा लेखा शाखेने देयक पारीत करतांना दिला. तथापि विमा रक्कम कपात केलेली नाही, त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

३. निविदा नियम ३८ नुसार ॲटम मध्ये २५% पर्यंत वाढ अपेक्षित आहे. विभागाने ॲटम क्र.२,६,७ मध्ये २५% पेक्षा जास्त वाढ झाल्याचे नमूद केलेले आहे. परंतू खर्च अंदाजपत्रकीय मर्यादेत आहे असे सादरीकरणात नमूद आहे. परंतू २५% पेक्षा जास्त वाढीव परिमाणास सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव सादरीकरण केलेले नाही. खालील प्रमाणे जास्तीचा खर्च झालेला आहे.

| ॲटम क्र. | ॲटमचे विवरण | देयकातील परिमाण | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परीमाण | दर | जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | Pro.UCR masonary in cm १:६ per fdn/plinth | ४४.४६ | ३२.४०० | १२.०६ | ३०१५.२६ | ३६३६४/- |
| ६ | Desiting the man hole/sewerage work in wet/dry condition | ३६.९९ | २४.३५० | १२.६४ | ५४१.१८ | ६८४१/- |
| ७ | Tran.of surplus material from work site | ३६.९९ | २४.३५० | १२.६४ | १७२.०१ | २१७४/- |
| | | | | | **एकूण** | **४५३७९/-** |

उक्त मुद्यांवर तपासणी करून आवश्यक कार्यवाहीसह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.२ प्रमाणे शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.६: सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२८ मधील एन-१२, एफ सेक्टर मधील ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. ( अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९६,८१६/-) खर्च रक्कम रू.२,१४,५१०/-**

सन २०१७-१८ या वर्षात वॉर्ड क्र.२८ मधील एन-१२ एफ सेक्टर मध्ये ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. ५ वेळा निविदा मागविली असतांना एकच निविदा मे.ओम कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९९% कमी दराची निविदा प्राप्त झाली. एजन्सीने २% रक्कम देयकातून कपात करण्याची विनंती करून महानगरपालिके सोबत करारनामा केला. कार्यालयाने कार्यालयीन आदेश क्र.मनपा/उपअभियंता झोन ४/८५/२०१७ दिनांक २९.३.२०१७ अन्वये कामाचे आदेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत २ महिने ठेवण्यात आली. काम दिनांक २१.४.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. विभागाने लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.४७४० उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.
२. काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही.
३. दिनांक २१.४.२०१७ रोजी काम पूर्ण झाल्याचे नमूद आहे. परंतू कामाचे देयक प्रथम व दरम्यानचे दिले. त्यामुळे काम पूर्ण होण्यापूर्वीच काम पूर्णत्व झाल्याचे अभिलेखे संचिकेत आहेत की कामाचे देयक अंतीम झाल्यानंतरचे याबाबत खुलासा अपेक्षित आहे. कारण संचिकेत कामाचे १% FSD रक्कम परतावा झाल्याचे नमूद आहे.
४. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही, तसेच देयकातून सुध्दा कपात झालेली नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.
५. कंत्राटदाराच्या विनंतीनुसार देयकातून अनामत रकमेपोटी २% रक्कम रू.१०,०००/- कपात केलेली नाही, त्याकारणे महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच ज्या हेतूसाठी अनामत रक्कम स्वीकारली जाते तो हेतू सफल होत नाही.
६. कार्यादेशातील अट क्र.३ नुसार सक्षम अधिका-यांच्या परवानगी शिवाय निविदा परिमाणापेक्षा जादा परिणाम स्वीकृत केले जाणार नाही असे नमूद आहे. तथापि ॲटम क्र.८ मध्ये शेड्यूल्ड B मधील परीमाण २ आहे. प्रत्यक्षात ६ परीमाणापर्यंत वाढ झालेली आहे. यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही. रू.१६,५५६/- खर्च अंदाजपत्रकात नमूद आहे. प्रत्यक्षात रू.५५,५२६/- इतका खर्च झालेला असून रू.३८,९७०/- जास्तीचा खर्च झालेला आहे.

करीता, उक्त मुद्यांवर तपासणी करून आवश्यक कार्यवाही अंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.४ प्रमाणे शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.७: सन २०१७-१८ या वर्षात हर्सूल तलाव स्मृतीवन परिसरातील कृत्रीम तलावात गणपती विसर्जन करणे करीता तात्पुरता रस्ता तयार करणे, स्टेज उभारणे व बॅरेकेटींग करणे. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,६५,७५०/-) ( खर्च रक्कम रू.४,६४,१८८/-)**

सन २०१७-२०१८ या वर्षात हर्सूल तलाव स्मृतीवन परिसरातील कृत्रीम तलावात गणपती विसर्जन करणे करीता तात्पुरता रस्ता तयार करणे, स्टेज उभारणे व बॅरेकेटींग करणे इत्यादी काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (C) कलमाच्या तरतूदीच्या अधिकारातून उपलब्ध कंत्राटदार यांचेकडून करून घेतले. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/झोन - ४/१४८/२०१७, दिनांक २१.९.२०१७ अन्वये सदरील कामाचे कार्यादेश निर्गमित केले. संबंधितानी दि.५.९.२०१७ रोजी काम पूर्ण झाल्याची दिनांक काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्र.४७३६ विभागाने लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.
२. देयकातून २% अनामत रक्कम व निविदा रक्कम कपात केली नसल्याने महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले आहे.
३. देयकातून ३% FSD कपात न होण्याचे कारण समजू शकले नाही, त्यामुळे महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले आहे.
४. देयकातून कामगार कल्याण निधी १% रक्कम रू.४६४/- कपात केली नाही, त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.
५. कंत्राटी कामाचा विमा कालावधी काम पूर्ण झाल्यानंतर उतरविला आहे, त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.
६. निविदा नियम ३८ प्रमाणे कामाच्या परिमाणात २५% वाढ अपेक्षित आहे. तथापि खालील ॲटममध्ये त्यापेक्षा जास्तीची झालेली परीमाणे व अतिरिक्त खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

| ॲटम क्र. | तपशिल | देयकातील परीमाण | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परीमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | Supplying hard murum kankar at the road etc. | १०२.५२ | ७९.२५ | २३.२७ | ५९१.०१ | १३७५३ |
| ७ | Spreading gravel sand soft murum etc. | २०१.४४ | १५८.५० | ४२.९४ | ३१.०५ | १३३३ |
| ९ | Compacting the hard murum etc. | २०४९.१५ | १५८५.०० | ४६४.१५ | ७.४२ | ३४४४ |
| | | | | **एकूण रक्कम रू.** | | **१८५३०/-** |

करीता उक्त मुद्यांवर तपासणी करून आवश्यक त्या कार्यवाहीसह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.४ प्रमाणे शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.८: सन २०१७-२०१८ या वर्षात वॉर्ड क्र.११ विश्वासनगर, हर्षनगर अंतर्गत विविध ठिकाणी अस्तित्वात असलेली जूनी जलनि:सारण वाहिनी काढून नविन जलनि:सारण वाहिनी टाकणे बाबत.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९८,०१९/- (खर्च रक्कम रू.४,५०,३७१/- )**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.११ विश्वासनगर, हर्षनगर अंतर्गत विविध ठिकाणी अस्तित्वात असलेली जुनी जलनि:सारण वाहिनी काढून नविन जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी ई- निविदा मागविण्यात आल्या होत्या. ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची ०.४३% निविदा शेख सलीम मोहीयोद्दीन यांची होती. एजन्सीने ३% कमी दराने काम करण्यास सहमत दर्शविली. परंतू १% Add.EMD भरण्यास नकार दिला. कार्यालयाने संबंधिताचे दर स्विकृत केले. २% अनामत रक्कम व करारनामा एजन्सीने महानगरपालिके सोबत केला. कार्यालयीन पत्र क्र.उपअभियंता झोन क्र.४/७५/२०१७, दिनांक ४.३.२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत २ महिने ठेवण्यात आली होती. सदरील काम दिनांक २.५.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. मोजमाप पुस्तिका क्र.४७४१ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. संचिकेत देयकाची २ पाने असणे आवश्यक आहे, परंतू पान क्र.१ नसल्याने अपूर्ण अभिलेख्यामुळे तपासणी करता आली नाही.

३. संचिकेतील completion Report आधारे ॲटम क्र.८ चे परीमाणात २५% पेक्षा जास्त वाढ झालेली आहे. कार्यादेशातील अट क्र.३ मध्ये नमूद प्रमाणे सक्षम अधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय निविदा परीमाणापेक्षा जादा परीमाण स्वीकृत केले जाणार नाही, असे असूनही उक्त ॲटमवर अंदाजपत्रक रकमेपेक्षा रू.२२३६६/- जास्तीचा खर्च झालेला आहे, यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

उक्त मुद्यांवर विभागाने आपल्या स्तरावर तपासणी करून कार्यवाही अंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.९: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.४ चेतनानगर अंतर्गत म्हाडा कॉलनी येथील अण्णाभाऊ साठे सभागृह परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.९९२८८/- ( खर्च रक्कम रू.९८२४५/-)**

लेखापरीक्षणा दरम्यान सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.४, चेतनानगर अंतर्गत म्हाडा कॉलनी येथील अण्णाभाऊ साठे सभागृह परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे बाबतच्या कामासाठी ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९९% दराची गुलाम रसूल गुलाम मोहीयोद्यीन यांची होती. संबंधित एजन्सीचे दर स्वीकृत करण्यात आले. एजन्सीने महानगरपालिके सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभियंता/झोन क्र.४/१०८/२०१७, दिनांक १५.७.२०१७ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत एक महिना ठेवण्यात आली होती. काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रानुसार काम दिनांक १४.८.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे नमूद आहे. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. मोजमाप पुस्तिका क्र.४७४१ विभागाने लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण झाल्यानंतर उतरविण्यात आला. त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल झालेला नाही.

३. कार्यादेशातील अट क्र.३ नुसार सक्षम अधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय निविदा परिमाणापेक्षा जादा परीमाण स्वीकृत केले जाणार नाही, असे नमूद असतांना तसेच निविदा अट क्र.३८ नुसार ॲटमच्या परीमाणात २५% पेक्षा जास्त वाढ होवूनही सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. ॲटम क्र.४ चे देयकातील परीमाण १४२.१३ असून शेड्यूल्ड B मधील परीमाण ८० आहे. फरक परीमाण ६२.१३ आहे. ॲटमचा दर रू.३७३.२५ प्रमाणे रू.२३,१९०/- जास्तीचा खर्च झालेला आहे.

उक्त मुद्यांवर विभागाने आपल्या स्तरावर तपासणी करून कार्यवाही अंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

### परिच्छेद क्र.१०: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.७ मयुरपार्क अंतर्गत विविध ठिकाणी तुटलेले चेंबर दुरूस्ती व नविन ढापे बसविणे बाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९९,६३४/- (खर्च रक्कम रू.१,९८,६८२/-)

सन २०१७-२०१८ या वर्षात वॉर्ड क्र.७ मयुरपार्क अंतर्गत विविध ठिकाणी तुटलेले चेंबर दुरूस्ती व नविन ढापे बसविणेबाबत निविदा मागविण्यात आल्या होत्या ४ वेळा निविदा मागवूनही एकही निविदा प्राप्त झाली नाही. पाचव्या वेळी closed offer मागविण्यात आली. त्यावेळी एक दरपत्रक अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०% कमी दराचे मे.माणिक इन्फ्रा प्रोजेक्टस् यांचे प्राप्त झाले. एजन्सीचे दर स्वीकृत करण्यात आले. एजन्सीने महानगरपालिके सोबत करारनामा केला. कार्यालयाने कार्यादेश क्र.मनपा/उपअभियंता झोन -४/१४१/२०१७ दिनांक ७.९.२०१७ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. कामाची मुदत २ महिने होती. काम मुदतीत पूर्ण झाले. संचिकेची तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. कंत्राटी कामाचा विमा देयकातून कपात करण्यात येईल असे सादरीकरणात नमूद आहे. परंतू विमा रक्कम देयकातून कपात झाली नाही, त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

२. कार्यादेश देण्यापूर्वी २% अनामत रक्कम घेणे क्रमप्राप्त आहे. परंतू कंत्राटदाराच्या विनंतीनुसार देयकातून अनामत रक्कम कपात करणे ही बाब नियमबाह्य असून अनामत रक्कम स्विकारण्याचा हेतू सफल न करणारी आहे. तसेच महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान करणारी आहे.

३. कार्यादेशात अट क्र.३ मध्ये स्पष्ट नमूद आहे की, सक्षम अधिका-याच्या लेखी परवानगीशिवाय निविदा परिमाणापेक्षा जास्तीचे परीमाण स्वीकृत केले जाणार नाही. तरी सुध्दा जास्तीचे परीमाण दर खर्च झालेला असून त्यास सक्षम प्राधीकरणाची मान्यता नाही.

| ॲटम क्र. | ॲटमचे विवरण | देयकातील परीमाण | शेड्यूल्ड B मधील परिमाण | फरक परिमाण | दर | जास्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | P/s SFRC Frame and Cover | २६ | ३ | २३ | २२४९ | ५१७२७/- |
| १ | P/constg.Drg.line BBm circular mh chamber depth १.५० | १० | ३ | ०७ | -- | ४८६५४/- |
| ४ | Fixing SFRC frame & cover | १८ | १३ | ०५ | ४२८ | २१४०/- |
| १२ | Rodding for removing chokeup exist drg.line | ३०३ | २२५ | ७८ | ११९.३४ | ९३०९/- |
| | | | | | **एकूण** | **१११८३०/-** |

करीता उक्त मुद्यांवर तपासणी करून आवश्यक कार्यवाही अंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.१ प्रमाणे शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.३० पवननगर, येथे अस्तित्वातील जलनि:सारण वाहिनीची दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे बाबत.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९९,५६२/-**
**खर्च रक्कम रू.४,९४,५८४/-**

वॉर्ड क्र.३० पवननगर येथे अस्तित्वातील जलनि:सारण वाहिनीची दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणेचे कामाकरीता चार वेळा निविदा मागविण्यात आल्या. चौथ्या वेळी एकच निविदा प्राप्त झाली.

प्राप्त निविदा डी.एस.साळुंके यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९०% कमी दराची प्राप्त झाली. प्राप्त दराची निविदा स्वीकृत करण्यात आली. एजन्सीने महानगरपालिके सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभियंता झोन -४/९५/२०१७, दिनांक १.६.२०१७ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत १२ महिने ठेवण्यात आली होती. काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात काम पूर्णत्वाची दिनांक नमूद नाही. संचिकेची सविस्तर तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. मोजमाप पुस्तिका क्र.५१०१ लेखापरीक्षणासाठी विभागाने उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. कार्यादेशात कामाची मुदत १२ महिने होती. दिनांक ३१.५.२०१८ पर्यंत कामाची मुदत असतांना दिनांक २.५.२०१८ रोजी दुसरे व अंतीम देयक पारीत करण्यात आले. म्हणजेच काम पूर्ण होण्यापूर्वीच देयक अंतीम केले. काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रात काम पूर्ण झाल्याची दिनांक नमूद नाही.

३. दुसरे व अंतीम देयकाची एकूण बेरीज रू.४,९९,०७६/- दर्शविली आहे. प्रत्यक्षात बेरीज रू.४,३४,४०६/- येते. म्हणजेच रू.६४,६७०/- जास्तीची रक्कम संबंधित कंत्राटदारास बेरजेच्या चुकीमुळे प्रदान केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते.

४. सदरील कामाच्या कार्यादेशात अट क्र.३ नुसार सक्षम अधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय निविदा परीमाणापेक्षा जादा परीमाण स्वीकृत केले जाणार नाही असे नमूद असतांनाही तसेच निविदा नियम ३८ प्रमाणे ॲटमच्या परीमाणात २५% वाढ अभिप्रेत आहे. त्यापेक्षा जास्त वाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे -

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशिल | देयकातील परीमाण | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परीमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १.२ | २५० mm dia to ४५० mm dia Rcc/swg pipe | १२९९ | १००० | २९९ | ४१ | १२२५९/- |
| ७.३ | १०० mm to २५० mm dia Rcc pipe | २१.८० | १० | ११.८० | ४३.०५ | ५०८/- |
| ७.१ | १०० mm to २५० mm dia swg pipe | २५ | १० | १५ | ३२.७६ | ४९१/- |
| ८.२ | २२५ mm dia swg pipe | २३ | १० | १३ | २७१.६९ | ३५३२/- |
| ८.३ | ३०० mm dia swg pipe | १६.८० | १० | ६.८० | ३५५.५२ | २४१८/- |
| ९.२ | २२५ mm dia swg pipe | २३ | १० | १३ | १५१.५८ | १९७१/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९.३ | ३०० mm dia swg pipe | १६.८० | १० | ६.८० | १९३.९८ | १३१९/- |
| १२ | Fixing of SFRC Frame & cover | २४ | ०५ | १९ | ४८८ | ९२७२/- |
| | | | | | **एकूण** | **३१७७०/-** |

५. ॲटम क्र.९,२.२२५ mm dia swg pipe चे शेड्यूल्ड B मध्ये दर रू.१५१.५८ असे आहेत. परंतू दुस-या व दरम्यानच्या देयकात रू.१६१.५८ असे प्रदान केले आहेत. २३ परीमाणासाठी रू.१०/- च्या फरकाने रू.२३०/- कंत्राटदारास अतीप्रदान करण्यात आले.

६. ॲटम क्र.१० मध्ये दुस-या व दरम्यानच्या देयकात रू.९८१/- प्रथम देयकाच्या बाबतचे असल्याचे दर्शविले. प्रत्यक्षात प्रथम देयकात ॲटम क्र.१० ची प्रदाने झालेली आहेत. तसेच दुस-या व दरम्यानच्या देयकात ॲटम क्र.१० च्या ०.९० m depth साठी रू.६६३२/- दराने प्रदान केली. परंतू प्रथम व दरम्यानच्या देयकात रू.६६८२/- ने २ परीमाणाचे प्रदान केले आहे. रू.१००/- अतीप्रदान रक्कम वसूलपात्र ठरते. एकूणच ॲटम क्रमांक १० च्या दराबाबत तपासणी करण्यात यावी.

७. कंत्राटी कामाचा विमा देयकातून कपात केलेला नाही, त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

८. २% अनामत रक्कम कार्यादेश देण्यापूर्वीच संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक असते. परंतू सदरील ठिकाणी दुस-या व अंतीम देयकातून अनामत रक्कम कपात केली, त्यामुळे महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले आहे.

उक्त मुद्यांवर तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.३ अन्वये ६४,६७०/-, मुद्या क्र.५ अन्वये रू.२३०/-, मुद्या क्र.६ अन्वये रू.१००/- असे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करावे तसेच मुद्या क्र.७ अन्वये शासनाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करण्यात यावे. इतर अनियमिततेबाबत व महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चितीअंती कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.३ अंतर्गत लक्ष्मीनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे बाबत. ( अंदाजपत्रकीय रक्कम रू.१९,९७,९५८/-) खर्च रक्कम रू.१९,९६,६९४/-**

वॉर्ड क्र.३ अंतर्गत लक्ष्मीनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ३ निविदा प्राप्त झाल्या, त्यात सर्वात कमी दराची शेख सलीम मोहीयोद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९८% कमी दराची निविदा प्राप्त झाली.

कंत्राटदाराने २% कमी दराने काम करण्यास सहमती दर्शविली. परंतू १% अतिरिक्त सुरक्षा ठेव न भरण्याच्या अटीवर सहमती दिली. संबंधित कंत्राटदाराची विनंती कार्यालयाने मान्य करून २% कमी दराचे निविदा दर स्वीकृत केले.

एजन्सीने महानगरपालिके सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयाने जा.क्र.मनपा / उपअभियंता झोन क्र.४/८६/२०१७, दिनांक ३१.३.२०१७ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. कामाची मुदत ४ महिने देण्यात आली होती. सदरील जलनि:सारण वाहिनीचे काम पूर्ण न झाल्याने सदरील कामास दिनांक १०.१०.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रानुसार दिनांक ९.१०.२०१७ रोजी काम पूर्ण झाल्याचे नमूद आहे. संचिकेची सविस्तर तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. मोजमाप पुस्तिका क्र.४७४१ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.
२. कंत्राटी कामाचा विमा कालावधी काम संपण्याच्या कालावधीचा आहे. त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.
३. कार्यादेशात अट क्र.३ मध्ये स्पष्ट नमूद केलेले आहे की, सक्षम अधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय निविदा परीमाणापेक्षा जादा परीमाण स्वीकृत केले जाणार नाही. तरीही निविदा नियम ३८ मध्ये नमूद २५% पेक्षा जास्त वाढीचे परीमाणावर जास्तीचा खर्च केलेला असून त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

| ॲटम क्रमांक | ॲटमचे विवरण | देयकातील परीमाण | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परीमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Ex.for roadway in earth soil | ४१४.६३ | १८४.५०० | २३०.१३ | ९५.४० | २१९५४/- |
| ७ | Conveying material obtainded from road cutting including. | ४१४.६३ | १८४.५०० | २३०.१३ | १७८.२० | ४१००९/- |
| | | | | | **एकूण** | **६२९६३/-** |

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करावी. कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१३: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.४, चेतनानगर अंतर्गत म्हाडा कॉलनी येथील अण्णाभाऊ साठे सभागृहाची संरक्षित भिंत बांधणे व किरकोळ दुरूस्ती करणे बाबत. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९९,८२२/-) खर्च रक्कम रू.१,९९,३२१/-**

चेतनानगर अंतर्गत म्हाडा कॉलनी येथील अण्णाभाऊ साठे सभागृहाची संरक्षित भिंत बांधणे व किरकोळ दुरूस्ती करणेच्या कामासाठी ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची निविदा शेख सलीम मोहीयोद्दीन यांची होती. अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९९% कमी दराची निविदा स्वीकृत करण्यात आली. एजन्सीने महानगरपालिके सोबत करारनामा केला.तद्नंतर कार्यालयाने पत्र क्र.मनपा/उपअभियंता/झोन क्र.४/१०७/२०१७ दिनांक १५.७.२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत २ महिने देण्यात आली होती. सदरील काम दिनांक ८.९.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. मोजमाप पुस्तिका क्र.४७४१ लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. कंत्राटी कामाचा विमा कार्यादेशाच्या तारखेपासून उतरविलेला नाही, त्यामुळे विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

३. कार्यादेशात अट क्र.३ मध्ये नमूद प्रमाणे सक्षम प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय निविदा परिमाणापेक्षा वाढीव परीमाण स्वीकृत केलेले आहे. तसेच निविदा नियम ३८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ॲटमनिहाय २५% पेक्षा जादा परीमाण अनुज्ञेय नाहीत. खालील ॲटम वर जास्तीचा खर्च झालेला आहे, ज्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशिल | देयकातील परीमाण | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परीमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | Pro.un coursed ruble mansory of Trap/granite/quarhsite/greless stones. | १९.७१ | १०.८०० | ८.९१ | ३०१५.२६ | २६८६६/- |
| ६ | Pro.flush groved pointing with cement mortar १:३ for stone mansonry work including | २३.१२ | १८ | ५.१२ | ६१.९५ | ३१७/- |
| ८ | Prov/casting in situ c.C.m-१५ १:२:४ of trap/metal for coping including etc. | २.५७४ | २.०४० | ०.५३४ | ५०१४.५२ | २६७८/- |
| | | | | | **एकूण** | **२९,८६१/-** |

**झोन क्र. ४ (वॉर्ड एच) अभियंता कार्यालय**

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करावी. कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१४: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात विभाग क्र.४ येथील ड्रेनज लाईन गटार सफाई साहित्य (रॉड) खरेदी बाबत. ( अंदाजपत्रकीय रक्कम रू.३५०००/-) खर्च रक्कम रू.३५,०००/-**

विभाग क्र.४ येथे ड्रेनेज लाईन गटार सफाई साहित्य खरेदी करण्याकरीता दरपत्रके मागविण्यात आली होती. ३ दरपत्रके प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रकापैकी संतोष नलावडे यांचे दर अंदाजपत्रकीय दराचे आहेत. संबंधितांचे दर स्वीकृत करण्यात आले, असे संचिकेत नमूद आहे. संबंधिताचे voucher तयार करून देयक पारीत करण्यात आले. संचिकेची तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. लेखा शाखेने अंदाजपत्रकीय मंजूरीसाठी कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठविले, परंतू कार्यकारी अभियंता यांची अंदाजपत्रकास मंजूरी संचिकेत नाही.

२. संचिकेच्या NS वरील दि.२२.३.२०१८ च्या सादरीकरणात नमूद आहे की, संतोष नलावडे यांचे रू.३५,००० चे कोटेशन मान्य झाले आहे, प्रत्यक्षात मंजूरी नाही. तरी सुध्दा देयक तयार करून त्यास मा.कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेण्यात आली आहे.

३. सदरील साहित्य प्राप्त झाल्याचे डिलेव्हरी चालान/देयक संचिकेत नाही.

४. प्राप्त साहित्याची नोंद विभागाच्या स्टॉक रजिस्टर मध्ये घेतल्याचे प्रमाणपत्र नाही.

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करावी. कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**झोन क्र. ४ (वॉर्ड एच) अभियंता कार्यालय**

**परिच्छेद क्र.१५: आर्थिक वर्ष सन २०१७-२०१८ वॉर्ड क्र.०९ महानगरपालिका प्रा.शा. एन-११ शाळेत विविध दुरूस्तीचे कामे करणे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि शौचालय दुरूस्ती बोरवेल घेणे इ.तातडीचे कामे करणेबाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,३२,१९८/- खर्च रक्कम रू.३,६४,६६९/-**

सन २०१७-२०१८ मध्ये वॉर्ड क्र.९ महानगरपालिका प्रा.शा.एन-११ शाळेत विविध दुरूस्तीची कामे करणे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि शौचालय दुरूस्ती बोरवेल घेणे इ.तातडीचे कामे करणेबाबतच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता व सदरील काम तातडीचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७(३)(C) अन्वये मा.आयुक्त यांचे विशेष अधिकारात सदरील काम उपलब्ध कंत्राटदार माणिक इन्फ्रा ॲण्ड प्रोजेक्ट यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याची मान्यता देण्यात आली. मा.आयुक्त व मा.शहर अभियंता यांचे चर्चेनुसार निविदा Tender च्या अनुषंगाने १०% कमी दराने मान्य करण्यात आली. महानगरपालिकेने माणिक इन्फ्रा ॲण्ड प्रोजेक्ट यांच्या सोबत करार केल्यानंतर कार्यालयीन आदेश क्र.मनपा/झोन क्र.४/३१/२०१६, दिनांक ४.११.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत नमूद नाही. काम पूर्ण झाल्याच्या प्रमाणपत्रामध्ये दिनांक २८.२.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे दिसून येते. सदर संचिकेची तपासणी करतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षणाकरीता मोजमाप पुस्तिका क्र.४७४० उपलब्ध करून न दिल्यामुळे लेखापरीक्षण पूर्ण करता आले नाही.

२. कार्यादेशात कामाची मुदत नमूद केलेली नाही, प्रत्यक्षात अधिनियमातील कलम ६७ (३) (C) मधील कामे तातडीने होणे गरजेचे असते. परंतू कार्यादेश दिल्यानंतर तब्बल ४ महिन्यात काम पूर्ण केले यावरून कामाची निकड होती का याबाबत साशंकता निर्माण होते. जरी कामाची निकड होती तर निविदा मागवून काम पूर्ण करता येवू शकले असते.

३. कंत्राटी कामाचा विमा विहीत मुदतीत उतरविला नाही. त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल झाला नाही.

४. निविदा नियम ३८ मध्ये नमूद परीमाणापेक्षा जास्तीची वाढ खालील ॲटम मध्ये झालेली आहे. परंतू विभागाने केवळ ॲटम क्र.८ मध्येच वाढ झाल्याचे दर्शवून इतर ॲटम मधील झालेली वाढ सक्षम प्राधिकरणाच्या मंजूरीस्तव सादरीकरण केलेली नाही, त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे -

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशिल | देयकातील परिमाण | अंदाजपत्रकीय परीमाण | फरक परिमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Dismartling brick masonary | ३.३६ | ०.७४५ | २.६१५ | १५०.१५ | ३९३/- |
| २ | Removing Shahabad or tandur stone | १००.३८ | १६.८०० | ८३.५८ | २९.६८ | २४८१/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | Removing /w.c.fan including discoonect | ८ | ५ | ३ | १४१.७५ | ४२५/- |
| ८ | P/A bitument layer at २ kg per/m२ over the terrace | ४५८.२४ | ४५ | ४१३.२४ | १२८.४० | ५३०६०/- |
| १४ | Pro/fixing १० cm cast iron Nahani trap | ३ | २ | १ | ५२५ | ५२५/- |
| १६ | P/const.brick mansonary in mm १:६ for inspenction chamber ६०x४५ | १० | २ | ८ | ३१११.१० | २४८८९/- |
| २० | Pro/supp.SFRC Frame cover १०००x७००x७५ | ११ | २ | ९ | १९८४.५० | १७८६०/- |
| २२ | Pro.fixing on wall/ceiling floor ISI mark G.I.pipe including | ६७.२० | २२ | ४५.२० | २०५.८० | ९३०२/- |
| ३२ | Finishing the terrace slab | १०८.६० | ३०.३१३ | ७८.२८७ | १५०.०६ | ११७४८/- |
| | | | | | **एकूण** | **१,२०,६८३/-** |

५. विभागाने अंदाजपत्रकात नमूद नसलेले ॲटम Execute केलेली आहे. ज्याचा समावेश Extra Item मध्ये होतो यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| **ॲटम क्र.** | **ॲटमचा तपशिल** | **देयकातील परिमाण** | **दर** | **रक्कम रू.** |
|---|---|---|---|---|
| २२ (२) | Pro/fixing on wall/ceiling floor ISI mark G.I.pipe १५ mm dia | ६९.३० | १४९.४६ | १०३५७/- |
| २७(२) | Refixing R.S.H. | ३६.१८ | १९४.०० | ७०१८/- |
| | | | एकूण | **१७,३७५/-** |

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करावी. कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१६: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर अंतर्गत एफ सेक्टर येथील (श्री.पळशीकर यांचे घरापासून विठ्ठल रूखमाई मंदिरापर्यंत) रस्त्याचे ट्रिमिक्स, कॉंक्रीटींग करणे.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,९९,४८०/-**
**खर्च रक्कम रू.१४,९५,३०३/-**

वॉर्ड क्र.२८ स्वामी विवेकानंद नगर अंतर्गत एफ सेक्टर येथील (श्री.पळशीकर यांचे घरापासून विठ्ठल रूखमाई मंदिरापर्यंत) रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे बाबत. ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता तीन वेळेस मुदतवाढ देवूनही निविदा विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. चार वेळेस निविदा मागवून देखील निविदा विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. दिनांक १२.५.२०१७ नुसार दरपत्रक सूचना closed offer मागविण्यात आल्या परंतू एकही निविदा दरपत्रक प्राप्त झाले नाही. दिनांक ७.६.२०१७ नुसार पुन्हा दरपत्रक सूचना (closed offer) मागविण्यात आल्या. दिनांक १९.६.२०१७ रोजी लेखा विभागात निविदा पेटी उघडण्यात आली असता एक निविदा प्राप्त झाली. अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८७% जास्त दराची निविदा श्री.शे.माजेद शे.मोहमद यांची होती. संबंधिताचे दर जास्तीचे असल्याने पुनश्च closed offer दरपत्रके मागविण्यात आली. त्यावेळी एक दरपत्रक मे.अरजीत कन्स्ट्रक्शन यांचे ४.७७% जास्त दराचे दर प्राप्त झाले. वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराने निविदा मान्य केली. अरजीत कन्स्ट्रक्शन यांनी महानगरपालिकेशी करारनामा केला.तद्नंतर त्यांना कार्यालयाने पत्र क्र.मनपा/उपअभियंता झोन क्र.४/२२४/१८, दिनांक ६.२.२०१८ अन्वये कार्यादेश देण्यात आला. कामाची मुदत चार महिने देण्यात आली होती. सदरील काम दिनांक २७.४.२०१८ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्व प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.५२२९ उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे लेखापरीक्षण पूर्णपणे करण्यात आले नाही.

२. कंत्राटी कामाचा विमा कार्यादेशातील अट क्र.४ नुसार कार्यादेशाच्या तारखेपासून सात दिवसाच्या आत उतरविणे बंधनकारक होते. परंतू संबंधित कॉन्ट्रॅक्टरने कामाचा विमा दिनांक ९.४.२०१८ पासून उतरविलेला आहे. त्यामुळे विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

३. कार्यादेशतील अट क्र.३ ची पूर्तता झालेली नाही. तसेच निविदा नियम ३८ नुसार ॲटमच्या परिमाणामध्ये २५% वाढ अभिप्रेत आहे. ॲटम क्र.९ चे परिमाण ०.२७ इतके असून देयकातील परिमाण ६.१६० इतके आहे. दोन्ही परिमाणातील फरक ५.८९ इतका आहे. सदरील ॲटम चे दर रूपये ४,८६७.१७ इतके आहे. त्यानुसार जास्तीच्या परिमाणावर एकूण रूपये २८,६६८/- जास्तीचा खर्च झालेला असून त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करावी. कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१७: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२९, एन-९ अंतर्गत बी-सेक्टर ड्रेनेजलाईन टाकणे व विविध ठिकाणचे मेनहोल चेंबर दुरूस्त करणे बाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९९,०२१/- (खर्च रक्कम रू.१,९६,८६५/-)**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२९, एन-९ अंतर्गत बी-सेक्टर ड्रेनेज लाईन टाकणे व विविध ठिकाणचे मेनहोल चेंबर दुरूस्त करणे बाबत. ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता चार वेळेस निविदा मागवूनही निविदा विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. तद्नंतर दरपत्रका द्वारे closed offer मागविण्यात आल्या. दिनांक ४.७.२०१७ रोजी लेखा विभागात निविदा पेटी उघडण्यात आली असता एक निविदा दरपत्रक प्राप्त झाले. अंदाजपत्रक दराची निविदा श्री.सुरेश यशवंतराव डोईफोडे यांची आहे. संबधिताची निविदा स्वीकृत करण्यात आली. श्री.डोईफोडे यांनी महानगरपालिके सोबत करारनामा केला. तद्नंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभियंता झोन क्र.०४/१४३/२०१७, दिनांक २०.९.२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत २ महिने देण्यात आली होती. सदरील काम दिनांक २९.११.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे completion certificate प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने मोजमाप पुस्तिका क्र.४९६८ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. ॲटम क्र.१ चे परीमाण ५३.७९ इतके आहे. ॲटम क्र.९ Refilling चे परीमाण ५३.७९ इतके आहे. तर शिल्लक परीमाण शून्य असतांना ॲटम क्र.१० नुसार Transe of surplus material हा ॲटम १२.१५ परीमाणासाठी Execute झाला ही बाब अनाकलनीय आहे. तसेच या बाबीवर झालेला खर्च रू.२०८९/- हा जास्तीचा झालेला असून यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते.

३. कंत्राटी कामाचे विमापत्र संचिकेत नाही. तसेच देयकातून सुध्दा १% रक्कम कपात केलेली नाही, त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. कार्यादेशातील अट क्र.३ मध्ये स्पष्ट नमूद असूनही निविदा परिमाणापेक्षा जास्तीचे परीमाण नोंदवून स्वीकृत करण्यात आले आहे. तसेच निविदा नियम २८ मध्ये ॲटममध्ये २५% पर्यंत वाढ अपेक्षित आहे. परंतू खालील परीमाणासाठी जास्त खर्च झालेला आहे, ज्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

| **ॲटम क्र.** | **ॲटमचे विवरण** | **देयकातील परीणाम** | **शेड्यूल्ड B मधील परीमाण** | **फरक परीमाण** | **दर** | **रक्कम रू.** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | Pro.and supplying SFRC frame & corner including | १९ | १३ | ६ | २२४९ | **१३४९४/-** |
| १० | Tran of surplus material | १२.१५ | १.५१ | १०.६४ | १७२.०१ | १८३०/- |
| | | | | | | **१५३२४/-** |

उक्त मुद्यांवर आपल्या स्तरावर तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.२ अन्वये महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रू.२०८९/- व मुद्या क्र.३ अन्वये शासनाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करावे. इतर अनियमितता व महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसानीबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१८: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२८ अंतर्गत स्वामी विवेकानंदनगर सिडको एन-१२ येथील श्री.गणेश विसर्जन विहीरीतील गाळ काढून साफ सफाई करणे. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९९,२००/-) खर्च रक्कम रू.४,४२,५९०/-**

वॉर्ड क्र.२८ अंतर्गत स्वामी विवेकानंदनगर सिडको एन-१२ येथील विहिरीतील गाळ काढून साफसफाई करणे बाबत ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची श्री.प्रभाकर मोहिते यांची निविदा अंदापत्रकीय दरापेक्षा ५.११% कमी दराची निविदा स्विकृत करण्यात आली. श्री.मोहिते यांनी महानगरपालिके सोबत करारनामा केला. तद्नंतर कार्यालयाने पत्र क्र.मनपा/झोन क्र.०४/७८/२०१६ दिनांक २.९.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

कामाची मुदत १५ दिवसाची देण्यात आली होती. सदरील काम दिनांक १४.९.२०१६ रोजी पूर्ण झाल्याचे completion certificate मध्ये नमूद आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षणाकरीता मोजमाप पुस्तिका क्रमांक ४१८९ उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. निविदा नियम ३८ नुसार ॲटमच्या परीमाणामध्ये २५% पर्यंत वाढ अभिप्रेत आहे. परंतू ॲटम क्र.४ Prov/applying two coats of water proof cement paint to plastered surface यासाठी शेड्यूल्ड B मध्ये ४९.०३ परीमाणाची नोंद आहे. प्रत्यक्ष देयकातील परीमाण ६४.८९ आहे. फरक परीमाण १५.८६ असून ॲटमचे दर रू.३३.९२ असे आहेत. जास्तीच्या परीमाणावर रू.५३८/- अतिरिक्त खर्च झालेला असून त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करावी. कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१९: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.०६, यादवनगर अंतर्गत एन-११ येथील सेक्टर F,G,H,K,L, आणि M मधील विविध ठिकाणची ड्रेनेज लाईन बदलणे बाबत. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.९,९९,३७४/-) खर्च रक्कम रू.९,९८,५०३/-**

वॉर्ड क्र.६ यादवनगर अंतर्गत एन-११ येथील विविध ठिकाणची ड्रेनेज लाईन बदलणेबाबत ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. तीन वेळेस मुदतवाढ देवूनही निविदा विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. चौथ्या वेळेस निविदा उघडण्यात आली असता एकच निविदा प्राप्त झाली. सर्वात जास्त दराची निविदा श्री.ओम कन्स्ट्रक्शन यांची होती. अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त दराची निविदा प्राप्त झाली. १ जुलै २०१७ पासून GST लागू झाल्याने ओम कन्स्ट्रक्शन यांनी पत्राद्वारे ५% जास्त दराने काम करण्यास संमती दिली. परंतू मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय दराने निविदा दर स्वीकृत केले. मे.ओम कन्स्ट्रक्शन यांनी महानगरपालिके सोबत करारनामा केला. तद्नंतर कार्यालयाने पत्र क्र.मनपा / उपअभियंता/झोन क्र.४/२४१/२०१८ दिनांक २८.३.२०१८ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ३ महिने देण्यात आली होती. सदरील काम दिनांक ३.५.२०१८ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. लेखापरीक्षण पथकास विभागाने मोजमाप पुस्तिका क्र.५२२२ उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. देयकात ॲटम क्र.१२ व १२.१ चे दोन्ही परीमाणासाठी ॲटम क्र.१२ अन्वये खर्च झालेला आहे. तरीसुध्दा ॲटम क्र.१३ वर २ परीमाणा मध्ये रू.१२१२/- प्रमाणे रू.२४२४/- झालेला खर्च अपेक्षित नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. ॲटम क्र.१२.१ न दर्शविता त्यापुढील क्रमांक दर्शवून निविदा शेड्यूल्ड B मधील ॲटमचा क्रम देयकात पूर्णपणे बदललेला आहे.

४. ॲटम क्र.१ मधील Exavation for pipe line trenches वरील परीमाण ३८४.०२ पुन्हा ॲटम क्र.६ मध्ये Refiling केले तर शिल्लक परीमाण शून्य राहते. तरीसुध्दा ॲटम क्र.१९ (देयकात) Trasf of surplus material दर्शवून रू.४०७१/- झालेला खर्च महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारा आहे.

५. कार्यादेशातील अट क्र.३ चे पालन झालेले नाही. तसेच निविदा नियम ३८ मध्ये २५% ॲटमच्या Qty मध्ये वाढ अपेक्षित आहे. परंतू त्यापेक्षा जास्तीच्या झालेल्या वाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही, त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| ॲटम क्र. | ॲटमचे विवरण | देयकातील परीमाण | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परीमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Ex.for pipe line trenches in earth soil | ३८४.०२ | २२५ | १५९.०२ | १४३.३६ | २२,७९७/- |
| ८ | Pro.ISI std swg pipes including etc.२०० mm dia swg. | ४७५.१५ | २५० | २२५.१५ | ३९७.८० | ८९,५६५/- |
| १० | Low/laying & jointing in profer grade & alignment swg pipes २०० mm dia | ४७५.१५ | २५० | २२५.१५ | २५२.५२ | ५६,८५५/- |
| ११ | Prov & const.BB mansonary in cm १:६ for inspection chamber ०.९०x०.४५ c.m.including etc | ६५ | ५० | १५ | ३८५१.७२ | ५७७७६/- |
| १९ | Removing exist pipe line of following size १५० mm dia swg. | ४७५.१५ | २०० | २७५.१५ | २९.५५ | ८१३१/- |
| २० | Prov.& supplying SFRC Frame & Cover | ६७ | ४० | २७ | १७५९.५० | ४७५०७/- |
| २१ | Fixing of SFRC Cover of Rect shape size १०००x७००x७५ mm | ६७ | ४० | २७ | ११०.१६ | २९७४ |
| | | | | | **एकूण** | **२,८५,६०५/-** |

**झोन क्र. ४ (वॉर्ड एच) अभियंता कार्यालय**

उक्त मुद्यांवर आपल्या स्तरावर तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.२ अन्वये रू.२४२४/-, मुद्या क्र.४ अन्वये रू.४०७१/- असे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे तसेच महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान व इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२०: आर्थिक वर्ष सन २०१७-२०१८ मध्ये वॉर्ड क्र.०६ यादवनगर अंतर्गत एन-११ येथील विविध ठिकाणीची ड्रेनेज लाईन बदलणे बाबत.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९९,८४२/-**
**खर्च रक्कम रू. ५,१९,०६६/-**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.०६ यादवनगर अंतर्गत एन-११ येथील विविध ठिकाणची ड्रेनेज लाईन बदलणेबाबतच्या कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीस प्रतिसाद मिळाला नाही. चौथ्या वेळेस निविदा उघडण्यात आली असता एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त दराची निविदा श्री.ओम कन्स्ट्रक्शन यांची होती. १ जुलै २०१७ पासून GST लागू झाल्याने ओम कन्स्ट्रक्शन यांनी पत्राद्वारे ५% जास्त दराने काम करण्यास संमती दिली व निविदा मान्य करण्यात आली. ओम कन्स्ट्रक्शन यांनी महानगरपालिके सोबत करार केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभियंता/झोन क्र.४/१९८/२०१८, दिनांक १९.१.२०१८ अन्वये कार्यादेश देण्यात आला. कामाची मुदत (२) महिने देण्यात आली होती. काम पूर्ण केल्याचा दिनांक १५.३.२०१८ असे काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद केलेला आहे.

लेखापरीक्षणा दरम्यान संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्रमांक ४७४० उपलब्ध करून न दिल्यामुळे लेखापरीक्षण पूर्णपणे करता आले नाही.

२. ॲटम क्र.१३ (१२.१) साठी झालेला खर्च ॲटम क्र.११ मध्ये पूर्वीच झालेला असतांना पुनश्च खर्च दर्शवून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच शेड्यूल्ड B मध्ये DSR चा संदर्भ दर्शविलेला नाही.

३. ॲटम क्र.१ ते ५ मधील परीमाण व ॲटम क्र.६ चे परीमाणासाठी खर्च झालेला आहे. तरीसुध्दा ॲटम क्र.१९ (१८) Tran.of surplus material वरील परीणाम करीता खर्च करणे ही बाब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

४. कार्यादेशातील अट क्र.३ चे पालन झालेले नाही. तसेच निविदा अट क्र.३८ मध्ये नमूद परीणामापेक्षा जास्तीच्या परीमाणासाठी खर्च झालेला आहे. त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे -

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशिल | देयकातील परिमाण | शेड्यूल्ड B मधील परिमाण | फरक परिमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | Ex.for pipe trenches in soft rock | ३६.४१ | २८.१२५ | ८.२८५ | ५०२.८८ | ४१६६ |
| ५ | Ex.for pipe trenches in hard rock | १८.९१ | ६ | १२.९१ | ८७२.४८ | ११२६४ |
| ११ | Prov.& const.B.B.mansonary in cm १:६ for inspection chamber ०.९०x०.४५ cm including etc. | ३७ | २५ | १२ | ३८५१.७२ | ४६२२१ |
| १४ (१३) | Removing existing pipe line of following size १५० mm dia swg | २४०.२० | ५० | १९०.२० | २९.५५ | ५६२० |
| २० (१९) | Pro & supplying SFRC frame of cover | ३७ | २४ | १३ | १७५९.५० | २२८७४ |
| २१ (२०) | Fixing of SFRC cover of Rect.shape size १०००x७००x७५ mm | ३७ | २४ | १३ | ११०.१६ | १४३२ |
| | | | | | **एकूण** | **९१५७७/-** |

५. सदरील कामाचे एकूण देयक रू.५,१९,०६६/- आहे, वजावटीची रक्कम रू.५७,९१८/- आहे. एकूण देयकातून वजावटीची रक्कम वजा करता संबंधितास रू.४,६१,१४८/- देय ठरते. परंतू देयकात रू.४,६१,८०६/- प्रदान केल्याचे निदर्शनास येते. एकूण रू.६५८/- जास्तीची रक्कम कंत्राटदारास अदा केली त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

करीता उक्त मुद्यांवर विभागाने आपल्या स्तरावर तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते.तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.५ अन्वये रू.६५८/- इतके महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे तसेच महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान व इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**झोन क्र. ४ (वॉर्ड एच) अभियंता कार्यालय**

**परिच्छेद क्र.२१: आर्थिक वर्ष सन २०१७-२०१८ वॉर्ड क्र.०६ यादवनगर येथील अस्तित्वातील गटारीवर आरसीसी स्लॅब टाकणे बाबत.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९८,४५०/- ( खर्च रक्कम रू.५,२१,७०५/-)**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.०६ यादवनगर येथील अस्तित्वातील गटारीवर आरसीसी स्लॅब टाकणे बाबतच्या कामासाठी ई निविदा विभागाकडून निविदा मागविण्यात आल्या असता चार वेळेस निविदा मागवून देखील निविदा विक्रीस प्रतिसाद मिळाला नाही. निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवसापर्यंत निविदा विक्री न झाल्यामुळे या कामासाठी जा.क्र मनपा/झोन क्र.४/४३३/२०१७, दिनांक १३.९.२०१७ नुसार दरपत्रक सूचना (closed offer) मागविण्यात आल्या.

दिनांक २९.९.२०१७ रोजी लेखा विभागात निविदा पेटी उघडण्यात आली असता एक निविदा प्राप्त झाली. अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराची निविदा ओम कन्स्ट्रक्शन यांची आहे. संबंधितास सदरील कामाचे Rate annalysis करून देण्यासाठी कळविण्यात आले असता संबंधिताने उपरोक्त काम २०% जास्त दराऐवजी ५% जास्त दराने करण्यास संमती दिलेली आहे. ओम कन्स्ट्रक्शन यांनी महानगरपालिके सोबत करार केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/झोन क्र.०४/१९७/२०१८, दिनांक १९.१.२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला. कामाचा कालावधी २ महिन्याचा राहील असे नमूद आहे. सदरील काम १९.३.२०१८ रोजी पूर्ण करण्यात आल्याचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची पाहणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.४७४० उपलब्ध करून न दिल्यामुळे लेखापरीक्षण पूर्ण करता आले नाही.

२. कार्यादेशातील अट क्र.४ नुसार कंत्राटी कामाचा विमा कार्यादेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाचे आत उतरविलेला नाही. त्यामुळे कार्यादेशाच्या अटी शर्तीचा भंग झालेला आहे.

३. कार्यादेश देण्यापूर्वी २% अनामत रक्कम वसूल केलेली नाही. तसेच देयकातून सुध्दा कपात केलेली नाही. महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच २% अनामत भरणा करून घेण्याचा हेतू सफल झाला नाही.

४. देयकातील बेरजेत तफावत आहे. कंत्राटदारास रू.४७१८०६/- प्रदान केले. प्रत्यक्षात रू.४७१४४०/- प्रदान होणे आवश्यक होते. रू.३६६/- जास्तीचे प्रदान झाल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

५. कार्यादेशातील अट क्र.३ ची पूर्तता झालेली नाही. तसेच निविदा नियम ३८ मधील अनुज्ञेय परीमाणापेक्षा जास्तीचे परीमाणे वापरण्यात आली. यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशिल | देयकातील परिमाण | शेड्यूल्ड B मधील परिमाण | फरक परिमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | Prov & const.brick mansonary in cm १:६ for inspection chamber ९०x४५ cm | २६ | १९ | ७ | ३९५६.१४ | २७६९३/- |
| ७ | Prov.& repairing to existing man hole chamber | ०५ | ०२ | ३ | ७२० | २१६०/- |
| ९ | Raising of existing man hole chamber | ०५ | ०१ | ४ | ९०२ | ३६०८/- |
| १० | Fixing of SFRC frame & cover | ०९ | ०६ | ३ | ११०.१६ | ३३०/- |
| ११ | Desilty the man hole chamber sewerage work in wet/dry conditin | २५.३० | १४.४४० | १०.८६ | ५४१.१८ | ५८७७/- |
| १२ | Trans of surplus material from work site | २९.०५ | १९.३८० | ९.६७ | १७२.०१ | १६६३/- |
| | | | | | **एकूण** | **४१३३१/-** |

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.४ अन्वये रू.३६६/- इतके महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे तसेच महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान व इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२२: आर्थिक वर्ष सन २०१७-२०१८ वॉर्ड क्र.०६ यादवनगर सिडको औरंगाबाद अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणेबाबत.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९९,८४२/- ( खर्च रक्कम रू. ,१९,०६६/- )**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.०६ यादवनगर सिडको औरंगाबाद अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटींग करणे बाबतच्या कामासाठी ई निविदा विभागाकडून चार वेळेस निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. या कामासाठी जा.क्र.मनपा/झोन क्र.०४/४८०/२०१७ दिनांक ११.१०.२०१७ नुसार दरपत्रक सूचना (closed offer) मागविण्यात आल्या.

दिनांक २६.१०.२०१७ रोजी लेखा विभागात निविदा पेटी उघडण्यात आली असता एक निविदा प्राप्त झाली. सदर निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% जास्तीने श्री.धोंडिबा सांडू साळुंके यांची होती. संबंधित गुत्तेदाराने १२% जास्त दराने निविदा भरली असून त्यामध्ये GST चा समावेश असल्याचे संचिकेत नमूद आहे. संबंधित गुत्तेदाराने दिनांक ८.१२.२०१७ अन्वये विभागास संमतीपत्र देवून सदर काम ३% जास्त दराने करण्याची सहमती दिली. संबंधित ठेकेदाराला फेर विचारणा केली असता त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दिली. ठेकेदाराने महानगरपालिकेशी करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभियंता/झोन क्र.४/२२०/१८, दिनांक ६.२.२०१८ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत (३) महिने देण्यात आली होती. दिनांक १९.३.२०१८ रोजी काम पूर्ण केल्याचे काम पूर्णत्व प्रमाणपत्रात नमूद केलेले आहे. सदरील संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.४७४० उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे लेखापरीक्षण पूर्णपणे करता आले नाही.

२. कंत्राटदाराने कार्यदेशातील अट क्र.३ ची पूर्तता केलेली नाही. तसेच निविदा नियम ३८ मधील नमूद / अनुज्ञेय परीमाणापेक्षा जास्तीचे परीमाणावर खर्च झालेला आहे. जास्तीच्या परीमाणास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे-

| **ॲटम क्र.** | **ॲटमचा तपशिल** | **देयकातील परिमाण** | **शेड्यूल्ड B मधील परिमाण** | **फरक परिमाण** | **दर** | **रक्कम रू.** |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | Conveying of excavated material | १०७.३८ | ४६.५०० | ६०.८८ | १४१.४१ | ८६०९ |
| ४ | Supplying ४० mm trap granite metal at the road site | ३७.०५ | १३.५०० | २३.५५ | ९५८.३५ | २२५७० |
| ५ | Spreading ४०/६० mm metal including | ३७.०५ | १३.५०० | २३.५५ | ३३.९२ | ७९९ |
| ६ | Supplying hard murum kankar at the road side. | ६५.०७ | ३१ | ३४.०७ | ५५९.२२ | १९०५३ |
| ७ | Spreading gravel sand soft murum hard murum | ६५.०७ | ३१ | ३४.०७ | २८.६२ | ९७५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | Compacting the sub grate gravel over size metal with power roller | ५४२.४० | ३१० | २३२.४० | १४.८४ | ३४४९ |
| | | | | | **एकूण** | **५५,४५५/-** |

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करून कार्यवाही अंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२३: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.०५ मेहमुदपुरा ते प्रतिक्षा किराणापर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.२४,९३,९२७/- (खर्च रक्कम रू.२७,२६,०७०/-)**

वॉर्ड क्र.०५ मेहमुदपुरा ते प्रतिक्षा किराणापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे बाबत ई- निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार (४) निविदा प्राप्त झाल्या. अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.८८% कमी दराची निविदा मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन यांची होती. निविदा दर मान्य करण्यात आले. मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन यांनी महानगरपालिके सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/झोन क्र.०४/३८/२०१६ दिनांक २९.११.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आला. कामाची मुदत (६) महिन्याची देण्यात आली होती. सदरील काम दिनांक २९.१२.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.४१९२ उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. सदरील संचिकेतील परि.क्र.५१ नुसार कार्यादेशातील अटी शर्ती नुसार कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. त्यामुळे कामाच्या देयकातून १% रक्कम कपात केल्याचे लेखा शाखेच्या सादरीकरणात नमूद आहे. संचिकेमध्ये उपलब्ध देयकाची तपासणी केली असता विमा रक्कम कपातीचा उल्लेख नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच लेखाशाखेचे सादरीकरण व देयकातील कपाती याचा ताळमेळ लागत नाही. त्यामुळे लेखा शाखेच्या समन्वयाने खुलासा व्हावा.

३. निविदा नियम (३८) मध्ये नमूद असल्याप्रमाणे ॲटम निहाय परिमाणामध्ये २५% वाढ अपेक्षित आहे. तथापि खालील ॲटममध्ये २५% पेक्षा जास्त वाढ झाली आहे. त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही. परिमाणात झालेली वाढ ही मूळ निविदेतील ॲटमची नसून Extra ॲटम मधील आहे.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशिल | देयकातील परिमाण | Extra Item मधील परिमाण | फरक परिमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Supplying hard murum kankar at road side including conveying and stacking etc.all comp | ५००.४१० | ३२१.७७० | १७८.६४ | ५९१.०१ | १,०५,५७८/- |
| २ | Spreading gravel sandsoft murum/hard murum/including etc.comp. | ५००.४१० | ३२१.७७० | १७८.६४ | २५.२० | ४,५०२/- |
| ३ | Construction of granularsub base by providing close graded material mixing including etc.all comp | ३४१.४१० | १७०.५५५ | १७०.८५५ | १७००.८६ | २,९०,६००/- |
| ४ | Compacting the hard murum kankar in layer of thickness upto २० cm including etc all comp. | २३७५.८० | १३९९ | ९७६.८० | ७.४२ | ७,२४८/- |
| | | | | | **एकूण रक्कम रू.** | **४,०७,९२८/-** |

**झोन क्र. ४ (वॉर्ड एच) अभियंता कार्यालय**

४. सदरील कामाच्या अतिरिक्त ॲटमचे अंदाजपत्रक रू.४,९८,७४८.६५ इतक्या रकमेचे तयार करण्यात आले होते. प्रत्यक्षात देयकात अतिरिक्त ॲटमसाठी रूपये ९,०६,६७६/- इतका खर्च झालेला असून रू.४,०७,९२८/- जास्तीचा खर्च झालेला आहे. जवळपास जितक्या रकमेचे extra ॲटमचे अंदाजपत्रक तयार केले त्याच्या दुप्पट रकमेचा खर्च होणे ही बाब योग्य नसून अंदाजपत्रक तयार करतांना विभागाने अतिरिक्त बाबींवर होणा-या खर्चाचा विचार करणे आवश्यक ठरते.

विभागाने उक्त मुद्यांवर तपासणी करून योग्य त्या कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.२ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करण्यात यावे. व इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२४ : आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये वॉर्ड क्र.०६ यादवनगर सिडको अंतर्गत कॉक्रीटींग करणे बाबत. ( अंदाजपत्रकीय रक्कम रू.१९,९८,६९८/-) खर्च रक्कम रू.१९,९४,९०४/-**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.०६ यादवनगर अंतर्गत कॉक्रीटींग करणे कामाबाबत. चार वेळेस निविदा मागवून देखील निविदा विक्रीस अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. जा.क्र.मनपा/झोन क्र.०४/४८०/२०१७, दिनांक ११.१०.२०१७ नुसार दरपत्रक सूचना (closed offer) मागविण्यात आल्या. दिनांक २६.१०.२०१७ रोजी लेखा विभागात निविदा पेटी उघडण्यात आली असता एक निविदा प्राप्त झाली. अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% जास्त दराची निविदा श्री.धोंडिबा सांडू साळुंके यांची होती. संबंधिताने दिनांक ८.१२.२०१७ रोजी लेखी संमती पत्र दिल्याचे संचिकेत नमूद आहे. त्यामध्ये ३% जास्त दराने काम करण्यासाठी संबंधिताने संमती दर्शविली असल्याचे संचिकेत नमूद आहे. तद्नंतर संबंधित कंत्राटदाराने अंदाजपत्रक दराने काम करण्यास तयार असल्याचे संमतीपत्रा द्वारे कळविल्याची नोंद संचिकेत आहे. त्यानुसार अंदाजपत्रक दराने दर स्वीकृत केले. संबंधित गुत्तेदाराने महानगरपालिके सोबत करारनामा केला. तद्नंतर कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/उपअभियंता/झोन क्र.०४ /२२१ / २०१८, दिनांक ६.२.२०१८ अन्वये कार्यादेश देण्यात आला. कामाची मुदत चार महिने देण्यात आली होती. काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रानुसार काम दिनांक १९.३.२०१८ रोजी पूर्ण केल्याचे नमूद आहे. संचिकेची तपासणी करतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षणा दरम्यान लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.४७४० उपलब्ध न करून दिल्यामुळे लेखापरीक्षण पूर्ण करता आले नाही.

२. कंत्राटी कामाचा विमा कार्यादेशाच्या दिनांकापासून उतरविण्यात आलेला नाही.

३. निविदा नियम ३८ नुसार अनुज्ञेय परीमाणापेक्षा जास्तीचे परीमाणे नोंदविण्यात येवून त्यावर अतिरिक्त खर्च झालेला आहे. अतिरिक्त खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

अतीरिक्त खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | ॲटमचा तपशील | देयकातील परीमाण | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परीमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Scraping the road site shoulder by mechanical means | ५६२.८० | ३३० | २३२.८० | ४.८८ | १,१३६/- |
| ३ | Conveying of excavated material | १४०.७० | ४९.५० | ९१.२० | १४१.४१ | १२,८९७/- |
| ४ | Supplying ४० mm trap granite metal at the road side | ५४.३४ | ३६ | १८.३४ | ९५८.३५ | १७,५७६/- |
| ५ | Spreading ४०/६० mm metal including | ५४.३४ | ३६ | १८.३४ | ३३.९२ | ६२२/- |
| ६ | Supplying hard murum kankar at the road site | ८४.४२ | ४९.५० | ३४.९२ | ५५९.२२ | १९,५२८/- |
| ७ | Spreading gravel sand soft murum hard murum | ८४.४२ | ४९.५० | ३४.९२ | २८.६२ | ९९९/- |
| ८ | Compacting the sub grad gravel over size metal with power roller | ९२२.८० | ५७० | ३५२.८० | १४.८४ | ५,२३६/- |
| | | | | | **एकूण** | **५७,९९४/-** |

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**झोन क्र. ४ (वॉर्ड एच) अभियंता कार्यालय**

**परिच्छेद क्र.२५: वॉर्ड क्र.३० अंतर्गत पवननगर मधील स्वामी समर्थ मंदीर जवळ व मधुकर सोसायटी येथील १५० mm,२५०mm,swg जलनि:सारण वाहिनी टाकणे. अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९१,४६८/- खर्च रक्कम रू.४,६५,५६४/-**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.एन-९, स्वामी समर्थ मंदीर व मधुकर सोसायटी येथील ड्रेनेज लाईन बसविण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या. चार वेळेस निविदा मागवून एकही निविदा प्राप्त झाली नाही. तद्नंतर closed offer मागविण्यात आली असता श्री.एल.एस.पवार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.१% कमी दराची प्राप्त झाली. तथापि निविदाधारकाने मुदतबाह्य डिमांड ड्राफ्ट १% इसारा रक्कम जमा केल्यामुळे सदरील ऑफर नाकारण्यात आली व परत एकदा दरपत्रक सूचना (closed offer) मागविण्यात आली. दिनांक ८.८.२०१७ रोजी लेखा विभागात निविदा पेटी उघडली असता ओम कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने निविदा स्वीकृत करण्यात आली. रू.५००/- मुद्रांकावर एजन्सीने महानगरपालिके सोबत करारनामा केला.जा.क्र.मनपा/उपअभियंता/झोन.क्र .०४/१६६ / २०१७, दिनांक २७.१०.२०१७ अन्वये ओम कन्स्ट्रक्शन यांना कामाचे आदेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत २ महिने होती.

संचिका तपासणीत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मोजमाप पुसितका क्रमांक ४७४० लेखापरीक्षणास विभागाने उपलब्ध करून न दिल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

२. कार्यादेश देण्यापूर्वी २% अनामत रक्कम घेणे आवश्यक असते. जेणे करून काम उत्कृष्ट दर्जाचे व्हावे. तथापि कंत्राटदाराच्या विनंतीनुसार २% अनामत रक्कम देयकातून कपात करण्यात आली. त्यामुळे अनामत रक्कम संबंधिताकडून भरून घेण्यामागचा हेतू सफल होत नाही. तसेच महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येते.

३. कार्यादेशात अट क्रमांक ३ मध्ये स्पष्ट नमूद केलेले आहे की, सक्षम अधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय निविदा परिमाणापेक्षा जास्तीचे परिमाण स्वीकृत केले जाणार नाही. विभागाने ॲटम क्रमांक ४ व ६ मध्ये २५% पेक्षा जास्त वाढ झाल्याचे नमूद केले आहे. तथापि खर्च अंदाजपत्रकीय रकमेच्या आत आहे असे नमूद केले आहे. तथापि त्यास सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव सादर केलेले नाही. ॲटम क्र.२,८ व ९ चे उल्लेखही नाही आणि मान्यताही नाही.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशिल | देयकातील परिमाण | शेड्यूल्ड B मधील परिमाण | फरक परिमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | Removing/enisting pipe line १५० mm dia Rcc | १८४.९५ | ६० | १२४.९५ | ३२.७६ | ४,०९३/- |
| ४ | Prov.ISI std SWG pipes २०० mm dia | १८४.९५ | १४० | ४४.९५ | २२७.४६ | १०,२२४/- |
| ६ | Low laying & Jointing in proper grade & alighment SWG pipes २०० mm dia. | १८४.९५ | १४० | ४४.९५ | १४०.१७ | ६,३०१/- |
| ९ | Providing & repairing to existing man hole | ११ | ५ | ६ | ८१५ | ४,८९०/- |
| ९ | Raising /Existing man hole. | ०९ | ५ | ४ | ११२१ | ४,४८४/- |
| ९ | Fixing of SFRC Frame & cover | ९ | ५ | ४ | ४८८ | १,९५२/- |
| | | | | | **एकूण** | **३१,९४४/-** |

उक्त मुद्यांवर विभागाने तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२६: सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.०३ एकतानगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,९८,५८३/-) खर्च रक्कम रू. १४,०७,०३३/-**

वॉर्ड क्र.०३ एकतानगर येथे ड्रेनज लाईन टाकणे बाबतच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या. ४ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्यामध्ये तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.८९% कमी दराची निविदा श्री.गुलाम रसुल गुलाम मोहीयोद्दीन यांची होती. निविदा दर स्वीकृत करण्यात आले. संबंधित गुत्तेदारानी महानगरपालिकेशी करार केल्यानंतर त्यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/उपअभियंता /वॉर्ड-अ/५५०/२०१६, दिनांक १३.६.२०१६ रोजी कार्यादेश देण्यात आला.

कामाचा कालावधी ०६ महिने होता. काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रा मध्ये काम पूर्ण झाल्याचा दिनांक ९.१२.२०१६ असा नमूद आहे. सदरील संचिका तपासणी करतांना खालील बाबी दिसून आल्या.

१. लेखापरीक्षणा दरम्यान लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका ४७५६ उपलब्ध करून न दिल्यामुळे लेखापरीक्षण पूर्ण करता आले नाही.

२. कार्यादेशातील अट क्र.४ नुसार कंत्राटी कामाचा विमा विहीत मुदतीत उतरविला नाही, त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल झालेला नाही.

३. ॲटम क्र.२, Ex.for pipe line trenches hard murum चे परीमाण १८४.०३४ असून दर रू.१७८.७१ आहेत. त्यानुसार रू.३२,८८९/- होतात. देयकात रू.३३,०५०/- प्रदान केले आहे. रू.१६१/- जास्तीचे प्रदान वसूलपात्र आहेत.

४. शेड्यूल्ड B मध्ये नसलेली म्हणजेच अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेल्या ॲटम वर खर्च झालेला आहे. Extra Item वरील खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे.

| **ॲटम क्र.** | **ॲटमचा तपशिल** | **देयकातील परिमाण** | **दर** | **रक्कम रू.** |
|---|---|---|---|---|
| ६(२) | P/ISI stnd SWG/RCC pipe २२५ mm dia | ५९.९० | २७४.३८ | १६४३५/- |
| ६(३) | P/ISI stnd SWG/RCC pipe २०० mm dia | ६३.८५ | २२७.४६ | १४५२३/- |
| ७(२) | Low lay & jointing in proper grade २२५ mm dia | ५९.९० | १५३.०१ | ९१६५/- |
| ७(३) | Low lay & jointing in proper grade २०० mm dia | ६३.८५ | १४०.१७ | ८९५०/- |
| | | | **एकूण** | **४९,०७३/-** |

५. ॲटम क्र.१०/P/steel Riber SFRC करीता परीमाण ८८ वापरण्यात आले. प्रत्यक्षात नविन चेंबर ८१ बनविलेले आहेत. तसेच प्रदान दर २२२७.०५ व रक्कम रू.१८४४५/- याचा ताळमेळ साधत नाही.

६. ॲटम क्र.१ ते ४ चे परीमाण ८६३.९६३ आहे. त्यापैकी ॲटम क्र.१४ प्रमाणे परीमाण ८११.६९८ दर्शविलेले आहे. शिल्लक परीमाण ५२.२६५ राहतात परंतू ॲटम क्र.१५ मध्ये १२४.८८४ परीमाण दर्शवून रू.२०५.०३ दराने रू.२५६०५/- प्रदान झालेले आहे. प्रत्यक्षात ७२.६१९ जास्तीचे परीमाण दर्शवून रू.१४,८८९/- अतिरिक्त प्रदान झालेले असून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारे आहे.

**झोन क्र. ४ (वॉर्ड एच) अभियंता कार्यालय**

उक्त मुद्यांवर तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.३ अन्वये रू.१६१/-, मुद्या क्र.६ अन्वये रू.१४,८८९/- इतकी रक्कम संबंधिताकडून वसूल करावी. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान व इतर अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२७: आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये वॉर्ड क्र.०३ एकतानगर येथे अस्तित्वातील जलनि:सारण वाहिनीची वार्षिक पध्दतीवर देखभाल दुरूस्ती करणे बाबत.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.५,००,०००/-**
**खर्च रक्कम रू.४,८३,३१०/-**

वॉर्ड क्र.३, एकतानगर येथे अस्तित्वातील जलनि:सारण वाहिनीची वार्षिक पध्दतीवर देखभाल दुरूस्ती करणे बाबतच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता २ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत २ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. यामध्ये तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८८% कमी दराची निविदा श्री.गुलाम रसुल गुलाम मोहीनोद्यीन यांची होती. निविदा दर मान्य करण्यात आले. संबंधित गुत्तेदाराने महानगरपालिकेशी करारनामा केल्यानंतर कार्यालयीन आदेश क्र.मनपा/उपअभियंता / वॉर्ड-अ/४०९/२०१६, दिनांक २.५.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आला. कामाचा कालावधी एक वर्ष होता. Completion certificate मध्ये काम पूर्ण झाल्याचा दिनांक ९.३.२०१७ असा आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तिका क्र.४७६२ उपलब्ध करून न दिल्यामुळे लेखापरीक्षण पूर्ण करता आले नाही.

२. कंत्राटी कामाचा विमा कार्यादेशाच्या आदेशापासून उतरविलेला नाही, त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.

३. सदरील कामाची मुदत दि.२.५.२०१६ पासून बारा महिन्याची असतांना सदरील काम दिनांक ९.३.२०१७ रोजी पूर्ण झाल्याचे अभिलेख्यात नमूद आहे. तथापि पूर्ण कालावधीत देखभाल दुरूस्तीचे काम संबंधित कंत्राटदाराने करणे बंधनकारक असतांना मुदतपूर्व काम पूर्ण दाखवून पुढील देखभाल दुरूस्तीसाठी महानगरपालिकेस आर्थिक भार सोसावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. शेड्यूल्ड B मध्ये न दर्शविलेल्या खालील ॲटमवर अतिरिक्त खर्च झालेला आहे. त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशिल | देयकातील परीमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १३ (२) | P/ISI stnd SWG.pipe २०० mm dia | ७८.७५ | २२७.४६ | १७,९१२/- |
| १४(१) | Low.lay & jointing in proper २०० mm dia SWG. | २९०.३० | १५३.०१ | ४४,४१९/- |
| | | | **एकूण** | **६२,३३१/-** |

५. ॲटम क्र.१३(२) अन्वये परीमाण ७८.७५ असे आहे. सदरील ॲटम पाईप पुरवठ्याचा आहे. ॲटम क्र.१४(१) अन्वये पुरवठा केलेला पाईप अंथरणे/ जोडणे इत्यादी साठी २०९.३० परीमाण दर्शविले आहे. वास्तविक पाहता जितक्या परीमाणाचा पाईप पुरवठा झाला तितक्याच परीमाण पाईप अंथरणे व जोडणे करीता असावयास पाहिजे अशी सर्वसाधारण धारणा असते. परंतू सदरील प्रकरणात पाईप पुरवठा परीमाण व अंथरणे परीमाणात १३०.५५ नगाचा फरक आहे. रू.१५३.०१ प्रमाणे रू.१९,९७५/- जास्तीचे परीमाण दर्शवून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. ॲटम क्र.१४ (१) अन्वये प्रदान केलेले दर ॲटम क्र.१४ (२) पेक्षा म्हणजे २२५ mm dia पाईप पेक्षा २०० mm dia साठी जास्तीचे आकारले आहे.

७. निविदा नियम ३८ मध्ये नमूद प्रमाणे ॲटमच्या परीमाणात २५% पर्यंत वाढ अभिप्रेत आहे. परंतू खालील ॲटममध्ये त्यापेक्षा जास्तीची वाढ झालेली असून त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील | देयकातील परीमाण | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परीमाण | दर | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Ex.pipe line trenches earth soil | १८०.६७ | १०० | ८०.६७ | १४३.४६ | ११,५७३/- |
| २ | Ex.pipe line hard murum | ८०.२८ | ५० | ३०.२८ | १८०.३२ | ५,४६०/- |
| ६ | Uprooting following size stoneware pipe RCC | ३५०.२५ | १५० | २००.२५ | ३१.२० | ६,२४८/- |
| ८ | Rodding for removing chock up १०० to १५० mm dia | १०४५.७५ | १०० | ९४५.७५ | ११९.३४ | १,१२,८६६/- |
| १३ | P/ISI stnd SWG pipe २२५ mm dia SWG | ८५.५५ | २० | ६५.५५ | २७४.३८ | १७,९८६/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ (२) | Low.lay & jointing in proper २०० mm dia SWG | १०६.५५ | ३० | ७६.५५ | १४०.१७ | १०,७३०/- |
| २२ | Refilling trenches | २४२.६८ | १२५ | ११७.६८ | ६४.२० | ७,५५५/- |
| | | | | | **एकूण** | **१,७२,४१८/-** |

उक्त मुद्यांवर आपल्या स्तरावर तपासणी करून कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

विभागाने मुद्या क्र.५ अन्वये रू.१९,९७५/- संबंधिताकडून वसूल करावी. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान व इतर अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

# लेखापरीक्षण अहवाल.
# वॉर्ड - ई कार्यालय
# सन २०१६-२०१७

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गतच्या वॉर्ड-ई कार्यालयाचे सन २०१६-२०१७ आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्याकरीता कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मुलेप/२१३, दिनांक २२.०९.२०१७ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. वॉर्ड कार्यालयाचे लेखापरीक्षण करतांना वॉर्ड अभियंता आणि वॉर्ड अधिकारी विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांनुसार चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करण्यात आले.

लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड अधिकारी कार्यालयातील माहे मे -२०१६ , नोव्हेंबर -२०१६ आणि मार्च-२०१७ या महिन्यातील जमा रकमांच्या संगणकीय पावत्यांचा व पावत्यांच्या संक्षिप्त अहवाल आणि वसूली/खिडकीनुसार पावत्यांचा तपशिल अहवालाशी चाचणी स्वरूपात तपासणी करण्यात आली. तसेच विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील संचिका, नामांतर संचिका, बे-बाकी प्रमाणपत्रांची प्रकरणे, मालमत्ता मागणी रजिस्टरमध्ये नोंदविलेल्या नोंदी दंडात्मक कार्यवाही अंतर्गत वटविण्यात आलेल्या पावत्या, मासिक पगार पत्रके पुरवणी देयके इत्यादीचे उपलब्ध अभिलेख्यानुसार चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करण्यात आले.

वॉर्ड-ई कार्यालयातील जमा बाजूचे व वॉर्ड अभियंता यांचे बी-वन निविदा कामाच्या संचिका, उपलब्ध अभिलेख्यानुसार चाचणी स्वरूपात तपासणी करून आढळून आलेल्या अनियमिततेबाबत जमा बाजूचे **२०** व खर्च बाजूचे **१४** असे एकूण **३४** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

**वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता यांच्या कार्यकाळाबाबत.**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | श्री.व्ही.डी.डाके | वॉर्ड अधिकारी | १७.४.२०१५ ते ७.४.२०१६ |
| २ | श्री.एस.डी.मोटे, | शाखा अभियंता तथा प्र.वॉर्ड अधिकारी | ०८.४.२०१६ ते १७.५.२०१६ |
| ३ | श्रीमती मिरा चव्हाण, | वॉर्ड अधिकारी | १८.५.२०१६ ते आजपर्यंत |
| | | | |
| १ | श्री.आर.एन.संधा | वॉर्ड अभियंता | २०१६-२०१७ |

सदरचे लेखापरीक्षण मुख्य लेखापरीक्षक सौ.दिपाराणी माणिकराव देवतराज यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले. प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांची नांवे पुढील प्रमाणे -

१. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक (पथक प्रमुख)

२. श्रीमती शिल्पा जोशी, कनिष्ठ लिपीक

**परिच्छेद क्र. ०१ : लेख्यांची सर्वसाधारण स्थिती.**

वॉर्ड - ई कार्यालयाचे सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी विभागाने अभिलेखे अपूर्ण स्वरूपातउपलब्ध करून दिले. विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यातील मालमत्ता मागणी नोंदवही, दैनंदिन वसूल केलेल्या करांची नोंद केलेला गोषवारा इत्यादी अभिलेखे तपासली. मालमत्ता मागणी नोंदवहीतील घेण्यात आलेल्या नोंदी अपूर्ण आढळल्या. मागणी नोंदवहीची एकूणच स्थिती अत्यंत खराब व दयनीय आहे. मागणी नोंदवहीत पुढील आणि मागील पाने फाटलेली असल्याने नोंदी अस्पष्ट आहेत. मागणी नोंदवही वर नोंदी घेणा-या कर्मचारी/अधिकारी यांचे साक्षांकन नाही. मागणी नोंदवही ही कायम जतन करणा-या अभिलेख्यातील अभिलेखे असल्याचे गांभीर्य विभागास नसल्याचे दिसून आले.

करीता विभागाने मालमत्ता मागणी नोंदवहीची स्थिती तपासावी. रजिस्टरच्या पुढील व मागील पानावरील नोंदी नष्ट होणार नाही याबाबत तातडीने नविन मागणी नोंदवही तयार करून संबंधित कर्मचारी / अधिका-यांचे नोंदवहीवर साक्षांकन करून घ्यावे. मागणी नोंदवहीतील अपूर्ण नोंदी जसे कर आकारणी संदर्भ, कर आकारणी मूल्य, एकूण कर योग्य असल्याची खातरजमा करावी.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. ०२ : अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

वॉर्ड-ई कार्यालयातील अनुषंगिक लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यात दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून द्यावे.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | मालमत्ता कर मागणी रजिस्टर. | **अपूर्ण स्वरूपात** |
| २ | पाणीपट्टी मागणी रजिस्टर | **अप्राप्त.** |
| ३ | अकृषीक कर मागणी रजिस्टर | **अप्राप्त.** |
| ४ | बे-बाकी प्रमाणपत्र अभिलेखे. | **अपूर्ण स्वरूपात.** |
| ५ | धनादेश पावती पुस्तके व स्टॉक रजिस्टर. | **अप्राप्त.** |
| ६ | स्वच्छता साहित्याची माहिती. | **अप्राप्त.** |
| ७ | जड संग्रह नोंदवही. | **अप्राप्त.** |

**वॉर्ड - ई कार्यालय**

| | | |
|---|---|---|
| ८ | स्टॉक रजिस्टर (१०९,११०,१११) | **अप्राप्त.** |
| ९ | नविन /दुरूस्त कर आकारणी संचिका. | **अप्राप्त.** |
| १० | बचतगटा मार्फत नियुक्त कर्मचा-यांच्या देयक संचिका. | **अप्राप्त.** |
| ११ | अनुषंगिक वॉर्ड अधिकारी यांच्यामार्फत झालेल्या सर्व संचिका. | **अप्राप्त.** |
| १२ | रोख किर्द | **अप्राप्त.** |
| १३ | न वटलेल्या धनादेशाची वर्षनिहाय यादी. | **अप्राप्त.** |
| १४ | कर्मचा-यांचा जॉबचार्ट. | **अप्राप्त.** |

**विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत उक्त माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत साशंकता निर्माण होते. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०३ : दोन वेगवेगळ्या मालमत्ता असतांना एकच दर्शवून महानगरपालिकेचे मालमत्ता कराचे नुकसानीबाबत.**

मालमत्ता कराचे मागणी रजिस्टर क्र.५ भूषणनगर तपासतांना असे निदर्शनास आले की, सदरील मागणी नोंद वहीत पान क्र.१३४, १३५ वर नोंद घेतांना १६३/१०२ चा संदर्भ दिलेला आहे. सदरील पानावर पी.एच.डावखरे पान क्र.११ भुषणनगर E००११६०८ अशा नोंदी आहेत. तसेच १६३/१०६ मो.जा.कर अशी सुध्दा नोंद निदर्शनास आली.

याच मागणी नोंद वहीत पान क्र.१४२/१४३ वर श्री.पंढरीनाथ हिराजी डावखरे, पान क्र.७ भूषणनगर असा उल्लेख आहे. कर योग्य मूल्य रू.१५००/- O/L असे नमूद आहे. मो.जा.कर ९४ पर्यंत पुढे बंद पान क्र.१३५ वर पहा असे उल्लेखीत आहे. पान क्र.१३५ वरील कर आकारणी संदर्भ १००/९५-९६ दिनांक १.४.९४ पासून २५३८ करयोग्य मूल्य आहे.

सदरील प्रकरणात एकाच मालकाच्या नावाच्या दोन मालमत्ता प्लॉट क्र.७ व ११ आहेत काय? मोकळ्या जागेचा कर फ्लॅट क्र.७ व ११ या दोन्ही प्लॉट साठी आहे का ? पान क्र.१४२/१४३ वरील मोकळ्या जागेचा कर रद्य करणे ही बाब योग्य असली तरी प्लॉट क्र.११ ला त्याचा संदर्भ नमूद करणे कीतपत योग्य आहे.

उक्त दोन्ही मालमत्ता स्वतंत्र असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते. त्यामुळे एकाच मालमत्तेचा कर वसूल करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

करीता सदरील प्रकरणात आपल्या स्तरावर तपासणी करून महानगरपालिकेचे होत असलेले आर्थिक नुकसान वसूली अंती अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा अप्राप्त आहे.

**महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून संबंधित अधिकारी/कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - ई कार्यालय**

**परिच्छेद क्र.०४ : पाणीपट्टी कर वसूली बाबतचे सप्टेंबर-२०१४ पासून औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांना खातेनिहाय पुरविण्यात आलेले अभिलेखे व ऑक्टोबर -२०१६ नंतर संबंधित कंपनीने पाणीपट्टी थकीत रकमेचे महानगरपालिकेस पुरविलेले अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणे बाबत.**

पाणीपट्टी कर वसूली बाबतचे सप्टेंबर -२०१४ पासून औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनी यांना खातेनिहाय पुरविण्यात आलेले अभिलेखे व ऑक्टोबर -२०१६ नंतर संबंधित कंपनीने पाणीपट्टी थकीत रकमेचे महानगरपालिकेस पुरविलेले अभिलेखे आवश्यक आहे.

करीता उक्त अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावे असे कळविण्यात आले होते. तथापि लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत. लेखापरीक्षण पथकाच्या असे निदर्शनास आले की, ऑक्टोबर -२०१६ नंतर महापालिकेकडून वसूल करण्यात येत असलेले पाणीपट्टी योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही. त्यामुळे सदरील प्रकरणी अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नसल्याने संबंधित अधिकारी/कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.०५ : पावती नंबर As/८३०५२ दिनांक २४.३.२०१७ वॉर्ड-ई अंतर्गतच्या स्वीकृत रकमेबाबत.**

वसूली केंद्र/खिडकीनुसार पावत्यांचा तपशील अहवाल आणि स्वीकृत रकमेच्या पावत्यांचा सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील माहे मार्च दिनांक २४.३.२०१७ रोजीचा ताळमेळ घेत असतांना असे निदर्शनास आले की, श्री.रमेश वामनराव धामणगांवकर यांनी मालमत्ता क्र.E००२१३४५ जुना मालमत्ता क्र. WE/१५/PG २४५ विशालनगर D-३ औरंगाबाद ४३१००१ या मालमत्तेसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी ICICI Bank चेक नंबर ०२७८९० रक्कम रू.४४२३/- भरणा करण्यात आलेला होता. तसेच संगणकीय पावती क्र.As/८३०५२ अन्वये वितरीत करण्यात आली.

तथापि, संगणकीय वसूली केंद्र/खिडकीनुसार पावत्यांचा तपशील अहवालात सदरील रक्कम भरणा झाल्याची नोंद नाही. तसेच चेक/दर्शनी हुंडी/वेतन आदेश भरणा पावती मध्येही सदरील चेकचा भरणा केल्याचे आढळून आलेली नाही. भरणा न केलेल्या चेकची संगणकीय पावती अभिलेख्यात मिळणे ही बाब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे. संगणकीय अभिलेख्यातून वितरीत झालेल्या पावतीचा त्याच तारखेतील तपशील अहवालात समावेश न होणे ही बाब एकूण मालमत्ता कर वसूलीच्या संगणकीय प्रणालीबाबत संशय निर्माण करणारी आहे.

करिता, उक्त बाबत विभागाने आपल्या स्तरावर शहानिशा तपासणीसह संगणक विभागाच्या समन्वयाने खुलासा सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**प्रकरणांत उक्त अनियमिततेबाबत महानगरपालिकेचे होत असलेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करण्यात यावे. तसेच संगणकाच्या सॉफ्टवेअर मधील चूकांची दुरूस्ती करून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - ई कार्यालय**

**परिच्छेद क्र.०६ : रजिस्टर क्र.५ पान क्र.२५२/२५३ भूषण नगर येथील नोंद पृष्ठ क्र.३७९ वर असल्याचे उल्लेख केल्याबाबत परंतू रजिस्टर मध्ये सदरील पृष्ठ उपलब्ध नसल्याबाबत.**

मालमत्ता नोंद वही क्र.५, भूषणनगर पृष्ठ क्र.२५२/२५३ वर कमल बाबासाहेब डोंगरे, P.No.२५०, S.No.२६१, तिरूपती नगर कर आकारणी संदर्भ वॉर्ड -ई २७२, २०१०-११ दिनांक २७.७.२०१० दिनांक १.४.२०१० करयोग्य मूल्य रू.१७३९/- असा उल्लेख आहे. सदरील मालमत्तेची नोंद online झाल्याबद्यल संगणकीय मालमत्ता क्रमांक नोंदविलेला नाही. तसेच सदरील पृष्ठावर Please see on R.No.५,P.No.३७९ असे नमूद केलेले आहे. तथापि याच मागणी नोंदवहीत सदरील पान क्र.३७९ उपलब्ध नाही.

करीता उक्त प्रकरणी तपासणी करून सदरील मालमत्तेची Online नोंद झालेली आहे. याची खात्री झाल्यानंतर अथवा नोंद झालेली नसल्यास नोंद घेवून महानगरपालिकेचे झालेले मालमत्ता कराचे नुकसान संबंधिताकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**प्रकरणांत उक्त अनियमिततेबाबत महानगरपालिकेचे होत असलेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करण्यात यावे. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०७ : वसूली केंद्र/खिडकीनुसार पावत्यांचा तपशील अहवाल आणि बँकेत भरणा रक्कम यामध्ये दिनांक २०.५.२०१६ रोजी आढळून आलेल्या तफावती बाबत.**

दिनांक २०.५.२०१६ रोजीच्या वसूली केंद्र/खिडकीनुसार पावत्यांचा तपशील अहवालात वसूल रक्कम रू.४,९८,९२५/- दर्शविली आहे. तथापि बँक भरणा रक्कम रू.४,९८,७७५/- असल्याचे तपासणी ताळमेळात आढळून आले.

MRD/१०७,९११ दिनांक २०.५.२०१६ श्री.सौरभ जोगळेकर यांनी विवाह नोंदणीकरीता भरणा केलेल्या रक्कम रू.१५०/- चा भरणा बँकेत झाला नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**करिता, उक्त बाबी बाबत आपण आपल्या स्तरावर प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून रकमेच्या वसूलीअंती अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत संबंधितांनी महापालिका फंडात जमा झालेली रक्कम बँक खात्यात जमा केलेली नाही. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी व उक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - ई कार्यालय**

**परिच्छेद क्र.०८ : वसूली केंद्र/खिडकीनुसार पावत्यांचा तपशील अहवाल आणि बँकेत भरणा रक्कम यामध्ये दिनांक २५.५.२०१६ रोजी आढळून आलेल्या तफावती बाबत.**

दिनांक २५.५.२०१६ रोजीच्या वसूली केंद्र/खिडकीनुसार पावत्यांचा तपशील अहवालात वसूल रक्कम रू.२,६३,४७५/- दर्शविली आहे. तथापि बँकेत भरणा रक्कम रू. २,६३,२२५/- असल्याचे तपासणी ताळमेळात आढळून आले.

MRD/१२३,५९१ दिनांक २५.५.२०१६ श्री.सुनिल फुलवारे यांनी विवाह नोंदणीकरीता भरणा केलेल्या रक्कम रू.२५०/- चा भरणा बँकेत झाला नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**करिता, उक्त बाबी बाबत आपण आपल्या स्तरावर प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून रकमेच्या वसूलीअंती अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत संबंधितांनी महापालिका फंडात जमा झालेली रक्कम बँक खात्यात जमा केलेली नाही. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी व उक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०९ : मालमत्ता मागणी नोंदवहीतील अपूर्ण नोंदीबाबत.**

वॉर्ड ई (झोन क्र.६) अंतर्गत येणा-या मालमत्तांपैकी चाचणी स्वरूपात मालमत्तांचे मागणी रजिस्टर तपासण्यात आले. मागणी रजिस्टर तपासणी दरम्यान खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. मालमत्ता मागणी रजिस्टर मध्ये संबंधित मालमत्ताधारकाचे नांव, पत्ता इत्यादी बाबी नमूद नाहीत.

२. मागणी रजिस्टर मध्ये कर आकारणी संदर्भ व दिनांक कर आकारणी कोणत्या तारखेपासून आहे याचा उल्लेख नाही.

३. मालमत्ता मागणी नोंदवहीत मालमत्तांचे कर योग्य मूल्य, मालमत्तांचा वापर इत्यादी बाबी नमूद नाही.

४. मागणी नोंदवही संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी प्रमाणित केलेली नाही.

५. मालमत्ताच्या मागणी नोंदवहीत उपलब्ध पानांच्या संख्येचे प्रमाणित करून नोंदवहीच्या शेवटच्या पानावर प्रमाणपत्र नाही.

६. मागणी नोंदवहीत बहुतांश ठिकाणी संगणकीय मालमत्ता क्रमांक नोंदविलेला नाही, त्यामुळे सदरील मालमत्ता online झाली याची खात्री झाली नाही.

७. मागणी रजिस्टर मधील मागची तसेच पुढील पाने फाटलेली निदर्शनास आलेली आहेत. त्या मालमत्तांचे संगणकात नोंद झालेली आहे किंवा कसे याचे लेखापरीक्षणा दरम्यान खात्री झालेली नाही.

८. मालमत्तांचे मागणी नोंदवही मध्ये सन २०१२-२०१३ या वर्षापर्यंत नोंदी घेतल्याचे आढळून आले. त्यानंतर कराच्या नोंदी अद्यावत न ठेवण्याचे कारण समजू शकले नाही. तसेच याबाबत आपल्या विभाग प्रमुखांनी नोंदी घेवू नयेत अशा सूचना दिलेल्या असल्यास त्याची प्रत लेखापरीक्षण विभागास देण्यात यावी.

करीता उपरोक्त मुद्यांवर आपल्या स्तरावर तपासणी करून आढळलेल्या त्रुटींचे निवारण करण्यात यावे. तसेच मागणी रजिस्टर मधील सर्व मालमत्तांचे संगणकीय अभिलेख्यात नोंद झालेली आहे. याबाबत प्रमाणित करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास सुचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन दर्शविलेले नाही.

**उक्त मुद्यांवर कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अहवाल सादर करावा तसेच सदरील अनियमिततेबाबत अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१० : मागणी नोंदवहीत संगणकीय मालमत्ता क्रमांकाची नोंद नसल्याबाबत.**

वॉर्ड -ई (झोन क्र.६) कार्यालया अंतर्गत असलेल्या मालमत्तांचे मागणी नोंदवही मध्ये संगणकीय मालमत्ता क्रमाकांची नोंद नाही. पर्यायाने सदरील मालमत्ता कडून मालमत्ता कराची वसूली प्रलंबित असल्याची शक्यता नाकारता येत नाही. चाचणी स्वरूपात खालील रजिस्टर मधील नोंदी निदर्शनास आलेल्या आहेत त्याचा तक्ता पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | रजिस्टर क्रमांक/ पान क्रमांक | मालमत्ता धारकाचे नांव | कर आकारणी संदर्भ वही | करयोग्य मूल्य |
|---|---|---|---|---|
| १ | ५<br>५०-५१ | कचरू मन्साराम डेडवाल P.Np.९/ p चौंडेश्वरी हौ.सो.गारखेडा | -- | ३९२५/- मोकळ्या जागेचा कर |
| २ | ५<br>६६-६७ | अविनाश विनायक गुळवे, P.No.३,S.No २०/१P चौंडेश्वरी हौ.सो.गारखेडा | -- | ४५००/- मोकळ्या जागेचा कर |
| ३ | ५<br>८२-८३ | आबा किसन झोंबाडे R.H.No.२, S.No.२० मधुराज को.ऑप.हौ.सो. तिरूपतीनगर गारखेडा | वॉर्ड-ई ४९१/१०-११ दिनांक १.४.२०१० दि.८.१०.२०१० | २७००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ५<br>९६-९७ | मो.आदिलखान<br>मो.अखिलखान<br>४-१८-३४/P CTS No. १५२९८/८७ अखिलनगर | -- | १०३७/- |
| ५ | ५<br>११८-११९ | वसंत किसनराव मनाळ भुषणनगर स.नं.२०,प्लॉट क्र.१५/P गारखेडा | २२२२<br>२०१०-११ | १४८०/- |
| ६ | ५<br>१४६-१४७ | सतिश केशवराव निळवंत P.No.१०, भुषणनगर | १८६५<br>२०००-२००१<br>१.९.२००० | ३४९९/-<br>८४०/- |
| ७ | ५<br>१७८-१७९ | नंदा मनोहरराव कल्याणकर<br>P.No.३,४-१८-३४/P भुषणनगर | १५२८<br>९४-९५ | १०००/-<br>मोकळ्या जागेचा कर |
| ८ | ५<br>२१०-२११ | सतिश संतराम बत्तरा P.No.१२,सर्वे नं.१९/२/२<br>तिरूपती हौ.सो.गारखेडा | २१६७<br>९९-२००० | ३६००/- |
| ९ | ५<br>२१४-२१५ | गोपाळकृष्ण दत्तात्रय जोशी<br>P.No.१०,गारखेडा | ३५०८<br>२०००-०१ | १५०/- |
| १० | ५<br>२६८-२६९ | बाळासाहेब नामदेव पाटील<br>P.No.४ तिरूपतीनगर | ३९५७<br>९७-९८ | ७५००/-<br>मोकळ्या जागेचा कर |
| ११ | ५<br>२७२-२७३ | प्लॉट क्र.६ तिरूपतीनगर | -- | |
| १२ | ५<br>२७४-२७५ | वंदना प्रदिप बनसोडे<br>विवेक रोहीदास बनसोडेs P.No.८, S.No.१९/२<br>तिरूपतीनगर | ६१६<br>९९-२००० | ४१७५/-<br>मोकळ्या जागेचा कर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | ५<br>२७८-२७९ | बबिता शामराव गिलबीले<br>कृष्ण एकनाथ कातोरे<br>P.No.१०,तिरूपतीनगर | -- | ६९००/-<br>मोकळ्या<br>जागेचा कर |
| १४ | ५<br>२८०-२८१ | किसन कुदमूलवार<br>P.No.३ तिरूपतीनगर | -- | ३६५०/- |
| १५ | P२<br>२८-२९ | सुरेखा नंदकुमार देशमुख<br>N-२ P२ - २/४,<br>विठ्ठलनगर | २२५२२<br>०६-०७<br>१-४-२००६ | R-२४४१/-<br>C-१९०१/- |
| १६ | P२<br>२१२-२१३ | मंगला मगरे<br>N२ P२ १५/२<br>विठ्ठलनगर | २२६१७<br>०६-०७<br>१-४-०६ | R १५७७/-<br>C ७२४/- |

विभागाने उक्त नोंदी आपल्या स्तरावर तपासून मालमत्ता Online झाल्याची खात्री करावी. मालमत्ता Online झालेली नसल्यास त्यानुसार कार्यवाही करून संबंधितांकडून कराची वसूल करून अहवाल घ्यावा. तसेच उक्त मागणी रजिस्टर व्यतिरिक्त इतर मागणी नोंदवह्यातील सर्व मालमत्ता Online झाल्याची खात्री करून तसे प्रमाणपत्र लेखापरीक्षण विभागास अनुपालनासह सादर करावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत प्रमाणपत्र लेखापरीक्षण पथकास सादर केलेले नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११ : मागणी रजिस्टर मध्ये कर आकारणी संदर्भ, कराची नोंद, संगणकीय मालमत्ता क्रमांक, मालमत्ता धारकाच्या नावाची नोंद नसल्याबाबत.**

वॉर्ड ई (झोन क्र.६) कार्यालया अंतर्गत असलेल्या मालमत्तांचे मागणी रजिस्टर पैकी चाचणी स्वरूपात तपासण्यात आलेल्या मागणी रजिस्टर मध्ये कर आकारणी संदर्भ, कराची नोंद, संगणकीय मालमत्ता क्रमांक, मालमत्ता धारकाच्या नावाची नोंद नाही. प्रथम दर्शनी खालील मागणी नोंद वहीतील नोंदी उदाहरणादाखल देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पत्ता | रजिस्टर नं/पान नं. | शेरा |
|---|---|---|---|
| १ | N-२ P-२ ६/१<br>विठ्ठलनगर | ८२-८३ | कर आकरणी संदर्भ नाही. कराची नोंद नाही. Online झाल्याचा क्रमांक नाही. |
| २ | N-२ P-२ ७/६<br>विठ्ठलनगर | १०४-१०५ | |
| ३ | N-२ P-२ ७/७<br>विठ्ठलनगर | १०६-१०७ | |

## M-१ तानाजीनगर

| अ.क्र. | पत्ता | | रजिस्टर नं./ पान नं. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | N-२ M१/ १/१ | तानाजीनगर | २०-२१ | कर आकरणी संदर्भ नाही. कराची नोंद नाही. Online झाल्याचा क्रमांक नाही. |
| २ | N-२ M१ /१-२ | | २२-२३ | |
| ३ | N-२ M१ /१-३ | | २४-२५ | |
| ४ | N-२ M१ /१-४ | | २६-२७ | |
| ५ | N-२ M१ /१-५ | | २८-२९ | |
| ६ | N-२ M१ /१-६ | | ३०-३१ | |
| ७ | N-२ M१ /२-१ | | ३२-३३ | |
| ८ | N-२ M१ /२-२ | | ३४-३५ | |
| ९ | N-२ M१ /२-३ | | ३६-३७ | |
| १० | N-२ M१ /२-४ | | ३८-३९ | |
| ११ | N-२ M१/ २-५ | तानाजीनगर | ४०-४१ | कर आकरणी संदर्भ नाही. कराची नोंद नाही. Online झाल्याचा क्रमांक नाही. |
| १२ | N-२ M१/ २-६ | | ४२-४३ | |
| १३ | N-२ M१/ २-७ | | ४४-४५ | |
| १४ | N-२ M१/ ३-३ | | ५२-५३ | |
| १५ | N-२ M१/ ३-५ | | ५६-५७ | |
| १६ | N-२ M१/ ३-८ | | ६२-६३ | |
| १७ | N-२ M१/ ४-४ | | ७०-७१ | |
| १८ | N-२ M१/ ४-५ | | ७२-७३ | |
| १९ | N-२ M१/ ४-६ | | ७४-७५ | |
| २० | निरंक / ५-१ | | ७६-७७ | |
| २१ | N-२ M१/ ५-४ | | ८२-८३ | |
| २२ | N-२ M१/ ५-५ | | ८४-८५ | |
| २३ | N-२ M१/ ६-२ | | ९०-९१ | |
| २४ | N-२ M१/ ६-३ | | ९२-९३ | |
| २५ | N-२ M१/ ६-४ | | ९४-९५ | |
| २६ | N-२ M१/ ६-५ | | ९६-९७ | |
| २७ | N-२ M१/ ६-६ | | ९८-९९ | |
| २८ | N-२ M१/ ६-७ | | १००-१०१ | |
| २९ | N-२ M१/ ६-८ | | १०२-१०३ | |
| ३० | N-२ M१/ ७-१ | | १०४-१०५ | |
| ३१ | N-२ M१/ ७-२ | | १०६-१०७ | |
| ३२ | N-२ M१/ ७-३ | | १०८-१०९ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३ | N-२ M१/ ७-५ | | ११२-११३ | |
| ३४ | N-२ M१/ ७-६ | | ११४-११५ | |
| ३५ | N-२ M१/ ७-७ | | ११६-११७ | |
| ३६ | N-२ M१/ ७-८ | | ११९-११९ | |
| ३७ | N-२ M१/ ८-१ | | १२०-१२१ | |
| ३८ | N-२ M१/ ८-४ | | १२६-१२७ | |
| ३९ | N-२ M१/ ८-५ | | १२८-१२९ | |
| ४० | N-२ M१/ ८-७ | | १३२-१३३ | |
| ४१ | N-२ M१/ ९-१ | | १३६-१३७ | |
| ४२ | N-२ M१/ ९-२ | | १३८-१३९ | |
| ४३ | N-२ M१/ ९-६ | | १४६-१४७ | |
| ४४ | N-२ M१/ १०-१ | | १४८-१४९ | |
| ४५ | N-२ M१/ १०-२ | | १५०-१५१ | |
| ४६ | N-२ M१/ १०-३ | | १५२-१५३ | |
| ४७ | N-२ M१/ ११-१ | | १६०-१६१ | |
| ४८ | N-२ M१/ ११-३ | | १६४-१६५ | |
| ४९ | N-२ M१/ ११-४ | तानाजीनगर | १६६-१६७ | कर आकरणी संदर्भ नाही. कराची नोंद नाही. Online झाल्याचा क्रमांक नाही. |
| ५० | N-२ M१/ ११-५ | | १६८-१६९ | |
| ५१ | N-२ M१/ १२-६ | | १८६-१८७ | |
| ५२ | N-२ M१/ १२-७ | | १८८-१८९ | |
| ५३ | N-२ M१/ १२-८ | | १९०-१९१ | |
| ५४ | N-२ M१/ १३-२ | | १९४-१९५ | |
| ५५ | N-२ M१/ १३-३ | | १९६-१९७ | |
| ५६ | N-२ M१/ १३-६ | | २०२-२०३ | |
| ५७ | N-२ M१/ १४-१ | | २०४-२०५ | |
| ५८ | N-२ M१/ १४-२ | | २०६-२०७ | |
| ५९ | N-२ M१/ १४-६ | | २१४-२१५ | |
| ६० | N-२ M१/ १४-७ | | २१६-२१७ | |
| ६१ | N-२ M१/ १५-१ | | २२०-२२१ | |
| ६२ | N-२ M१/ १५-२ | | २२२-२२३ | |
| ६३ | N-२ M१/ १५-३ | | २२४-२२५ | |
| ६४ | N-२ M१/ १५-४ | | २२६-२२७ | |
| ६५ | N-२ M१/ १५-६ | | २३०-२३१ | |
| ६६ | N-२ M१/ १५-७ | | २३२-२३३ | |
| ६७ | N-२ M१/ १५-८ | | २३४-२३५ | |
| ६८ | N-२ M१/ १६-३ | | २४०-२४१ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६९ | N-२ M१/ १६-६ | | २४६-२४७ | |
| ७० | N-२ M१/ १७-२ | | २५०-२५१ | |
| ७१ | N-२ M१/ १७-४ | | २५४-२५५ | |
| ७२ | N-२ M१/ १७-५ | | २५६-२५७ | |
| ७३ | N-२ M१/ १७-७ | | २६०-२६१ | |
| ७४ | N-२ M१/ १८-१ | | २६४-२६५ | |
| ७५ | N-२ M१/ १८-२ | | २६६-२६७ | |
| ७६ | N-२ M१/ १८-७ | | २७६-२७७ | |
| ७७ | N-२ M१/ १८-८ | | २७८-२७९ | |
| ७८ | N-२ M१/ १९-१ | | २८०-२८१ | |
| ७९ | N-२ M१/ १९-२ | | २८२-२८३ | |
| ८० | N-२ M१/ १९-३ | | २८४-२८५ | |
| ८१ | N-२ M१/ १९-४ | | २८६-२८७ | |
| ८२ | N-२ M१/ १९-५ | | २८८-२८९ | |
| ८३ | N-२ M१/ १९-६ | तानाजीनगर | २९०-२९१ | कर आकरणी संदर्भ नाही. कराची नोंद नाही. Online झाल्याचा क्रमांक नाही. |
| ८४ | N-२ M१/ २०-१ | | २९२-२९३ | |
| ८५ | N-२ M१/ २०-२ | | २९४-२९५ | |
| ८६ | N-२ M१/ २०-३ | | २९६-२९७ | |
| ८७ | N-२ M१/ २०-५ | | ३००-३०१ | |
| ८८ | N-२ M१/ २०-६ | | ३०२-३०३ | |
| ८९ | N-२ M१/ २०-७ | | ३०४-३०५ | |
| ९० | N-२ M१/ २०-८ | | ३०६-३०७ | |
| ९१ | N-२ M१/ २१-२ | | ३१०-३११ | |
| ९२ | N-२ M१/ २१-३ | | ३१२-३१३ | |
| ९३ | N-२ M१/ २२-२ | | ३२६-३२७ | |
| ९४ | N-२ M१/ २२-४ | | ३३०-३३१ | |
| ९५ | N-२ M१/ २३-१ | | ३३६-३३७ | |
| ९६ | N-२ M१/ २३-२ | तानाजीनगर | ३३८-३३९ | कर आकरणी संदर्भ नाही. कराची नोंद नाही. Online झाल्याचा क्रमांक नाही. |
| ९७ | N-२ M१/ २३-३ | | ३४०-३४१ | |
| ९८ | N-२ M१/ २३-४ | | ३४२-३४३ | |
| ९९ | N-२ M१/ २४-८ | | ३६२-३६३ | |
| १०० | N-२ M१/ २५-२ | | ३६६-३६७ | |
| १०१ | N-२ M१/ २५-३ | | ३६८-३६९ | |
| १०२ | N-२ M१/ २५-४ | | ३७०-३७१ | |
| १०३ | N-२ M१/ २५-७ | | ३७६-३७७ | |
| १०४ | N-२ M१/ २५-८ | | ३७८-३७९ | |

विभागाने सदरील मालमत्ता बाबत तपासणी करून निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करावी. तसेच ज्या मालमत्तांना अद्यापही कर आकारणी झालेली नसेल अशा मालमत्तांना कर आकारणी करून पूर्तता करावी, जेणे करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही.

**तसेच उक्त नोंदी नाममात्र आहेत. विभागाने आपल्या स्तरावर इतरही मागणी नोंद वह्यांचा आढावा घेवून पूर्तता करावी व त्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने पूर्तता केलेली नाही. महानगरपालिकेचे होणा-या नुकसानीस संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२ : विवाह मंडळाच्या नोंदणीचे अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

वॉर्ड -ई कार्यालयातील महाराष्ट्र विवाह मंडळांचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९८८ अन्वये विवाह मंडळांची नोंदणीची तरतूद आहे.

उक्त अधिनियमाच्या नियम-५ अन्वये आपल्या वॉर्ड कार्यालयात सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात नोंद केलेल्या विवाह मंडळाच्या संचिका व इतर अनुषंगिक अभिलेखे लेखापरीक्षण कामी लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून द्यावेत असे सूचित केले असता लेखापरीक्षण पथकास अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत. अभिलेखे उपलब्ध न करून देणे ही बाब साशंकता निर्माण करणारी आहे. महानगरपालिकेकडे विवाह मंडळाची नोंदणी होणे आवश्यक आहे. याबाबत कार्यवाहीअंती तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१३ : मोकळ्या जागांच्या कर आकारणी बाबतच्या सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील अभिलेखे/संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ प्रमाणे मोकळ्या जागेस मालमत्ता कर आकरण्याची तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे अनुसूचीचे प्रकरण (८) चे कलम (४) अन्वये निबंधकाकडून माहिती मागविण्याची तरतूद असून त्याप्रमाणे कार्यवाही केली असल्याचे सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील अभिलेखे/संचिका लेखापरीक्षणासाठी आवश्यक असल्याने आपल्या अधिपत्याखाली हाताळण्यात आलेली प्रकरणे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून द्यावीत असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

**विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. ज्यामुळे महानगरपालिकेच्या उत्तपन्नात वाढ होवू शकते. अशा प्रकारे कार्यवाही केलेली नसल्याचे अभिलेखे उपलब्ध करून न दिल्यामुळे निदर्शनास आले. करीता संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.१४ : सिडको हस्तांतरणानंतर सिडको क्षेत्रासाठी आकारण्यात आलेल्या मालमत्ता करासंबंधी

सिडको क्षेत्रातील मालमत्तांना सन २००६-२००७ पासून मालमत्ता कराची आकारणी करण्यात येत असते. संबंधित वॉर्डातील मागणी रजिस्टर क्र.N-४-७ ची तपासणी केली असतांना अशा नोंदी निदर्शनास आल्या आहेत की, सन २००६-२००७ ऐवजी त्यानंतरच्या वर्षापासून मालमत्ता कराची आकारणी केलेली आहे. आकारण्यात आलेल्या मालमत्ता करासंदर्भातील अभिलेखे मागितले असतांना संबंधितांनी लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाही.

**उक्त बाबी नाममात्र तपासल्या असून त्याचा स्वतंत्र विवरण तक्ता परिशिष्ट (अ )सोबत जोडण्यात येत आहे.**

विभागाने विवरण तक्त्यातील नोंदी आपल्या स्तरावर तपासून संबंधित मालमत्तांना आकारण्यात आलेला कर योग्य असल्याची खातरजमा करावी. तद्नंतर सदरील नोंदीच्या मालमत्ता कराच्या अभिलेख्यासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे. तसेच वॉर्डा अंतर्गत सिडको क्षेत्रातील इतरही मालमत्तांच्या नोंदी आपल्या स्तरावर तपासून आकारलेला कर योग्य असल्याची खातरजमा करून त्यानुसार स्वतंत्र प्रमाणपत्र लेखापरीक्षण विभागास सादर करावे असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे झालेली कर आकारणी योग्य असल्याची खात्री होत नाही.

**करिता, उक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. तसेच दिरंगाई बाबत संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.१५ :सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर नामांतर व नविन भोगवटाधारक प्रकरणा मध्ये निदर्शनास आलेल्या अनियमितते संबंधी.

वॉर्ड ई (झोन क्र.६) च्या वॉर्ड कार्यालयाने मालमत्ता कर नामांतर व नविन भोगवटाधारक प्रकरणांमध्ये आदेश निर्गमित केलेली आहेत.

सदरील प्रकरणापैकी उपलब्ध करून दिलेल्या नाममात्र प्रकरणांची तपासणी केली असतांना खालील प्रकरणात अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/१६३/१६, दिनांक ११.५.२०१६ अन्वये हर्षा सुमंत जोशी यांच्याकडून सदाशीव शंकर जाधव यांचे नांवे F.No.५, सारंग अपार्टमेंट स्वप्ननगरी या मालमत्तेचे नामांतर झाले आहे. सदरील मालमत्तेचा संगणकीय मालमत्ता क्र.E००२९५६३ असा आहे.

    सदरील मालमत्तेचे नामांतर खरेदी खताआधारे झाल्याचे निदर्शनास येते. परंतू सदरील मालमत्तेची नोंद नगरभूमापन कार्यालयाची आखीव पत्रिका किंवा तहसील कार्यालयाकडील ७/१२ उतारा संचिकेत नाही. अशा परिस्थीतीत मालमत्ता नामांतर प्रक्रिया पूर्ण होणे कितपत योग्य आहे. तसेच सन २०१६-२०१७ या वर्षापर्यंत कराचा भरणा केलेला नाही.

२. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/१६४/१६, दिनांक १७.५.२०१६ अन्वये मुरलीधर किसनराव मोटे यांचे नावावरून पार्वताबाई मुरलीधर मोटे यांचे नावे घर क्र.९३, गजानन कॉलनी या मालमत्तेचे नामांतर झाले आहे. सदरील मालमत्तेचा संगणकीय मालमत्ता क्र.E०००४९०१ असा आहे.

सदरील मालमत्तेचे नामांतर वारसा हक्काने केल्याचे नमूद आहे. तथापि मयत व्यक्तीचे वारस कोण आहेत याबाबत मा.न्यायालयाचे वारसा हक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) संचिकेत नाही. संचिकेतील इतर कागदपत्रे Attestted केलेले नाहीत. सादरीकरणात वारस अर्जदाराने मृत्यूपत्र सादर केले असे नमूद आहे. प्रत्यक्षात संचिकेत असे कागदपत्र नसल्याची खात्री झाली. मालकी हक्काबाबत नगर भूमापन कार्यालय तहसील कार्यालयाचे कागदपत्रे नाहीत.

३. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/१६८/१६, दिनांक १९.५.२०१६ अन्वये एस.एन.गदीलेत यांचे नावावरून नितिन मधुकरराव ज्ञाते यांचे नावे A-२३, सह्याद्री हिल्स गारखेडा या मालमत्तेचे नामांतर करण्यात आले आहे.

सदरील प्रकरणी मालकी हक्काचे जसे नगर भूमापन कार्यालय, तहसील कार्यालयाकडील पी.आर.कार्ड/७/१२ संचिकेत नाही. तरीही नामांतर प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे.

४. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/प्र.अधि ई/१६९/२०१६ दिनांक १९.५.२०१६ अन्वये जूने मालमत्ताधारक विठाबाई हरी इंगळे यांचे नावावरून नविन मालमत्ताधारक सुमन भिमराव तोकलवार यांचे नावे N२ प्रकाशनगर घ.क्र.२३५ चे नविन मालमत्ताधारक म्हणून मंजूरी दिलेली आहे. सदरील मालमत्तेचा संगणकीय मालमत्ता क्र.E००१६६०४ असा आहे.

सदरील प्रकरणी संचिकेत खरेदीखत करारनामा प्रत जोडलेली आहे. त्यामध्ये नमूद प्लॉट क्र.८२ आहे. नविन मालमत्ताधारक म्हणून नोंद घेतांना महानगरपालिकेचे मालमत्ता कराच्या अभिलेख्यात प्लॉट क्र.२३५ नमूद असतांना उक्त खरेदीखत करारनाम्यानुसार नविन मालमत्ताधारकाची नोंद घेणे कायदेशीररीत्या योग्य वाटत नाही.

५. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/प्र.अधि ई/१७१/२०१६ दिनांक १९.५.२०१६ संगीता राधेशाम चव्हाण नविन मालमत्ताधारक जूने मालमत्ताधारक कमलबाई लक्ष्मण वाघमारे संजयनगर येथील संगणकीय मालमत्ता E००१६०५१ असा आहे.

प्रकरणात सदरील आदेशामध्ये संगणकीय मालमत्ता क्र.E००१६५०१ नमूद आहे. तसेच वारसा हक्काचे (Succession Certificate) मा.न्यायालयाचे नाही. संचिकेत मृत्यूपत्र असल्याचे नमूद आहे. प्रत्यक्षात असे प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

६. कार्यालयीन पत्र जा.क्र.मनपा/प्र.अधि ई/१७२/२०१६, दिनांक १९.५.२०१६ अन्वये श्री.गोविंद एकनाथ आव्हाळे यांच्या नावावरून त्यांची पत्नी श्रीमती गंगुबाई गोविंदराव आव्हाळे घर क्र.४५८, मोहल्ला चिकलठाणा, औरंगाबाद संगणकीय मालमत्ता क्र.E०००९००५ करण्यात आले.

संचिकेत सादरीकरणात संबंधित व्यक्तीच्या नांवे मृत्यूपत्र असल्याची नोंद आहे. तथापि संचिका तपाणीत मृत्यूपत्र अथवा मा.न्यायालयाचे वारसा हक्काचे आदेश (Succession Certificate) जोडले असल्याचे आढळून आले नाही.

७. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/प्र.अधि ई/१७५/१६, दिनांक १९.५.२०१६ अन्वये शेख नमीन शेख बशीर NPO किशन गंगय्या पचलोरे यांच्या नावावरून श्रीमती शांताबाई लालचंद बन्सवाल घर क्र.२०/P मोहल्ला संजयनगर संगणक क्र.E००१५७८३ करण्यात आली.

संचिका तपासणीत किसन गंगय्या पासलोटे असे नाव खरेदीखतावर आहे. श्रीमती रेखा किसन पासलोटे यांनी ते मयत असल्याचे नमूद केले आहे. तथापि संचिकेत संबंधिताचे मृत्यू प्रमाणपत्र जोडलेले नाही. मा.न्यायालयाचे (Succession Certificate) नाही. पासलोटे ऐवजी पचलोरे महानगरपालिकेच्या दस्तऐवजामध्ये नमूद झाले आहे.

८. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/प्र.अधि ई /१९०/२०१६ दिनांक ३१.५.२०१६ अन्वये संभाजी शंकरराव कोरके यांचे नावावरून सुनिता रविंद्र मुंढे यांच्या नांवे घर क्र.१५८/B मीनाताई ठाकरेनगर न्यु एस.टी.कॉलनी संगणकीय मालमत्ता क्र.E००२६१६२ नविन मालमत्ता धारक म्हणून नोंद घेतलेली आहे.

सदरील प्रकरणात संभाजी शंकरराव कोरके यांनी मालमत्ता रू.१००/- च्या मुद्रांकावर खरेदीखत करून दत्तात्रय पांडुरंग उकर्डे यांच्या नावे विक्री केली आहे. नविन भोगवटा धारकाने सदरील मालमत्ता संभाजी शंकरराव कोरके यांच्याकडून खरदी केलेली नसतांनाही संबंधित नविन भोगवटा धारकाचे नाव महानगरपालिकेच्या अभिलेख्यात समाविष्ठ झालेले आहे. या बाबीसंबंधी भविष्यात कायदेशीर अडचणीस महानगरपालिकेस सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कार्यालयीन आदेश क्र.मनपा/प्र.अधि.ई/१९२/१६ दिनांक ३१.५.२०१६ जूना मालमत्ताधारक पंचशिल दत्ता दातार नविन दत्ता उकंडी दातार घर क्र.४-१०-७४२ लोकशाही कॉलनी, मुकुंदवाडी संगणकीय मालमत्ता क्र.E००१९५१० असा आहे.

सदरील प्रकरणात जूना मालमत्ता धारक यांचे निधन झाल्याचे नमूद आहे. वारसांच्या प्रतिज्ञापत्राचे आधारे महानगरपालिकेच्या अभिलेख्यात नविन मालमत्ताधारक म्हणून नोंद केली आहे. प्रकरणात मा.न्यायालयाचे वारसा हक्क प्रमाणपत्र संचिकेत नाही.

९. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/प्र.अधि.ई/१९३/२०१६, दिनांक ३.५.२०१६ अन्वये श्री.कान्हु रामाजी पवार यांच्या नावावरून श्री.भिमराव रेखाराव चव्हाण यांच्या नावे घर क्र.ग.नं.२० मोहल्ला संयजनगर, मालमत्ता क्र.E०००६३४२ नविन मालमत्ताधारक म्हणून नोंद घेण्यात आली.

सदरील प्रकरणामध्ये श्री.कान्हु रामजी पवार यांनी रू.१००/- च्या मुद्रांकावर खरेदीखत करून श्री.रघुनाथ पिता रावसाहेब इंगळे यांच्या नांवे विक्री केली आहे. नविन मालमत्ता धारकाने श्री.कान्हु रामजी पवार यांच्याकडून खरेदी केलेली नसतांना संबंधित नविन भोगवटा धारकाचे नांव महानगरपालिका अभिलेख्यात समाविष्ट झालेले आहे. या बाबी संबंधी भविष्यात कायदेशीर अडचणीस महानगरपालिकेस सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**वॉर्ड - ई कार्यालय**

तसेच संबंधित प्रकरणात माहनगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. मालमत्ता कर सन २०१६-२०१७ पर्यंतचा भरणा करून घेणे आवश्यक असतांना कर भरणा २०१५-२०१६ चाच करून घेण्यात आला आहे.

१०. कार्यालयीन आदेश क्र.नामांतर/१९७ दिनांक ३.६.२०१६ अन्वये शशांक विनायकराव ओंढेकर यांचे नावावरून शितल सुरेश बाराहाते यांच्या नावे F.No.२ साई कॉर्नर गारखेडा संगणकीय मालमत्ता क्र.E००२५०८७ चे नामांतर आदेश निर्गमित झालेले आहे.

सदरील प्रकरणात नगर भूमापन कार्यालयाची आखिव पत्रिका संदर्भ वर्षाची न मागविता नामांतर झाल्याचे संचिकेतील प्राप्त अभिलेख्यानुसार निदर्शनास आले. नामांतर आदेश निर्गमित करतांना नगरभूमापन कार्यालयाची आखिव पत्रीका चेक लिस्ट नुसार आवश्यक आहे.

११. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/प्र.अधि.ई/१८२/२०१६ दिनांक २७.५.२०१६ अन्वये जूना मालमत्ता धारक जोशी मालती मधुकर NPO किशोर सोनाजी पवार यांचे नावावरून नविन मालमत्ताधारक विलास मारोती काथार यांचे नांवे घर क्र.४-१८-३४/P गजानन कॉलनी संगणकीय मालमत्ता क्र.E००२०३७६ चे नविन मालमत्ताधारक म्हणून आदेश निर्गमित झालेले आहे.

सदरील प्रकरणाची संचिका लेखापरीक्षणास मिळाली नाही. केवळ आदेशाची प्रत जनरल पॉवर ऑफ ॲटर्निची प्रत आहे. मालमत्ता कर भरणा केल्याची प्रत नाही. सादरीकरण नाही. त्यामुळे सदरील प्रकरणाचे लेखापरीक्षण करता आले नाही.

तसेच नामांतर प्रकरणाच्या जावक बारानिधी मध्ये जावक क्रमांकाचा ताळमेळ लागत नाही. जावक क्रमांक सोडलेली आहेत. पान क्र.१६ वर अ.क्र.१७३,१७४ तर पान क्र.४३ वर अ.क्र.४७४ missing आहेत. अ.क्र.४४७ व ४४८ पान क्र.४१ वर क्रमांक टाकून सोडलेली आहे.

**करीता उक्त अनियमिततेबाबत आपल्या स्तरावर तपासणी करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. याबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१६ : महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ अन्वये वॉर्ड -ई कार्यालयाने वितरीत केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राबाबतच्या प्रकरणातील अनियमिततेबाबत.**

सन २०१६-२०१७ या वर्षात एकूण १९३ प्रकरणांची नोंदणी झालेली आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २९ मार्च २००३ अन्वयेच्या अधिसूचनेमध्ये महाराष्ट्रा मध्ये महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९९ अन्वये आकारण्यात येणा-या विवाह नोंदणी व त्या संबंधीच्या नियमाबाबत शुल्काच्या दरामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. उक्त अधिनियमातील नियम क्र.११(१) नुसार विवाह नोंदणी तपासण्यासाठीच्या अर्जासोबत रू.१५/- शुल्क संबंधितांनी भरणा करणे आवश्यक आहे.

वॉर्ड कार्यालयातील नाममात्र संचिका तपासल्या असता रू.१५/- शुल्क वसूल केलेले नाही. त्यामुळे एकूणच वॉर्ड-ई कार्यालयास विवाह निबंधक म्हणून प्राप्त झालेल्या अधिकाराच्या तारखेपासून सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात एकूण १९३ विवाह नोंदणी प्रमाणपत्र वितरीत केलेले आहे. रू.१५/- प्रमाणे १९३ प्रकरणात तपासणी शुल्क वसूल न केल्याने महानगरपालिकेचे रक्कम रू.२८९५/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**उक्त प्रकरणाबाबत प्रत्यक्ष शहानिशा व खातरजमा करून अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करण्यात यावे. तद्नंतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१७ : वॉर्ड कार्यालयाने प्राप्त अधिकारात मालमत्ता कराची आकारणी , दुरूस्ती इत्यादी बाबींच्या संचिका उपलब्ध करून दिल्या नसल्याबाबत.**

आपल्या कार्यालयास वारंवार मागणी करूनही आपल्या कार्यालयाने नविन मालमत्ता कराची आकारणी, मालमत्ता करामध्ये करण्यात आलेल्या दुरूस्त्या नुसार झालेला कमी जास्त मालमत्ता कराच्या संचिका लेखापरीक्षणा कामी उपलब्ध करून दिलेल्या नाहीत.

आपल्या विभागाकडे उक्त संचिकांची मागणी केलेली असतांना अधिकारी/ कर्मचारी यांनी सदरील संचिका कर आकारणी विभागाकडे हस्तांतरीत झालेल्या आहेत असे तोंडी कळविले. नविन मालमत्ता कर आकारणी व मालमत्ता करात दुरूस्ती करण्याचे अधिकार आपल्या कार्यालयास प्राप्त असूनही सदरील अभिलेखे कर आकारणी विभागाकडे असणे ही बाब योग्य नाही.

करिता, उपरोक्त बाबीबाबत सविस्तर खुलासा सादर करावा तसेच उक्त बाबीच्या संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध होतील याची दक्षता घ्यावी असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत संचिका उपलब्ध झालेल्या नाहीत. प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीकोनातून वॉर्ड अधिकारी यांना मालमत्ता कर आकारणी/दुरूस्ती बाबत अधिकार प्रदान केलेली प्रकरणे संबंधित अधिक-यांनी त्यांचेकडे जतन करणे आवश्यक आहे. **संबंधितांनी उक्त प्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याने त्यांचे कार्यक्षेत्रातील लेखापरीक्षण पूर्ण करता आले नाही. याबाबत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - ई कार्यालय**

**परिच्छेद क्र.१८ : सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात वॉर्ड-ई कार्यालयात सामान्य पावती पुस्तक क्र.९४७ मधील पावती क्र.९४६०७ च्या दोन्ही प्रती पावती पुस्तकात उपलब्ध नसल्याबाबत.**

सन २०१६-२०१७ या वर्षात रस्त्यावर कचरा टाकणे, बांधकाम साहित्य टाकणे इत्यादीसाठी दंड आकारणे कामी सामान्य पावती पुस्तक क्र.९४६ वापरण्यात आले आहे. सदरील पावती पुस्तकामध्ये सन २०१६-२०१७ पर्यंत पावती क्र.९४६०१-९४६०६ पावती वितरीत केल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर याच पावती पुस्तकामधील पावती क्र.९४६०८ ते ९४६२२ पावत्या सन २०१७-२०१८ मध्ये वापरण्यात येत आहेत व पुढेही वापर चालू आहे. सदरील पावती पुस्तकात पावती क्र.९४६०७ च्या दोन्ही प्रती उपलब्ध नाही. ही बाब गंभीर स्वरूपाची आहे.

तसेच सन २०१६-२०१७ मध्ये वापरलेले पावती पुस्तक पुढे सन २०१७-२०१८ मध्ये वापरणे ही बाब सुध्दा लेखाविषयक नियमाच्या विरूध्द आहे.

त्याचप्रमाणे असेही निदर्शनास आले की, सामान्य पावती पुस्तकातील पावती प्रत्यक्ष संबंधितांना देण्यात आल्यानंतर पुनश्च महानगरपालिकेच्या F-१०४ मधील त्याच व्यक्तीच्या तितक्याच रकमेच्या पावत्या निर्गमीत झालेल्या आहेत. तसेच हस्तलिखीत पावतीच्या क्रमांकाचा संगणकीय F-१०४ पावतीमध्ये उल्लेख नाही. केवळ संबंधिताचे नाव व रक्कम इत्यादीचा ताळमेळ घेता आला. परंतू हस्तलिखीत पावतीच्या संदर्भातच संगणकीय पावती असल्याची खात्री करता आली नाही.

६. सदरील कामामध्ये काही ॲटमची Qty मध्ये वाढ २५% पेक्षा जास्त झालेली आहे. निविदा नियम ३८ नुसार २५% पर्यंत वाढ अभिप्रेत आहे. त्यापेक्षा जास्तीची वाढ झालेली असून सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे खालील प्रमाणे झालेला जास्तीचा खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबत खुलासा अपेक्षित आहे.

| ॲटम क्रमांक | ॲटमचा तपशील | देयकातील परिमाण | शेड्यूल्ड B मधील परीमाण | फरक परीमाण | दर | जास्तीचा खर्च रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | Prov.uncoursed rubble masunary in cm १:६ for fdn/Plinth | ५.९४ | ३.२४० | २.७० | २५४५.१८ | ६८७२/- |
| **२** | Prov.IInd class BB mansuhary In cm १:६ for fdn/Plinth | ४६.७२ | ९.६६० | ३७.०६ | ४२५६.०९ | १५७७३१/- |
| **७** | P/A three costs of synthetic enamed pdint | ६.०५ | ४.५० | १.५५ | ५३.५५ | ८३/- |
| | | | | | **एकूण** | **१,६४,६८६/-** |

७. सदरील प्रकरणात ५% अतीरिक्त सुरक्षा ठेव देयकातून कपात केली. मुख्यतः अतीरिक्त सुरक्षा ठेव कामाच्या Performance शी निगडीत बाब आहे. त्यामुळे संबंधित अधिका-यांनी देयकातून कपात करण्याची परवानगी देणे कितपत योग्य ठरते. तसेच महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान सुध्दा झाले आहे.

करीता उक्त मुद्दे तपासून लेखापरीक्षण विभागास सविस्तर खुलासा सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**मुद्या क्र.६ अन्वये जास्तीचा झालेला खर्च रू.१,६४,६८६/- यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसल्याने खर्च अमान्य करण्यात येतो. इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - ई अभियंता कार्यालय**

**परिच्छेद क्र.१३ : सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२३ अंतर्गत विमाननगर आठवडी बाजार, दिपनगरी येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत. अंदाजपत्रक रक्कम रू. १८,९६,३९३/-( खर्च रक्कम रू.१९,५९,९९८/- )**

वॉर्ड क्र.२३ अंतर्गत विमाननगर आठवडी बाजार, दिपनगरी येथे रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृती दिनांका पर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची २.८८% Below निविदा ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची होती. कंत्राटदाराचे दर स्वीकृत करण्यात आले. कंत्राटदाराने महानगरपालिके सोबत करारनामा केला. तसेच २% अनामत रकमेचा भरणा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/प्र.अभियंता ई/४४/२०१६ दिनांक १८.५.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ४ महिने देण्यात आली. काम दिनांक १.६.२०१६ रोजी पूर्ण झाल्याचे नमूद आहे. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने मोजमाप पुस्तीका क्र.४४९५ उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. सदरील कामाचे अंदाजपत्रक मंजूर करतांना लेखा शाखेने परिच्छेद क्र.८ मध्ये नमूद प्रमाणे शहरी भागात पुर्नडांबरीकरण करणेचे लेखाशिर्षात अंदाजपत्रक नोंदविले. परंतू देयक प्रदान करतांना परिच्छेद ५१ नुसार इतर भांडवली विकास कामे या लेखाशिर्ष नमूद आहे. ज्या लेखा शिर्षाअंतर्गत अंदाजपत्रकात नोंद घेतली जाते. त्याच लेखाशिर्षात खर्च करणे अपेक्षित आहे. याबाबत लेखा विभागाच्या समन्वयाने खुलासा अभिप्रेत आहे.

३. सदरील कामात ॲटम क्र.७ compacting the sub grade gravel ४० mm size metal etc या कामासाठी देयकात १४४७.६३ परीमाण नोंदविलेले आहे. शेड्यूल्ड घBङ मध्ये ९०९ परीमाण आहेत. फरक परीमाण ५३८.६३ असून ॲटमचा दर ११.५५ असा आहे. रू.६२२१/- जास्तीचा खर्च झालेला आहे. निविदा नियम ३८ प्रमाणे परीमाणात २५% पर्यंत वाढ अभिप्रेत आहे. जास्तीच्या झालेल्या खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही, त्यामुळे उक्त खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबत खुलासा अपेक्षित आहे.

करीता उक्त मुद्यांवर आपल्या स्तरावर तपासणी करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**मुद्या क्र.३ अन्वये जास्तीचा झालेला खर्च रू.६२२१/- यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसल्याने अमान्य करण्यात येतो. इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - ई अभियंता कार्यालय**

**परिच्छेद क्र.१४ : सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.८७ म्हाडा कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे बाबत.**

वॉर्ड क्र.८७, म्हाडा कॉलनी येथे सिमेंट रस्ता कॉंक्रीटचा रस्ता तयार करणेच्या कामाची संचिका विभागाने उपलब्ध करून दिली. सदरील कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी १.७७% Below दराची निविदा बरतूने आकाश भरत यांची होती. संबंधितांचे निविदा दर कार्यालयाने स्वीकृत केल्यानंतर संबंधितांनी २% अनामत रकमेचा भरणा FDR स्वरूपात केला. तसेच कामाबाबत रू.५००/- च्या मुद्रांकावर करारनामा करून दिला. कार्यालयाने कार्यालयीन पत्र क्र.मनपा/प्र.अभियंता ई / ८३ /२०१६ दिनांक ३.८.२०१६ अन्वये कामाचे कार्यादेश निर्गमित केले. कार्यादेशात कामाची मुदत ४ महिने देण्यात आली. सदरील काम दिनांक १२.९.२०१६ पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्व प्रमाणपत्रावरून निदर्शनास आले. संचिकेच्या तपासणीत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. रू.६००/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना रू.५००/- च्या मुद्रांकावर करारनामा केल्याने शासनाचे रू.१००/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

२. निविदा नियम ३८ नुसार ॲटम मध्ये २५% पर्यंत वाढ अभिप्रेत आहे. सदरील कामात ॲटम क्र.२ Ex.for roadway in earth Soil चे देयकातील परीमाण १५२.५६ व शेड्यूल्ड B मधील परीमाण ७६.५०० आहे. फरक परीमाण ७६.०६ इतका आहे. सदरील ॲटमसाठी रू.९६.३० दर नमूद आहे. रू.७३२५/- जास्तीच्या रकमेस सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही, त्यामुळे जास्तीचा खर्च अमान्य का करू नये याचा खुलासा व्हावा.

३. लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने सदरील कामाची नोंद असलेली मोजमाप पुस्तिका क्र.२९९६ लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

करीता विभागाने उक्त मुद्यांवर आपल्या स्तरावर तपासणी अंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**मुद्या क्र.१ अन्वये शासनाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करण्यात यावे. मुद्या क्र.२ अन्वये जास्तीचा झालेला खर्च रक्कम रू.७३२५/- यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसल्याने अमान्य करण्यात येतो. इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - ई अभियंता कार्यालय**

## लेखापरीक्षण अहवाल.
## वॉर्ड - क्र. ९ कार्यालय
## सन २०१७-२०१८

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गतच्या वॉर्ड क्र.९ या कार्यालयाचे सन २०१७-२०१८ आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्याकरीता कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मुलेप/११२, दिनांक १२.६.२०१८ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. वॉर्ड कार्यालयाचे लेखापरीक्षण करतांना वॉर्ड अभियंता आणि वॉर्ड अधिकारी विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांनुसार चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करण्यात आले.

लेखापरीक्षणा दरम्यान जमा रकमांच्या संगणकीय पावत्यांचा व पावत्यांच्या संक्षिप्त अहवाल आणि वसूली/खिडकीनुसार पावत्यांचा तपशिल अहवालाशी चाचणी स्वरूपात तपासणी करण्यात आली. तसेच विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील संचिका, नामांतर संचिका, बे-बाकी प्रमाणपत्रांची प्रकरणे, मालमत्ता मागणी रजिस्टरमध्ये नोंदविलेल्या नोंदी दंडात्मक कार्यवाही अंतर्गत वटविण्यात आलेल्या पावत्या, मासिक पगार पत्रके पुरवणी देयके इत्यादीचे उपलब्ध अभिलेख्यानुसार चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करण्यात आले.

वॉर्ड क्र.९ या कार्यालयातील जमा बाजूचे व वॉर्ड अभियंता यांचे बी-वन निविदा कामाच्या संचिका, उपलब्ध अभिलेख्यानुसार चाचणी स्वरूपात तपासणी करून आढळून आलेल्या अनियमिततेबाबत जमा बाजूचे **३०** व खर्च बाजूचे **०१** असे एकूण **३१** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

**वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता यांच्या कार्यकाळाबाबत.**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | श्री.एस.आर.जरारे | वॉर्ड अधिकारी | २०१७-२०१८ |
| | | | |
| २ | श्री.एस.ओ.पवार | शाखा अभियंता तथा प्र.उपअभियंता (से.नि.) | १८.५.२०१६ ते ३०.६.२०१७ |
| ३ | श्री.के.बी.परदेशी | शाखा अभियंता तथा प्र.उपअभियंता | ५.७.२०१७ ते आजपावेतो |

सदरचे लेखापरीक्षण मुख्य लेखापरीक्षक सौ.दिपाराणी माणिकराव देवतराज यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले. प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांची नांवे पुढील प्रमाणे -

१. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक

२. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक

**परिच्छेद क्र. ०१ : अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

वॉर्ड क्र.९ या कार्यालयातील अनुषंगिक लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यात दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून द्यावे.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| **१** | मालमत्ता कर पाणीपट्टी व अकृषीक कर याबाबतचे मागणी रजिस्टर. | **अप्राप्त** |
| **४** | बे-बाकी प्रमाणपत्र अभिलेखे. | **अप्राप्त** |
| **५** | धनादेश पावती पुस्तके व स्टॉक रजिस्टर. | **अप्राप्त** |
| **६** | स्वच्छता साहित्याची माहिती. | **अप्राप्त** |
| **७** | अधिकारी-कर्मचारी सेवापुस्तके , सेवापट , हजेरीपत्रक , दैनंदिन -अहवाल, मासिक पगारपत्रके,पुरवणे देयके इत्यादी. | **अपूर्ण स्वरूपात** |
| **८** | वैद्यकीय प्रतीपूर्ती संचिका. | **अपूर्ण स्वरूपात** |
| **९** | जड संग्रह नोंदवही. | **अप्राप्त** |
| **१०** | स्टॉक रजिस्टर (१०९,११०,१११) | **अप्राप्त** |
| **११** | नविन /दुरूस्त कर आकारणी संचिका. | **अप्राप्त** |
| **१२** | बचतगटा मार्फत नियुक्त कर्मचा-यांच्या देयक संचिका. | **अप्राप्त.** |
| **१३** | अनुषंगिक वॉर्ड अधिकारी यांच्यामार्फत झालेल्या सर्व संचिका. | **अप्राप्त.** |
| **१४** | कर्मचा-यांचा जॉबचार्ट. | **अप्राप्त.** |

**विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत उक्त माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत साशंकता निर्माण होते. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २: प्रभाग -९ अंतर्गत सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वसूली बाबत.**

औरंगाबाद महानगरपालिका सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता वॉर्ड -ड या प्रभागात खालील तक्त्यात पुरविलेल्या माहितीनुसार खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निवासी व निवासेत्तर मालमत्ता कराच्या वार्षिक एकूण मागणी रक्कम रू.**६७,२४,६६,०६२/-** आहे. प्रभागाकडून वसूल झालेली रक्कम रू. **११,८६,२३,८५१**/- वजा जाता रक्कम रू.५५,३८,४२,२११/- इतकी मालमत्ता करापोटीची रक्कम थकीत आहे व पाणीपट्टी एकूण मागणी प्रभागा मार्फत उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

तसेच पाणीपट्टी वसूल केलेली रक्कम रू.**३,७६,२४,८६०/-** ही एकत्रितरित्या दर्शविलेली आहे.

**सन २०१७-२०१८**

**झोन क्र.९ येथील मालमत्ता वसूली तक्ता.**

| अ.क्र. | एकुण मालमत्ता | | एकूण मागणी | | एकूण वसूल केलेली रक्कम | | फरक रक्कम रू | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर | |
| | २४१४८ | ३३४७ | ४५४८३५२११ | २१७६३०८५१ | **११८६२३८५१** | | **५५३८४२२११** | | |

**सन २०१७-२०१८**

**झोन क्र.९ येथील पाणीपट्टी वसूली तक्ता.**

| अ.क्र. | एकुण नळधारक | | एकूण मागणी | | एकूण वसूल केलेली रक्कम | | फरक रक्कम रू | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर | |
| | १६०८९ | ४४१ | -- | -- | **३७६२४८६०** | | -- | -- | -- |

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१. मालमत्ताधारकाकडे मालमत्ता कराच्या रकमा ब-याच कालावधीपासून प्रलंबित राहिल्या असून थकबाकीत प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. तथापि प्रभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ कलम १२८ नुसार थकबाकीदारांवर वसूलीची ठोस कार्यवाही वेळीच न केल्यामुळे करांच्या रकमा थकीत होवून त्याचा परिणाम महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नावर झाला आहे.

२. दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून थकीत असलेल्या मागणीच्या वसूल न केलेल्या कराबाबत महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता २०११ चे नियम ३४२ प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबी पाहता वॉर्ड -ड ने कराची मागणी व वसूलीची कार्यवाही अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे सत्वर करणे आवश्यक आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर असलेल्या थकीत रकमांचे मालमत्ताधारकांवर अधिनियमाच्या तरतदीप्रमाणे नियोजनबध्द कार्यवाही करून रकमा थकीत राहणार नाहीत याबाबत योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही, तरी मार्च -२०१८ अखेर प्रलंबित मालमत्ता कराची रक्कम रू.५५,३८,४२,२११/- वसूल करणेची दक्षता घेण्यात यावी.

**उपरोक्त बाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०३ : सन २०१७-२०१८ २०१८ या कालावधीतील वॉर्ड क्र. ९ वॉर्ड कार्यालयातील वसूल रकमांच्या ताळमेळ बाबत.**

मालमत्ताधारक श्री.एस.आर.बोरावके, सौ.सरोज एस बोरावके, मालमत्ता क्र.D०००७३०९, राहणारा धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, उस्मानपुरा यांनी या वर्षाचा मालमत्ता कर पावती क्र.As/८९२७२, दिनांक २६.५.२०१७ रक्कम रू.१०९८२/- H.D.F.C. Bank card No.०६५१०००५९९ (Card Payment) द्वारे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला. तथापि त्याची नोंद त्या दिवसाच्या पावत्यांच्या (कॅश रजिस्टरमध्य) तपशिलामध्ये नसल्याचे निदर्शनास आले आहे.

१. वॉर्ड कार्यालयातील, कॅश रजिस्टर दिनांक २६.५.२०१७ रोजीच्या मालमत्ता कर वसूली पावतीच्या रकमेच्या नोंदीनुसार त्या दिवशी पहिली पावती क्र.As/१८३९५ अशी असून त्याच दिवशीची शेवटची मालमत्ता कर पावती क्र.As/१८९७६ असा आहे म्हणजेच त्या दिवशी पावती क्र.As/८९२७२, दिनांक २६.५.२०१७ वॉर्ड कार्यालयातून जनरेट होणे ही बाब आक्षेपार्ह आहे.

२. वॉर्ड कार्यालयातील वसूली केंद्र / खिडकीवर प्रत्यक्ष संगणकावर तपासून पाहिले असता पावती क्रमांक As/८९२७२, दिनांक २६.५.२०१७ या पावतीची नोंद वेगवेगळ्या तीन ठिकाणी खालील प्रमाणे दिसून आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | As/८९२७२<br>दि.९.२.२०१८ | ३४२१/- | सुनिल नेमिनाथ इंद्राने,<br>वॉर्ड क्र.४ (H)<br>मालमत्ता क्र.H०००८७५६<br>मयुरपार्क. औरंगाबाद. |
| २ | As/८९२७२<br>दि.२६.५.२०१७ | १२२७/- | १)मिर्झा अहमद बेग<br>२) मिर्झा मोहम्मद बेग<br>३) मिर्झा रफत बेग<br>पिता मिर्झा खालेद बेग |
| ३ | As/८९२७२<br>दि.२६.५.२०१७ | १०९६२/- | श्री.एस.आर.बोरावके, सौ.सरोज एस.बोरावके |

उक्त प्रमाणे वेगवेगळ्या तीन ठिकाणी म्हणजेच दिनांक १.४.२०१७ ते दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत एकाच वर्षाच एकाच पावती द्वारे वेगवेगळ्या नावाने नोंद असल्याचे दिसून येते.

३. मालमत्ताधारक विनोद बाबुलाल, जैस्वाल, मालमत्ता क्र.D००४१८००, राहणार एकनाथ नगर यांनी या वर्षाचा मालमत्ता कर पावती क्र.As/९५४६९, दिनांक ५.३.२०१८ रक्कम रू.३९३/- द्वारे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला. तथापि त्याची नोंद त्या दिवसाच्या पावत्यांच्या (कॅश रजिस्टरमध्ये) तपशिलामध्ये नसल्याचे निदर्शनास आले आहे.

४. वॉर्ड कार्यालयातील वसूल / खिडकीवर प्रत्यक्ष संगणकावर तपासून पाहिले असता पावती क्रमांक As/९५४६९, दिनांक ५.३.२०१८ या पावतीची नोंद वेगवेगळ्या तीन ठिकाणी खालील प्रमाणे दिसून आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | As/९५४६९<br>दि.५.३.२०१८ | ३९३/- | विनोद बाबुलाल जैस्वाल<br>मालमत्ता क्र.D००४१८००<br>एकनाथनगर, औरंगाबाद. (वॉर्ड क्र.९) |
| २ | As/९५४६९<br>दि.५.३.२०१८ | ३९३/- | विशाल रत्नाकर राऊत, वॉर्ड क्र.२ (G)<br>मालमत्ता क्र.G०००८८९७, जुनावाडा<br>गुलमंडी, औरंगाबाद. |
| ३ | As/९५४६९<br>दि.५.३.२०१८ | २०,०००/- | विशाल रत्नाकर राऊत, वॉर्ड क्र.२ (G)<br>मालमत्ता क्र.G०००८८९७,<br>धनादेश क्र.८६०७३२, दिनांक २०.२.२०१८<br>स्टेट बँक ऑफ इंडिया, औरंगाबाद. |

उक्त प्रमाणे वेगवेगळ्या तीन ठिकाणी म्हणजेच दिनांक १.४.२०१७ ते दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत एकाच वर्षाच एकाच पावती द्वारे दोन वेगवेगळ्या नावाने नोंद असल्याचे दिसून येते.

विभागास उक्त बाबत खुलासा सादर करावा असे जा.क्र.मनपा/मुलेप/२०१८ /२३०, दिनांक २७.९.२०१८ अन्वये कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उक्त बाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ०४ : विवाह मंडळाची नोंदणी बाबत.**

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८,१९९९ व सा.आ.वि.अधिसूचना क्रमांक विनोका २००७/९३८/प्र.क्र.२३७/ कु.क.२, दिनांक १ नोव्हेंबर २००७ अन्वये आपल्या कार्यक्षेत्रातील विवाह जुळविणारी वधु वर सुचक मंडळे अथवा व्यक्तींनी विवाह निबंधकाकडे नोंदणी करणे अनिवार्य व कायद्याने बंधनकारक आहे. तसेच विवाह मंडळाच्या नोंदणीसाठी विवाह मंडळ चालविणारे व्यक्ती किंवा व्यक्तीचा गट अशा विवाह मंडळाच्या नोंदणी करीता, नमुणा -अछ मध्ये विवाह निबंधकाकडे लेखी अर्ज किती प्राप्त झाले व या अर्जासोबत नोंदणी शुल्क रू.२०००/- प्रमाणे किती रक्कम प्राप्त झाली याबाबतची सविस्तर माहिती लेखापरीक्षणास आवश्यक असल्याने ती माहिती उपलब्ध करून देण्यात यावी असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतिम होइपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०५ : आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये विवाह नोंदणी संचिकेतील अनियमिततेबाबत.**

विवाह नोंदणी संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्याबाबत विभागास उक्त संदर्भियान्वये व तद्नंतर अर्धसमास पत्र क्र.१ दिनांक १३.६.२०१८ रोजी पत्र देण्यात आले. मात्र विभागाने विवाह नोंदणी संचिका उपलब्ध करून दिलेल्या नाही.

पत्र क्र. जा.क्र.मनपा/मुलेप/२५३/२०१८, दिनांक २३.१०.२०१८ रोजी दिल्यानंतर दिनांक २७.११.२०१८ रोजी विभागाने विवाह नोंदणी संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिल्या आहे.

लेखापरीक्षण करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये वॉर्ड क्र.९ मध्ये विवाह नोंदवही नमुना आय नियम ८,९ नुसार एकूण १८५ विवाह नोंद झाल्याचे दिसते. मात्र विवाह नोंदणी फिस भरतांना फक्त ३८ विवाहाची विवाह नोंदणी फी रक्कम रूपये ६७९०/- चा भरणा झालेला आहे. बाकी रक्कम रूपये २४५६५/- चा भरणा केलेला नाही.

२. संचिका सादर करतांना अपूर्ण सादरीकरण करण्यात आले आहे. प्रमाणपत्र देतांना, विवाह नोंदणी फिस भरतांना विवाह पडताळणी स्वाक्षरी साक्षीदार तपासतांना साक्षीदाराची स्वाक्षरी सादरीकरण करून मंजूरी घेणे आवश्यक होते. मात्र तसे झाल्याचे दिसत नाही.

३. यादीतील अ.क्र.४८ कुमावत देवेंन्द्र राजेंद्र रजि.अ.क्र.६१२ यांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र (नमुना ई) देतांना मंजुरी न घेता प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले आहे.

४. आर्थिक वर्ष २०१७-१८ मधील कॅश रजिस्टर पाहिले असता काही विवाह नोंदणी फीस दुबार (double) भरणा झालेली आहे.

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून अहवाल तात्काळ लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**डबल नोंद विवाह नोंदणी**

| अ.क्र. | नांव | दिनांक | रक्कम | पावती क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | आकाश अजय विभुते | १७.७.२०१७ | ५०/- | MRD/१८४ |
| | आकाश अजय विभुते | १७.७.२०१७ | ५०/- | MRD/१८५ |
| २ | नागेश्वर पांडुरंग जाधव | १८.८.२०१७ | १५०/- | MRD/२५८ |
| | नागेश्वर पांडुरंग जाधव | १८.८.२०१७ | १५०/- | MRD/२५९ |

वॉर्ड - क्र. ९ कार्यालय

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | पियुष नारायणलाल ओसवाल | २३.१०.२०१७ | २१५/- | MRD/३७४ |
| | पियुष नारायणलाल ओसवाल | २३.१०.२०१७ | २१५/- | MRD/३७७ |
| ४ | हुबेश कोठामल ईसराणी | २२.११.२०१७ | ११५/- | MRD/४२१ |
| | Hubesh Kothamal Israni | २२.११.२०१७ | ११५/- | MRD/४२२ |
| ५ | स्वप्नील राजेंद्र वैजापुरकर | १.१.२०१८ | ६५/- | MRD/४९२ |
| | स्वप्नील राजेंद्र वैजापुरकर | १.१.२०१८ | ६५/- | MRD/४९४ |
| ६ | अभिजित रत्नाकरराव देशमुख | १६.१.२०१८ | ११५/- | MRD/५२३ |
| | अभिजित रत्नाकरराव देशमुख | १६.१.२०१८ | ११५/- | MRD/५२४ |
| ७ | राहुल विश्वास घोगरे | ३.३.२०१८ | २१५/- | MRD/६२५ |
| | Rahul Vishwas Ghogre | ३.३.२०१८ | २१५/- | MRD/६३१ |
| | | | | |
| ८ | निखिलेश रामधन पाटील | २२.३.२०१८ | ६५/- | MRD/६६९ |
| | Nikhilesh Ramdhan Patil | २२.३.२०१८ | ६५/- | MRD/६७० |
| | | एकूण | १९८०/- | |

उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.०६ : विवाह नोंदणी संचिके बाबत**

विवाह नोंदणी संचिका मध्ये संबंधित अर्जदार यांनी दिनांक २८.४.२०१७ रोजी विभागास देण्यात आले. विवाहाची तारीख दिनांक १.५.२००२, विवाहाचे ठिकाण बालाजी मंगल कार्यालय, बालाजी नगर, औरंगाबाद वराचे नांव : थोरहत्ते श्रीकृष्णा अंबादासराव, जन्मदिनांक २३/६/१९७९, आधार कार्ड नं.४९७०३६७४९७०४, वधुचे नांव : बोर्डे शितल सुभाष,, जन्म दिनांक २३/१२/१९८५, आधार कार्ड क्र.७२३६७९४६१६४२ सदरील बाबत विवाह नोंदणी रजि.क्र.५, अ.क्र.५९१ वर नोंद घेवून नमुना ई Form E (कलम ६(१) आणि नियम ५) प्रमाणे दिनांक ४.७.२०१७ रोजी संबंधितास विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. संचिकेची तपासणी दरम्यान खालील बाब निदर्शनास आली.

१. संचिकेची तपासणी दरम्यान वर व वधुचा विवाह दिनांक १.५.२००२ रोजी झालेला आहे. परंतु वधुने सादर केलेले जन्माचे दाखलावर २३/१२/१९८५ दर्शविण्यात आलेली आहे. त्यामुळे मुलीचे लग्नाचे वेळचे वय हे अठरा नसतांना लग्न झाल्याचे संबंधित संचिकेत जोडण्यात आलेल्या वयाच्या कागदावरून दिसून येते. म्हणजेच विभागाने कागदाची तपासणी न करता विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले.

२. विवाह नोंदणी अधिनियम १९९९ अन्वये आकारण्यात येणा-या विवाह नोंदणी प्रमाणपत्र रक्कम जमा न करताच प्रमाणपत्र देण्यात आले.

**तरी विभागाने पुनश्च शहानिशा करून वरील मुद्या क्र.१ व २ बाबत कार्यवाही करून तसा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ०७: नामांतर करतांना मालमत्ता कर पूर्ण वसूल न करता नामांतर करून देणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान खालील दोन नामांतर संचिकेत आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

सन २०१७-२०१८ चा कर पूर्ण न भरता पार्ट पेमेन्ट भरणा करून नामांतर केलेला आहे तरी विभागाने दोन्ही नामांतर संचिकेत मालमत्ता कर हा पूर्ण भरणा झाल्यानंतरच नामांतर करणे आवश्यक होते.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.योगेश अशोक देवगिरीकर दाऊदपुरा, जालनारोड, शॉप नं.३१ जी.एफ. CTS.No.१४८२२ D०० १९०७१ | जा.क्र.मनपा/वॉर्ड-९/ नामांतर/२९८८/२०१७ दिनांक १६.१२.२०१७ |
| २ | श्रीमती अमृता योगेश देवगिरीकर, दाऊदपुरा, जालनारोड, shop no.२१ CTS No.१४८२२, D०० १९०७३ | जा.क्र.मनपा/वॉर्ड-९/ नामांतर/२९८९/२०१७ दिनांक १६.१२.२०१७ |

तरी विभागाने वरील दोन्ही संचिकेबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले होते.

**तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०८ : नामांतर अनियमिततेबाबत.**

अर्जदार श्री.श्रीकांत शरद चौबे, श्री.शरद माणिकराव चौबे, डॉ.श्रीकांत शरद चौबे यांनी नामांतर करतांना पाणीपट्टी कर पावती श्री.पंकज सुधाकर शुक्ला या नावाच्या पावत्या तिन्ही संचिकांत लावण्यात आलेल्या असून यांनी मूळ मालमत्ताधारक दुसरे असतांना ती शुल्काची पावती लावून नामांतर केलेले आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | मुळ मालमत्ताधारक | पाणीपट्टी भरणा पावतीवरील नांव |
|---|---|---|---|
| १ | श्रीकांत शरद चौबे माणिक आर्केड,F.No.४ चेतनानगर औरंगाबाद. | सायली जतिन चटके व रमेश जतिन चटके | F१०४/२१०५ ११.४.२०१५ पंकज सुधाकर शुक्ला |
| २ | श्री.शरद माणिकराव चौबे, माणिक आर्केड F.No.२ चेतनानगर औरंगाबाद. | सुर्यवंशी एस.एन. | F१०४/२१०५ ११.४.२०१५ पंकज सुधाकर शुक्ला |
| ३ | डॉ.श्रीकांत शरद चौबे माणिक आर्केड F.No.५ चेतनानगर औरंगाबाद. | शरद माणिकराव चौबे | F१०४/२१०५ ११.४.२०१५ पंकज सुधाकर शुक्ला |

वरील अनियमितेबाबतचा खुलासा विभागाने लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०९: मालमत्ता नामांतर/कर विभाजन करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

मालमत्ता नामांतर करण्यासाठी अर्जदार विनोद ताराचंद अग्रवाल व इतर जुगलकिशोर अग्रवाल व इतर, राजकुमार माणिकचंद अग्रवाल, हनुमानदास अग्रवाल व इतर यांनी C.T.S.१२९९० व १२९९१ जालनारोड मोंढा नाका, सिग्नल जवळ औरंगाबाद यांनी मालमत्ता नामांतर/कर विभाजनासाठी अर्ज कागदपत्रे सादर केली आहे.

मालमत्तेचा वापर व्यवसायिक स्वरूपाचा असून करयोग्य मूल्य ४५४०३/- एवढे आहे. जमिनीचे मूळ मालक पुनमचंद ताराचंद अग्रवाल मालमत्ता क्रमांक D००४४५०२ आहे. नामांतर/कर विभाजन संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. जा.क्र./मनपा/वॉर्ड-९/नामांतर/५७५/२०१८,दिनांक २६.३.२०१८ रोजी नामांतर आदेश निर्गमित करण्यात आले असून आदेशानुसार खालील प्रमाणे नामांतर करण्यात आले.

| अ. क्र. | म्यु.घ.नं. | घरमालकाचे नांव | करयोग्य मूल्य | स.मा .कर | करआकारणी पासून |
|---|---|---|---|---|---|
| १ | CTS१२९९० व १२९९१ जालनारोड मोंढा नाका सिग्नलजवळ | श्री.विनोद अग्रवाल कुलभुषण अग्रवाल, सुभाष अग्रवाल, राजेंद्र अग्रवाल, भिकचंद अग्रवाल, दिलीप अग्रवाल | १८१६३/- | ८१७३ | १.४.२०१८ (D-००४४५०२) |
| २ | CTS१२९९० व १२९९१ जालनारोड मोंढा नाका सिग्नलजवळ | जुगलकिशोर अ्ग्रवाल, विजयकुमार अग्रवाल, ओमप्रकाश अग्रवाल, अशोक अग्रवाल अभिलाष अग्रवाल | ९०८०/- | ४०८६ | १.४.२०१८ (D-नविन नोंद |
| ३ | CTS१२९९० व १२९९१ जालनारोड मोंढा नाका सिग्नलजवळ | श्री.राजकुमार माणिकचंद अ्ग्रवाल | ९०८०/- | ४०८६ | १.४.२०१८ (नविन नोंद) |
| ४ | CTS१२९९० व १२९९१ जालनारोड मोंढा नाका सिग्नलजवळ | श्री.हनुमानदास अग्रवाल, नंदलाल अ्ग्रवाल, रमेश अग्रवाल | ९०८०/- | ४०८६ | १.४.२०१८ (नविन नोंद) |

याप्रमाणे नामांतर करून विभाजन करण्यात आले आहे. मात्र नामांतर करतांना प्रत्येकी ९०००/- प्रमाणे ३६०००/- वसूल करणे आवश्यक होते. तसे न करता फक्त ९०००/- वसूल केले आहे. म्हणजेच २७०००/- चा कमी भरणा झालेला आहे.

**वॉर्ड - क्र. ९ कार्यालय**

१. कर विभाजन करतांना संचिकेत मंजूरी घेणे आवश्यक असतांना मंजूरी घेतलेली नाही.

२. नामांतर करतांना चालु आर्थिक वर्षाचे P.R.कार्ड लावणे आवश्यक असतांना जुने P.R. कार्ड लावण्यात आले आहे.

**विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून याबाबतचा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१०: जावक रजिस्टर मधील नोंदी बाबत.**

विभागाच्या नामांतर संचिकाची तपासणी दरम्यान जावक बारनिशी मधील नंबर तपासतांना जा.क्र.२७०८ दिनांक ३१.१०.२०१७ ते जा.क्र.२७२७ दिनांक ६.११.२०१७ अशी नोंद घेण्यात आली व त्यानंतर परत जा.क्र.२७०८ दिनांक ६.११.२०१७ पासून सुरूवात करण्यात आली. म्हणजेच विभागाने एकूण एकविस (२१) जावक क्रमांक डबल नोंद घेण्याचे जावक बारनिशीवर दिसून येते.

तरी विभागाने झालेल्या अनियमिततेबाबत तपासणी करून त्याचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त बाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११ : नामांतर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

नामांतर संचिका तपासली असता अर्जदार श्री.दत्तात्रय नामदेवराव भटकर, विशाल अपार्टमेंन्ट शहानूरवाडी (ज्योतीनगर) C.T.S.१६२३२ Flat A-१२ औरंगाबाद यांनी नामांतरसाठी कागदपत्रे सादर केली आहे.

१. Flat A-१२ चा खरेदी/विक्रीचा व्यवहार खालील प्रमाणे झाला आहे.

आर.एस.चौधरी
↓
सौ.मिनाक्षी सुनिल महाजन
↓
श्री.दत्तात्रय नामदेवराव भटकर

Flat चे मालक आर.एस.चौधरी हे असून त्यांनी त्यांच्या मुलीला (सौ.मिनाक्षी सुनिल महाजन) यांना बक्षिसपत्र करून मुलीला दिला आहे. दस्त क्र.४५३८/२००४ दिनांक १६.११.२००४ अन्वये मुलीच्या नावे Flat करून दिला आहे.

तद्नंतर मुलीनी सदरील Flat श्री.दत्तात्रय नामदेवराव भटकर यांना विकला आहे. दस्त क्र.२४९/२०१३ दिनांक १४.१.२०१३ अन्वये यांना विकला आहे. म्हणजेच खरेदी/विक्रीचा व्यवहार करतांना सौ.मिनाक्षी सुनिल महाजन आणि श्री.दत्तात्रय नामदेवराव भटकर यांच्यात होवून त्याप्रमाणे नामांतर आदेश पारित होणे आवश्यक होते. मात्र खरेदी/विक्रीचा व्यवहार श्री.आर.एस.चौधरी व दत्तात्रय नामदेवराव भटकर यांच्या झाल्याचे दर्शविण्यात आले. ही बाब आक्षेपार्ह आहे.

२. सौ.मिनाक्षी सुनिल महाजन यांनी flat खरेदी केल्यानंतर महानगरपालिके मध्ये नामांतर करणे आवश्यक होते. मात्र त्यांनी नामांतर न करता परस्पर विक्री केली आहे.

३. नामांतर करतांना करयोग्य मूल्य २१४७/- वर नामांतर शुल्क ३००० वसूल करणे आवश्यक होते. मात्र १५०० नामांतर शुल्क वसूल केले आहे. १५००/- चा कमी भरणा केला आहे.

**विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून याबाबतचा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२: मालमत्ता कर नामांतर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

अर्जदार रामकृष्ण झावरू पाटील रा.सारा प्राईड, रणजीतनगर Plot क्र. C-१० यांची नामांतर केले बाबतची संचिका तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सारा प्राईड प्लॉट क्र.C-१० या मालमत्तेचा खरेदी/विक्री खालील प्रमाणे झाली आहे.

एस.एस.कन्स्ट्रक्शन
↓
मिलिंद अरविंदराव सेवलीकर
↓
श्री.गोपाल मदन गांगर्डे
↓
रामकृष्ण झावरू पाटील

मात्र नामांतर करतांना गोपाल मदन गांगर्डे यांनी रामकृष्ण झावरू पाटील यांचे नावे नामांतर केले आहे. मिलिंद अरविंदराव सेवलीकर यांचे नावाचे नामांतर न करता नंतरच्या नावाने नामांतर झाल्याचे दिसते. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

१. नामांतर करतांना पाणीपट्टी थकबाकी भरल्याचे दिसून येत नाही.
२. संचिकेत नामांतर केल्याबाबत आदेश नाही.

करीता मुद्या क्र.१,२ व ३ बाबत व रक्कम रू.१५००/- चा भरणा करून लेखापरीक्षण विभागास खुलासा सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त रक्कम रू.१५००/- चा महानगरपालिका फंडात भरणा करून संबधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१३ : नामांतर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

अर्जदार सतिश विजयकुमार रूद्रकंठवार,रामकुँवर प्लसा, संजय हौ.सोसायटी पिरबाजार,दर्गारोड F.No.४ Type A ,उस्मानपुरा औरंगाबाद यांनी मालमत्ता नामांतरसाठी कागदपत्रे सादर केली आहे.

खरेदी खत क्र.४७४४/२०१७ दिनांक १५.११.२०१७ अन्वये शिरीष शेषराव दिक्षीत व निता शिरीष दिक्षीत यांच्याकडून खरेदी केले आहे.

मात्र महानगरपालिकेचे मालमत्ता नोंदी नुसार मंजिरी जयंत अभ्यंकर हे असल्याचे दिसून येते. संचिकेची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

मंजिरी जयंत अभ्यंकर
↓
शिरीष शेषराव दिक्षित
निता शिरीष दिक्षित
↓
सतीश विजयकुमार रूद्रकंठवार

महानगरपालिकेचे मालमत्ता नोंदीनुसार मंजिरी जयंत अभ्यंकर हे असून त्यांनी शिरीष/निता दिक्षित यांना विकला आहे. मात्र त्यांनी महानगरपालिकेत मालमत्ता नामांतर न करता सतिश विजयकुमार रूद्रकंठवार यांना विकला आहे. म्हणजेच नामांतर न करता परस्पर विक्री केली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

२. दस्त क्रमांक २२०५/२००७ दिनांक १९.७.२००७ अन्वये मंजिरी जयंत अभ्यंकर यांनी शिरीष शेषराव दिक्षित, निता शिरीष दिक्षित यांना उक्त दस्त क्रमांकानुसार रजिस्ट्री करून दिल्याबाबत कागदपत्रे असतांनाही संबंधिताने याबाबत प्रथम नामांतराची कार्यवाही करून तद्नंतर पुढील आदेश निर्गमित करणे आवश्यक होते. मात्र तसे झाल्याचे दिसून येत नाही. यामुळे महानगरपालिकेचे १५००/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा महानगरपालिकेचे झालेले तात्पुरते आर्थिक नुकसान रक्कम रू.१५००/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१४ : नामांतर / कर विभाजन करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

मालमत्ता नामांतर/विभाजन करण्यासाठी अर्जदार पुरूषोत्तम मानजी पटेल व इतर मोहन रामजी पटेल व इतर राहणार अजबनगर ५-२६-१/P औरंगाबाद. CTS १३८०२/३, १३८०२/४ यांनी कागदपत्रे सादर केली आहे. मालमत्तेचा वापर निवासी असून करयोग्य मूल्य १३२०८ एवढे आहे. जमिनीचे मूळ मालक देवशी जेठा पटेल, जीवराजभाई करमशी पटेल, मालमत्ता क्र.D००२४२३९ आहे. नामांतर /कर विभाजन संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. जा.क्र.मनपा/वॉर्ड-/नामांतर/१८६/२०१८, दिनांक ३०.१.२०१८ रोजी नामांतर/कर विभाजन आदेश निर्गमित करण्यात आले असून आदेशानुसार खालील प्रमाणे नामांतर/कर विभाजन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | म्यु घ.नं. | घरमालकाचे /हिस्सेदाराचे भोगवटा करणा-याचे नांव | करयोग्य मूल्य | स.मा.कर | कर आकारणी पासून |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५-२६-१/P<br>१३८०२/३<br>१३८०२/४ | श्री.पुरूषोत्तम एम.पटेल,<br>श्री.राजेश के.पटेल<br>श्री.मनोज एस.पटेल | ६६०४/- | १९८१ | १.४.२०१७ |
| २ | ५-२६-१/P<br>१३८०२/३<br>१३८०२/४ | श्री.मोहन आर.पटेल,<br>श्री.वसंत आर पटेल,<br>श्री.ललीत डी.पटेल | ६६०४/- | १९८१ | १.४.२०१७ |

या प्रमाणे नामांतर/कर विभाजन करण्यात आले आहे. मात्र नामांतर करतांना ९०००/- नामांतर फीस वसूल करणे आवश्यक होते. संबंधिताने ४५००/- नामांतर फिस वसूल केली आहे. म्हणजेच ४५००/- चा कमी भरणा केला. ही बाब आक्षेपार्ह आहे.

२. कर विभाजन करतांना संचिकेत मंजूरी घेणे आवश्यक असतांना मंजूरी घेतल्याची दिसून येत नाही.

३. रक्कम रूपये १००/- च्या मुद्रांकावर मालमत्ता विभाजन दाखवलेले आहे.

४. पाणीपट्टी भरणा पावती नाही. अर्ज सादर केलेला नाही.

५. वारसा प्रमाणपत्र, पी.आर.कार्ड, नसतांनाही नामांतर करण्यात आले आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून संबंधितावर प्रशासकीय कार्यवाही करून याचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. करिता उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१५ : मालमत्ता नामांतर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

अर्जदार श्री.भागाराम भानाजी राठोड, तुलसी प्लॉट ओनर्स कॉ.ऑप हौसिंग सोसायटी लि. मोहल्ला एकनाथ नगर C.T.S.number १६३२१/१, बिल्डींग नंबर १२ मधील पहिल्या मजल्यावरील प्लॉट नंबर ९० विक्री क्षेत्र ४०० चौ.फुट (३७.१७ चौ.मी.) असून सौ.कन्या छत्राराम सोळंकी यांच्या कडून खरेदीखत दस्त क्रमांक ८७७३/२०१५ दिनांक ३०.१२.२०१५ खरेदी केले आहे. महानगरपालिकेच्या मालमत्ता रजिस्टरवर कोठांवदे संगिता सुरेश यांचे नावे असल्याचे दिसून येते.

संचिकेची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. खरेदी खत दस्त क्रमांक ८७७३/२०१५ दिनांक ३०.१२.२०१५ भागाराम भानाजी राठोड यांनी सौ.कन्या छत्राराम सोळंकी यांच्याकडून खरेदी करून मालमत्ता नामांतर केली आहे. मात्र कोठांवदे संगिता सुरेश यांचे नावे मालमत्ता असतांना याचे नामांतर न करता परस्पर नामांतर झाल्याचे दिसून येते. ही बाब गंभीर स्वरूपाची असून मालमत्ता नामांतर करतांना अनियमितता झाल्याचे दिसते.

२. मालमत्ता नामांतर करतांना नामांतर आदेश /३०९१/२०१७ दिनांक २९.१२.२०१७ अन्वये आदेश पारीत करतांना श्रीमती कोठांवदे संगिता सुरेश यांच्या कडून खरेदी करून नामांतर केल्याचे दर्शविले आहे. इतर कागदपत्रावर, खरेदी खतावर सौ.कन्या छत्राराम सोळंकी या नावाने मंजूरी घेतल्याचे दिसून येते.

३. बे-बाकी साठी संचिकेत पाणीपट्टी, पावती क्र.F१०४/३५६६, दिनांक १८.४.२०१७ खटोड नरेंद्रचंद माणिकचंद यांचे नावे रक्कम रू.३७००/- (१६-१७ PP) ची नोंद आहे. म्हणजेच दुस-या नळधारकाची पावती असल्याचे दिसून येते.

४. विभागाने खातरजमा करून नियमाने मालमत्ता नामांतर करावे व होणारे आर्थिक नुकसान रक्कम रू.१५००/- चा भरणा करून लेखापरीक्षण विभागास लेखी खुलासा सादर करावा.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा महानगरपालिकेचे झालेले तात्पुरते आर्थिक नुकसान रक्कम रू.१५००/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१६ : N.P.O. करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड कार्यालयातील नामांतर संचिका तपासतांना N.P.O. धारक श्री.अविनाश मधुकर वाहुळ ५-४-६८, नागसेन नगर, उस्मानपुरा औरंगाबाद यांनी मुळ मालमत्ताधारक श्री.जयाजी बळीराम खरात यांच्याकडून घेतली असून N.P.O. करण्यासाठी महानगरपालिका वॉर्ड कार्यालयात कागदपत्रे सादर केली आहे.

संचिका पाहतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मुळ मालमत्ताधारक श्री.जयाजी बळीराम खरात यांच्याकडून खरेदी खत क्रमांक ०४AA३४०००६ दिनांक १७.४.२००६ अन्वये श्री.मधुकर पिता नाना वाहुळे यांनी खरेदी केले आहे. मात्र N.P.O. करून घेतलेले नाही. त्यामुळे अद्यापपर्यंत मालमत्ता मुळ मालकाच्या नावेच आहे.

२. मधुकर पिता नाना वाहुळे यांचा दिनांक २१.५.२००८ रोजी मृत्यू झाला असून त्यांचा मुलगा अविनाश मधुकर वाहुळे यांनी N.P.O.साठी कागदपत्रे सादर केली आहे. ना हरकत/संमतीपत्र R>P६१८८८५९ दिनांक ४.८.२०१७ अन्वये लिहून देणार श्रीमती चंद्रकला मधुकर वाहुळ २) रवि मधुकर वाहुळ ३) किरण मधुकर वाहुळ यांनी लिहून घेणार - अविनाश मधुकर वाहुळ यांना मालमत्ता N.P.O. करण्यासाठी संमती दिली आहे. मात्र मालमत्ता N.P.O. करतांना मूळमालक - जयाती पिता बळीराम खरात यांच्या कडून मधुकर पिता नाना वाहुळ यांचे नावे N.P.O. घेणे आवश्यक होते. तसे न करता वारसाच्या संमतीने मुलगा अविनाश मधुकर वाहुळ यांचे नावे करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह असून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसार करणारी आहे.

तरी याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१७ : मालमत्ता नामांतर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड कार्यालयातील नामांतर संचिका तपासल्या असता अर्जदार श्री.हरजितसिंग रणजितसिंह छाबडा राहणार सिंधी कॉलनी Plot No.५५ सिटी सर्व्हे नं.१५०३७, औरंगाबाद यांनी नामांतरासाठी कागदपत्रे सादर केली असून मालमत्तेचे मूळ मालक रणजितसिंह दिवाणसिंह छाबडा हे असून मालमत्ता क्रमांक D००४४४४३ मालमत्तेचा वापर निवासी आहे.

नामांतर संचिका पाहतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मालमत्ताधारककाकडे एकूण देय रक्कम रू.६७६०३/- (२०१७-१८) असतांना रक्कम रूपये ५५,१७०/- एवढेच रकमेपेक्षा भरणा online केलेला आहे.

२. करयोग्य मूल्य निवासी १०९०८/- असतांना नामांतर शुल्क ४५००/- एवढे घेणे आवश्यक होते. मात्र संबंधिताने १५००/- नामांतर शुल्क वसूल केले आहे. म्हणजेच ३०००/- रू.कमी भरणा केला आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**कमी रक्कम रू.३०००/- चा महानगरपालिका फंडात भरणा करून संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१८ : N.P.O.करतांना झालेल्या अनियमितेबाबत.**

वॉर्ड कार्यालय क्र.९ (ड) चे लेखापरीक्षण कार्यरत असून वॉर्ड कार्यालयातील मालमत्ता N.P.O. संचिका तपासले असता अर्जदार शशिकांत राजेंद्र मगर, सिध्दातं राजेंद्र मगर, घर क्र.४-१८-३४/५५, उत्तम नगर औरंगाबाद यांनी N.P.O साठी कागदपत्रे सादर केली असून मालमत्तेचे मूळ मालक श्रीमती शशिकलाबाई काशिनाथ मगर हे असून मालमत्तेचा क्रमांक D००३९७०३ हा आहे.

N.P.O.संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मालमत्ताधारक शशिकलाबाई काशिनाथ मगर हे असून संचिकेील पावती क्रमांक As/२२८९७,दिनांक १.६.२०१७ नुसार मालमत्तेचा वापर व्यवसायिक दर्शविण्यात आला आहे. मात्र सदरील मालमत्ता मिश्र स्वरूपाची आहे.

२. मालमत्ता नामांतर करतांना नामांतर शुल्क निवासी + व्यावसायिक ४५००+९०००=१३५००/- एवढे वसूल करणे आवश्यक होते. मात्र संबंधिताने निवासी दराने नामांतर शुल्क १५००/- वसूल केले आहे. म्हणजेच १२०००/- चा कमी भरणा केला आहे.

३. कर आकारणी विभागाने कर आकारणी चूकीची केली आहे. कर आकारणी सुधारित करून त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

मुद्या क्र.१,२,३ बाबत विभागाने खात्री करून लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१९ : N.P.O.करतांना झालेल्या अनियमितेबाबत.**

वॉर्ड कार्यालयातील नामांतर संचिका तपासले असता अर्जदार सौ.निता संतोष ललवाणी, सौ.चंद्रकला किशोर ललवाणी, विष्णुनगर घर क्र.४-१८-३४/४६७, यांनी मालमत्ता खरेदी केली असून N.P.O. करण्यासाठी वॉर्ड कार्यालयात कागदपत्रे सादर केली आहे. मालमत्तेचे मूळ मालक श्रीमती चंद्रकला चंद्रशेखर ओकळी हे असून D००३९२६५ हा त्यांचा मालमत्ता क्रमांक आहे.

संचिका पाहतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मालमत्ता ही मिश्र स्वरूपाची असून त्याला फक्त निवासी दराने मालमत्ता कर आकारणी करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह असून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करण्यात आली आहे.

२. N.P.O. करतांना पाणीपट्टी कर भरणा आर्थिक वर्ष २०१७-२०१८ पर्यंत करणे आवश्यक होते. मात्र २४-११-२०१६ पर्यंत लमसम भरणा केलेला आहे.

३. N.P.O. शुल्क वसूल करतांना निवासी + व्यवसायिक प्रमाणे १५००+३०००=४५०० वसूल करणे आवश्यक होते. मात्र रक्कम रू.१५००/- वसूल करण्यात आले. म्हणजेच ३०००/- चा कमी भरणा केला आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**महानगरपालिकेचे झालेले तात्पुरते आर्थिक नुकसान रक्कम रू.३०००/- महानगरपालिका फंडात भरणा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२० : N.P.O.करतांना झालेल्या अनियमितेबाबत.**

वॉर्ड कार्यालयातील नामांतर N.P.O.संचिका तपासल्या असता अर्जदार विश्वजित पंडीत पाटील यांनी N.P.O. करणेसाठी कार्यालयात कागदपत्रे दाखल केली आहे. मालमत्तेचा वापर निवासी स्वरूपाचा असून मालमत्ता क्रमांक F०००६५१९ असून मूळ मालमत्ताधारक श्री.शामसुंदर सिताराम सोनी यांचे नाव सादरीकरणात दर्शविले आहे.

संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. महानगरपालिकेच्या मालमत्ता रजिस्टरवर मूळ मालक क्षिरसागर असल्याचे दिसून येते. मात्र N.P.O. आदेश पारीत करतांना जा.क्र.मनपा/वॉर्ड-९/नामांतर/१४७/२०१८, दिनांक २२.१.२०१८ रोजी मूळमालक तुपे कौतिकराव गणपतराव यांचे नाव दर्शवून N.P.O. आदेश देण्यात आले आहे. ही बाब आक्षेपार्ह असून आदेश चूकीचे देण्यात आले आहे.

२. मालमत्तेचे खरेदी /विक्री खालील प्रमाणे झालेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ | लिहून देणार | कौतिक गणपतराव तुपे | ६.२.२००७ |
| | लिहून घेणार | शाम सुंदर सिताराम सोनी | |
| ब | लिहून देणार | शामसुंदर सिताराम सोनी | ५.४.२०१३ |
| | लिहून घेणार | विश्वजित पंडीत पाटील | |

मात्र नामांतर करतांना मूळ मालक तुपे कौतिकराव गणपतराव N.P.O. श्री.विश्वजित पंडील पाटील असे दर्शवून N.P.O. आदेश देण्यात आले आहे.

प्रत्यक्षात मूळ मालक क्षीरसागर हे असून त्यांना मूळ मालक दाखवून N.P.O. विश्वजित पंडील पाटील असे आदेश पारीत करणे आवश्यक होते. म्हणजेच संबंधिताने चुकीचे N.P.O. आदेश निर्गमित केले आहे.

३. खरेदी / विक्री करतांना मुद्या क्रमांक २ मधील शामसुंदर सिताराम सोनी यांच्या नावाने N.P.O. झाल्याचे दिसून येत नाही. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. विभागाने मालमत्तेचे N.P.O. करतांना संचिकेतील खरेदी खतानुसार मालमत्तेचे N.P.O. न करता शेवटचा मालमत्ताधारक विश्वजीत पंडीत पाटील यांचे नावे N.P.O. करण्यात आले आहे. ही बाब आक्षेपार्ह असून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून झालेले आर्थिक नुकसानीबाबत जबाबदारी निश्चित करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - क्र. ९ कार्यालय**

**परिच्छेद क्र.२१ : मालमत्तेचे N.P.O.करतांना झालेल्या अनियमितेबाबत.**

वॉर्ड कार्यालयातील N.P.O. संचिकेची तपासणी करतांना अर्जदार राजेंद्र रामेश्वरजी करवा, घर क्रमांक ४-१८-३४ नाथनगर मालमत्ता क्रमांक D००४१४७२ खरेदी केली असून N.P.O. करण्यासाठी कागदपत्रे सादर केली आहे. मालमत्तेचे मूळ मालक महानगरपालिकेचे नोंदीनुसार घाटगे गोपीनाथ अंबादासराव हे आहे.

संचिकेची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मूळ मालक घाटगे गोपीनाथ अंबादासराव हे असून त्यांची पत्नी श्रीमती मथुराबाई भ्र.गोपीनाथराव घाटगे यांनी डॉ.सौ.ज्योती भ्र.सुधीर देशमुख यांना दिनांक १६.१०.२००३ रोजी बक्षीस पत्र करून मालमत्ता त्यांना दिली आहे. मात्र वारसाबाबत कागदपत्रे नाही.

२. मालमत्तेची खरेदी/विक्री खालील प्रमाणे झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | लिहून देणार | श्रीमती मथुराबाई भ्र.गोपीनाथराव घाटगे | बक्षिसपत्र |
| | लिहून घेणार | डॉ.सौ.ज्योती भ्र सुधीर देशमुख | |
| २ | लिहून देणार | डॉ.सौ.ज्योती भ्र सुधीर देशमुख | |
| | लिहून घेणार | संतोष विठ्ठल पाटील | |
| ३ | लिहून देणार | संतोष पिता विठ्ठल पाटील | |
| | लिहून घेणार | राजेंद्र पिता रामेश्वरजी करवा | |

मात्र यापैकी एकानेही मालमत्तेचे N.P.O. केलेले नाही. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. N.P.O. आदेश जा.क्र.मनपा/वॉर्ड-९/नामांतर/२७१०/२०१७,दिनांक १-११-२०१७ अन्वये मूळ मालक संतोष विठ्ठल पाटील N.P.O. राजेंद्र रामेश्वरजी करवा हे नावे देण्यात आले आहे. हे आदेश चूकीचे असून महानगरपालिकेच्या मालमत्ता रजिस्टर नुसार घाटगे गोपीनाथ अंबादासराव हे मूळ मालक असल्याचे दिसून येते.

४. मालमत्तेचे N.P.O. करतांना संचिकेतील खरेदी खतानुसार N.P.O. करणे आवश्यक होते. परंतू तसे न करता राजेंद्र पिता रामेश्वरजी करवा या नावाने N.P.O. आदेश निर्गमित करण्यात आले आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून संबंधिताकडून आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाही करून लेखी खुलासा सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - क्र. ९ कार्यालय**

**परिच्छेद क्र.२२ : मालमत्ता N.P.O.करतांना झालेल्या अनियमितेबाबत.**

वॉर्ड कार्यालयातील (N.P.O.) संचिका पाहतांना अर्जदार कमलेश कचरूसेठ मुट्टेकर यांनी मालमत्ता N.P.O. करण्यासाठी कागदपत्रे सादर केली असून मालमत्ता घर क्र. ४-१८-३४/१०१ मालमत्ता क्रमांक D००३९७२७ खरेदी केली. मालमत्ता वापर निवासी स्वरूपाचा आहे. मालमत्तेचे मूळ मालक मुंगरकर शारदाबाई रामभाऊ हे आहेत. संचिकेची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मालमत्तेची खरेदी खत (मुद्रांकावर) झाले असून खालील मालमत्ताधारकांनी खरेदी /विक्रीचा व्यवहार केला आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | लिहून देणार | शारदाबाई भ्र राम मुंगरकर |
| | लिहून घेणार | प्रकाश रामदयाल बाहेती |
| २ | लिहून देणार | जयप्रकाश रामदयाल बाहेती |
| | लिहून घेणार | कमलकुमार झुंबरलाल पहाडे |
| ३ | लिहून देणार | किर्तीकुमार झुंबरलाल पहाडे |
| | लिहून घेणार | सौ.कस्तुराबाई भ्र सजन चोरभे |
| ४ | लिहून देणार | सौ.कस्तुराबाई भ्र सजन चोरभे |
| | लिहून घेणार | लक्ष्मीबाई अशोक मुट्टेकर |
| ५ | लिहून देणार | लक्ष्मीबाई अशोक मुट्टेकर |
| | लिहून घेणार | कमलेश कचरूसेठ मुट्टेकर |

मात्र मूळ मालक (महानगरपालिकेच्या) मालमत्ता रजिस्टर नुसार मुंगरकर शारदाबाई रामभाऊ हे असून या नंतर मालमत्ता धारकाने N.P.O. म्हणून नोंद केलेली नाही. N.P.O. म्हणून कमलेश कचरूसेठ मुट्टेकर यांनी जा.क्र.मनपा/वॉर्ड -९/नामांतर /२४६९/२०१७, दिनांक ११.९.२०१७ अन्वये N.P.O. नोंद केलेली आहे. म्हणजेच वरील एकाही मालमत्ताधारकाने N.P.O. म्हणून नोंद केले नसतांनाही शेवटच्या मालमत्ताधारकाचे नाव लावण्यात आले आहे ही बाब आक्षेपार्ह असून नियमबाह्य असल्याचे स्पष्ट होते.

**विभागने प्रत्यक्ष खात्री करून नियमानुसार N.P.O. म्हणून नोंद घेवून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वॉर्ड - क्र. ९ कार्यालय**

**परिच्छेद क्र.२३ : मालमत्ता नामांतर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड कार्यालयातील नामांतर संचिका तपासल्या असता अर्जदार रमेश केशवराव मुळे व इतर दुकान क्र.१ व २ यांनी वेदांत नगर स्टेशन रोड (लाभ पर्ल)औरंगाबाद व्यावसायीक मालमत्ता दुकान क्र.१ व २ नामांतर करण्यासाठी कागदपत्रे सादर केली असून मालमत्तेचे मूळ मालक अ.वहाब हे असून मालमत्ता क्रमांक D००३८७३४ कर योग्य मूल्य १९९३१ आहे.

नामांतर संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मालमत्तेचे मूळ मालक अब्दुल वहाब हे असून त्याच्याकडून सौ.अनिता पवनकुमार अग्रवाल यांनी खरेदी केले. त्यानंतर यांच्याकडून रमेश केशवराव मुळे यांनी खरेदी करून नामांतरासाठी अर्ज सादर केला आहे. मात्र सौ.अनिता पवनकुमार अग्रवाल यांनी नामांतर न करता विक्री केली आहे.

२. संचिकेतील मालमत्ता खरेदी / विक्रीचे कागदपत्रे पाहिली असता दुकान क्र.१ व २ असे आहे. मात्र नामांतर करतांना दुकान क्र.२ चे नामांतर झालेले दिसून येते.

३. जा.क्र.मनपा/वॉर्ड-९/नामांतर १४२/२०१८/ दिनांक २०.१.२०१८ अन्वये श्री.रमेश केशवराव मुळे व इतर यांना आदेश पारीत करण्यात आले असून त्यावर सुध्दा शॉप नं.२ CTS No.१८३४९/१/४ मोहल्ला रेल्वेस्टेशन रोड औरंगाबाद याच दुकानाचे नामांतर केले आहे.

शॉप नं.१ व २ चे नामांतर असतांना फक्त एकाच दुकानाचे नामांतर करण्यात आले आहे. त्यामुळे चूकीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून लेखी खुलासा लेखापरीक्षण पथकास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२४ : आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मधील मालमत्ता कर, पाणीपट्टी कर धनादेश न वटले बाबत.**

वॉर्ड कार्यालयात मालमत्ता कर व पाणीपट्टी करापोटी धनादेश घेण्यात आले आहे. त्यापैकी रक्कम रू**. ४,११,९२२/-चे** धनादेश वटलेले नाही. न वटलेल्या धनादेशाची यादी खालील प्रमाणे.

धनादेश न वटल्यामुळे विभागाने इन्स्टुमेन्ट ॲक्ट १९५८ कलम १३८ अन्वये संबंधितावर कोणती कार्यवाही करण्यात आली. याबाबत प्रत्यक्ष तपासणी करून लेखापरीक्षण विभागास लेखी खुलासा सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

# न वटलेल्या धनादेशाची यादी.

| अ.क्र. | नांव | मालमत्ता क्रमांक | धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम रू. | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विजय शंकरराव बागुल/ दादाराव सांडू काकडे | D००४०६२२ | १४२३१९ | ३०.०३.२०१७ | २९३३७/- | शिवशंकर कॉलनी, ४-९-२८६ |
| २ | निरा अशोक जैन/ बालशेखर गणपत | D००२९१३३ | ८८६०८३ | ३०.०३.२०१७ | ४५०८५/- | वेदांत नगर |
| ३ | कार्यकारी अभियंता P.W.D. | Water tax | ९५७६७८ | २७.०३.२०१७ | २३५५५३/- | पद्मपुरा |
| ४ | सतिश दादाराव बनकर | Water tax | ३३५७५३ | ३०.०५.२०१७ | २०००/- | रमानगर/पन्नालालनगर |
| ५ | जागृती हॉटेल | NA Tax | ०००३४० | १८.०७.२०१७ | ३७९७/- | पद्मपुरा,बन्सीलालनगर |
| ६ | बाबासाहेब डाक | Water tax | १५४४१५ | ०१.०८.२०१७ | ८३४०/- | बालाजी नगर |
| ७ | बालासाहेब नामदेवराव पाटील बिल्डर्स | NA Tax | ७६६४७ | २२.११.२०१७ | १८४५/- | R.H.No.२५/१/२३१ ज्योतीनगर |
| ८ | सुरेश ओमकार गवई | D००४११८४ | ००००१८ | १९.०१.२०१८ | ९१८९/- | P.No.२७ मित्रनगर |
| ९ | बालासाहेब पाटील | D००३६९६३ | ०७६६४९ | २२.११.२०१७ | १२६४४/- | P.No.१८२ ज्योतीनगर |
| १० | बालासाहेब पाटील | Water tax | ०७६६४८ | २२.११.२०१७ | ६४४५/- | P.No.१८२ ज्योतीनगर |
| ११ | साहेबराव महादू जोंधळे | D००३६७५६ | ३०७५६५ | २८.०२.२०१८ | १००००/- | R.H.No.६५,द्वारकापुरी एकनाथनगर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | सौ.राधा कचरू घोडके | D००४४६२९ | ०१६४२५ | ०२.०५.२०१८ | ११८५०/- | P.No.१२, shop No.०१, दत्तात्रय आर्केड एस.बी.एच.कॉलनी |
| १३ | नारायण सोनवणे | १०००२२९५ | ३९७०५९ | ३१.०५.२०१८ | ३५८३७/- | P.No.१४,प्रताप नगर |
| | | | | **एकूण** | **४,११,९२२/-** | |

**विभागाने न वटलेल्या धनादेशाबाबत संबंधिताकडे पाठपुरावा करून थकीत रक्कम महानगरपालिका फंडात रू.४,११,९२२/- भरणा करावी. महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२५ : मालमत्ता नामांतर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड कार्यालयामधील निशांत नंदलाल मंत्री, शॉप क्र.९ सेंटर पॉईन्ट कॉम्प्लेक्स, उस्मानपुरा मालमत्ता क्र.D००१५१२८ करयोग्य मूल्य ६७५० मालमत्तेचा वापर व्यावसायिक असून यांनी नामांतरसाठी कागदपत्रे दाखल केली आहे. मालमत्तेचे मूळ मालक विश्राम प्रकाश, शिवाजी शांतीलाल पि.करसनभाई पटेल हे आहे. मालमत्ता नामांतर संचिका तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मूळ मालक विश्राम प्रकाश, शिवाजी, शांतीलाल पि.करसनभाई पटेल यांनी दस्त क्रमांक २७५२/२०१४, दिनांक ३०.६.२०१४ अन्वये सौ.सरला जगदिश दरख यांना विकल्याचे दिसून येते. मात्र मालमत्ता नामांतरासाठी निशांत नंदलाल मंत्री यांनी कागदपत्रे दाखल केल्याचे दिसते.

२. निशांत नंदलाल मंत्री यांनी शॉप नंबर ०९ खरेदी केल्याबाबत दस्त (रजिस्ट्रीची कॉपी) संचिकेत नाही. संचिकेत सौ.सरला जगदिश दरख यांचे दस्त (रजिस्ट्रीची कॉपी) दिसून येते.

३. नामांतर करतांना आर्थिक वर्ष २०१७-२०१८ चा मालमत्ता कर भरून नामांतर करणे आवश्यक होते. मात्र तसे झाल्याचे दिसत नाही.

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त मुद्या क्र. १ ते ३ बाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२६ : मालमत्ता नामांतर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड कार्यालयातील मालमत्ता नामांतर संचिका तपासल्या असता अर्जदार गोकुळ अमरचंदजी अग्रवाल यांनी मान सरोवर आर्केड F-२ उस्मानपुरा मालमत्ता क्रमांक D००१२३९० करयोग्य मूल्य २६१४ मालमत्तेचा वापर व्यावसायीक आहे. महानगरपालिका मालमत्ता पावतीनुसार हरीश प्रकाश छावगडे असल्याचे दिसते.

मालमत्ता संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| | | |
|---|---|---|
| १ | लिहून देणार | आर.बी.नागपाल तर्फे पार्टनर रमेश बोधराज नागपाल. |
| | लिहून घेणार | अग्रवाल गोकुळ अमरचंद |

याप्रमाणे दस्त क्रमांक ४५८/२००२ दिनांक १५.३.२००२ रोजी नोंद झालेली आहे. सिटी सर्व्हे नंबर १४४८३ वर नविन मालमत्ताधारकांचे नाव आले आहे. मात्र मूळ मालकाचे नांव दिसून आलेले नाही.

२. मूळ मालक हरीश प्रकाश छावगडे यांचे P.R.कार्ड, रजिस्ट्री संचिकेत दिसत नाही. संबंधिताने रमेश बोधराज नागपाल यांचेकडून मालमत्ता घेतल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात मूळ मालक यांच्या कडून मालमत्ता खरेदी/ विक्रीचा व्यवहार होणे आवश्यक होते.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२७ : मालमत्ता (N.P.O.) करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड कार्यालयातील नामांतर (N.P.O.) संचिका पाहिले असता अर्जदार मयुर सुरेश नवगिरे, बालाजी नगर, ४-१८-३४/p D००३४७४६ मालमत्तेचा वापर निवासी असून करयोग्य मूल्य ३०९० एवढे आहे.

मालमत्तेचा मूळ मालक सोतीराम दसुराम विश्वकर्मा हे असल्याचे महानगरपालिकेच्या मालमत्ता कर भरणा पावती वरून दिसते.

संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१ लिहून देणार रामराव रायभान बनकर
लिहून घेणार मयुर सुरेश नवगिरे

याप्रमाणे खरेदी / विक्रीचा व्यवहार झाला असून जा.क्र.मनपा/वॉर्ड-९/नामांतर/३०९४/२०१७, दिनांक ३०.१२.२०१७ अन्वये N.P.O.म्हणून मूळ मालक रामराव रायभान बनकर N.P.O. श्री.मयुर सुरेश नवगिरे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. मात्र निर्गमित केलेले आदेश चूकीचे आहे.

मालमत्तेचे मूळमालक सोतीराम दसुराम विश्वकर्मा असतांना त्यांचे नांव न दर्शविता दुस-याचे नांव मूळ मालक म्हणून दर्शविले आहे. ही बाब गंभीर स्वरूपाची असून आक्षेपार्ह आहे.

याबाबत विभागाने खात्री करून लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा. असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.२८ : आर्थिक वर्ष २०१७-२०१८ च्या नामांतर संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्याबाबत.

वॉर्ड कार्यालयातील जावक बारनिशी नुसार तपासणी केली असता खालील क्रमांकाच्या संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेल्या नाही.

९३६, ९३७, ९५३, ९५४, ९५५,९९८,११०७,१२२८,१५४४,१५६५,१६०२,१६२३,१६२५,१७१५ ,१७४१,१७४२, १७४४,१८०४,१८०५,१८०६,१८३६,१८७४,१८७५,१९५८,१९६०,१९६१,१९७७, १९७८ २०१२, २०१३,२०९८,२१२३,२१३५,२१४९,२२०३,२२०२,२२०९,२२१९,२२२८,२२३३, २२५९ , २२७० २२९७,२३३७,२३६४,२३८०,२३९२,२४३७,२४४४,२४६२,२४६३,२४६४,९४८१,२४८२,२४९०,२५००, २५८३,२५८४,२७१९,२७२०,२७२८,२७५२,२७५३,२७५८,२७५९,२८११,२८३६,२८६९,२८७३, २९४५ , २९४८,२९७०,३०५८,३०११,३०१२,३०१३,०६,४८,१०५,१४२,१८७,३६७ ,४१६ ,४२३ ,४९६ , ५३७,५५०,५८७, ५८८,६१५,६२१,६२२,६२४

**नामांतर संचिका उपलब्ध करून द्यावे असे विभागास सूचित करण्यात आले होते. तथापि अहवाल अंतीम होईपर्यंत अहवाल सादर करण्यात आलेला नाही.**

**उपरोक्त बाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२९ : मालमत्ता नामांतर करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड कार्यालयामधील नामांतर संचिका पाहिल्या असता अर्जदार निशान्त नंदलाल मंत्री, शॉप क्रमांक ९ सेक्टर पॉईन्ट कॉम्प्लेक्स उस्मानपुरा मालमत्ता क्रमांक D००१५१२८ करयोग्य मूल्य ५७५० मालमत्तेचा वापर व्यावसायिक असून यांनी नामांतरासाठी कागदपत्रे दाखल केली आहे. मालमत्तेचे मूळ मालक, विश्राम प्रकाश, शिवाजी शांतीलाल पि.करसनभाई पटेल हे आहे. मालमत्ता नामांतर संचिका तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मूळ मालक विश्राम, प्रकाश शिवाजी शांतीलाल पि.करसनभाई पटेल यांनी दस्त क्रमांक २७५२/२०१४, दिनांक ३०.६.२०१४ अन्वये सौ.सरला जगदिश दरख, यांना विकल्याचे दिसून येते. मात्र मालमत्ता नामांतरासाठी निशान्त नंदलाल मंत्री यांनी कागदपत्रे दाखल केल्याचे दिसते.
२. निशान्त नंदलाल मंत्री यांनी शॉप नंबर ०९ खरेदी केल्याबाबत दसत (रजिस्ट्रीची कॉपी) संचिकेत नाही. संचिकेत सौ.सरला जगदिश दरख यांचे दस्त (रजिस्ट्रीची कॉपी) दिसून येते.
३. नामांतर करतांना आर्थिक वर्ष २०१७-२०१८ चा मालमत्ता कर भरून नामांतर करणे आवश्यक होते. मात्र तसे झाल्याचे दिसत नाही.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३० : वॉर्ड क्र.९ कार्यालया अंतर्गत कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांचे मूळ सेवापट/सेवापुस्तक तपासणीअंती निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत.**

वॉर्ड कार्यालया अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांचे ठेवलेले सेवापुस्तक /सेवापटांचे चाचणी स्वरूपामध्ये तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या आक्षेपित बाबी खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री.राजेश रामचंद्र गावीत - कनिष्ठ लिपीक** यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.
   १. सहाव्या वेतन आयोगाची वेतन निश्चितीची नोंद सेवापुस्तका मध्ये नाही.
   २. जात प्रमाणपत्र वैधताबाबतची नोंद सेवापुस्तकामध्ये नाही.
   ३. कुटुंबाचे नामनिर्देशन तपशिल नाही.
   ४. संगणक प्रशिक्षण MS.CIT. पासची नोंद नाही.
   ५. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.
   ६. कर्मचा-याचे चारित्र्य व पूर्व चारित्र्याचे पोलिस अधिक्षक तपासणी अहवालाची नोंद नाही.

२. **श्री.असदउल्ला खान - स्वच्छता निरिक्षक, वॉर्ड क्र.९ -**

१. आदेश क्र.मनपा/आस्था-१/२५०७/९८, दिनांक ३ जुलै १९९८
अन्वये दिनांक ९ जून १९९४ पासून १४००-४०-१६००, ५०-२३ द.शे.६०-२६०० ही निवड श्रेणी प्रदान आहे. सदरची वेतन निश्चिती वेतन नियम -११ (४) प्रमाणे सुधारित करण्यात यावी.
२. कुटुंबाचे नामनिर्देशन तपशिल नाही.
३. संगणक प्रशिक्षण MS.CIT. पासची नोंद नाही.
४. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.
५. कर्मचा-याचे चारित्र्य व पूर्व चारित्र्याचे पोलिस अधिक्षक तपासणी अहवालाची नोंद नाही.

**३. श्री.अन्वर खान करीम खान पठाण - कनिष्ठ लिपीक**

१. शासन क्र.नगरविकास विभाग क्र.मागास-२२२००२/५१०,
प्र.क्र.५३/२००२/नवि-६, दिनांक २७.९.२००२, रूग्णता सेवानिवृत्त) अनुकंपा नियुक्त दि.१९.१.२००४ कनिष्ठ लिपीक आहे. (शासन निर्णय दि.२६.१०.१९९४, दि.२३.८.१९९६)
२. सहावा वेतन आयोग दिनांक १.७.२००८ रोजीचे वार्षिक वेतन वाढ रू.२६०/- प्रदान आहे जी की बरोबर नाही. त्या ऐवजी रू.२५०/- अशी येते. दुरूस्ती अनुषंगिक कार्यवाही करावी.
३. कर्मचा-याचे चारित्र्य व पूर्व चारित्र्याचे पोलिस अधिक्षक तपासणी अहवालाची नोंद नाही.
४. आदेश क्र.मनपा/वॉर्ड क/५९३/२०१४, दिनांक ७.६.२०१४ अन्वये परावर्तीत वैद्यकीय कारणास्तव रजा (२०) दिवस- रजा खाती नोंदविलेल्या नाही- नोंद घ्यावी.

**४. श्रीमती वर्षा वसंत महिरे - सफाई मजूर, वॉर्ड क्र.९**

१. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड-अ/१८८४/२०१५, दिनांक ३.६.२०१५, आदेशाची नोंद सेवापटामध्ये नाही. आदेश क्र.१६४०/२०१६, दिनांक २५.५.२०१६, आदेश नोंद नाही. आदेश क्र.मनपा/वॉर्ड-४/२०१६/४२८, दिनांक २१.९.२०१६ नोंद नाही.
२. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड-४/३८४/२०१७, दिनांक २०.२.२०१७ (१८०) दिवस प्रसूती रजा - रजा खाती नोंद नाही.
३. जात वैधता प्रमाणपत्र नाही.
४. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.
५. कर्मचा-याचे चारित्र्य व पूर्व चारित्र्याचे पोलिस अधिक्षक तपासणी अहवालाची नोंद नाही.

**५. श्री.राजू सिताराम राठोड - शिपाई वॉर्ड क्र.९**

१. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड-ड/११४३/२०१४, दिनांक ७.५.२०१४ ची नोंद नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. कर्मचा-याचे चारित्र्य व पूर्व चारित्र्याचे पोलिस अधिक्षक तपासणी अहवालाची नोंद नाही.

**६. श्री.विजय मोहन मिसाळ - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद नाही.
२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.
३. आदेश क्र.मनपा/आस्था-२/२००८/२२२६,दिनांक १४.१०.२००८ अन्वये दिनांक १९.६.२००८ पासून आश्वासित प्रगती योजना लागू २६१०-४००० लागू

**७. श्रीमती शोभाबाई रमेश साळवे -**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद नाही.
२. संबंधित दि.१.७.२०१३ रोजीचे एकूण वेतन रू.६१८०/-असे असतांना सेवापटामध्ये रू.६१५०/- अशी चूकीची नोंद दिसून येते.
३. आदेश क्र.मनपा/आस्था-२/२०१७/८८१, दिनांक १३.१०.२०१७ व आदेश क्र.मनपा/प्रभाग क्र.९/४८३/२०१८, दिनांक ७.३.२०१८ ची नोंद सेवापटामध्ये नाही.
४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.
५. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

**८. श्री.शशिकांत अशोक दोंदे - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद नाही.

२. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

३. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

**९. श्री.विनोद निवृत्ती लोखंडे - सफाई मजूर ,वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद नाही.

२. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

३. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

४. प्रथम नियुक्ती दि.८.१२.२००६ अशी आहे. दि.८.१२.२००६ चे वेतन ४४४०-१३०० पुढील वेतनवाढ दिनांक १.७.२००७ रोजी देय ठरते. तथापि दि.७.१२.२००७ रोजी प्रदान केल्याची नोंद आहे. जी बरोबर नाही.

५. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

**१०. श्री.भाऊसाहेब सयाजी डिडोरे - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. दिनांक ९.६.१९९४ पासून सुधारित वेतन निश्चिती मध्ये अतिप्रदान झालेले वेतन वसूलीची नोंद सेवापटामध्ये लालशाईने घेतलेली नाही. ती घेण्यात यावी.

**११. श्री.सतिश अशोक पगारे - सफाई मजूर ,वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

**१२. श्री.मुकेश दिपचंद लाहोट - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

**१३. श्री.बंडू कचरू हिवाळे - सफाई मजूर, वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

**१४. श्रीमती शोभाबाई सुभाष देवतकर - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

**१५. श्री.सुनिल तुकाराम जाधव - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

५. दिनांक १.७.२०१० रोजी पासून सुधारित वेतन निश्चिती दरम्यान अतिप्रदान वेतन वसूलीची नोंद लाल शाईने सेवापटामध्ये नाही.

**१६. श्रीमती प्रयागबाई अशोक बनकर - सफाई मजूर, वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

**१७. श्री.सुरेश भिकाजी दाभाडे - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

५. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-२/२०१७/८६१, दि.९.१०.२०१७ अन्वये आदेश क्र.मनपा/प्रभागक्र.९/९८१/२०१८,दिनांक २७.४.२०१८ ची नोदं सेवापटामध्ये घेतलेली नाही.

**१८. श्री.दानेल काशिनाथ कुचेकर - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

५. दिनांक १.७.२००७ रोजीची वार्षिक वेतनवाढ रू.१९०/- इतकी येत असतांना विभागाने रू.२००/- अशी परिगणीत केलेली असल्याने रू.१०/- जास्तीचे प्रदान केलेले आहे. दुरूस्तीसह वसूल करण्यात यावी.

**१९. श्री.मुन्ना जगन्नाथ कांबळे - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

**२०. श्री.रविंद्र दशरथ अदमाने - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

**२१. श्री.विनोद भानुदास साळवे - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

५. दिनांक १.७.२०११ रोजी पासून वेतन बॅन्डच्या कमाल वेतनावर वेतन घेत असल्याने प्रकरणी शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात यावी. अतिप्रदान वेतन वसूल करण्यात यावे.

**२२. श्री.संतोष तेजराव मगरे - मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

५. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-२/३१६/२०१५, दिनांक १९.३.२०१५ व आदेश क्र.मनपा/आस्था-२/२०१५/९६७, दिनांक ३.७.२०१५ ची नोंद सेवापटामध्ये घेण्यात आलेली नाही.

**२३. श्री. सुंदर मोहन खरात - सफाई मजूर वॉर्ड क्र.९**

१. वैद्यकीय तपासणी / पोलिस चारित्र्य पडताळणी नोंद सेवापटामध्ये नाही.

२. कर्मचा-याचे स्वग्राम घोषित बाबत नोंद नाही.

३. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. संबंधिताच्या रजा खाती विविध उपभोगलेल्या रजा व शिल्लक रजा नोंदी नाही.

५. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-२/२०१४/१००३, दिनांक २६.४.२०१४ नोदं सेवापटामध्ये नाही.

६. संबंधित दि.१.७.२०१३ पासून वेतन बँडच्या कमाल वेतनावर वेतन घेत असल्याने शासन निर्णयान्वये कार्यवाही करावी.

उक्त एकूण (२३) सेवापट/सेवा पुस्तकाचे चाचणी स्वरूपामध्ये तपासणी केली त्यामध्ये निदर्शनास आलेल्या आक्षेपित बाबी वरील प्रमाणे नमूद आहेत.

विभागाने उक्त अनियमितता/त्रुट्यांबाबत प्रत्यक्ष तपासून खातरजमा करावी व आपल्या विभागातील इतर सर्व सेवापुस्तक/सेवापट तपासून अद्ययावत करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने वॉर्ड कार्यालयातील कार्यरत कर्मचारी / अधिकारी यांचे सवोपुस्तके व सेवापट अद्ययावत करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.**

**लेखापरीक्षण अहवाल.**
**वॉर्ड - ड ( क्र. ९) अभियंता कार्यालय**
**सन २०१७-२०१८**

**परिच्छेद क्र.०१ : आर्थिक वर्ष २०१७-२०१८ या कालावधीतील अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

वॉर्ड-ड (क्र.९) अभियंता कार्यालयातील अनुषंगिक लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यात दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून द्यावे.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात बी-१ कामाच्या संचिका उपलब्ध करून देणे.(रस्ते जलनि:सारण, पाणीपुरवठा , बांधकाम,इमारत बांधकाम उद्यान बांधकाम,नाला सफाई, स्मशानभूमी विकास, शहर सौंदर्यीकरण इ.व इतर बाबी) | **अप्राप्त.** |
| २ | मोजमाप पुस्तिका | **अप्राप्त.** |
| ३ | स्टॉक बुक रजिस्टर (१०९,११०,१११) | **अप्राप्त.** |
| ४ | डेड स्टॉक रजिस्टर. | **अप्राप्त.** |
| ५ | शासकीय अनुदानातून करण्यात आलेल्या कामांच्या संचिका. | **अप्राप्त.** |
| ६ | वॉर्ड अभियंता कार्यालयात कार्यरत कर्मचा-यांचा जॉबचार्ट. | **अप्राप्त.** |
| ७ | गुंठेवारी संचिका. | **अप्राप्त.** |
| ८ | आवक जावक, पी.टी.वर्क रजिस्टर | **अप्राप्त.** |

विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत उक्त माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत साशंकता निर्माण होते. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

# लेखापरीक्षण अहवाल.
# उद्यान विभाग
# सन २०१६-२०१७

**प्रस्तावना :**

लेखापरीक्षण विभागाच्या लेखापरीक्षण कार्यक्रमानुसार उद्यान विभागाचे सन २०१६-२०१७ आर्थिक वर्षाचे नियमित लेखापरीक्षण करण्याबाबत कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मुलेप/२०, दिनांक ०५.०२.२०१८ नुसार विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानुसार चाचणी स्वरूपाचे लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने महानगरपालिके अंतर्गत उद्यान विभागातील अभिलेखे, उद्यानाचे संगोपन, संरक्षण व विकास इत्यादीबाबतच्या संचिका व इतर अनुषंगिक संचिका तपासण्यात आल्या असून विहित नमुन्यात रजिस्टर क्र.१०९,११० व १११, ताळमेळ रजिस्टर मध्ये साहित्याच्या नोंदी अपूर्ण असल्याकारणाने ताळमेळ घेता आलेला नाही.

लेखापरीक्षणा दरम्यान उद्यान विभागाचे जमा व खर्च बाजूचे लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण **१६** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

## *उद्यान अधिक्षक यांच्या कार्यकाळाबाबत.*

**सन २०१६-२०१७ या कालावधीत श्री.विजय बापुसाहेब पाटील हे उद्यान अधिक्षक म्हणून कार्यरत होते.**

सदरचे लेखापरीक्षण मुख्य लेखापरीक्षक श्रीमती दि.मा.देवतराज यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले. प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांची नांवे पुढील प्रमाणे -

१. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक (पथक प्रमुख)

२. श्रीमती शिल्पा जोशी, कनिष्ठ लिपीक

**परिच्छेद क्र. ०१ : अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

उद्यान विभागातील अनुषंगिक लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यात दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून द्यावे.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | आर्थिक वर्ष २०१६-२०१७ या कालावधीत खरेदी केलेल्या ट्रि-गार्ड व त्यासंबंधीचे लेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत. | अप्राप्त. |
| २ | आर्थिक वर्ष २०१६-२०१७ या कालावधीत सामाजिक वनीकरण विभाग (वन विभाग) यांच्याकडून प्राप्त रोपे व त्यासंबंधीचे लेखे उपलब्ध करून देणे बाबत. | अप्राप्त. |
| ३ | आर्थिक वर्ष २०१६-२०१७ या कालावधीत भांडार विभागातून प्राप्त स्वच्छता साहित्य व इतर अनुषंगिक साहित्याचे रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत. | अप्राप्त. |
| ४ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ११ नुसार वृक्ष अधिक-याला ३ वर्षाच्या कालावधीसाठीचा ६महिन्यातून एकदा पाठविण्यात आलेला अहवाल लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत. | अप्राप्त. |
| ५ | सिध्दार्थ उद्यान येथे मे.डिझनी फन फेअर सिटी , नाशिक यांना खेळणी बसविणे,देखभाल दुरूस्ती करणे संचलन करणे करीता जागा भाड्याने देणे करीता मा.सर्वसाधारण सभेने पारित केलेल्या ठरावाप्रमाणे व करारनाम्यातील अटी/शर्ती प्रमाणे रू.२५०००/-अनामत रकमेची पावती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणे बाबत. | अप्राप्त. |
| ६ | महानगरपालिकेच्या मालकीचे एकूण उद्यान व खाजगी तत्वावर दिलेल्या उद्यानाची माहिती मिळणे बाबत. | अप्राप्त. |
| ७ | आर्थिक वर्ष २०१६-२०१७ या कालावधीत खरेदी केलेल्या खत/औषधीचे विहित नमुन्यातील अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत. | अप्राप्त. |
| ८ | वृक्षतोड रक्कम व वृक्षतोड अनामत रकमेबाबतची मंजूरी दरसुची लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणे बाबत. | अप्राप्त. |
| ९ | सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील विविध कामाच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देणे बाबत. | अपूर्ण स्वरूपात प्राप्त. |
| १० | उद्यान विभागाचे सन २०१६-२०१७ चे डेड स्टॉक रजिस्टर उपलब्ध करून देणे बाबत. | अप्राप्त. |

**विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत उक्त माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत साशंकता निर्माण होते. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

उद्यान विभाग

**परिच्छेद क्र.०२ :सिध्दार्थ उद्यान येथे भाडेतत्वावर कार्यरत डिझनी फन फेअर, नाशिक यांनी माहे एप्रिल २०१४ या महिन्याच्या भाडेपोटी द्यावयाच्या रकमेचा भरणा न केल्याबाबत.**

औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत येणा-या सिध्दार्थ उद्यान येथे नागरिक व लहान मुलांच्या मनोरंजनाकरीता अंदाजे ३५०० चौ.फुट जागा स्वखर्चाने खेळणी बसविणे, देखभाल दुरूस्ती करणे, संचलन करणे इत्यादी कामाकरीता वाटाघाटीअंती रू.१२०००/- प्रती महाभाडे देण्याचे मान्य केल्यानुसार १० वर्षाकरीता दरवर्षी १०% दरवाढीसह मा. सर्वसाधारण सभेमध्ये ठराव संमत झालेला आहे. संबंधितास जा.क्र.मनपा/उद्यान/७७/२०१२, दिनांक २४.४.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

संचिकेतील भाडेपोटी भरण्यात आलेल्या रकमांची एप्रिल २०१२ पासून आजतागायत सविस्तर तपासणी केली असता माहे एप्रिल २०१४ या महिन्याची रक्कम रू.१४,५२०/- इतकी भरणा न करण्यात आलेली आढळून आलेली आहे.

एप्रिल २०१४ चा भरणा संबंधितांनी केला नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते.

करिता, आपण आपल्या स्तरावर प्रत्यक्ष शहानिशा व खात्री करून संबंधिताकडून रकमेचा भरणा करून घेवून अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने संबंधितांकडून रक्कम वसूल करून अनुपालन दर्शविलेले नाही.

**विभागाने संबंधिताकडून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून विलंबाबाबत संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०३ : सिध्दार्थ उद्यान येथे भाडेतत्वावर कार्यरत डिझनी फन फेअर,नाशिक यांच्याकडून वसूल न करण्यात आलेल्या देयकांच्या रकमे बाबत.**

औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत येणा-या सिध्दार्थ उद्यान येथे नागरिक व लहान मुलांच्या मनोरंजनासाठी अंदाजे ३५०० चौ.फुट जागा स्वखर्चाने खेळणी बसविणे, देखभाल दुरूस्ती करणे, संचलन करणे इत्यादी कामाकरीता वाटाघाटी अंती रू.१२०००/- प्रती माह भाडे देण्याचे मान्य केल्यानुसार १० वर्षाकरीता दरवर्षी १०% दरवाढीसह मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठराव संमत झालेला आहे. संबंधितास जा.क्र.मनपा/उद्यान/७७/२०१२, दिनांक २४.४.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

संबंधित ठेकेदारासह केलेल्या करारनाम्यानुसार अट नं.१२ नुसार भाडेपोटी द्यावयाची रक्कम कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून अग्रीम स्वरूपात द्यावी लागेल असे नमूद आहे.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता, असे निदर्शनास आले की, १०% वाढ ही माहे एप्रिल पासून वसूल करणे अपेक्षित आहे. तथापि खालील निर्देशित महिन्यातील रकमा या जुन्याच दराने वसूल केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | महिना | रक्कम रू. | वसूल रक्कम रू. | फरक रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०१५ | १५९७२=०० | १४५२०=०० | १४५२=०० |
| २ | एप्रिल २०१६ | १७५७०=०० | १५९७२=०० | १५९८=०० |
| ३ | एप्रिल २०१७ | १९३२७=०० | १७५७०=०० | १७५७=०० |
| | | | **एकूण रक्कम रू.** | **४८०७=००** |

करिता उक्त बाबी संबंधी विभागाने आपल्या स्तरावर प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे, असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने संबंधितांकडून रक्कम वसूल करून अनुपालन दर्शविलेले नाही.

**विभागाने संबंधिताकडून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून विलंबाबाबत संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०४ : सिध्दार्थ उद्यान येथे डिझनी फनफेअर, नाशिक यांना मनोरंजना करीता खेळणी बसविणे, देखभाल दुरूस्ती व संचलन करणे करीता जागा भाडेतत्वावर देणे बाबत.**

औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत येणा-या सिध्दार्थ उद्यान येथे नागरिक व लहान मुलांच्या मनोरंजना करीता अंदाजे, ३५०० चौ.फुट जागा स्वखर्चाने खेळणी बसविणे, देखभाल दुरूस्ती करणे, संचलन करणे इत्यादी कामाकरीता वाटाघाटी अंती रू.१२०००/- प्रती महाभाडे देण्याचे मान्य केल्यानुसार १० वर्षारीता दरवर्षी १०% दरवाढीसह मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठराव संमत आहे. संबधितास जा.क्र.मनपा/उद्यान /७७ / २०१२,दि.२४.४.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

कार्यादेशात नमूद अट क्र.१२ नुसार भाडेपोटी द्यावयाची रक्कम कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून अग्रीम स्वरूपात द्यावी लागेल. तथापि संचिकेची सविस्तर तपासणी केली असता भाडेपोटी घ्यावयाच्या रकमा या अग्रीम स्वरूपात न भरता ब-याच वेळेस विलंबाने भरणा करण्यात आलेल्या आढळून आल्या आहेत. त्यामुळे कार्यादेशात नमूद अटी व शर्तीचा भंग झालेला आहे. तसेच ठरल्या प्रमाणे रकमा अग्रीम स्वरूपात न भरल्याने महानगरपालिकेचे तात्पुरते नुकसान झाले आहे व अद्यापही होत आहे.

करिता विभागाने उक्त अनियमिततेबाबत सुधारणा करून सविस्तर खुलाशासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**उद्यान विभाग**

**परिच्छेद क्र.०५ : सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात सिडको भागातील गट ब अंतर्गत एन-११ बीसी सेक्टर व १२ वी योजना उद्यान टाऊन सेंटर एल १ व टाऊन सेंटर सी-सेक्टर उद्यान, एन-३ व एन-४ एच सेक्टर उद्यान व एन-२ बी, सी व डी सेक्टर उद्यानाचे १२ महिने देखभाल व संगोपन करणे.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.८,०७,५२२/-**
**खर्च रक्कम रू.८,०२,९९८/-**
**मुदतवाढ ३ महिने खर्च रक्कम रू.२,००,७६९/-**

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात सिडको भागातील गट ब अंतर्गत एन-११ बी, सी सेक्टर व १२ वी योजना उद्यान टाऊन सेंटर एन-१ व टाऊन सेंटर सी-४ सेक्टर उद्यान, एन-३, एन-४ एच सेक्टर उद्यान व एन-२ बी, सी व डी सेक्टर उद्यानाचे १२ महिने देखभाल व संगोपन करणेचे कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ४ निविदा विक्री झाल्या तर निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची ०.५५% Below चे मे. पियुष नर्सरी यांचे आहेत. उक्त दरास मा.शहर अभियंता यांनी तांत्रीक मान्यता प्रदान केलेली आहे. संबंधित एजन्सीला कार्यालयीन आदेश क्र.मनपा/उद्यान/४५/२०१६,दिनांक २५.२.२०१६, दि.२५.२.२०१६ ते २४.२.२०१७ पर्यंतच्या कालावधीचे वार्षिक देखभालीसाठी आदेश निर्गमित करण्यात आले. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील मुद्दे आक्षेपार्ह निदर्शनास आलेले आहेत.

१. उक्त कामास कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मआ/स्वीस/२०१६/५३, दिनांक २५.१.२०१६ अन्वये प्रशासकीय मंजूरी मा.आयुक्त यांची होणे आवश्यक होते. तथापि संचिकेत त्याप्रमाणे मान्यता घेतलेली नाही.

२. लेखापरीक्षणासाठी मोजमाप पुस्तीका क्र.२७०४,४५२८ व ४८८७ विभागाने उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. दुस-या व अंतीम देयकात एकूण रक्कम रू.३,५०,४७३/- आहे. कपातीची एकूण बेरीज रू.२४,५३३/- आहे. एकूण देयकाच्या रकमेतून कपातीची रक्कम वजा जाता रू.३,२५,९४०/- रक्कम निव्वळ राहते. ती रक्कम कंत्राटदारास देय आहे. तथापि कंत्राटदारास देयकातील बेरजेनुसार Net payble amt. रू.३२९४४५/- दर्शविली आहे. म्हणजेच रू.३५०५/- जास्तीची प्रदान झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अतीप्रदान रक्कम वसूलीस पात्र आहे.

४. कार्यादेशात नमूद प्रमाणे निविदेतील अटी व शर्ती क्र.१ ते १८ संचिकेत उपलब्ध नाही. तसेच त्याची पूर्तता संबधितांनी केली आहे का ? याचा स्वतंत्र अहवाल सुध्दा संचिकेत नाही.

५. कार्यादेशात नमूद प्रमाणे टिप क्र.४ नुसार उद्यानात काम करणा-या मजूरांचे पी.एफ.व ई.एस.आय.प्रत्येक महिन्याची हजेरी पत्रक वेळोवेळी उद्यान विभागास सादर करावी लागेल असे नमूद आहे. परंतू याबाबतचे अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाही.

६. सदरील उद्यानाची वार्षिक देखभालीसाठी पुनश्च निविदा मागविण्यात आल्याचे संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-२३ प्रमाणे स्पष्ट होत नाही. त्याच कंत्राटदारास मुदतवाढ दिल्याचे सादरीकरण आहे. प्रत्यक्षात स्वतंत्र संचिका प्रस्तावित असल्यास खुलासा व्हावा.

करीता उक्त मुद्यांप्रमाणे आपल्या स्तरावर तपासणी शहानिशा करून अतिप्रदान रक्कम वसूलीअंती अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

विभागाने मुद्या क्र.३ मध्ये नमूद रू.३५०५/- अतिप्रदान रक्कम संबंधिताकडून वसूल करावी व इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.०६ : वॉर्ड क्र.८० अंतर्गत केटली गार्डन येथे ओपन जिमचे साहित्य बसविणे बाबत. (सन २०१५-१६) अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९९,८५०/-**
**खर्च रक्कम रू.१,८९,८५८/-**

वॉर्ड क्र.८० अंतर्गत केटली गार्डन येथे ओपनजिमचे साहित्य बसविण्यासाठी स्वेच्छा निधीतून प्रस्तावित करण्यात आले. ई-निविदा मार्फत निविदा सूचना दिल्यानंतर ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या अंतीम तारखेस ३ निविदा प्राप्त झाल्या. १) मॉडेल आर्ट वर्क्स - अंदाजपत्रकीय दराने २) संतोष चव्हाण-३.५१% जास्त दराने ३) सुमीत कन्स्ट्रक्शन ५.५५% जास्त दराने. उक्त पैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची निविदा मॉडेल आर्ट वर्क्स यांची मान्य करण्यात आली. संबंधित ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने मान्य करून संबंधितास जा.क्र.मनपा/उद्यान/२२६/१६,दिनांक १४.९.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मोजमाप पुस्तिका क्र.२५८७ लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून न दिल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

२. कामगार विमा हा देयकातून कपात केल्यामुळे विमा कपातीबाबतचा हेतू साध्य झालेला नाही.

३. जा.क्र.मनपा/मआ/स्वीस/२०१६/५३, दिनांक २५.१.२०१६ महानगरपालिकेच्या मंजुर अर्थसंकल्पानुसार विविध विकास कामांची रूपये ५० हजार आणि त्यावरील किंमतीची अंदाजपत्रके मंजूर करणे ई- निविदेद्वारे कंत्राटदारांची नियुक्ती करणे, झालेल्या विकास कामांची देयके अदा करणे इत्यादी व या विषयाचे अनुषंगिक प्रस्ताव आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडे सादर केल्या जातात. इतःपर या कार्यवाहीत अंशतः बदल करण्यात येवून रूपये ५०,०००/- ते १५ लक्ष पर्यंतच्या सर्व प्रकारच्या विकास कामांची अंदाजपत्रके आणि रितसर प्रस्ताव संबंधित विभाग प्रमुख/कार्यकारी अभियंत्यांनी त्यांच्या शिफारशीसह प्रथम लेखा विभागात लेखा तपासणी आणि नोंदीकरीता सादर करावेत. लेखा विभागाने त्यास नियमानुसार मंजूरी देवून तसेच खर्चाची नोंद घेवून, सदर प्रस्ताव शहर अभियंता यांचेकडे पाठवावेत. शहर अभियंता यांनी त्यास तांत्रिक मंजूरी देवून प्रशासकीय मंजुरीकरीता आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे सादर करावेत. उक्तप्रमाणे आदेशित असतांना संचिकेत मा.आयुक्त यांच्या प्रशासकीय मान्यतेशिवाय कार्यवाही करण्यात आल्याची निदर्शनास येते ही बाब नियमबाह्य आहे.

करिता उक्त बाबत आपण आपल्या स्तरावर प्रत्यक्ष शहानिशा व खातरजमा करून अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०७ : सन २०१६-२०१७ या वर्षात सिध्दार्थ उद्यान मुख्यप्रवेश द्वार येथून प्रवेश देण्याकरीता आकारण्यात येत असलेल्या फीच्या software बाबत.**

सिध्दार्थ उद्यान येथील प्रवेश द्वारावर, उद्यानात प्रवेश करण्यासाठी प्रवेश फी आकारली जाते. प्रवेश फी आकारतांना मोठी व्यक्ती व लहान मुले यांच्यासाठी वेगवेगळे दर आकारण्यात येतात. प्रवेश करतांना त्यानुसार प्रवेश फी घेतली जाते. प्रवेश फी रक्कम भरणा करतांना मोठी व्यक्ती व लहान मुले यांची वसूल केलेली रक्कम महानगरपालिका फंडात जमा होते. परंतू मोठे व्यक्ती व लहान मुले यांचा वेगवेगळी संख्या मागितली असतांना फी आकारण्यात येत असलेल्या software मधून तसा Report Generate होत नाही असे संबंधितांचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात वसूल केलेली रक्कम व संख्या यांचा ताळमेळ साधण्यासाठी उक्त Report Generate होणे आवश्यक ठरते. असे Report Generate न झाल्यामुळे वसूल केलेली रक्कम योग्य आहे किंवा कसे याची खात्री होत नाही.

करीता उक्त प्रकरणी योग्य कार्यवाही अंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही.

**विभागाने परिच्छेदात नमूद प्रमाणे कार्यवाही करून होत असलेल्या विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**उद्यान विभाग**

**परिच्छेद क्र.०८ : सन २०१६-२०१७ या वर्षात मीनी ट्रेनच्या तिकीटांचा रू.१६००/- चा कमी भरणा झालेला असल्याने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसानीबाबत.**

चालान क्र.१८४९३ दिनांक २५.८.२०१६ रोजीचा भरणा रू.४४००/- चा झालेला आहे. यामध्ये दिनांक २२.८.२०१६ चे रू.२०००/- आणि पुस्तक क्र.१५५ (१५४०१ ते १५४२०) चे रू.४००/- असे एकूण रू.४४००/- चा भरणा झालेला आहे. दिनांक २५.८.२०१६ रोजी दिनांक २४.८.२०१६ तील उर्वरीत पावती क्र.१५४२१ ते १५५०० एकूण (८०) पावत्याची रक्कम रू.१६००/- भरणा झालेली नाही. पुढील पावती पुस्तक क्र.१५६ मधील पावती क्र.१५५०१ पासूनचा भरणा केलेला आहे.

त्यामुळे ८० पावत्यांचा रू.२०/- प्रमाणे रू.१६००/- चा कमी भरणा झाल्याचे निदर्शनास येते.

करीता आपल्या स्तरार तपासणी करून कमी भरणा रकमेचा महानगरपालिका फंडात त्वरीत भरणा होणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही करून लेखापरीक्षण विभागात अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केले नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक महानगरपालिका फंडात त्वरीत भरणा करावे. विलंबाबाबत संबंधित कर्मचारी /अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०९ : सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात सिडको भागातील गट ड अंतर्गत कॅनॉट प्लेस उद्यान एन-१ उद्यान, एन-१ जॉगींग ट्रॅक उद्यानाचे १२ महिने देखभाल व संगोपन करणे बाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.७,६४,५८०/-**
**खर्च रक्कम रू.७,६०,७५७/-**
**मुदतवाढ ३ महिने खर्च रू.१,९०,७६१/-**

सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात सिडको भागातील गट ड अंतर्गत कॅनॉट प्लेस उद्यान एन-१ उद्यान, एन-१ जॉगींग ट्रॅक उद्यानाचे १२ महिने देखभाल व संगोपन करणे कामाकरीता ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा विक्री होवून निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी ०.२% सर्वात कमी दराची निविदा होती. संबंधितास वाटाघाटीस बोलाविण्यात आले असता ०.५% दर मान्य करून जा.क्र.मनपा/उद्यान/४६/१६ दिनांक २५.२.२०१६ अन्वये दिनांक २५.२.२०१६ ते २४.२.२०१७ पर्यंतच्या कालावधीचे वार्षिक देखभालीसाठी आदेश निर्गमित करण्यात आले.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. उपरोक्त कामास कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मआ/स्वीस/२०१६/५३, दिनांक २५.१.२०१६ अन्वये प्रशासकीय मंजूरी मा.आयुक्त यांची घेणे आवश्यक होते. तथापि संचिकेत त्याप्रमाणे मान्यता घेतलेली नाही.

२. लेखापरीक्षणासाठी मोजमाप पुस्तिका क्र.२७०४ विभागाने उपलब्ध करून दिलेली नसल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. परिच्छेद ४४ नुसार मा.मुख्य लेखाधिकारी यांनी EE यांची स्वाक्षरी तसेच check measurement ५% सह फेर सादर करावे असा अभिप्राय आहे. परिच्छेद ४६ नुसार एनएस-१२, P-४४ वरील मा.मुख्य लेखाधिकारी यांच्या टिपणीनुसार मा.उद्यान अधिक्षक यांनी १००% चेकींग केली आहे. करीता संचिका मा.कार्यकारी अभियंता १,२,३ व ८ यांच्याकडे पाठविणे योग्य असे नमूद करून कृषी सहाय्यक, उद्यान अधिक्षक, कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी आहे. लेखा विभागाने परिच्छेद ४७ वर पूर्तता करून पाठविले असे नमूद करून लेखाधिकारी यांनी मुख्य लेखाधिकारी यांचेकडे संचिका मार्गस्थ केली असल्याचे दिसून येते. मुख्य लेखाधिकारी यांचेकडे परत परिच्छेद ४४ वरील मत मांडले आहे. यावर परिच्छेद ४८ नुसार कार्यकारी अभियंता यांनी पूर्वी पूर्तता झाली आहे. देयक अदायीसाठी सादर केले होते. पुन्हा पुन्हा तोच शेरा येत आहे. कृपया तपासावे देयक अदायीसाठी पुन्हा सादर अशी नोंद आहे.

परिच्छेद ४९ वर लेखा विभागातील कनिष्ठ लिपीक यांनी मोजमाप पुस्तिका २७०४ पान क्र.१७४ वर स्वाक्षरी करून पूर्तता केली आहे. कृपया अवलोकन व पुढील कार्यवाहीस्तव असे नमूद करून लेखाधिकारी, मुख्य लेखाधिकारी, शाखा अभियंता, कक्ष प्रमुख, मा.आयुक्त यांच्या स्वाक्षरी होवून देयक अदायगी झाली आहे.

P.W.D .Manual नुसार कार्यकारी अभियंता यांनी ५% मोजमापे तपासणे बाबत स्पष्टपणे नमूद आहे. अशी मोजमापे मोजमाप पुस्तिकेत तपासलेली असतीलही परंतू मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नसल्याने खात्री झालेली नाही. परिच्छेद ४६ नुसार जसे उद्यान अधिक्षक यांनी १००% मोजमापे तपासल्याचे नमूद आहे त्यानुसार कार्यकारी अभियंता यांच्या टीपणीमध्ये उल्लेख आलेला नाही.

४ . कार्यादेशात नमूद प्रमाणे निविदेतील अटी व शर्ती क्र.१ ते १८ संचिकेत उपलब्ध नाही. तसेच त्याची पूर्तता संबंधितांनी केली आहे काय? त्याचा स्वतंत्र अहवाल संचिकेत नाही.

५. वेळोवेळी उद्यान अधिक्षक व कृषी सहाय्यक यांनी कामाबाबत केलेल्या पाहणी व सुचने करीता नोंद रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. असे नमूद आहे. तथापि लेखापरीक्षण कामी नोंद रजिस्टर उपलब्ध झालेले नाही.

६. उद्यानात काम करणा-या मजुरांचे पी.एफ., ई.एस.आय.सी. प्रत्येक महिन्याच्या हजेरी पत्रक वेळोवेळी उद्यान विभागास सादर करावे लागेल असे नमूद आहे. तथापि त्याबाबतचे अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाही.

७. कामगार विम्याची कपात देयकातून कपात केल्याने विमा काढण्यामागचा हेतू सफल होत नाही.

८. जा.क्र.मनपा/३४०/१७, दिनांक २८.७.२०१७ अन्वये २५.२.२०१७ ते २४.५.२०१७ पर्यंत कार्योत्तर मुदतवाढ आदेश देण्यात आले. मुदतवाढीचे देयक अदा करतांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी ने देयक अदा करणे आवश्यक होते. तथापि देयक अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२% कमी अदा केलेले संचिकेतील देयकावरून दिसून येते. रक्कम रू.५७४/- जास्तीचे अदा करून प्रथमदर्शनी महानगरपालिकेचे नुकसान झाल्याचे आढळून येते.

उक्त बाबत आपण आपल्या स्तरावर प्रत्यक्ष शहानिशा व खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.८ मध्ये नमूद रू.५७४/- अतिप्रदान रक्कम संबंधिताकडून वसूल करावी तसेच इतर अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चितीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१० :सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात स्वेच्छा निधी या लेखा शिर्षाअंतर्गत वॉर्ड क्र.५४ खोकडपुरा अंतर्गत महानगरपालिकेच्या खुल्या जागेस चेनलिंक गेट व रंगकाम करणे बाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९९,८३७/- खर्च रक्कम रू.१,७८,२७०/-**

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात स्वेच्छा निधी या लेखाशिर्षा अंतर्गत वॉर्ड क्र.५४ खोकडपुरा अंतर्गत महानगरपालिकेच्या खुल्या जागेस चेनलिंक गेट व रंगकाम करणेचे कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. चार निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.साई समर्थ कृषी सेवा केंद्र यांची १२.६७% कमी दराची निविदा प्राप्त झाली. एजन्सीला २% अनामत रक्कम भरणा करण्यासाठी कार्यालयाने कळविले. तेव्हा संबंधित एजन्सीने महानगरपालिकेकडून त्यांच्या पूर्वीचे देयकांच्या रकमा मिळाल्या नाही म्हणून नविन काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. संबंधितांना काम करण्यास नकार दिल्यामुळे EMD रक्कम जप्त करणे व काळ्या यादीत नाव समाविष्ठ करण्याची नोटीस बजावली.

दुस-या क्रमांकाची एजन्सी पियुष नर्सरी यांना पहिल्या क्रमांकाच्या एजन्सीच्या दराने काम करण्यास विचारणा केली असतांना त्यांनी पहिल्या क्रमांकाच्या निविदा धारकाच्या दराने काम करण्यास नकार दिला. तद्नंतर कार्यालयाने सदरील कामाची फेर निविदा मागविली. फेर निविदेमध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची मे.पियुष नर्सरी यांची निविदा अंदाजपत्रकीय दराची प्राप्त झाली. संबंधिताने २% अनामत रकमेचा धनाकर्ष कार्यालयात सादर करून रू.१००/- च्या मुद्रांकावर करारनामा केला. एजन्सीला कार्यालयीन पत्र क्रमांक मनपा/उद्यान/४७०/२०१७, दिनांक ८.९.२०१७ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील मुद्दे आक्षेपार्ह निदर्शनास आले.

१. साई समर्थ कृषी सेवा केंद्र यांनी काम करण्यास नकार दिला त्यांचे नांव काळ्या यादीत समाविष्ठ केल्याचे पत्र आहे. परंतू EMD रक्कम जप्त केली. याबाबतचे अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाही. EMD रक्कम जप्त झाली नसेल तर कार्यवाही करून अनुपालन द्यावे.

२. मोजमाप पुस्तिका क्र.४७८१ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झाली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. रू.५००/- ऐवजी रू.१००/- च्या मुद्रांकावर करारनामा केल्यामुळे शासनाचे रू.४००/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. देयकाची एकूण बेरीज रू.१,७८,२२६/- येते. प्रत्यक्षात रू.१,७८,२७०/- प्रदान केले. रू.४४/- अतिप्रदान रक्कम वसूलीस पात्र आहे.

करीता उक्त मुद्यांवर सविस्तर तपासणीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र. १ अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, मुद्या क्र.३ अन्वये शासनाचे झालेले आर्थिक नुकसान रू.४००/- व मुद्या क्र.४ अन्वये रू.४४/- असे एकूण रू.४४४/- अतिप्रदान रक्कम संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११ : सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.५ अंतर्गत रामेश्वरनगरी व रामेश्वरपुरम उद्यान मध्ये झाडे लागवड करून, नविन खेळणी बसवून उद्यानाचे एक वर्ष देखभाल व संगोपन करणे बाबत.**
**अं.प.रक्कम रू.९,९६,३५७/- ( खर्च रक्कम रू.६,३५,८०८/-)**

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.५ अंतर्गत रामेश्वरनगरी व रामेश्वरपुरम उद्यानामध्ये झाडे लागवड करून नविन खेळणी बसवून उद्यानाचे एक वर्ष देखभाल व संगोपन करणेचे कामाकरीता महा ई सेवा विभागा मार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची निविदा १.३३% (कमी दराची) शिवम नर्सरी यांची होती. एजन्सीने ४% कमी दराने काम करण्यास संमती दिली. महानगरपालिके सोबत रू.१००/- च्या मुद्रांकावर करारनामा केला. एजन्सीला कार्यालयीन आदेश क्र.मनपा/उद्यान /८७०/ २०१७,दिनांक २४.१.२०१७ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील मुद्ये आक्षेपार्ह निदर्शनास आले आहेत.

१. मोजमाप पुस्तिका क्र.४९५७ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. एजन्सीने रू.१००/- च्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. प्रत्यक्षात शासनाच्या सूचनेनुसार रू.५००/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते. शासनाचे रक्कम रू.४००/- चे नुकसान झाले आहे.

३. शेड्यूल्ड B मधील Part A मधील ॲटम क्र.१ व २ Execute झालेले नसतांनाही ॲटम क्र.३ व ४ वर रू.१,६२,७६०=०० खर्च झालेला आहे. त्यामुळे निविदेतील कामे पूर्ण न होता काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र निर्गमित होवून रक्कम रू.६,३५,८०८/- रकमेचे देयक प्रदान केले आहे. Part A मधील ॲटम क्र.१ व २ साठीच ॲटम क्र.३ व ४ वरील खर्च होणे अपेक्षित होते.

करीता उक्त मुद्यांवर सविस्तर तपासणीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र. २ अन्वये शासनाचे झालेले आर्थिक नुकसान रू.५००/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२ : वृक्ष तोड संचिका तपासणीत आढळून आलेल्या त्रुट्या व अनियमिततेबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान चाचणी दाखल उपलब्ध करून दिलेल्या एकूण २० संचिकेची तपासणी केली असता खालील दर्शविलेल्या काही सामायिक त्रुट्या व अनियमितता आढळून आल्या.

१. वृक्षतोड आदेशात नमूद अट क्र.३ प्रमाणे सदर कार्यवाही करतांना महानगरपालिका प्रतिनिधी समक्षच करावी असे नमूद असतांना एकाही प्रकरणात प्रतिनिधीचा अहवाल नाही. प्रत्यक्षात किती वृक्षतोडीची परवानगी दिली होती व किती वृक्ष तोडले तसेच कार्यवाही प्रतिनिधी समोरच झाली किंवा नाही याबाबत शहानिशा करता आली नाही.

२. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ११ नुसार झाडांचे जतन करण्याची जबाबदारी जमिन मालक किंवा भोगवटाधारक यांची राहील. अशा झाडांच्या स्थितीविषयीचा ३ वर्षाच्या कालावधीसाठीचा अहवाल ६ महिन्यातून एकदा वृक्ष अधिका-यास द्यावा लागेल असे नमूद असतांना स्वतंत्र अर्धसमास वितरीत करूनही लेखापरीक्षण कामी प्रपत्र -ई अहवाल उपलब्ध करून देण्यात आले नाही ही बाब नियमबाह्य आहे.

३. वृक्षतोडसाठी आकारण्यात येणारे दर कुठल्या नियमानुसार अथवा कोणत्या सक्षम प्राधिकरणाच्या आदेशाने आकारण्यात आले याबाबत शहानिशा करता आलेली नाही.

४. वृक्ष अधिकारी यांनी प्रपत्र-एच भरून घेतलेले नाही. प्रपत्र H नुसार पाऊस, आग, वीज पडल्याने, मुसळधार पावसाने जे वृक्ष पडले असतील / नष्ट झाले असतील तर वृक्ष अधिकारी जमीन मालकास/भोगवटाधारकास नोटीस बजावू शकतो.

५. मालक/भोगवटादार यांच्याकडून कलम ११(२) नुसार अधिनियमाच्या कलम ८/९/१० तरतुदीनुसार प्रपत्र डी भरून घेणे आवश्यक आहे. कलम ८/९ च्या आदेशान्वये भोगवटाधारकाकडून उल्लंघन झाल्यास भरलेली सुरक्षा अनामत रक्कम रद्द होवून अधिनियमातील तरतुदीनुसार कायदेशीर कार्यवाही करण्याची तरतुद आहे.

करीता उक्त बाबींबाबत आपण आपल्या स्तरावर प्रत्यक्ष शहानिशा करून खुलासा सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने वरील अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१३ : सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.६, यादवनगर अंतर्गत महानगरपालिकेच्या जागेत झाडांना पाणी देण्यासाठी बोअरवेल पंप व जी.आय.पाईप लाईन टाकणे बाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,४४,८८७=०० (खर्च रक्कम रू. १,३७,१२३=००)**

सन २०१६-२०१७ या वर्षात वॉर्ड क्र.६ यादवनगर अंतर्गत महानगरपालिकेच्या जागेत झाडांना पाणी देण्यासाठी बोअरवेल, पंप व जी.आय.पाईपलाईन टाकणेचे कामासाठी महा-ई-सेवा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा ०.३३% कमी दर मे.शिवम नर्सरी यांची होती. एजन्सीने महानगरपालिके सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयाने कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/९०६/२०१७, दिनांक ७.१.२०१७ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. कामाची मुदत एक महिन्याची होती. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील मुद्दे आक्षेपार्ह निदर्शनास आले आहेत.

१. मोजमाप पुस्तिका क्र.४८८३ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.
२. सदरील कामाचा करारनामा रू.५००/- च्या मुद्रांकाऐवजी रू.१००/- च्या मुद्रांकावर केलेला आहे, त्यामुळे शासनाचे रू.४००/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.
३. शेड्यूल्ड B मधील ॲटम क्र.१,२ व ३ चे दर व देयकातील दर भीन्न आहेत. त्यामुळे प्रदान केलेली रक्कम योग्य असल्याची खात्री झाली नाही.

करीता उक्त मुद्यांवर लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.२ अन्वये शासनाचे झालेले आर्थिक नुकसान रू.४००/- संबंधिताकडून वसूल करावे तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१४ : सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.६, यादवनगर येथील उद्यानात लॉन लागवड करणे बाबत.**

वॉर्ड क्र.६, यादवनगर येथील उद्यानात लॉन लागवड करणेचे कामासाठी महा ई - सेवा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.शिवम नर्सरी यांची ०.३% कमी दराची प्राप्त झाली. एजन्सीने महानगरपालिके सोबत कारारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/९०५/२०१७, दिनांक ७.१.२०१७ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत एक महिना होती.

सदरील काम स्वेच्छा निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात यावे. संचिकेची तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्र.४८८२ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. सदरील कामाचा करारनामा रू.५००/- च्या मुद्रांक ऐवजी रू.१००/- च्या मुद्रांकावर केलेला असल्याने शासनाचे रू.४००/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

करीता, उक्त मुद्यांवर अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने मुद्या क्र.२ अन्वये शासनाचे झालेले आर्थिक नुकसान रू.४००/- संबंधिताकडून वसूल करावे तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१५ : सिध्दार्थ उद्यानातील वाहतुक उद्यानाजवळील बंद अवस्थेतील कारंजा पूर्ववत सुरू करणे बाबत.**

सिध्दार्थ उद्यानातील वाहतुक उद्यानाजवळील बंद अवस्थेतील कारंजा पूर्ववत करण्यासाठी संचिकेतील प्रस्तावानुसार मा.आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणीतील दिलेल्या आदेशान्वये सदर काम तातडीने हाती घेण्यात आले. त्यासाठी ३ कोटेशन उपलब्ध गुत्तेदाराकडून मागविले व सर्वात कमी दराचे कोटेशन श्री.शेख मुजीब यांचे रक्कम रू. ४९,८००/- प्राप्त झाले. करिता सदरील काम Voucher payment आधारे करण्यात आले. कामाची नोंद MB २५८७, पृष्ठ क्र. १८९ व १९० वर घेतली असल्याचे संचिकेत नमूद आहे.

संचिका तपासणीत खालील आक्षेपार्ह बाबी आढळून आल्या-

१. मोजमाप पुस्तिका २५८७ लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने पूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (सी) च्या तरतुदी अंतर्गत मा.आयुक्त यांना प्राप्त असलेल्या आर्थिक मंजूरी अधिकारातील रकमेपर्यंतची कामे पार पाडल्यानंतर अशा कामांचा एकत्रित प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर माहितीस्तव ठेवणे अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक आहे. उक्त प्रकरणांत खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात आले नसल्याचे संचिकेतील अभिलेख्यानुसार निदर्शनास येते.

३. मागविण्यात आलेले दरपत्रके हे सीलबंद पाकिटात होती याबाबत सक्षम अधिकारी यांनी पाकिटावर “opened by me” असा उल्लेख करून स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे प्राप्त दरपत्रके बंद पाकिटात प्राप्त झाल्याबाबत साशंकता निर्माण होते.

४. प्राप्त कोटेशनबाबत विभागाने तुलनात्मक तक्ता तयार केलेला नाही. केवळ सादरीकरणात ३ कोटेशन मागवून सर्वात कमी दराचे श्री.शेख मुजीब यांचे होते असे नमूद केले आहे व त्यानुसार Abstract for Estimate By Quatation तयार केला तथापि या Abstract वर Referance PWD/MJP/DSR/२०१५-२०१६ असे नमूद आहे. प्राप्त दर व DSR चे दर एकच आहे किंवा कसे याबाबत विभागाने संचिकेत बाबी नमूद केलेल्या नाहीत.

५. सदरील काम उपलब्ध ठेकेदाराकडून करून घेण्याची मान्यता सक्षम प्राधिकरणाने दिलेली आहे. परंतू महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम -१९४९ मधील तरतूदीचा उल्लेख विभागाने संचिकेत केलेला नाही.

६. संचिकेत कार्योत्तर कामाचे आदेश उपलब्ध नसतांनाही काम पूर्ण करून देयक अदायगी झालेली आहे.

करीता उक्त बाबीं बाबत विभागाने प्रत्यक्ष शहानिशा व खात्री करून अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१६ : सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात स्वेच्छा निधी या लेखाशिर्षातून लोखंडी ट्री गार्ड खरेदी बाबत.**

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात स्वेच्छा निधीतून लोखंडी ट्री गार्ड खरेदी करणेसाठी सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा सूचना जा.क्र.मनपा/उद्यान/१४/ २०१६, दिनांक २२.१.२०१६ अन्वये प्रसिध्दीस दिली. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दर ४.२% Below मुबारक पठाण यांचे प्राप्त झाले. एजन्सीचे दर स्वीकृत झाल्यानंतर एजन्सीने महानगरपालिकेसोबत करारनामा केला. तद्नंतर एजन्सीला कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/३ / २०१६, दिनांक २९.४.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आले. दिनांक २६.५.२०१६ रोजी काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. एजन्सीला दिनांक ३०.७.२०१६ रोजी देयक पारीत केले आहे.

**उद्यान विभाग**

तद्नंतर स.सदस्य यांनी पत्र क्र.१६९, दिनांक १५.७.२०१६ रोजी पत्र देवून रू.२ लक्ष रकमेपर्यंत ट्री गार्ड स्वेच्छा निधीतून खरेदी करण्यात यावे, असे कळविले. उद्यान विभागाने संचिका पृष्ठ क्र.(३७) वर सादरीकरणात नमूद केले आहे की, संचिकेतील पूर्व परिच्छेद (२०) वरील मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार निविदा पध्दतीने ट्री गार्ड खरेदीचे वार्षिक दर मागवून निविदा दरास मंजूरी दिली आहे. मुबारक पठाण यांचे ४.२% कमी दराची निविदा प्राप्त झाली असून संबंधित एजन्सीला कार्यादेश देवून प्रक्रिया पूर्ण करणे योग्य होईल. एजन्सीने २% अनामत रक्कम देयकातून कपात करण्याबाबत विनंती केली. यास कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिली. करारनामा महानगरपालिके सोबत एजन्सीने केला.

तद्नंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५४३/२०१६, दिनांक २.९.२०१६ अन्वये कार्यादेश दिले. दिनांक २६.९.२०१६ रोजी काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत आहे. एजन्सीचे अंतीम देयक दिनांक १.१२.२०१६ रोजी पारीत करण्यात आले.

ट्री गार्ड खरेदीसाठी स.सदस्य यांनी पत्र क्र.१७०, दिनांक १८.७.२०१६ रोजी पत्र देवून रू.२ लक्ष रकमेपर्यंत ट्री गार्ड स्वेच्छा निधीतून खरेदी करण्यात यावे असे कळविले.

उद्यान विभागाने परिच्छेद (४२) वर सादरीकरणात नमूद केले आहे की, याच संचिकेतील परिच्छेद (२०) व (२१) वर मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुबारक पठाण यांची ४.२% Below दराची निविदा मंजूर झालेली आहे. पुनश्च स.सदस्य यांनी पत्र दिल्याप्रमाणे मुबारक पठाण यांच्या मंजूर दराने खरेदी करण्याकरीता प्रस्तावित होते. या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दिनांक २१.९.२०१६ रोजी मान्यता दिली. एजन्सीने २% अनामत रक्कम भरण्याबाबत विभागाने कळविलेले नाही. करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६२९/२०१६, दिनांक ११.१०.२०१६ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहे. एजन्सीने दिनांक २७.१०.२०१६ रोजी काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र संचिकेत आहे. एजन्सीचे देयक दिनांक ५.१२.२०१६ रोजी पारीत केल्याचे संचिकेवरून निदर्शनास येते. संचिकेच्या तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. मोजमाप पुस्तिका क्र.२७०८ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेली नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.
२. प्रकरणात सन २०१५-२०१६ या वर्षात निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याच वर्षाच्या निविदे प्रमाणे सन २०१६-१७ या वर्षात निविदा न मागविता त्याच पुरवठाधारकास ट्री गार्ड पुरवठा करण्याबाबत कार्यादेश देण्यात आले.
३. सन २०१६-२०१७ या वर्षात निविदाधारक कंत्राटदार यांच्या कडून दिनांक १८.७.२०१६ च्या पत्राच्या सादरीकरण संचिकेत केवळ करारनामा करून घेतला. २% अनामत रक्कम भरणा करून घेतलेली नाही. दिनांक १५.७.२०१६ च्या पत्राच्या सादरीकरण संचिकेत २% अनामत रक्कम देयकातून कपात करण्यास मान्यता दिली. परंतू देयकात २% अनामत रक्कम कपात केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

**उद्यान विभाग**

४. पुरवठाधारकास दिनांक २९.४.२०१६ चे कार्यादेश देण्यापूर्वी संबंधितांनी करारनाम्यावर स्वाक्षरी केली आहे किंवा नाही ? याची तपासणी झालेली नाही. पुरवठाधारकाने करारनाम्यावर स्वाक्षरी केलेली नसतांनाही कार्यादेश निर्गमित झालेले आहे.

५. पुरवठाधारकाने दिनांक २३.५.२०१६ व २६.५.२०१६ या दोन तारखांना अनुक्रमे १००,१३१ ट्री गार्डचा पुरवठा केलेला आहे व त्याबाबत उद्यान अधिक्षक यांनी स्टॉक बुक पान क्र.८ वर नोंद घेण्यात आल्याचे प्रमाणित केले. परंतू असे स्टॉक बुक लेखापरीक्षण पथकास तपासणीसाठी उपलब्ध झालेले नाही.

६. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५४३/२०१६, दिनांक २.९.२०१६ अन्वये २३० ट्री गार्ड पुरवठा करण्याबाबत कार्यादेश निर्गमित केलेले आहे. दिनांक २०.९.२०१६ रोजी १०५ आणि दिनांक २६.९.२०१६ रोजी १२५ ट्री गार्ड पुरवठा केल्याचे डिलेव्हरी चालान संचिकेत आहेत. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६२९/२०१६, दिनांक ११.१०.२०१६ अन्वये निर्गमित कार्यादेशातील ट्रीगार्ड दिनांक २१.१०.२०१६ रोजी १०० व २७.१०.२०१६ रोजी १३० असे एकूण २३० ट्री गार्ड पुरवठा केल्याचे डिलेवरी चालान संचिकेत आहेत. परंतू या चालानवर उद्यान अधिक्षक यांनी ट्री गार्ड प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही. त्यामुळे ट्री गार्ड प्राप्त झाल्याची खात्री झालेली नाही. यावर झालेल्या खर्चाबाबत साशंकता निर्माण होते.

७. सदरील प्रकरणात स.सदस्य यांनी पत्र क्र.१६९ दिनांक १५.७.२०१६ व पत्र क्र.१७० दिनांक १८.७.२०१६ अन्वये प्रत्येकी २ लक्ष म्हणजे एकूण ४ लक्ष रकमेचे ट्री गार्ड खरेदीसाठी पत्रे दिलेली आहेत. ही दोन्ही पत्रे उद्यान विभागात आवक क्र.८९९ व ९०० दिनांक १८.७.२०१६ रोजी आवक वहीत नोंदवून पत्रावर आवक क्रमांक नोंदविलेला आहे असे पत्रावर नमूद क्रमांकावरून निदर्शनास आले. विभागाकडे जर एकाच तारखेस स.सदस्याचे दोन पत्र प्राप्त झाले तर वेगवेगळ्या संचिकेत सादरीकरण करण्याचे प्रयोजन समजू शकले नाही.

८. कार्यादेश क्र.मनपा/उद्यान/५४३/२०१६ दिनांक २.९.२०१६ या प्रकरणात प्राप्त मंजूर दराप्रमाणे पुरवठा करण्याबाबत कार्यकारी अभियंता स्तरावर मान्यता प्रदान आहे. याबाबत संबंधित अधिका-यांना अधिकार दिल्याचे आदेश संचिकेत प्राप्त नाही.

९. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मआ/स्वीस/२०१६/६१०, दिनांक १७.१०.२०१६ अन्वये मुबारक पठाण यांचे देयक मंजूरीस्तव सादर केलेले आहे. सदरील आदेशाची प्रत संचिकेत नाही.

करीता उक्त मुद्या क्र.१ ते ९ बाबत आपल्या स्तरावर तपासणी करून लेखापरीक्षण विभागास खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

विभागाने उक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**उद्यान विभाग**

# भाग - ब

# चौकशी अहवाल

# अग्निशमन विभागाचा प्राथमिक चौकशी अहवाल

## प्रस्तावना :

मा.महापौर, महानगरपालिका औरंगाबाद यांनी कार्यालयीन पत्र क्र.मनपा/महापौर/२०१८/ ७१३, दिनांक २४.४.२०१८ अन्वये अग्निशमन विभागा मार्फत विविध कामे विविध एजन्सींना देण्यात येतात. अग्निशमन विभागाच्या शासनाच्या पॅनलवर असलेल्या एजन्सीची माहिती, कामे करण्याबाबतचे निकष व याबाबतचा शासन निर्णय इत्यादी बाबीं संबंधी अहवाल सादर करण्याबाबत लेखापरीक्षण विभागास सूचित करण्यात आले होते.

लेखापरीक्षण विभागाने अग्निशमन विभागाशी संपर्क साधून सन २०१७-२०१८ या वर्षात उक्त मुद्यांवर संबंधित विभागाकडून माहिती मिळविली. अग्निशमन विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार Directorate of Maharashtra Fire Services यांच्या वेबसाईट वरील पोर्टलवर उपलब्ध असलेल्या अनुज्ञप्तीधारक अभिकरणाची (Licensed Agencies) दिनांक ३१.३.२०१८ पर्यंतची यादीची प्रत सादर केलेली आहे. या यादीमध्ये ६५९ अनुज्ञप्तीधारक अभिकरणे (Licensed Agencies) असून या एजन्सीमार्फत आग प्रतिबंधक व जीवसंरक्षकसाठी कामे करून घेतली जातात. अग्निशमन विभागाकडे अंतिम Fire NOC साठी प्राप्त झालेल्या प्रकरणांत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक कायदा -२००६ मधील कलम (३) व नियम (४) (१) नुसार नमुना 'अ' मध्ये लायसन्स प्राप्त अभिकरणाने अग्निशमन उपाययोजनेची कामे पार पाडलेली आहेत असे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

सदरील लायसन्स प्राप्त अभिकरणाच्या यादीतील एजन्सीकडून करून घेण्याची मुभा देण्यात आलेली आहे. विशिष्ट एकाच एजन्सीकडून कामे करून घ्यावीत असे बंधन संचालनालय अग्निशमन सेवा महाराष्ट्र राज्य यांनी दिलेली नाही.

**सदरील चौकशी दरम्यान औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिका-याने सन २०१७-२०१८ या वर्षात एकूण ९३ अंतिम Fire NOC निर्गमित केल्या आहेत. या प्रकरणांची तपासणी केली असतांना प्रामुख्याने खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.**

१. सन २०१७-२०१८ या वर्षात औरंगाबाद महानगरपालिकेतील अग्निशमन विभागाने खालील एजन्सीकडून आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना केल्या असल्याबाबत निदर्शनास आलेले आहे. २०१७-२०१८ या वर्षात संबंधित Licences Agencies ने किती कामे पार पाडली याचा तपशिल पुढील प्रमाणे -

सन २०१७-२०१८ या वर्षात अग्निशमन विभागाने अंतिम फायर NOC करिता आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना करिता कामे केलेल्या अनुज्ञप्तीधारक (Licences Agencies) अभिकरणाची यादी.

| अ.क्र. | अनुज्ञप्तीधारक अभिकरणाचे नांव व पत्ता | संचालक महाराष्ट्र राज्य फायर सर्व्हिसेस यांनी दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत निर्गमित केलेल्या अनुज्ञप्तीधारक अभिकरणाचे यादीतील क्रमांक | अनुज्ञप्तीला वैधता दिनांक | अनुज्ञप्तीधारक अभिकरणाने एकूण केलेली प्रकरणे |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | मे.ॲडव्हान्टेजसाई प्रॉजेक्ट प्रा.लिमिटेड, जी-७४, ईटरनिटी मॉल, तीन हात नाका, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, ठाणे-पश्चिम ४००६०४ | ६८ | १२.४.२०१८ | ११ |
| २ | मे.निओसिस फायर ॲण्ड सेफ्टी टेक्नोलॉजिस प्रा.लि., सी-३/७४, टाऊन सेंटर, तापडिया फेमच्या मागे एन-१ सिडको,औरंगाबाद. | १६३ | २८.४.२०१८ | ०२ |
| ३ | मे.रूद्राणी फायर सर्व्हिसेस,shop no.J-१,३, भारत बाजार, ए.पी.आय.कॉर्नर, औरंगाबाद ४३१ २०१ | १७४ | १२.४.२०१८ | ०४ |
| ४ | मे.के.व्ही.कॉर्पोरेशन, फ्लॅट नं.९, देशपांडे पुरम B प्रभातनगरी औरंगाबाद. | २०५ | ३०.५.२०१८ | ०२ |
| ५ | मे.ग्राफिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लिमिटेड, राकाज लाईफस्टाईल क्लब, सहाकारनगर रोड, ज्योतीनगर, औरंगाबाद. | २३२ | १९.७.२०१८ | २१ |
| ६ | मे.प्राकृतिक इन्फ्रा सर्व्हिसेस प्रा.लि. श्यामकुंज प्लॉट नं.१४३, सेक्टर एफ-१ एन-४ सिडको औरंगाबाद. | २४७ | २४.१.२०१९ | १५ |
| ७ | रचना इंजिनियरींग सर्व्हिसेस शॉप नं.एस-६ वास्तु विहार अपार्टमेंट प्लॉट नं.२७/२८ गट नं.१७५ सिडको वाळूज महानगर -१ औरंगाबाद. | २४८ | ६.११.२०१८(H)<br>२०.६.२०१८(D) | ०१ |
| ८ | मे.इंडिया ऑटोमेशन ॲण्ड सोल्यूशन्स ऑफिस नं.४, दुसरा माळा पुष्पशांती टॉवर, कर्वे पुतळ्याजवळ, कर्वे रोड, कोथरूड, पुणे ४११ ०३८ | २५६ | २.८.२०१८ | ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | मे.ओम फायर सर्व्हिसेस, ०५,सिडको शॉपिंग कॉम्प्लेक्स, सिडको महानगर-१, वाळुज,औरंगाबाद. | ३४७ | २१.११.२०१८(H) २०.३.२०१८(D) | ०८ |
| १० | मे.वैद्यनाथ फायर सर्व्हिसेस प्रा.लि. ऑफिस नं.५, तिसरा मजला, अशोक विजय कॉम्प्लेक्स, एम.जी.रोड,३२६ अरोरा टॉवर जवळ, कॅम्प, पुणे ४११ ००१ | ३७६ | ६.८.२०१८ | ०१ |
| **११** | **मे.फायरटार्ड - फायर सेफ्टी सोलुशन्स, एफ-१९ /१६,एन-७ सिडको औरंगाबाद.** | **४०५** | **१५.२.२०१७** | **०२** |
| १२ | मे.धनश्री फायर सर्व्हिसेस, ६२, स्वयंभू,येलदरकर कॉलनी, बसमत रोड, परभणी - ४३१ ४०१ | ४१७ | १४.४.२०१८ | ०२ |
| १३ | मे.जय बजरंग फायर सर्व्हिस लेन नं.सी-३, स्मशान मारूती रोड, संजयनगर, औरंगाबाद. ४३१००१ | ४६७ | ११.१०.२०१८ | १९ |
| १४ | मे.मॅक्ससेफ फायर सर्व्हिसेस एच.नं.२८/५, एन-११, मयूर नगर हडको,औरंगाबाद ४३१ ००३ | ४९४ | २०.२.२०१८ | ०१ |
| १५ | मे.साई फायरटेक इंजिनिअरिंग सर्व्हिसेस डी-५ सिध्दांत ड्रिम होम्स, सी.एस.नं.१५६, आलोक नगर सातारा परिसर, बीड बायपास औरंगाबाद ४३१०१०. | ५१३ | २८.४.२०१८ | ३ |
| | | | एकूण | **९३** |

**उक्त यादीतील अ.क्र.११ मधील फायर टार्ड फायर सेफ्टी सोल्युशन्स औरंगाबाद या एजन्सीचे लायसन्स ची वैधता दिनांक १५.२.२०१७ अशी असतांनाही संबंधित एजन्सीने लायसन्सचे नविनीकरण केलेले नसतांनाही दोन प्रकरणात अंतिम फायर NOC निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य असून सदरील ठिकाणी आगीमुळे काही जिवित हानी वित्त हानी झाल्यास सर्वस्वी जबाबदारी अग्निशमन विभागाची राहील. अग्निशमन विभागाने अंतिम NOC देतांना संबंधित एजन्सीची लायसन्सची वैधता तपासणे आवश्यक आहे.**

## २. सन २०१७-२०१८ या वर्षात अग्निशमन विभागाने खालील अंतिम NOC दिलेल्या प्रकरणात सक्षम प्राधिकरणाची सादरीकरणात मान्यता घेतलेली नाही.

१. चेअरमन, पीपल एज्युकेशन सोसायटी, मुंबई P.E.S. इंजिनियरींग College Building CTS No.२२१ नागसेनवन, औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/FIRE/३४९/२०१८ दिनांक १७.१.२०१८.

२. नारायण जनार्धन गावंडे, सुधाकर शंकरराव चिमणे, निवासी High-Rise Building plot no.४५४ & ४५५, सेक्टर G.C.I. वाळुज महानगर -०१ औरंगाबाद Final Five Noc No.AMC/Fire/४१७/२०१७, दिनांक ८.७.२०१७.

३. डायरेक्टर नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स & इनफॉरमेशन टेक्नोलॉजीक बॉईज हॉस्टेल, बिल्डींग Final Fire NOC No/AMC/Five/११७ /२०१७, दिनांक ५.१२.२०१७.

४. नितेश सुरेश पाटील, हॉटेल बिल्डिंग A&C मेघदुत रिसोट प्रा.लि. युनिट हॉटेल अतिथी P.No,३ (P) टाऊन सेंटर जालना रोड औरंगाबाद. Final Fire NoC No.AMC/Fire/१६४६/२०१४, दिनांक १३.३.२०१८

५. श्री.अंबिका इस्टेट आणि डेव्हलपर्स तर्फे पार्टनर श्री.कमलेश परमार व इतर (हायराईज बिल्डींग कमर्शियल रेसीडेन्शीयल) प्लॉट नं.१६ ,१७ ,२० ,२१ ,२८ ,३० , ३१,३२,३३ गट नं.११७ आणि १ (P) नक्षत्रवाडी औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१३५६/२०१८, दिनांक १९.१.२०१८

६. श्री.गणेश बिल्डर्स & डेव्हलपर्स MS श्री.अंबिका इस्टेट & डेव्हलपर्स through Partner कमलेश परमार प्लॉट नं.१६ ,१७ ,२० ,२१ ,२८ ,३० , ३१,३२,३३ गट नं.११७ आणि १ (P) नक्षत्रवाडी औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१४०५/२०१८, दिनांक २५.१.२०१८

७. छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था, आयुर्वेदिक कॉलेज बिल्डिंग & ॲग्रीकल्चरल कॉलेज बिल्डींग गट नं.४२ (P) & ४४ (P) कांचनवाडी पैठणरोड औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/११६०/२०१७, दिनांक १३.१२.२०१७

८. संजय जयसिंगराव भोसले, हॉटेल सुरभी, फॅमिली रेस्टॉरन्ट, Plot No.४, एन-८ CIDCO औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१५९/२०१७, दिनांक १.५.२०१७.

९. अध्यक्ष, एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी, डॉ.अब्दुल गफार कादरी, CBSC स्कूल बिल्डींग गट क्र.१८९,जटवाडा रोड, औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१४३४/२०१८, दिनांक ३०.१.२०१८

१०. प्राचार्य ओयेस्टार इंग्लिश हायस्कूल गट क्र.१५, फत्तेपुर वरूड फाटा काझी, जालनारोड, औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१०२२/२०१७, दिनांक १३.११.२०१७

११. ललीत कुमार रामगोपाल राठी, निवासी हायराईज बिल्डींग, राठी टॉवर्स CTS No.१६०३०/B जयोतीनगर,दशमेश नगर, औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१३९७/२०१८, दिनांक २२.१.२०१८.

१२. योगेश विपुलदास जव्हेरी GPA होल्डर विकास लक्ष्मण चौधरी कमर्शियल & निवासी, हायराईज बिल्डींग, P.No.१, CTS No.१५७३५/P उल्कानगरी औरंगाबाद. . Final Fire Noc No.AMC/ Fire/१६४१/२०१८, दिनांक १३.३.२०१८.

१३. कौशल्याबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट CTS No.१६०३१ स्कूल बिल्डींग,शाळा सर्व्हे नं.२८९, श्रेयनगर औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/६२५/२०१७, दिनांक ३०.८.२०१७.

१४. ओ.एम.बागला, ॲटोमोटिव्ह सिस्टीम इंडिया लिमिटेड, कंपनी & लेबर बिल्डींग, गट नं.२१७, चित्तेगांव औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/६८६/२०१७, दिनांक १२.९.२०१७.

१५. रामकृष्ण टेंपल बिल्डींग, रामकृष्ण मीशन आश्रम गट ४० (P) सातारा औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१४४१/२०१८, दिनांक ३१.१.२०१८

१६. किशोर बेनीफिशन ट्रस्ट,प्रभा चंपालाल देसरडा, एज्युकेशन फाउन्डेशन औरंगाबाद स्कूल बिल्डींग सीटीएस नं.१२२४०/२०, १२२४०/३३, सर्व्हे नं.३२१, ३२२ बायजीपुरा औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१४७६/२०१८, दिनांक ७.२.२०१८.

१७. कै.गंगोत्री काळवणे, चॅरिटेबल & रिसर्च सेन्टर ट्रस्ट हॉस्पिटल बिल्डींग,P.No.४९४ गट नं.१८१, तीसगांव औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१०४७/२०१७, दिनांक १७.११.२०१७.

१८. राजु लेखराज तनवाणी, हनुमान जगन्नाथ भोंडवे, स्कूल बिल्डींग गट नं.३१, मौजे साजापुर वाळूज महानगर सिडको ता.& जिल्हा,औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/ Fire/७५४/२०१७, दिनांक २६.९.२०१७.

१९. राजेंद्र नारायण शेवाळे, अनुराधा राजेंद्र शेवाळे, शेवाळे हॉस्पिटल बिल्डिंग प्रा.लि.P.No,२४, CTS No.१३१६१/२ श्रीनिकेतन कॉलनी औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/ Fire/७४८/२०१७, दिनांक ३१.१०.२०१७.

२०. डॉ.विद्या संतोष घळगे, अध्यक्ष महर्शी वाल्मीकी शिक्षण संस्था, अजंठा लर्निंग हब,इंग्लिश मीडीयम स्कूल बील्डींग, गट नं.१५२,अजंठा ता.सिल्लोड जि.औरंगाबाद
Final Fire Noc No.AMC/ Fire/५३६/२०१७, दिनांक १.८.२०१७

२१. गणेश पुंडलिक सोनवणे, मनेष पुंडलिक सोनवणे, कमर्शियल & निवासी हायरेज बिल्डिंग,P.No.D सर्वे नं.१८७/१/P हर्सूल औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/ Fire/१५६३/२०१८, दिनांक २३.२.२०१८

२२. डॉ.विल्मा लोनापल्ले वाडकेपीद ॲन्स हॉस्पिटल सीटीएस नं.१५५८६, १५१८६/A, गारखेडा, जालनारोड,औरंगाबाद Final Fire Noc No.AMC/ Fire/१७१७/२०१८, दिनांक २९.३.२०१८

२३. भावेश रमेशभाई पटेल, कमर्शियल कम रेसीडेन्शीयल बिल्डींग, P.No.२९ to ४५, एन-२, सिडको, औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/ Fire/१५६३/२०१८, दिनांक २३.२.२०१८.

२४. राजु तनवाणी, कमर्शीयल ॲण्ड रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग, सीटीएस नं.१४८१३, उस्मानपुरा औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/Fire/५८१/२०१७ दिनांक ११.८.२०१७.

२५. विरा टेरीनरीज प्रा.लि.चित्तेगांव ता.पैठण औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/Fire/१३२२/२०१७, दिनांक १३.१.२०१८.

२६. उन्मेश विद्याधर टाकळकर, युनायटेड सिग्मा हॉस्पिटल हेल्थ केअर प्रा.लि.CTS No.१६०३७/३०, P.No.३०, शहानूरवाडी औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/Fire/१३७५/२०१८, दिनांक २०.१.२०१८.

२७. अध्यक्ष, गोरक्ष शैक्षणिक बहुउद्येशिय संस्था, खामगांव, गोरक्ष कॉलेज ऑफ फार्मसी ॲण्ड रिसर्च सेंटर, खामगांव,गट नं.४०२, ता.फुलंब्री जि.औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/Fire/१५२७/२०१८, दिनांक १६.२.२०१८.

२८. डॉ.ब-हाळे मेडीकल सेन्टर प्रा.लि.शांती नर्सिंग होम गट नं.८/P कांचनवाडी, पैठणरोड, औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/Fire/१६८७/२०१८, दिनांक २४.३.२०१८

२९. डॉ.दिग्विजय दर्शन शिंदे, धनश्री दिग्विजय शिंदे, हॉस्पीटल बिल्डींग, गट नं.६६(P) ईटखेडा, औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/Fire/६६९/२०१७, दिनांक ८.९.२०१७

३०. छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था, हॉस्पीटल बिल्डिंग P.No,२ गट नं.४४/P कांचनवाडी औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/११५४/२०१७, दिनांक १३.२.२०१७

३१. छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था, आयुर्वेदिक कॉलेज & हॉस्पीटल बिल्डींग गट नं.४४/P, Final Fire Noc No.AMC/Fire/११५५/२०१७, दिनांक १३.२.२०१७

३२. छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था हॉस्टेल बिल्डिंग D,P.No.४ & ३८, गट नं.४४/P & ४५/P कांचनवाडी, पैठणरोड, औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/११५९/२०१७, दिनांक १३.१२.२०१७

३३. छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था डेन्टल कॉलेज & हॉस्पिटल बिल्डिंग A, P.No.४ & ३८, गट नं.४४/P & ४५/P
Final Fire Noc No.AMC/Fire/११५७/२०१७, दिनांक १३.१२.२०१७

३४. छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था गर्ल्स हॉस्टेल, A & B,P.No.४ & ३८, गट नं.४४/P & ४५/P
Final Fire Noc No.AMC/Fire/११५६/२०१७, दिनांक १३.१२.२०१७

३५. छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था, डेन्टल कॉलेज & हॉस्पिटल बिल्डिंग B
Final Fire Noc No.AMC/Fire/११५८/२०१७, दिनांक १३.१२.२०१७

३६. सौ.मिरा अर्जुन कडपे, कमर्शियल बिल्डिंग, P.No.४ CTS No. १५८४०/१३१ शिवाजीनगर रोड, औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/१३५५/२०१८, दिनांक १९.१.२०१८

३७. MS HPCL कंपनी गॅसपंप गट नं.४१/A केम्ब्रीज स्कूल जवळ, सुंदरवाडी हायवे सेन्टर जालना रोड,औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/१५१६/२०१८, दिनांक १५.२.२०१८

३८. MS HPCL कंपनी पेट्रोल डिझेल पंप गट नं.४१/A केम्ब्रीज स्कूल जवळ सुंदरवाडी हायवे सेन्टर, जालना रोड,औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/१५१७/२०१८, दिनांक १५.२.२०१८

३९. देवानंद नारायण कोटगिरे , GPA धारक ललीत कुमार रामगोपाल राठी, कमर्शियल बिल्डींग, P.No.१ व २, CTS No.१५८५४/B/२, बागशेरजंग, दाऊदपुरा, काल्डा कॉर्नर, ओरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/७५/२०१७, दिनांक १३.४.२०१७

४०. रविंद्र खिंवसरा व इतर कमर्शियल बिल्डिंग, CTS No.१२४८९/१/३८/B जालना रोड औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/Fire/२०८/२०१७, दिनांक ८.५.२०१७

४१. डॉ.मंगेश राजपुत व इतर , हॉस्पीटल बिल्डींग,प्लॉट क्र.१३६, १३७,१३८ गट क्र.७१(P) सातारा, बीड बायपास रोड, औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/५९५(A)/२०१७, दिनांक १६.८.२०१७

४२. विजय परमानंद शेट्टी, विजय रेसीडेन्सी & व्हेज रेस्टॉरन्ट & लॉजिंग, P.No.३५, टाऊन सेंटर सिडको, औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/२१४/२०१७, दिनांक १०.५.२०१७

४३. राजेश बालबक्ष बटोले The Developers & G.P.A होल्डर नभराज कन्स्ट्रक्शन, B-१, B-२ बिल्डींग, कमर्शियल रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग, गट नं.७३४/P चिकलठाणा औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/१५०३/२०१८, दिनांक १३.२.२०१८

४४. सौ.संगिता मनोज भंडारी, कमर्शियल कम रेसीडेन्शीयल बिल्डिंग, P.No. ५, सर्व्हे नं.१०, सेक्टर ,G-१, सिडको औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/१६९४/२०१८, दिनांक २४.३.२०१८

४५. सुवर्णपाल सुरेन्दर सिंग पुरी, हरमोहन सिंग, सुरेन्दरसिंग पुरी जीपीए सौ.सुखप्रीत कौर, हरमीतसींग मौनी निवासी हायराईज बिल्डींग CTS No.१६०३१, Plot No.८, श्रेयनगर उस्मानपुरा औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/३०४/२०१७, दिनांक २.६.२०१७

४६. सुनिल ओमप्रकाश अग्रवाल, ज्योती सुनिल अग्रवाल, कमर्शियल ॲन्ड रेसीडेन्शीयल बिल्डींग, CTS No.१३१९८/१०, १३१५६/०१, १३१५७/१,रोकडीया हनुमान कॉलनी, औरंगाबाद. Final Fire Noc No.AMC/Fire/८५५/२०१७, दिनांक १४.१०.२०१७

४७. अशोक नरसींगराव सरवदे, कमर्शियल कम रेसीडेन्शीयल बिल्डींग, प्लॉट क्र.०५, स.नं.१०, सेक्टर G-१ सिडको औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/१६९३/२०१८, दिनांक २४.३.२०१८

४८. कृष्णकुंज, मे.कृष्णराज बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स, विकास राजेंद्र आनंद, विवेक रमेश नवाथे, कमर्शियल ॲन्ड रेसीडेन्शीयल बिल्डींग, प्लॉट नं.९३, स.नं.२४/P गारखेडा, N-४ सिडको औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/१४८४/२०१८, दिनांक ८.२.२०१८

४९. ओम डेव्हलपर्स, श्री.राहुल मिश्रीकोटकर, कमर्शियल बिल्डींग सीटीएस नं.१७३१८, न्यू उस्मानपुरा, औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/७६९/२०१७, दिनांक ३०.९.२०१७

५०. किरण मालानी व इतर जीपीए भागचंद मुगदीया,अनिल संचेती, प्रतीक कांकरीया, अरीहंत डेव्हलपर्स कमर्शियल व रेसीडेन्शीयल बिल्डींग, गट नं.३०/१ (P) शहानूरवाडी, औरंगाबाद.

५१. चंपालाल कन्हैय्यालाल खिंवसरा कमर्शियल कम रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग. बिल्डींग १ ABC, CTS No.१५७३५/७१४ खिंवसरा लॉन्स, गारखेडा औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/५२६/२०१७, दिनांक २८.७.२०१७

५२. सचीन सुरेंद्र बेदमुथा, सौ.मीना सचिन बेदमुथा व इतर कमर्शियल कम रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग फ्लॅट नं.२० स.नं.८ (P) मुकुंदवाडी, एन२, सिडको औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/४१५/२०१७, दिनांक ८.७.२०१७

५३. मनोज पगारीया, निर्मल असोसीएट्स कमर्शियल हायराईज बिल्डींग CTS No. १२८७७/A/१, जालना रोड औरंगाबाद
Final Fire Noc No.AMC/Fire/८७५/२०१७, दिनांक १५.१.२०१७

५४. संजीवकुमार कांकरीया, सौ.नंदा संजीवकुमार कांकरीया कमर्शियल आणि रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग प्लॉट नं.१०३ आणि ९६, CTS No.५२/६/P गारखेडा औरंगाबाद
Final Fire Noc No.AMC/Fire/९६२/२०१७, दिनांक १.११.२०१७

५५. छगनलाल किसनलाल तापडीया, कमर्शियल कम रेसीडेन्शीयल बिल्डींग, CTS No.१ ६०६० (P),१६०३१ (P) श्रेयनगर औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/४९५/२०१७, दिनांक २२.७.२०१७

५६. आर.एच.एस.व्हेन्चर पार्टनर सचिन नागोरी कमर्शियल हायराईज बिल्डिंग,P.No. C-०६, C-०७, & C-०८, CTS No.२०२९५/०२/४४, २०२९५/२/३४ & २०२९५/२/३३, अदालत रोड, औरंगाबाद.
Final Fire Noc No.AMC/Fire/२७७/२०१७, दिनांक २६.५.२०१७

**उक्त प्रमाणे एकूण ५६ प्रकरणांत मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी अंतिम NOC निर्गमित करण्यापूर्वी सादरीकरणातील त्रुटींची पूर्तता झालेली आहे किंवा नाही तसेच भोगवटाधारकास अंतिम NOC निर्गमित करणे बाबत सादरीकरणात आदेश पारीत करणे कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीकोनातून आवश्यक बाब आहे. तसे न झाल्याने काही प्रकरणांत तपासणी न होताच अंतिम NOC ची सादरीकरणात मान्यता नसून सुध्दा NOC निर्गमित होणे हे प्रामुख्याने मोठ्या स्वरूपाची अनियमितता असल्याचे निदर्शनास येते.**

**३. अनुज्ञप्तीधारक (Lisence) अभिकरण (Agency) मे.फायरटार्ड फायर सेफ्टी सोलुशन्स यांची अनुज्ञप्ती वैधता दिनांक १५.२.२०१७ रोजी संपुष्टात आली. तरीही Final Fire NOC निर्गमित केलेली प्रकरणे.**

१. नारायण जनार्धन गावंडे, सुधाकर शंकरराव चिमणे, निवासी High-Rise Building Plot No ४५४ & ४५५ सेक्टर G.C.I. वाळूज महानगर -०१, औरंगाबाद Final Fire NOC No.AMC/Fire/४१७/२०१७, दिनांक ८.७.२०१७

२. डायरेक्टर नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स & इन्फॉरमेशन टेक्नोलॉजिक बॉईज हॉस्टेल बिल्डींग फायनल NOC No./AMC/Fire/१११७/२०१७, दिनांक ५.२.२०१७

**उक्त दोन प्रकरणात एजन्सीचे लायसन्स संपुष्टात आलेले आहे. तरीही एजन्सीने फॉर्म 'A' अंतिम NOC साठी अग्निशमन विभागात सादर करणे ही बाब नियमबाह्य असून याबाबत संबंधित एजन्सीवर अग्निशमन विभागाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक कायदा २००६ नुसार कार्यवाही प्रस्तावित करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही विभागाने केलेली नाही. याउलट विभागाने लायसन्स वैध नसलेल्या एजन्सीच्या फॉर्म 'A' नुसार सादर केलेल्या माहिती नुसार अंतिम NOC निर्गमित केलेली आहे. त्यामुळे उक्त दोन्ही ठिकाणी नैसर्गिक आपत्ती , आग इत्यादी मुळे होणा-या नुकसानीबाबत अग्निशमन विभाग जबाबदार राहील.**

**४. Form 'A' वर दिनांक तसेच आवक नोंदवहीत अनुज्ञप्तीधारक अभिकरणाचे (Licenced Agencies) नोंद नसलेली प्रकरणे.**

१. विजया आरोले व वसंत आरोले (कमर्शिलयल व रेसीडेन्शीयल) बिल्डींग, P.No.१ CTS No.१८३१८ शिट नं.१५५ & १५६ रचनाकर को ऑप.हौसींग सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड औरंगाबाद.
Final Fire NOC No.AMC/Fire/२५३/२०१७, दिनांक १९.५.२०१७

२. भावेश रमेशभाई पटेल, कमर्शियल कम रेसीडेन्शीयल बिल्डींग, P.No.२९ & ४५, N-२ सिडको औरंगाबाद. Final Fire NOC No.AMC /Fire /२६५ / २०१७, दिनांक २०.५.२०१७

३. राजु तनवाणी, कमर्शियल & रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग CTS No.१४८१३,उस्मानपुरा औरंगाबाद. Final Fire NOC No.AMC/Fire /५८१ / २०१७, दिनांक ११.८.२०१७

४. आनंद अमृतराव देशपांडे जीपीए सुनिल दयानंद ढील्पे मे.वास्तु प्रभा डेव्हलपर्स आणि बिल्डर्स, रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग, प्लॉट क्र.२, गट क्र.२४/P, ईटखेडा औरंगाबाद. Final Fire NOC No.AMC/Fire /२५४ / २०१७, दिनांक १९.५.२०१७

५. अर्जून नारायण कडपे, कमर्शियल बिल्डींग, प्लॉट नं.०६, CTS No.१५८४०/१३३, शिवाजीनगर रोड औरंगाबाद. Final Fire NOC No.AMC/Fire /२५२/ २०१७, दिनांक १९.५.२०१७.

**महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक कायदा २००६ मधील तरतुदीनुसार भोगवटाधारकाने अनुज्ञप्तीधारक अभिकरणामार्फत (Licenced Agencies) केलेल्या उपाययोजने संबंधी पार पाडलेल्या कामाबाबत नमुना अ मध्ये प्रमाणपत्र देवून त्यावर दिनांक नमूद करणे आवश्यक आहे. उक्त प्रकरणात असे निदर्शनास आले आहे की, नमुना 'अ' वर एजन्सीने दिनांक नमूद केलेली नाही. तसेच अग्निशमन विभागात सदरील फॉर्म प्राप्त झाल्यानंतर त्या फॉर्मवर आवक क्रमांक नोंदविलेला नाही. त्यामुळे सादर झालेले अभिलेख्यांची वैधतेबाबत साशंकता निर्माण होते. विभागाने सर्व बाबींची पूर्तता नसतांनाही अंतिम Fire NOC निर्गमित केलेली आहे.**

## ५. नमुना "अ" अनुज्ञप्तीधारक(Licenced) अभिकरणाने (Agencies) सादर न केलेली प्रकरणे.

१. संजय जयसिंगराव भोसले, हॉटेल सुरभि फॅमिली रेस्टॉरन्ट, Plot No.४, N-८,सिडको औरंगाबाद. Final Fire NoC NO.AMC /Fire /१५९ / २०१७ दि.१.५.२०१७

२. अध्यक्ष एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष डॉ.अब्दुल कादरी CBSE स्कूल गट नं.१८९, जटवाडा रोड, औरंगाबाद. Final Fire NoC NO.AMC/Fire /१४३४ /२०१८,दि.३०.१.२०१८.

३. डॉ.विद्या संतोष घळगे, (अध्यक्ष) महर्षी वाल्मिकी शिक्षण संस्था, अजंठा लर्निंग हब इंग्लिश मिडीयम स्कूल, गट नं.१५२, अजिंठा ता.सिल्लोड औरंगाबाद.
Final Fire NoC NO.AMC/Fire /५३६ /२०१७,दि.१.८.२०१७

४. छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था, आयुर्वेदिक कॉलेज & बिल्डींग गट नं.४४/P, कांचनवाडी औरंगाबाद.
Final Fire NoC NO.AMC/Fire /११५५ /२०१७,दि.१३.१२.२०१७

५. MS.HPCL कंपनी, गॅस पंप गट नं.४१/A केम्ब्रीज स्कूल जवळ, सुंदरवाडी हायवे, सेन्टर जालनारोड औरंगाबाद.
Final Fire NoC NO.AMC/Fire /१५१६ /२०१८,दि.१५.२.२०१८.

६. MS.HPCL कंपनी, पेट्रोल डिझेल पंप, जालना रोड,गट क्र.४१/A ,केम्ब्रीज स्कूल जवळ, सुंदरवाडी हायवे सेन्टर, औरंगाबाद.
Final Fire NoC NO.AMC/Fire /१५१७ /२०१८,दि.१५.२.२०१८.

**महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक कायदा २००६ मधील तरतुदीनुसार भोगवटाधारकाने अनुज्ञप्तीधारक अभिकरणामार्फत (Licenced Agencies) केलेल्या उपाययोजने संबंधी पार पाडलेल्या कामाबाबत नमुना अ मध्ये प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. अग्निशमन विभाग एजन्सीने प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यानुसार प्रत्यक्ष स्थळपाहणी करून केलेल्या उपाययोजनेचा तपासणी अहवाल अग्निशमन विभागामार्फत अधिकारी/कर्मचारी संचिकेत सादर करतात. तद्नंतरच अंतिम NOC निर्गमित केल्या जाते. उक्त प्रकरणात असे निदर्शनास आले आहे की, नमुना 'अ' एजन्सीने सादर केलेले नसतांनाही अंतिम Fire NOC निर्गमित केलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक कायदा २००६ मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.**

## ६. सन २०१७-२०१८ या वर्षात अग्निशमन विभागाने निर्गमित केलेल्या अंतिम NOC तील खालील काही प्रकरणांत अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे -

१. श्री.उन्मेश विद्याधर टाकळकर, युनायटेड सिग्मा हॉस्पिटल हेल्थ केअर प्रा.लि.,CTS No. १६०३७/३०, P.No.३०,शहानूरवाडी औरंगाबाद Fire NOC ही जा.क्र.मनपा/Fire/१३७५/२०१७, दिनांक २०.१.२०१८ मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिनांक २०.१.२०१८ रोजी प्रकरण तपासणीसाठी ठेवावे असे अभिप्राय दिलेले आहे. प्रत्यक्षात संचिकेत तपासणी अहवाल सादर केलेला नाही. तरी सुध्दा अंतिम NOC निर्गमित झालेली आहे.

२. श्री.गणेश बिल्डर्स & डेव्हलपर्स श्री.अंबिका इस्टेट & डेव्हलपर्स पार्टनर श्री.कमलेश जे परमार व इतर P.No.१६,१७,२०,२१,२८,३०,३१,३२,३३, गट क्र.११७ आणि १/P नक्षत्रवाडी औरंगाबाद येथे कमर्शियल & रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग साठी १४०५/२०१८, दिनांक २५.१.२०१८ नुसार अंतिम एनओसी दिलेली आहे. याच जागेबाबत यापूर्वी श्री.अंबिका इस्टेट & डेव्हलपर्स या नांवे जा.क्र.मनपा /Fire / १३५६/२०१८, दिनांक १९.१.२०१८ अन्वये अंतिम Fire NOC निर्गमित झालेली आहे. एकाच इमारतीसाठी दोन वेगवेगळ्या अंतिम फायर NOC मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी त्याच्या स्वाक्षरीने निर्गमित केलेले असून नियमाप्रमाणे ही बाब अयोग्य आहे. संचिकेत कुठेही गणेश बिल्डर्स यांच्या नावाने नमुना 'अ' निर्गमित झालेला नसतांनाही अंतिम Fire NOC श्री.गणेश बिल्डर्स & डेव्हलपर्स यांच्या नावाने निर्गमित केलेली आहे.

महापालिके तर्फे निर्गमित झालेल्या, अभिलेख्यात, जसे बांधकाम परवाना, मालमत्ता कर भरणा पावती LBT नोंदणी प्रमाणपत्र अकृषीकर इत्यादीवर अंबिका इस्टेट & डेव्हलपर्स यांच्याच नावाचा उल्लेख आहे. तसेच खुल्या जागेची खरेदी खतावरचे सुध्दा अंबिका डेव्हलपर्स यांच्याच नावाचा उल्लेख आहे.

अग्निशमन विभागाने केवळ श्री.गणेश बिल्डर्स & डेव्हलपर्स यांनी उक्त मालमत्तेवरील बांधकामाच्या भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्या संदर्भाने फायनल Fire NOC ची गरज आहे असे नमूद करून दिनांक ५.१.२०१८ रोजी अर्ज सादर केलेला आहे. या अर्जावरून सादरीकरण कोठेही गणेश बिल्डर्सच्या नावाचा उल्लेख नाही.

तसेच जा.क्र.मनपा/Fire/१३५६/२०१८, दिनांक १९.१.२०१८ निर्गमित करतांना from 'A' गट नं ११७ ऐवजी केवळ १७ नमूद असून सुध्दा अंतिम फायर NOC निर्गमित केलेली आहे.

३. श्री.राजेंद्र नारायण शेवाळे, सौ.अनुराधा राजेंद्र शेवाळे, शेवाळे हॉस्पिटल, सीटीएस नं. १३१६१/२, प्लॉट नं.२५, श्रीनिकेतन कॉलनी, औरंगाबाद अंतिम फायर NOC क्र.मनपा/फायर/७४८/२०१७ दिनांक ३१.१०.२०१७ अशा क्रमांकाने निर्गमित झालेला आहे. प्रत्यक्षात आवक रजिस्टरला ७४८/२०१७ दिनांक २५.९.२०१७ वर मॅनेजींग डायरेक्टर, धनदा कार्पो लि.हॉटेल वेदांत रेस्टॉरेन्ट ॲण्ड लॉजिंग, रेल्वेस्टेशन रोड औरंगाबाद यांना NOC नुतनीकरणाबाबत कळविण्यात आलेले आहे. म्हणजेच श्री.डॉ.राजेंद्र नारायण शेवाळे यांच्या नावे दिलेला फायनल फायर NOC वरील जा.क्र.चूकीचा नोंदविला आहे. याबाबत जावक रजिस्टर तपासले असता त्याच्या नावे FinalFireNOC No.AMC/Fire/९४८/२०१७, दिनांक ३१.१०.२०१७ अन्वये देण्यात आले.

तसेच संचिकेत दिनांक २३.९.२०१७ रोजी बसविलेली उपकरणे तपासणीचा अहवाल सादर झालेला आहे. तद्नंतर जा.क्र.मनपा/ अशाद / ७४९/२०१७ दिनांक ३१.१०.२०१७ रोजी दिनांक २३.९.२०१७ च्या स्थळ पाहणी नुसार हॉस्पिटल मधील पार्कींग एरियामध्ये वाहन आत प्रवेशासाठी व बाहेर येण्यासाठी पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली नाही ती करण्यात यावी त्यानंतरच अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्राची कार्यवाही करण्यात येईल असे नमूद आहे. परंतू उक्त पत्राप्रमाणे संबंधिताने कार्यवाही केली किंवा नाही याबाबतचा अहवाल संचिकेत नाही असे असतांनाही अंतिम फायर NOC निर्गमित झालेली आहे.

४. Final Fire NOC देण्यापूर्वी अनुज्ञप्तीधारक अभिकरणाने Form 'A' मध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (२००७ चा महा.३) यांच्या तरतूदीनुसार आवश्यक केल्याप्रमाणे इमारतींमध्ये किंवा जागांमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना करण्यासंबंधात व अन्य तदानुषंगीक बाबींचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने कामे पार पाडली आहेत असे प्रमाणित करणे आवश्यक आहे. अशा अनुज्ञप्तीधारक अभिकरणाचे नावाचा उल्लेख संचिकेच्या सादरीकरणास विभागाने केलेला नाही.

५. कौशल्याबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट CTS No. १६०३१ स्कूल बिल्डींग शाळा, सर्व्हे नं.२८९, श्रेयनगर औरंगाबाद Final Fire NoC AMC/Fire/६२५/२०१७, दिनांक ३०.८.२०१७ संचिकेत दिनांक २६.८.२०१७ रोजी मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी स्प्रिंकलर सिस्टीम करणे आवश्यक आहे असे सादरीकरणात अभिप्राय नोंदविला आहे. तथापि संबंधितांनी या बाबींची पूर्तता केलेली आहे किंवा नाही याची खात्री न करताच विभागाने अंतिम फायर NOC दिनांक ३०.८.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

६. रामकृष्ण टेंपल बिल्डींग, रामकृष्ण मिशन आश्रम, गट नं.४० (P), सातारा औरंगाबाद Final Fire NOC.No.AMC/Fire/१४४१/२०१८ दिनांक ३१.१.२०१८ संचिकेत दिनांक ३१.१.२०१८ रोजी संबंधिताचे प्रकरण तपासणी साठी ठेवा असा शेरा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी संचिकेत दिलेला आहे. तपासणी न होताच दिनांक ३१.१.२०१८ रोजी सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसतांना अंतिम Final NOC देण्यात आलेली आहे.

७. राजु तनवानी, कमर्शियल & रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग, CTS No.१४८१३, उस्मानपुरा औरंगाबाद Final Fire NOC No.AMC/Fire/५८१ /२०१७ दिनांक ११.८.२०१७ संचिकेत दिनांक ११.८.२०१७ रोजी सादरीकरणात मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी तपासा असा शेरा दिलेला आहे. तद्नंतर संचिकेत तपासणी झाल्याचा अहवाल नाही. तसेच संबंधितांना २०१७ या वर्षात NOC निर्गमित झालेली असल्याने मा.स्थायी समितीचा ठराव क्र. २१२ दिनांक १७.३.२०११ नुसार अर्थसंकल्पीय बैठकीमध्ये ही फी आकारणी व दरवाढीस मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार रू.१०,०००/- घेणे आवश्यक होते. संबंधित भोगवटाधारकाने २०१० या वर्षात रू.५०००/- ना हरकत प्रमाणपत्राची फीस भरणा केलेली आहे. उर्वरीत रक्कम वसूली केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. प्रकरणात उक्त बाबींची पूर्तता झालेली नसतांनाही अंतिम फायर NOC निर्गमित करण्यात आलेली आहे.

८. विरा टॅनरीज प्रा.लि.चित्तेगांव ता.पैठण, औरंगाबाद Final Fire NOC No.AMC/Fire/१३२२/२०१८ दिनांक १३.१.२०१८ संचिकेत नमुना 'अ' वरील दिनांक १३.२.२०१८ अशी आहे. तत्पूर्वीच NOC निर्गमित झालेली आहे. तसेच मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिनांक २९.११.२०१७ रोजी तपासणीसाठी ठेवा असा शेरा दिलेला आहे. परंतू तपासणीनंतर संचिकेत तपासणी अहवाल सादर केलेला नाही त्याप्रमाणे सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

९. श्री.मंगेश भावसिंग राजपुत व इतर हॉस्पिटल बिल्डींग P.No.१३६,१३७,१३८ गट नं.७१/P सातारा बीडबायपास रोड औरंगाबाद. Final Fire NoC No.AMc/Fire/५९५/A/२०१७, दिनांक १६.८.२०१७ अन्वये संबंधितास अंतिम NOC देण्यात आली. अंतिम NOC ची रक्कम नऊ महिने उशिराने पावती क्र.११७३५३ दिनांक १०.५.२०१८ रोजी रक्कम रू.१०,०००/- महानगरपालिका फंडात जमा झाल्याने महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले आहे.

१०. चंपालाल कन्हैय्यालाल खिंवसरा कमर्शियल कम रेसीडेन्शीयल हायराईज बिल्डींग बिल्डींग -१ ABC CTS No.१५७३५/७/४ खिंवसरा लॉन्स, गारखेडा औरंगाबाद Final Fire NOC No.AMC/Fire/५२६/२०१७ दिनांक २८.७.२०१७.

सदरील प्रकरणात प्राकृतिक इन्फ्रा सर्व्हीस प्रा.लि. यांनी Form 'A' सादर केला आहे. परंतू त्यावर दिनांक नमूद नाही. तसेच Form 'A' वरील CTS No.१५७३५/७/४ असा आहे जो उक्त NOC मधील CTS क्रमांकासोबत जूळत नाही.

११. मनोज पगारीया, निर्मल असोसिएटस् कमर्शियल हायराईज, बिल्डींग, CTS No.१२८७७/A/१७ जालना रोड औरंगाबाद Final Fire NOC No.AMC/Fire/८७५/२०१७ दिनांक १५.१०.२०१७. उक्त प्रकरणात मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी प्रकरण तपासणीसाठी ठेवा असा शेरा सादरीकरणात दिला आहे. परंतू तपासणीबाबत अहवाल सादरीकरणात नाही. अंतीम मान्यता नाही. तरीसुध्दा अंतीम Fire NOC निर्गमित झालेले आहे.

१२. रविंद्र सि.खिंवसरा व इतर कमर्शियल बिल्डींग, CTS No.१२४८९/१३८, जालना रोड औरंगाबाद Final Fire No.AMC/Fire/२०८/२०१७ दिनांक ८.५.२०१७ रोजी देण्यात आली. उक्त प्रकरणात मुख्य अग्निशमन विभागाने अंतिम Fire NOC AMC/Fire/२००/२०१७, दिनांक ८.५.२०१७ रोजी जावक रजिस्टरच्या नोंदीवरून दिसून येते.

**उक्त अनियमिततेची पूर्तता विभागाने केलेली नसल्याने आग नैसर्गिक आपत्ती इत्यादी बाबीमुळे निर्माण होणा-या परिस्थितीत होणा-या नुकसानीबाबत अग्निशमन विभाग सर्वस्वी जबाबदार राहील.**

**७.** अग्निशमन विभागाने सन २०१७-२०१८ या वर्षात निर्गमित केलेली NOC च्या प्रकरणांपैकी काही प्रकरणे महानगरपालिका हद्यीच्या बाहेरील आहेत. अग्निशमन विभागास याबाबत विचारणा केली असता विभागाने तोंडी खुलासा सादर केला की, कार्यक्षेत्राबाहेर सुमारे २० चौ.किलोमीटर परिसरात आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन सेवा देणे बंधनकारक आहे. त्यानुसार विभागाने महापालिका हद्यीबाहेरील भोगवटा धारकांना अंतिम फायर NOC निर्गमित केलेली आहेत.

**महानगरपालिका हद्यीच्या बाहेरील भोगवटा धारकांना अंतिम फायर NOC निर्गमित करण्याचे अधिकाराबाबत शासन निर्णय/ स्थायी आदेश अग्निशमन विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही. केवळ आपत्कालीन परिस्थितीत शासनाने कार्यक्षेत्राबाहेर २० चौ.किलोमीटर परिसरात अग्निशमन सेवा देणे बंधनकारक आहे. याचा आधार घेवून अंतिम फायर एनओसी निर्गमित करणे ही बाब संयुक्तिक नाही.**

**उपरोक्त मुद्येनिहाय प्राथमिक चौकशी अहवाल माहितीस्त्व सविनय सादर.**

# *पैठण रोड येथे डि.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबतच्या संचिकेतील वाढीव अंदाजपत्रकाबाबत प्राथमिक तपासणी अहवाल.*

**पैठण रोड, नाथ सिड्स ते दिशा संस्कृती डी.पी. रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स.सदस्य श्री.नंदकुमार घोडेले यांनी विनंती केली आहे. तांत्रिक विभागाने महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाच्या सन २०१३-१४ च्या दर सूचीनुसार रक्कम रू.१,७८,८४,५२१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.**

सदरील काम डी.पी.डी.सी.फंडातून करण्यासाठी प्रस्तावित आहे. डी.पी.डी.सी.फंडातून सलीम अली सरोवर व जापानीज गार्डन करिता ठेवण्यात आलेला निधी रक्कम रू.५९,०८,०६४/- इतका उक्त कामासाठी वापरण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. यास तत्कालीन आयुक्तांनी दिनांक १२.१.२०१६ रोजी मान्यता दिली. तथापि, डी.पी.डी.सी फंडामधून सदरचे काम करण्यास मान्यता मिळाली नाही. सदरचे काम अत्यावश्यक असल्याने विशेष बाब म्हणून पैठणरोड व सिडकोला जोडणारा रस्ता असल्याने महानगरपालिका फंडातून काम प्रस्तावित केले. यास दिनांक ८.६.२०१६ रोजी तत्कालीन आयुक्तांनी मान्यता दिली. तद्नंतर सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.४७०, दिनांक १८.६.२०१६ अन्वये पारित करण्यात आला. मा.सर्वसाधारण सभेने सदरील कामाच्या अंदाजपत्रक रक्कम रू. १,७८,८४,५२१/- यास मान्यता प्रदान केली.

मा.सर्वसाधारण सभेतून मान्यता प्रदान केल्यानंतर कामाचे अंदाजपत्रकीय नोंद घेण्यासाठी प्रकरणाची संचिका दिनांक २४.६.२०१६ रोजी लेखा शाखेकडे पाठविण्यात आली. लेखा शाखेने परिच्छेद (२८) नुसार सदरील कामाची नोंद २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे, असे नमूद करून प्रस्तावास मान्यता देण्यासाठी संचिका मा.आयुक्त यांचेकडे दिनांक ८.८.२०१६ रोजी पाठविण्यात आली. त्यास तत्कालीन आयुक्तांनी मान्यता प्रदान केली.

तद्नंतर सदरील कामाची निविदा सूचना प्रसिध्दीस देवून निविदा दिनांक १५.९.२०१६ रोजी मागविण्यात आल्या. दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. यामध्ये मो.अहमद सिद्यीकी यांची तुलनात्मक दृष्टया अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.४७% कमी दराची निविदा प्राप्त झाली. मा.आयुक्त यांनी दिनांक २६.१०.२०१६ रोजी सदरील निविदा स्विकृतीसाठी मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवण्यासाठी मान्यता दिली.

मा.स्थायी समितीने विषय क्र.९५ दिनांक २४.११.२०१६ अन्वये संबंधितांचे निविदा दर स्वीकृत करण्यात आले. रू.१,६१,९०,८५६.४८ ची निविदा अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले.

कार्यालयीन आदेश क्र.मनपा/झोन क्र.७/वॉर्ड अभि/४१५/२०१६, दिनांक १४.१२.२०१६ अन्वये मोहम्मद अहेमद सिद्यीकी यांना सदरील कामाचे कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ६ महिने ठेवण्यात आली आहे.

दिनांक १६.१०.२०१७ रोजी कार्यकारी अभियंता यांनी सदरील कामाचे देयकात २०% रक्कम गोठवून ठेवली. कामास दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत मुदतवाढ प्रस्तावित केली. प्रथम व दरम्यानचे रू.८४,६१,९१७/- रकमेचे देयके प्रदान करण्यासाठी संचिका लेखा शाखेकडे पाठविली.

दिनांक २९.१०.२०१७ रोजी लेखा शाखेने प्रथम व दरम्यानचे देयक अदायगी करीता शहर अभियंता यांचेकडे लेखा शाखेच्या अभिप्राय व शिफारशीसह संचिका पाठविली.

दिनांक १६.११.२०१७ रोजी कार्यकारी अभियंता यांनी देयके देण्यास मान्यता देण्यासाठी मा.आयुक्तांकडे प्रस्तावित केले. मा.आयुक्तांनी सदरील देयकास दिनांक २८.११.२०१७ रोजी मान्यता दिली. लेखा शाखेने दिनांक २८.११.२०१७ रोजी रू.८४,६१,९१७/- रकमेचे देयक पारीत केले.

परिच्छेद ६२ ते ६४ मध्ये शाखा अभियंता यांनी दुसरे व दरम्यानचे देयक रू. ६६,४३,०९९/- प्रस्तावित केले. या देयकात रू.२,३३,८६०/- चे अतिरिक्त बाबींच्या कामाचा समावेश आहे. अतिरिक्त कामामुळे दिनांक २०.५.२०१८ पर्यंत मुदतवाढ प्रस्तावित केली. संचिका लेखा विभागास सादर केली.

दुसरे व दरम्यानचे देयक अदायगीच्या मंजूरीसाठी रू.६६,४३,०९९/- लेखा शाखेच्या अभिप्राय व शिफारशीसह शहर अभियंता यांचेकडे सादर केली. शाखा अभियंता यांनी दिनांक १०.४.२०१८ रोजी मान्यता दिली.

एम.आय.टी.कॉलेज कडून Third Party Inspection केल्याचे परिच्छेद ७६ मध्ये नमूद आहे. उक्त देयकास मा.आयुक्त यांनी १८.६.२०१८ रोजी मान्यता दिली.दिनांक ७.७.२०१८ रोजी लेखा शाखेने देयक पारीत केले.

परिच्छेद क्र.७९ ते ८२ मध्ये प्रस्तावित करण्यात आले की, मा.महापौर, यांनी औरंगाबाद पैठण मुख्य रस्त्यापासून दिशा संस्कृती (कृषी विद्यालयाच्या बाजूचा दिशा संस्कृतीकडे) जाणा-या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम हाती घ्यावे असे आदेश केले. काम करावयाचे झाल्यास रू.२८,६५,०००/-इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कम मूळ कामाच्या अंदाजपत्रकात समाविष्ट केल्यावर एकूण अंदाजपत्रक रक्कम २,०७,४९,५२०/- इतकी होते. कामास ३१.१२.२०१८ पर्यंत मुदतवाढ प्रस्तावित आहे.

परिच्छेद ८३ ते ८७ मध्ये लेखा शाखेने अभिप्राय दिले आहेत की, CVC Guideline नुसार नविन अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश आहेत. प्रस्तावित केल्याप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रू.२,०७,४९,५२०/- मूळ निविदा दर व वाढीव कामाच्या कालावधीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे असे नमूद करून संचिका अतिरिक्त आयुक्त यांचेकडे पाठविण्यात आली.

तांत्रिक कक्षाने सदरील कामासाठी रू.१,५१,०५,०१६/- इतका खर्च झाला आहे असे नमूद केले. तसेच लेखा शाखा व कार्यकारी अभियंता यांचे प्रस्तावानुसार प्रकरण अतिरिक्त आयुक्तांकडे सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव प्रस्तावित केले आहे. सदरील संचिका पुढे अतिरिक्त आयुक्त यांच्या समक्ष गेलेली नाही.

सदरील प्रकरणात खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

१. **सदरील कामाचे कार्यादेश दिनांक १४.१२.२०१६ रोजी दिलेले आहेत. कामाची मुदत ६ महिने होती. प्रथम व दरम्यानचे देयक दिनांक १६.१०.२०१७ रोजी प्रस्तावित करण्यात आले. त्या तारखेस कामाची मुदत संपलेली होती. प्रथम व दरम्यानचे देयकास मंजूरी देतांना सदरील कामास मुदतवाढ दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत देण्यात आली. परंतू मुदतवाढीचे कारणे संचिकेत नमूद नाही.**

२. **रू.२८,६५,०००/- वाढीव नविन रस्त्याचे काम असल्याने यासाठी स्वतंत्र नविन निविदा काढणे उचित राहील. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागात शासन परिपत्रक क्र.संकीर्ण- २०१८ / प्र.क्र.५३९/नवि-२०, दिनांक ८ जून २०१८ अन्वये नागरी स्थानिक संस्था मार्फत राबविण्यात येणा-या निविदा प्रक्रिया बाबत दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.**

# *राठी टॉवर , दशमेशनगर येथील नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट पुल बांधणे बाबतच्या संचिकेतील वाढीव अंदाजपत्रकाबाबत प्राथमिक तपासणी अहवाल.*

मा. महापौर, महानगरपालिका औरंगाबाद यांचे कार्यालयीन पत्र क्र.मनपा/महापौर / २०१८/९२३,दिनांक २०.७.२०१८ अन्वये राठी टॉवर ,दशमेशनगर येथील नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट पुल बांधणे बाबतच्या संचिकेतील वाढीव अंदाजपत्रकाबाबतच्या प्रकरणांची पडताळणी,तपासणी करून लेखापरीक्षणाचा प्राथमिक अहवाल सादर करणे बाबत कळविलेले असून पत्रासोबत प्रकरणाची मूळ संचिका लेखापरीक्षण विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार मुख्य लेखापरीक्षक यांचे मार्फत Post Audit चे काम करण्यात येते. Pre-Audit चे काम महानगरपालिकेतील लेखा शाखेमार्फत करण्यात येते.

मा.महापौर यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रकरणांमधील कामे सद्यस्थितीत पूर्ण झालेली नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. तसेच सदरील संचिका संबंधित विभागाकडून लेखापरीक्षण विभागास प्राप्त न होता मा.महापौर यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या आहेत. उक्त संचिकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे संचिकेतील मुद्येनिहाय संक्षिप्त बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**राठी टॉवर्स, दशमेशनगर येथील नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट पुल बांधणेसाठी तांत्रिक विभागाने प्रत्यक्ष स्थळपाहणी केली. सदरील ठिकाणचे बॉक्स कल्व्हर्टचे काम करणेसाठी विशेष बाब म्हणून संबंधित वॉर्डाच्या नगरसेविका शिल्पाराणी वाडकर यांच्या मागणीनुसार काम प्रस्तावित करण्यात आले. राठी टॉवर्स भागातील सर्व गटार व पाईप ब्लॉक होत असल्याने त्यासाठी बॉक्स कल्व्हर्ट पुल बांधणे आवश्यक असल्याबाबत नमूद आहे. सन २०१५-२०१६ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार रक्कम रू. ३०,६१,९२१/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.**

सन २०१०-२०११ या वर्षात महानगरपालिके तर्फे डिफर्ड पेमेंट मधून शहरातील विविध ठिकाणी आर.सी.सी.ब्रिज बांधण्याचे प्रस्तावित होते. यासाठी रू.१.१३ कोटीचे अंदाजपत्रक करण्यात आले होते. या प्रस्तावामध्ये राठी टॉवर्स दशमेशनगर येथील पुलाचाही समावेश होता. तथापि, राठी टॉवर्स, दशमेश नगर येथील पुलाचे काम तातडीने पूर्ण करणे गरजेचे असल्याने संबंधित वॉर्डाच्या नगरसेविका शिल्पाराणी वाडकर, मा.आयुक्त व मा.महापौर यांनी विनंती केली. उक्त कामासाठी मा.महापौर यांनी “महापौर आपतकालिन निधी” या लेखाशिर्षातून सन २०१६-२०१७ मध्ये रू.२५ लक्षची तरतूद उपलब्ध करून दिली.

सदरील कामासाठी मा.आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी दिनांक २४.८.२०१६ रोजी रू.३०,६१,९२१/- चे अंदाजपत्रकास मान्यता दिली. सदरील संचिका लेखा विभागामार्फत अंदाजपत्रकीय तरतूद नोंदवून प्रशासकीय मान्यतेसाठी पुनश्च मा.आयुक्त यांचेकडे सादर करण्यात आली. दिनांक १९.९.२०१६ रोजी मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

तद्नंतर विषय क्र.४८, दिनांक २७.९.२०१६ रोजी मा.स्थायी समिती सभेने रू.३०,६१,९२१/- च्या अंदाजपत्रकास मान्यता दिली. त्यानुसार ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. तीन वेळा निविदेस प्रतिसाद मिळाला नाही. चौथ्या वेळी एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२२% जास्तीच्या दराची होती. सदरील दराबाबत मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले. संबंधित एजन्सीने अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्तीच्या दराने काम करण्यास संमती दिली. त्यानुसार संबंधितांचे दर मंजूर करण्यासाठी दिनांक १९.४.२०१७ रोजी मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. मा.स्थायी समिती सभापतीची निवड झालेली नसल्याने मा.स्थायी समिती कार्यान्वित नव्हती, परंतू सदरील ठिकाणचे काम मान्सूनपूर्व होणे आवश्यक असल्याने मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला. मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.१०५७, दिनांक २०.५.२०१७ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३५ (१) अन्वये ठराव पारीत केला. त्यानुसार संबंधित एजन्सीकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराची रक्कम रू.३१,३२,५४७/- ची निविदा स्विकृत करण्यात आली. तसेच करार करण्यास मंजूरी देण्यात आली.

तद्नंतर कार्यालयीन आदेश क्र.१८५, दिनांक २.६.२०१७ अन्वये सदरील कामाचे मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत ६ महिने कार्यादेशात नमूद आहे.

प्रकरणांत दिनांक १७.४.२०१८ रोजी संबंधित विभागाचे शाखा अभियंता यांनी संचिकेतील परिच्छेद क्र.६४ ते ६७ मध्ये प्रस्तावित केले की, सदरील कामाच्या खोदकामा दरम्यान भुमिगत गटार योजनेची मेन सिव्हर लाईन, पाणीपुरवठा लाईन, बी.एस.एन.एल., रिलायन्स, टाटा यांच्या ओएफसी केबल बॉक्स कल्व्हेटच्या कामात अडथळा निर्माण करीत आहे. त्यामुळे तांत्रिक दृष्ट्या बॉक्स कल्व्हेट बांधणी शक्य नसल्याने आर.सी.सी.पुल बांधणे प्रस्तावित केले. यासाठी पुलाचे डिझाईन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे तांत्रिक तपासणीसाठी सादर केले.आर.सी.सी.पुलाचे बांधकामासाठी अतिरिक्त बाबीसह रू.७६,०५,००४/- एवढ्या रकमेचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले. तसेच निविदाधारक एजन्सीचे १०% जास्त असल्याकारणाने रू.८३,००,८६०/- चा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च मा.महापौर यांनी सुचविलेल्या अत्यावश्यक खर्चातून करता येईल असे नमूद आहे. सदरील सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेस्तव व झालेल्या कामाचे पहिले व दरम्यानचे देयक रू.३५,१०,०९४/- मान्यतेस्तव सादर करून सदरील कामास दिनांक ३०.८.२०१८ पर्यंत मुदतवाढ प्रस्तावित आहे.

प्रथम व दरम्यानचे देयक अदायगीसाठी संचिका दिनांक २९.५.२०१८ रोजी लेखा शाखेकडे पाठविण्यात आली. लेखा शाखेने परिच्छेद ७६ ते ८३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रकास व अतिरिक्त बाबीस सक्षम प्राधिकरणाची (मा.सर्वसाधारण सभा) मान्यता अनिवार्य आहे. रू. ३५,१०,०९४/- चे देयक प्रदान करण्याची शिफारस केली आहे. परिच्छेद ८४ मध्ये दिनांक ८.६.२०१८ रोजी शहर अभियंता यांनी देयक मान्य करणे व प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे असे नमूद केले आहे.

तांत्रिक कक्षाने दिनांक १८.६.२०१८ रोजी प्रस्तावास मान्यता देण्यासाठी प्रस्तावित केले. अतिरिक्त आयुक्त यांनी दिनांक ३०.६.२०१८ रोजी प्रस्ताव मान्य केला.तद्नंतर लेखा शाखेने त्याच तारखेस देयक पारीत केले आहे.

परिच्छेद ९१ अन्वये उपअभियंता यांनी मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रस्तावित केले. दिनांक ६.७.२०१८ रोजी अतिरिक्त आयुक्त यांनी प्रस्ताव मा.महापौर यांचेकडे सादर केला.

विषय क्र.५३५, दिनांक १८.७.२०१८ अन्वये सुधारित अंदाजपत्रक अतिरिक्त बाबीसह तसेच निविदादर १०% जास्त दराने रू.८३,००,८६०/- च्या कामास मान्यता प्रदान केली.

विषयांकित मुद्येनिहाय बाबीवरून प्रकरणांत खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

१. **बॉक्स कल्व्हर्टचे काम प्रस्तावित होण्यापूर्वी प्रत्यक्ष स्थळपाहणी तांत्रिक विभागाने केलेली आहे. सदरील ठिकाणचे खोदकाम करतेवेळी भुमिगत गटार योजनेचे मेन सिव्हर लाईन, पाणीपुरवठा लाईन, बी.एस.एन.एल, रिलायन्स, टाटा यांच्या ओएफसी केबल इत्यादी बाबींमुळे अडथळा झाला असल्याचे निदर्शनास आले. त्याचवेळी तांत्रिक विभागाने नविन निविदा मागविणे व त्यानुसार काम करणे आवश्यक होते. विभागाने तसे न करता बॉक्स कल्व्हर्ट ऐवजी आर.सी.सी.पुलाचे काम प्रस्तावित केलेले आहे. असे काम प्रस्तावित करतांना सुधारित अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय पूर्व मान्यता सक्षम प्राधिकरणाची घेणे आवश्यक होते. सदरील कामाच्या अंदाजपत्रकात रू.५२,३८,९३९/- इतक्या रकमेची वाढ झाल्यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडला. प्रत्यक्षात तांत्रिक विभागाने सदरील ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केल्यानंतर भुमिगत गटार योजना व पाणीपुरवठा योजना या दोन्ही विभागांच्या विभाग प्रमुखांशी समन्वय साधला नसल्यामुळे सुधारित अंदाजपत्रकावर वाढीव खर्च सोसावा लागला. तसेच तांत्रिक विभागाने तब्बल दहा महिन्यानंतर सुधारित अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केले आहे. सुधारित अंदाजपत्रकास मान्यता घेतली नसतांना देखील प्रथम व दरम्यानचे देयक सादर केले ही बाब नियमबाह्य आहे.**

२. **सुधारित अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकरण (मा.सर्वसाधारण सभा) यांची दिनांक ११.७.२०१८ रोजी मान्यता प्राप्त आहे. तथापि, प्रथम व दरम्यानचे देयक सुधारित अंदाजपत्रकानुसार रू.३५,१०,०९४/- यास अतिरिक्त आयुक्त यांनी दिनांक ३०.६.२०१८ रोजी देयक प्रदान करण्यास सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेपूर्वी मान्यता दिली व लेखा शाखेने दिनांक ३०.६.२०१८ रोजी देयक पारीत केले.**

३. मा.आयुक्त यांनी कार्यालयीन आदेश क्र.मआ/स्वीस/२०१८/१४७, दिनांक ५.६.२०१८ च्या आदेशात धोरणात्मक निर्णय आयुक्तांच्या मान्यतेने घेतील असे नमूद आहे. मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवणे ही बाब धोरणात्मक स्वरूपाची आहे, असे असतांना मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना सदरची बाब अवगत न करता परस्पर अतिरिक्त आयुक्त यांनी मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवलेला आहे.

४. सदरील ठिकाणच्या कामाबाबत स्थळपाहणी मध्ये महानगरपालिकेच्या तांत्रिक कक्षाने तांत्रिक विभागातील उपविभागांशी समन्वय साधून कामाची अंदाजपत्रकीय रक्कम निश्चित केली असती तर महानगरपालिकेस निश्चितच अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा प्राप्त झाली असती.

५. कार्यादेश देण्यापूर्वी कंत्राटदाराकडून २% अनामत रक्कम स्विकारलेली नाही. कंत्राटदाराच्या विनंतीनुसार सदरील रक्कम प्रथम व दरम्यानच्या देयकातून सुध्दा कपात केलेली नाही. त्यामुळे रू.५७,५००/- चे महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

# बांधा वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील पथदिवे बदलणे व ८ वर्ष देखभाल दुरूस्ती करणे

# प्राथमिक तपासणी अहवाल

**संदर्भ :-मा.आयुक्तांचे आदेश जा.क्र./मनपा/मआ/स्वीस/२०१८/२३०,**

**दिनांक २७.०६.२०१८**

संदर्भिय पत्रान्वये LED पथदिव्यांच्या कामाबाबत आढावा घेण्यास व खालील बाबींवर मुद्देनिहाय अहवाल सादर करण्यास मुख्यलेखा परिक्षक यांचे अध्यक्षेतेखाली कक्ष प्रमुख तांत्रिक कक्ष व विधी सल्लागार यांची संयुक्त समिती नेमण्यात आलेली आहे. त्यानुसार मुद्दे निहाय अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश
२. शहरात पथदिव्यांची गरज
३. करारनाम्यानतील अटी शर्ती प्रमाणे झालेली कामे व उर्वरित कामे विहीत कालावधीत कामे पुर्ण होत आहे किंवा कसे
४. करारनाम्यातील आर्थिक अणि कायदेविषयक बाबी

## १. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

दिनांक २०/०५/२०१४ रोजी ठराव क्र. ४५७ अन्वये मा. सर्वसाधारण सभेने महानगरपालिका औरंगाबाद हद्दीतील अस्तीत्वात असलेले संपुर्ण पथदिवे काढून त्या ठिकाणी उर्जा बचत / LED चे पथदिवे BOT तत्वावर लावणे तसेच मुलभुत सुविधांची कामे करणे या प्रस्तावास मंजुरी दिली. उक्त मंजुरीनुसार निविदा प्रसिध्दीस देण्यात आली. प्राप्त निविदांचे तांत्रिक कागदपत्रे आणि व्यावसायीक दर पत्रक यांची छाणणी करुन निविदा अंतीम करण्यासाठी आयुक्त, मनपा यांच्या अध्यक्षतेखाली शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखाधिकारी, विधी सल्लागार व विभाग प्रमुख (विद्युत) यांची समिती गठीत करण्यात आली होती.

या समितीने प्राप्त झालेल्या निविदांपैकी ०१. पॉलीकॅब वायर्स प्रा.लि. ०२. शाह इन्व्हेस्टमेंट फायनांशियल डेव्हलपमेंट ॲण्ड कन्स्ट्रक्शन कं.लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्रा.लि. (Joint Venture) ०३. इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. आणि पॅरागॉन केबल इंडिया (Joint Venture) अशा एकुण तीन निविदांची तपासणी केली असता मे.पॉलीकॅब वायर्स प्रा.लि. आणि शाह इन्व्हेस्टमेंट फायनांशियल डेव्हलपमेंट ॲण्ड कन्स्ट्रक्शन कं.लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्रा.लि. (Joint Venture) यांच्या निविदा कंत्राटदार विविदेतील तांत्रिक पात्रतेचे निकष पुर्ण करीत नसल्याने बाद ठरविण्यात आल्या. आणि इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. आणि पॅरागॉन केबल इंडिया (Joint Venture) यांची निविदा उघडण्याचा निर्णय झाला.

प्राप्त निविदेप्रमाणे

Part-A : Rs. ८६,९३,१७,४००/-

Part-B : Rs. २५,२८,५०,६८०/-

Part-C : Rs. ४४,५७,९२,८९६/- (Cost to AMC for Electricity Bill for १० years)

Part-D : Rs. ९,१२,००,०००/- (दोन वर्षाची देखभाल दुरुस्ती रक्कम)

आणि पात्र कंपनी / ठेकेदार यांनी रू. २,७२,००,०००/- EMI ची मागणी केली व या EMI मध्ये ठेकेदाराने Part-A आणि Part-B ची ११२,२१,६८,०८०/- रुपयांची कामे करण्याचा प्रस्ताव दिला आहे. या संदर्भाने सविस्तर चर्चा करुन समितीने इतिवृत्त जा.क्र.३३५, दि. ०२/०९/२०१४ प्रमाणे मान्यता दिली आहे.

या सर्व बाबींसह प्राप्त झालेली निविदा मा. स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी सादर केली असता स्थायी समितीने प्रस्तावास विषय क्र. ६९, दि. ०३/०९/२०१४ नुसार मान्यता प्रदान केली आहे. यानंतर रितसर कार्यवाही करुन कंत्राटदरासह करारनामा करुन त्यास कार्यादेश जा.क्र. ३४०, दि. ०३/०९/२०१४ अन्वये काम सुरु करण्याचा आदेश देण्यात आला.

या आदेशास आणि निविदा मंजुरी प्रक्रियेस मे.पॉलीकॅब वायर्स प्रा. लि. आणि शाह इन्व्हेस्टमेंट फायनांशियल डेव्हलपमेंट ॲण्ड कन्स्ट्रक्शन कं.लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्रा. लि. (Joint Venture) यांनी मा. उच्च न्यायालया खंडपिठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल करुन आव्हान दिले. त्यानुसार

१. WP ७८४३/२०१४ शाह इन्व्हेस्टमेंट विरुध्द मनपा.
२. WP ८२११/२०१४ पॉलीकॅब प्रा. लि. विरुध्द मनपा.

सदरील प्रकरणात निविदाधारक कं. मे. इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम सोबत मनपा प्रतिवादी होती.

या दोन्ही याचीकांची एकत्रित सुनावणी होऊन दि. १४/१०/२०१४ रोजी मा. उच्च न्यायालयाने निकाल दिला. त्या आदेशाप्रमाणे महानगरपालिकेने निविदा मंजुरी घाई घाईत केल्याने मनपाच्या निर्णयात हस्तक्षेपाची आवश्यकता असल्याने कारणमिमांसेसह नमुद करुन मा. स्थायी समितीने घेतलेला निर्णय आणि दि. ०३/०९/२०१४ चा करारनामा व कार्यादेश रद्द करण्याचे आदेश पारीत केले.

दि. १४/१०/२०१४ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाने दिलेला आदेश इलेक्ट्रॉन लाईटिंग सिस्टीमच्या विरोधात असल्यामुळे त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. सदरील SLP NO. ३४१२९-३४१३०/२०१४ मध्ये सुनावणी घेऊन दि. २०/११/२०१५ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. त्यात इलेक्ट्रॉन लाईटिंग सिस्टीम प्रा.लि. यांचे अपील मा. सर्वोच्च न्यायालयाने अंशतः मंजुर केले.

LED प्रकरणामध्ये मे. ईलेक्ट्रान लाईटींनींग सिस्टीम यांना दिनांक ०३/०९/२०१४ रोजी देण्यात आलेल्या कार्यादेशास दि.२०/११/२०१५ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने एसएलपी नं. ३४१२९-३४१३०/२०१४ मध्ये जाहिरातीचे अधिकार वगळून अंशतः वैध ठरवले होते. त्यानुसार नव्याने सुधारीत कार्यादेश देण्याच्या निर्णयास्तव संचिका असतांना  तत्कालीन आयुक्त श्री. केंद्रेकर यांनी निविदे मधील रक्कम आणि सद्यस्थितीचे बाजार भावाचे अवलोकन करण्यासाठी समिती गठीत केली होती, ज्याचे सदस्य श्री. संजय पवार - मुख्य लेखा अधिकारी (प्र.), श्री. सिकंदर अली - शहर अभियंता (प्र.), श्री. कोल्हे - कार्यकारी अभियंता, श्री. बनसोडे - कार्यकारी अभियंता (मानद), श्रीमती थेटे - विधी सल्लागार होते.

सदरील समितीने दिनांक ०५/०२/२०१६ रोजी अहवाल सादर केला. तद्नंतर दि. १५/०२/२०१६ रोजी निवृत्त न्यायाधीश मा. उच्च न्यायालय श्री. चांदीवाल यांचा अभिप्राय प्राप्त झाला. आयुक्तांनी समितीच्या अहवालाप्रमाणे  मा. स्थायी समिती आणि मा. सर्व साधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवणेबाबत नमुद केले, त्याप्रमाणे दि.१८/०२/२०१६ रोजी मा. स्थायी समिती आणि दि.२०/०२/२०१६ रोजी मा. सर्व साधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवण्यात आला.

सदरील प्रस्तावाप्रमाणे Part A करीता ४०,००० लाईट फिटींग्ज नमुद वॅट ईत्यादी प्रमाणे खरेदी करण्यासाठी निविदेप्रमाणे रक्कम रू. ८६,९३,१७,४००/- ऐवढी लागली असती. त्याऐवजी बाजारातील Bajaj, Syska या कंपनीच्या भावाची तुलना केली असता रिटेल प्रमाणे खरेदी करुन सुद्धा मनपाची बचत रू.६४,२१,१९,०००/- ईतकी झाली असती. त्या वैतीरीक्त टेंडरमधरी Part B हे २०% जास्तीचे दिल्यामुळे ५ कोटी वाचले असते. असे एकुण रू. ११२ कोटीच्या निविदेमध्ये रू.७० कोटीचा खर्च वाचला असता. तसेच Part D प्रमाणे मनपाने स्वतः लाईट खरेदी करुन स्वःस्तरावर देखभाल दुरुस्ती केल्यास निविदेच्या ८ वर्षानंतर लागणारा ९५/- प्रती फिटींगचा एकुण खर्च वार्षीक ४.५ कोटी असुन २ वर्षांसाठी अंदाजे ९ कोटी रुपये लागले असते. असे नमुद करून प्रस्ताव सादर केला ज्यात मा. स्थायी समिती आणि मा. सर्व साधारण सभेत निविदा रद्द करण्याचा आणि मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये निकाली निघालेल्या प्रकरणात दिवाणी अर्ज दाखल करण्याचा निर्णय झाला. या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी दि.१८/०२/२०१६ रोजी मा. स्थायी समितीचा करणापुरता  उतारा मिळाला होता. तथापी मा. सर्व साधारण सभेचा कारणापुरता उतारा दि.३१/०३/२०१६ रोजी प्राप्त झाला, तत्पुर्वी अवमान याचिका क्रमांक १४४-१४५/२०१५ दिनांक २६.०३.२०१६ दाखल झाले.

Interim Application for modification of earlier order दाखल तथापी मा. न्यायालयाने IA च्या ऐवजी Review दाखल केल्यास उचीत आदेश पारीत करता येतील असे तोंडी आदेश केले Review दाखल करण्यात आला. मनपाने दाखल केलेला रिव्हीव दि. १/०९/२०१६ रोजी खारीज करण्यात आला. दि. ०२/०९/२०१६ रोजी अवमान याचिकेत सुनावणी मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश दि. २०/११/२०१५ नुसार पूर्वीचे निर्गमीत केलेले कार्यादेश दि.३/०९/२०१४ मध्ये सुधारणा करुन म्हणजेच पूर्वी दिलेले जाहिरातीचे अधिकार वगळून सुधारीत कार्यादेश दि.०१/९/२०१६ रोजी संबंधीत याचिकाकर्तेस निर्गमीत करण्यात आले. आणी याची माहिती दि. २/९/२०१६ च्या सुनावणी दरम्यान मा. न्यायालयास देण्यात आली याची न्यायालयाने दखल घेवून सुधारीत करारनामा १५ दिवसात पूर्ण करण्यास आदेशीत करुन अवमान याचिका निकाली काढली.

## २. शहरात पथदिव्यांची गरज

सदर कामाच्या संचिकेचे अवलोकन केले असता असे आढळुन येते की, महानगरपालिकेतील अस्तित्वातील पथदिवे, पोल, केबल, जंक्शन बॉक्स व इतर यांचे आयुषमान संपलेले असल्याने तसेच या पथदिव्यांमुळे वेळोवेळी घडत असलेले अपघात या सर्व बाबींचा विचार करून ९०% पथदिव्यांच्या व्यवस्थेचे नुतनीकरण करण्यासाठी प्रस्तावित केले होते. त्यानुषंगाने तत्कालिन आयुक्तांनी या प्रकरणी संबधीत विभाग प्रमुख आणि शहर अभियंता यांचेशी सविस्तर चर्चा करून तसेच त्यावेळी पथदिव्यांशी संबधीत होत असलेला खर्चाचा विचार करून दरवर्षी ढोबळमानाने होत असलेला १८ कोटींचा खर्च व विद्युत देयक बीलवर प्रतीमहा हात असलेला ८० ते ८५ लक्ष रूपयांचा खर्च विचारात घेता/पाहता LED तत्वावर लावण्यास सुमारे ५०% बचत होण्याची शक्यता मुल्यांकित केलेले होते, त्यानुषंगाने शहरातील पथदिव्याचें बीओटी पध्दतीने / तत्वावर कामे करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आलेला होता. या बाबतीत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली आहे.

शहरातील अस्तित्वात पथदिव्यांची व्यवस्था योग्य नसल्याकारणाने सदरील कामाची गरज होती असे संचिकेवरून स्पष्ट होते.

## ३. करारनाम्यानतील अटी शर्ती प्रमाणे झालेली कामे व उर्वरित कामे

सदरील कामासाठी दिनांक ३०.०६.२०१४ रोजीच्या निविदा सूचनाप्रमाणे ई-टेंडरद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या, निवेदेनुसार ४ भागात निविदा कामांचा व्याप समाविष्ठ होता.

a) रूपये ८६,९३,१७,४००/- LED दिवे लावणे

b) रूपये २५,२८,५०,६८०/- १२०० नविन पोल उभे करणे व Infrastructure ची कामे करणे
c) रूपये ४४,५७,९२,८९६/- Cost to AMC for Electricity Bill for १० years

d) रूपये ९,१२,००,०००/- दोन वर्षाची देखभाल दूरूस्तीची कामे

अशा प्रकारची निविदा मंजूरी झालेली आहे. निविदेतील अटी शर्तीनुसार काम सुरू केल्याच्या तारखेपासून प्रथम महिण्यात ३००० दुसऱ्या महिण्यात ३५०० अशा प्रकारे बाराव्या महिण्यात २००० अशा प्रकारे ४०००० फिटींगचे कामे प्रस्तावित होते. ते खालील प्रमाणे आहेत.

## Annexure A

| Sr NO. | Month | Fitting Nos. | Remark |
|---|---|---|---|
| १ | १st Month | ३००० | |
| २ | २nd Month | ३५०० | |
| ३ | ३rd Month | ३५०० | |
| ४ | ४th Month | ३५०० | |
| ५ | ५th Month | ३५०० | |
| ६ | ६th Month | ३५०० | |
| ७ | ७th Month | ३५०० | |
| ८ | ८th Month | ३५०० | |
| ९ | ९th Month | ३५०० | |
| १० | १०th Month | ३५०० | |
| ११ | ११th Month | ३५०० | |
| १२ | १२th Month | २००० | |
| | | ४०००० Nos | |

निविदेतील अट क्रमांक १३ नुसार प्रथम ०३ महिण्यात २५%LED लावणे आवश्यक आहे. त्यानुसार म्हणजेच १०००० पथदिवे लावले आहे. तसेच निविदेतील दिलेल्या कालमर्यादेत एका वर्षात पार्ट B मध्ये नमुद असलेले कामे करणे आवश्यक आहे.

निविदेतील अट क्रमांक २८नुसार प्रीप्रेटी पिरेड निविदेतील कालमर्यादा संपल्यानंतर निविदाधारकाने कामे पुर्ण न केल्यास मुदतवाढ किंवा दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतुद आहे. ती खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

After the Lapse of the offered Preparatory/Commencement Period & Execution period of One Year, if the allocated work is not completed a per the Schedule of Tender, then grant of time to complete the work shall be awarded by the Municipal Commisioner, Aurangabad, on due acceptance of submission towards valid reasons of delay. In case, the reasons are not found satisfactory, such extension shall be subject to a penalty equivalent to the percentage of unfinished work. For an example if the offered EMI is say Rs. १,००,०००/-& १०% of the work remains unfinished, then Penalty of Rs. १०,०००/- per Month shall be levied for the extension of One Month. Then the enalty shall stand doubled to Rs.२०,०००/- for the Next Month.

**<u>झालेली व उर्वरित कामे</u>**

सदर बाब विद्युत विभागाच्या पर्यवेक्षण आणि निगराणीखाली असुन झालेल्या कामाचा अहवाल मागविला असता ऑक्टोबर २०१७ पासुन कामाची सुरूवात झाल्याचे नमुद आहे. करारनाम्यानुसार दिनांक २८.०८.२०१८ मध्ये प्रत्यक्षीत काम सुरू झाल्याचे विभाग प्रमुख यांनी कळविलेले आहे. निविदा अटी शर्तीनुसार प्रथम ३ महिण्यात १०००० दिवे बसविणे आवश्यक होते त्यानुसार ३१ जुलै २०१८ पर्यंत १०००० LED बसविण्यात आलेले आहेत. ३१ जुलै २०१८ ते आज पावेतो किती फिटींग बसविण्यात आलेले आहेत. तसा कोणताही अहवाल विभाग प्रमुख यांनी दिलेला नसल्याकारणाने ३०००० LED बसविणे बाकी अहे अशी धारण होते. या शिवाय निविदेतील Part B मधील कामे अद्याप बाकी असल्याचे विभागाने कळविले आहे.

आतापर्यंत केलेल्या कामाच्या कोणतेही देयक संबधीतास प्रदान केलेले नाही. सदर कामाचे देयक अदा करण्यासाठी निविदा अटी शर्तीनुसार इस्क्रो अकाऊंट खाते काढणे आवश्यक होते त्यानुसार इस्क्रो खाते काढलेले आहे किंवा कसे ते विभागाने दिलेले नाही.

तथापी लेखा विभागाकडून माहिती घेतली असता, इस्क्रो खाते IDBI Bank मध्ये असुन ते खालील प्रमाणे खाते क्रमांकासह नमुद केले आहेत.

IDBI Bank ०३७६१६३००००००१७४८ Acoount Opening Dt.१६.११.२०१७ प्रत्यक्षात या खात्यामध्ये दिनांक १२ जानेवारी २०१८ पासून दररोज १० लक्ष रक्कम जमा करण्यात येत असुन आत्तापर्यंत एकुण जमा रक्कम १५.५० कोटी ही जमा झालेली आहे. सदर रकमेतुन कोणतेही देयक प्रदान करण्यात आलेले नाही. सद्यस्थितीत, दिनांक १५ जून २०१८ पासून सदर खात्यामध्ये रक्कम भरणा बंद करण्यात आलेली आहे. (माहितीस्त्व सोबत विवरणपत्र जोडण्यात येते आहे.)

## ४. <u>विहीत कालावधीत कामे पुर्ण होत आहे किंवा कसे</u>

सदर कामाच्या व्यापानुसार LED दिवे लावण्यास पायाभुत कामे करणे इत्यादि बाबतीत निविदाधारकाने करणे अपेक्षित होते, तथापी आत्ता पर्यंत झालेले कामे ही १०००० फिटींग बसविण्यात आलले आहे, उर्वरित कामे बाकी आहे. कामाची मुदत ही अंदाजे ऑक्टोबर २०१७ पासून चालू केली. (चौकशीसाठी करारनाम्याची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.) उर्वरित कामे अजुन झालेली नाही. सदर कामाचा कालावधी हा १ वर्षाचा आहे. विभागाकडुन स्पष्ट अहवाल मागविणे योग्य होईल.

उर्वरित कामे झालेली नाही. तथापी या कामाची नेमकी सुरूवात झाल्याचा कालावधी व अंतिम होण्याचा कालावधी याबाबत सविस्तर माहिती विभागाकडून मागविणे योग्य होईल. विभागाकडुन माहिती प्राप्त झाली नसल्याकारणाने कामाची मुदत केव्हा संपेल याबाबत भाष्य करता येणार नाही.

## <u>निष्कर्ष :</u>

१. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार निविदा अटी,शर्ती बद्दल कोणतीही शंका किंवा कोणताही अहवाल देता येत नाही.

२. Comprehensive Plan तयार केला पाहिजे, प्राधान्याने लाईट फिटींग बरोबर पार्ट-B चे काम घेतल्यास पार्ट-B बाबत वारंवार येणाऱ्या तक्रारी कमी होतील.

**३.** महानगरपालिकेत सध्यास्थितीत यापुर्वी कॉम्प्रोसिव मेंन्टनन्स्द्वारे विद्युत पथदिव्यांची कामे होत होती. LED ची निवीदा काढतांना महानगरपालिकेची विद्युतखर्चावर बचत होण्याच्या दृष्टीने कामे देण्यात आली होती परंतु आता दोन्ही पध्दतीने कामे चालु आहे. LED च्या कामाच्या प्रगतीनुसार १०००० दिव्यांचे कामे झालेले असून उर्वरीत ३०००० दिवे लावण्याचे कामे बाकी आहे. अशा परिस्थितीत व कॉम्प्रेसिव्ह खर्च कमी करण्यासाठी उर्वरीत ३०००० दिवे लावणे आवश्यक आहे. म्हणजेच कॉम्प्रेसिव्ह कामे बंद करता येतील. शिवाय आजच्या स्थितीला LED ज्या भागात दिवे लावलेले आहे. त्या त्या भागातील कॉम्प्रेसिव्हच्या निविदामध्ये पथदिवे देखभाल दुरूस्ती करणे कामाअंतर्गत LED दिव्यांचा विचार करून तेवढी रक्कम कमी करून क्रमप्राप्त आहे म्हणजेच खर्चात काटकसर होईल, अशी समितीची धारणा आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समिती, जाधववाडी येथील मोकळ्या जागेच्या मालमत्ता करामध्ये झालेल्या दुरूस्तीबाबत अहवाल.

**प्रस्तावना :**

कृषी उत्पन्न बाजार समिती, जाधववाडी येथील मोकळ्या जागेच्या मालमत्ता करामध्ये झालेल्या दुरूस्तीबाबत तपासणी करून अहवाल सादर करण्याबाबत दिनांक २७.१२.२०१८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीत मा.सभापती यांनी आदेशित केलेले आहे.

त्यानुषंगाने वॉर्ड - ब (झोन क्र.५) कार्यालयाकडून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जाधववाडी येथील मोकळ्या जागेच्या मालमत्ता कराच्या दुरूस्तीची संचिका लेखापरीक्षण विभागास प्राप्त झाली. तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती सेल हॉल क्र.१ ते ५ येथील मालमत्ता कराच्या आकारणीची संचिका सुध्दा लेखापरीक्षण विभागास संबंधित कार्यालयाने सादर केलेली आहे.

उक्त दोन्ही संचिकांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मोकळ्या जागेस सन १९९७ पासून मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली होती. कृषी उत्पन्न बाजार समितीला वेळोवेळी मालमत्ता कराचा भरणा करणेबाबत महानगरपालिके कडून पाठपुरावा करण्यात आलेला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीने दिनांक २३.१.२०१६ व दिनांक २५.१०.२०१८ अन्वये महानगरपालिकेस पत्रव्यवहार करून आकारण्यात आलेल्या मोकळ्या जागेच्या मालमत्ता करामध्ये दुरूस्ती करण्यात यावी याबाबत पत्र दिल्याचे संचिके मध्ये नमूद आहे.

२. कृषी उत्पन्न बाजार समितीस कर आकारणी क्र. ११८४/१९९७-९८ अन्वये कर आकारणी झालेली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीकडे असलेले एकूण क्षेत्रामध्ये असलेले कोल्ड स्टोरेज, MSEB व पनन महासंघ, पुणे यांना लिजवर जागा कृषी उत्पन्न बाजार समितीने मोकळ्या जागा हस्तांतरीत केलेल्या आहेत. त्यानुसार विभाजन करून मालमत्ता करामध्ये दुरूस्ती करण्याबाबत कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी महानगरपालिकेकडे विनंती केली.

**३.** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विनंतीनुसार जाधववाडी येथील मोकळ्या जागेच्या मालमत्ता करामध्ये दुरूस्ती करण्याबाबत कर विवाद समितीसमोर प्रकरण ठेवण्यात आले. दिनांक १९.११.२०१८ रोजी कर विवाद समितीने खालील निर्णय दिलेला आहे.

अ. कर आकारणी क्र. ११८४/९७-९८ दिनांक १.४.१९९७ पासून कर योग्य मूल्य रू.१३०७७३१२=०० दिनांक १.४.१९९७ पासून करण्यात आली. नविन Lay-out No. म.न.पा.नरवि-०९/२०१८ दि.२०.८.२०१८ नुसार मोकळ्या जागेमध्ये वाढ दिसून आली. त्यामुळे एकूण क्षेत्र ४२६१८८ चौ.मी.नुसार सुधारीत कर आकारणी करणे योग्य.

ब. महानगरपालिकेने बांधीव गाळ्यांवर व बांधकामाचे क्षेत्रावर कर आकारणी दि.२६/१०/१९९८ पासून केलेले तेवढे क्षेत्र वगळण्यात यावे.

क. कोल्ड स्टोरेज चे क्षेत्रफळ लिज ॲग्रीमेन्ट क्र.१७७६ दि.१५.७.२००५ नुसार एकूण क्षेत्र ३२२७.०० चौ.मी.कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रातून वगळून कोल्ड स्टोरेज यांचे नावे विभाजन करण्यात यावे.

ड. M.S.E.B. चे क्षेत्रफळ लिज ॲग्रीमेन्ट क्र. २७३९ दि.१७.६.२००८ नुसार एकूण क्षेत्र ३७८५.०० चौ.मी. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रातून वगळून MSEB यांचे नावे विभाजन करण्यात यावे.

इ. पननमहासंघ, पुणं चे क्षेत्रफळ लिज ॲग्रीमेन्ट क्र.०१/ दि.११.१.२०११ व क्र.५१७५ दिनांक ३०.६.२०११ नुसार एकूण क्षेत्र १३४२०१=०० चौ.मी. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रातून वगळून पनन महासंघ पूणे यांचे नांवे विभाजन करण्यात यावे.

ई. बांधकाम केलेले क्षेत्र + कोल्ड स्टोरेज चे क्षेत्र + MSEB चे क्षेत्र + पनन महासंघ पूणे चे क्षेत्र.

उ. क्षेत्र वगळता उर्वरीत क्षेत्रावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे नांवे लिज डिड च्या तारखा लक्षात घेवून कायम करावे.

आदेश पारीत करून कर वसूली करण्यात यावी. समितीचा निर्णय उपरोक्त प्रमाणे अंमलात आणावा.

समितीमध्ये कर निरिक्षक (तांत्रिक), वॉर्ड अधिकारी वॉर्ड -ब (झोन क्र.५), कर निर्धारक व संकलक आणि अतिरिक्त आयुक्त यांचा समिती सदस्य म्हणून समावेश आहे.

४. उक्त कर विवाद निर्णय समितीने दिलेल्या निर्णयास मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांची मान्यता घेतलेली नाही.

५. कर विवाद निर्णय समितीच्या मान्यतेनुसार जा.क्र.मनपा/झोन क्र.५/२०१८/१८३६, दिनांक १९.११.२०१८ अन्वये कृषी उत्पन्न बाजार समिती, जाधववाडी येथील मोकळ्या जागेच्या मालमत्ता करामध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

अ. कृषी उत्पन्न बाजार समिती येथील मोकळ्या जागेचा कर आकारणी क्र.११८४/१९९७-९८ दिनांक १.४.१९९७ ते २५.१०.१९९८ पर्यंत कर योग्य मूल्य रू.१,३०,७७,३१२/- कायम करण्यात येते.

ब. दिनांक २६.१०.१९९८ पासून बांधकाम क्षेत्र व कोल्ड स्टोरेजचे क्षेत्र वजा जाता सुधारित करयोग्य मूल्य रू.९०,६१,४०८/- दिनांक १४.७.२००५ पर्यंत व पुढे बंद.

क. दिनांक १५.७.२००५ पासून MSEB चे क्षेत्र वजा जाता सुधारित करयोग्य मूल्य रू.८९,५६,१४४/- दिनांक १६.६.२००८ पर्यंत व पुढे बंद.

ङ दिनांक १७.६.२००८ पासून पणन महासंघ, पुणेचे क्षेत्र वजा जाता सुधारित करयोग्य मूल्य ८८,३७,०२४/- दिनांक २९.६.२०११ पर्यंत व पुढे बंद.

इ. दिनांक ३०.६.२०११ पासून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उर्वरीत मोकळ्या जागेवर सुधारित करयोग्य मूल्य रू.४५,४२,५९२/- पुढे कायम असे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

६. कर विवाद विभाग समितीने दिलेल्या निर्णयानुसार कर विभागणी करण्यात आली. त्यानुसार कार्यालयीन पत्र क्र.मनपा/झोन क्र.५/२०१८/१८३९, दिनांक १९.११.२०१८ अन्वये सौ.मोनिता सुनिल शेट्टी यांना कोल्ड स्टोरेजच्या मोकळ्या जागेवरील करयोग्य मूल्य रू.१,०३,२६४/- वर सामान्य कर नियमाप्रमाणे दिनांक १५.७.२००० पासून पुढे कायम करण्यात आला. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/झोन-५/२०१८/१८३८, दिनांक १९.११.२०१८ अन्वये कार्यकारी अभियंता शहर विभाग क्र.१, डॉ.आंबेडकर रोड, जुने पावर हाऊस परिसर औरंगाबाद यांना दिनांक २७.६.२००५ पासून मोकळ्या जागेवरील करयोग्य मूल्य रू.१,२१,१२०/- व सामान्य कर नियमाप्रमाणे दिनांक २७.६.२००६ पासून व पुढे कायम असा आकारण्यात आला. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/झोन-५ /२०१८/१८३७, दिनांक १९.११.२०१८ अन्वये विभागीय उप सह व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य कृषी पनन मंडळ, पूणे विभागीय कार्यालय औरंगाबाद यांना मोकळ्या जागेवरील करयोग्य मूल्य रू.४२,९४,४३२/- व सामान्य कर नियमाप्रमाणे दिनांक ३०.६.२०११ पासून पुढे कायम करण्यात आला.

७. वॉर्ड अधिकारी झोन क्र.५ यांनी कार्यालयीन पत्र क्र.मनपा/झोन-५/२०१८/१८८४, दिनांक १.१२.२०१८ अन्वये मा.महापौर यांच्याकडे कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या मालमत्तांबाबत सादर केलेली सविस्तर टिपणीची प्रत या सोबत जोडण्यात येत आहे.

८. कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सेल हॉल क्र.१ ते ५ च्या मालमत्ता कराबाबत प्रकरण दाखल केलेले असून मा.न्यायालयाने सदरील प्रकरणात रू.२५ लक्ष भरणा करण्याबाबत सुपर कृषी उत्पन्न बाजार समिती यांना दिनांक १ एप्रिल २०१६ रोजी आदेशित केलेले आहे.

**निष्कर्ष :-**

१. कर विवाद निर्णय समितीने दिनांक १९.११.२०१८ रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जाधववाडी येथील मोकळ्या जागेच्या करामध्ये सुधारणा आदेश व कर विभागणी आदेश निर्गमित केलेले आहेत. वास्तविक पाहता कृषी उत्पन्न बाजार समितीने कोल्ड स्टोरेज करिता दिनांक १५.७.२००५, MSEB सोबत दिनांक १७.६.२००८ व पनन महासंघ पुणे यांचे सोबत दिनांक १.१.२०११ व दिनांक ३०.६.२०११ रोजी लिज ॲग्रीमेन्ट नुसार जमिनी हस्तांतरीत झालेल्या असतांना संदर्भिय तारखांना कर आकारणी विभागाने करामध्ये सुधारणा / विभाजन करणे अपेक्षित आहे.

२. कर विवाद निर्णय समितीने दिनांक १९.११.२००८ रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जाधववाडी येथील मोकळ्या जागेच्या करामध्ये सुधारणा व करविभागणी बाबत घेतलेल्या निर्णयास मा.आयुक्त यांची मान्यता घेतलेली नाही.

३. कर आकारणी विभागाने उक्त मुद्यांतील लिज ॲग्रीमेन्टच्या तारखानुसार विभाजन/कर सुधारणा केलेली नसल्याने महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

# दिनांक १ जानेवारी २०१८ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीतील वॉर्ड क्र.१ ते ९ वॉर्ड कार्यालयातील वसूल रकमांच्या ताळमेळ बाबतचा अहवाल.

उपरोक्त विषयी सविनय सादर करण्यात येते की, लेखापरीक्षण विभागामार्फत सद्यस्थितीत झोन क्र.४ , कार्यालयीन आदेश क्र.१०३/२०१८, दिनांक ३०.५.२०१८ व झोन क्र.९ ,कार्यालयीन आदेश क्र. ११२/२०१८, दिनांक १२.६.२०१८ या दोन विभागाचे वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता कार्यालयाचे सन २०१७-२०१८ या वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले असता, झोन क्र.९ च्या लेखापरीक्षणा दरम्यान एकच पावती क्रमांक , दिनांक २६.५.२०१७ व दिनांक ९.२.२०१८ या तारखांना महानगरपालिकेच्या मालमत्ता कराच्या सॉफ्टवेअर मधून जनरेट झाल्याने सदरील पावत्यांन्वये प्राप्त झालेली रक्कम वसूल झाली किंवा नाही याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच वेगवेगळ्या मालमत्ताधारकांना एकच पावती क्रमांक देणे ही बाब सॉफ्टवेअर मध्ये अफरातफर करून निर्गमित करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते.

उक्त बाब मा.सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांच्या निदर्शनास आणून दिली असता आपण सर्व वॉर्ड कार्यालयातील १ जानेवारी २०१८ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीतील वसूल रकमांचा ताळमेळ घेण्यासाठी मा.सभापती, स्थायी समिती यांचे पत्र क्र.मनपा/सभापती/स्थास/४३/२०१/, दिनांक १९.७.२०१८ अन्वये आदेशित केले आहे.

त्यानुषंगाने वॉर्ड कार्यालय १ ते ९ यांचे उक्त कालावधीतील वसूल रकमांचा , वॉर्ड कार्यालयातील अभिलेख्यांचा ताळमेळ घेण्याचे कामा दरम्यान तपासणीत आढळून आलेल्या महत्वाच्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

**१. झोन क्र.३ दिनांक १.१.२०१८ ते ३१.३.२०१८ च्या वसूली दरम्यान तपासणीत आढळून आलेल्या महत्वाच्या आक्षेपार्ह नोंदी पुढील प्रमाणे.**

मालमत्ताधारक अ.कादर शेख वजीर मसरूर माजेदा अ.कादर, मालमत्ता क्र.C००२००३५, अरीश कॉलनी, घ.नं.८-१०-६१६ यांनी या वर्षाचा मालमत्ताकर पावती क्र.As/९५४०० दिनांक ५.३.२०१८, रक्कम रू.६९७८/- धनादेश क्र.००००००२ दिनांक ५.३.२०१८ रक्कम रू.६९७८/- धनादेश क्र.००००००२ दिनांक ५.३.२०१८ Bombay mercantile co-op Bank Ltd. द्वारे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला. तथापी त्याची नोंद त्या दिवसाच्या पावत्याच्या (कॅश रजिस्टर मध्ये) तपशिलामध्ये नसल्याचे निदर्शनास आले आहे.

**विभागाने उक्त बाबत ताळमेळ घेवून समर्थनीय खुलासा सादर करावा असे सूचित केले असता विभागाने खुलासा सादर केलेला असून मालमत्ता पावती क्र. .As/९५४०० च्या ऐवजी मालमत्ता पावती क्र.AS/३९५५८, दिनांक ५.३.२०१८ धनादेश क्र.००००००२ दिनांक ५.३.२०१८ Bombay mercantile co-op Bank Ltd. द्वारे मालमत्ता कराचा भरणा महानगरपालिका फंडात जमा केल्याबाबत जा.क्र.मनपा/वॉर्ड क्र.३/२०१८/१०४५, दिनांक ५.१०.२०१८ रोजी कळविले आहे.**

**संगणक विभागाने As ९५४०० क्रमांक बदलून As ९५५८ क्रमांक दर्शविलेला आहे. प्रत्यक्षात online पावती निर्गमित झाल्यानंतर अशाप्रकारे पावत्यांचे क्रमांक बदलणे ही बाब शंकास्पद वाटते.**

२. **झोन क्र. ४, दिनांक ९.२.२०१८ रोजी कर निर्धारण विभाग मालमत्ता कराच्या पावत्यांचा संक्षिप्त अहवाल एकूण रक्कम रू.२,२२,९९५/- अशी आहे. पावत्यांच्या संक्षिप्त अहवाल तपशिल अहवालामध्ये सुध्दा हीच रक्कम नमूद आहे.**

दिनांक ९.२.२०१८ ची एकूण वसूल रक्कम

| | |
|---|---|
| मालमत्ता कर रू. | २,२२,९९५/- |
| पाणीपट्टी व इतर रू. | ३,७०,९७१/- |
| **एकूण रक्कम रू.** | **५,९३,९६६/-** |

**बँकेत भरणा रक्कम**

| | |
|---|---|
| **रोख** | **रू.५,२७,७०८/-** |
| **धनादेश** | **रू.६६,२५८/-** |
| **एकूण** | **रू.५,९३,९६६/-** |

परंतू उक्त तारखेस खालील क्रमांकाच्या पावत्या झोन क्र.४ ने निर्गमित केल्या. ज्यांचा समावेश पावत्यांच्या तपशिलात व संक्षिप्त अहवालात नाही. पावत्यांचे विवरण पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | पावती क्र. | तपशिल | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | As/८९२६६ दि.९.२.२०१८ | मोहम्मद करारखान मोहम्मद शहाबानखान रोजाबाग, प्लॉट क्र.१८ H०००५४८८ | रू.१३०३१, धनादेश BMC Bank क्र.५, दि.९.२.२०१८ | |
| २ | As/८९२७२ दि.९.२.२०१८ | सुनिल नेमीनाथ इंद्राने, मयुरपार्क P.No.५, H०००८७५६ | रू.३४२१/- रोख | |
| ३ | As/८९२७३ दि.९.२.२०१८ | मुरलीधर खंडू थोरात, फ्लॅट नं.५, सुरेवाडी हर्सूल, B०००४२९२ | रू.२३३६/- रोख | |

उक्त पावत्यांचा रोख व धनादेश मार्फत व्यवहार झालेला आहे.

रोख रक्कम रू. **५७५७/-** झोन क्र.४ मधून दिनांक १६.२.२०१८ रोजी S.No.९३०३६८ अन्वये H.D.F.C. बँकेत परस्पर जमा केलेली आहे. याबाबत कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड४/२०१८/२५० दिनांक १६.२.२०१८ अन्वये सिस्टीम मॅनेजर यांना पत्राद्वारे कळविण्यात आले. त्याची प्रत कर निर्धारक व संकलक यांना दिली आहे. लेखा शाखेला कळविले नाही.

तसेच धनादेशाद्वारे स्विकारलेली रक्कम रू.१३०३१ बाबत H.D.F.C बँकेत जमा केल्याची पावती कॅश जमाच्या पावती सोबत नाही. झोन क्र.४ कार्यालयातील पावत्यांच्या संक्षिप्त अहवालावर टिप लिहून सदरील रकमेचा धनादेश दिनांक ९.२.२०१८ रोजीच पाठविण्यात आल्याचा उल्लेख केलेला आहे.

जर धनादेश दिनांक ९.२.२०१८ रोजी जमा केला तर रोख रक्कम १६.२.२०१८ रोजी उशिराने जमा करण्याचा हेतू काय होता, तसेच धनादेश जमा केल्याची बँकेची पोच पावती नाही. त्यामुळे रू.१३०३१/- महानगरपालिका फंडात जमा झाल्याची खात्री झाली नाही.

विभागास उक्त बाबत खुलासा सादर करावा असे जा.क्र.मनपा/मुलेप/२०१८ /२२८, दिनांक २७.९.२०१८ अन्वये कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**३. झोन क्र.६ च्या लेखापरीक्षणा दरम्यान लेखापरीक्षणात आढळून आलेल्या महत्वाच्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे-**

मालमत्ताधारक श्री.शरद एल.देशपांडे, मालमत्ता क्रमांक E००२६७८०, राहणार F.No.२, स्पंदननगर, अरोही कॉम्प्लेक्स, सिडको यांनी या वर्षाचा मालमत्ता कर पावती क्र.As/९५३४१ दिनांक ५.३.२०१८, रक्कम रू.१५०००/- H.D.F.C. Bank card No. ०३९८ (Card payment) द्वारे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला. तथापि त्याची नोंद त्या दिवसाच्या कॅश रजिस्टरला त्याच पावतीची त्याच नावाने दोन वेगळ्या रकमेद्वारे व दुस-या वॉर्ड कार्यालयात देखील त्याच पावतीची नोंद दुस-या नावाने खालील प्रमाणे घेण्यात आल्या त्या खालील प्रमाणे -

| अ.क्र. | पावती क्र. | रक्कम रू. | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड -ई As/९५३४१ दि.५.३.२०१८ | १७२२/- | श्री.शरद एल.देशपांडे F.No.२ मालमत्ता क्र.E००२६७८० स्पंदननगर अरोही कॉम्प्लेक्स सिडको धनादेश क्र.०९२०५५, दि.५.३.२०१८ | सदरील पावती नाही. पण कॅश रजिस्टरला दर्शविण्यात आलेले आहे. |
| २ | वॉर्ड -ई As/९५३४१ दि.५.३.२०१८ | १५०००/- | श्री.शरद एल.देशपांडे F.No.२ मालमत्ता क्र.E००२६७८० स्पंदननगर अरोही कॉम्प्लेक्स सिडको, H.D.F.C. कार्ड No.०३९८, दिनांक ५.३.२०१८ | सदरील पावती आहे व कॅश रजिस्टरला नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | वॉर्ड -ब As/९५३४१ दि.५.३.२०१८ | १७२२/- | डी.व्ही.डांगे, मालमत्ता क्र.B००२९६७२ सिडको, धनादेश क्र.०९२०५५, दिनांक ५.३.२०१८, state Bank of India | सदरील पावती वॉर्ड कार्यालय -ब येथे फाडण्यात आली. परंतू कॅश रजिस्टरला नोंद नाही. |

उक्त प्रमाणे वेगवेगळ्या ठिकाणी म्हणजेच दिनांक ५.३.२०१८ रोजी वॉर्ड कार्यालय E व वॉर्ड कार्यालय B या दोन कार्यालयात एकाच पावती द्वारे दोन वेगवेगळ्या नावाने नोंद असल्याचे दिसून येते.

विभागास उक्त बाबत खुलासा सादर करावा असे जा.क्र.मनपा/मुलेप/२०१८ /२२९, दिनांक २७.९.२०१८ अन्वये कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

## ४. झोन क्र.९ च्या लेखापरीक्षणा दरम्यान लेखापरीक्षणात आढळून आलेले महत्वाचे आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

मालमत्ताधारक श्री.एस.आर.बोरावके,सौ.सरोज एस बोरावके, मालमत्ता क्र.D०००७३०९, राहणारा धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, उस्मानपुरा यांनी या वर्षाचा मालमत्ता कर पावती क्र.As/८९२७२, दिनांक २६.५.२०१७ रक्कम रू.१०९८२/- H.D.F.C. Bank card No.०६५१०००५९९ (Card Payment) द्वारे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला. तथापि त्याची नोंद त्या दिवसाच्या पावत्यांच्या (कॅश रजिस्टरमध्य) तपशिलामध्ये नसल्याचे निदर्शनास आले आहे.

१. वॉर्ड कार्यालयातील, कॅश रजिस्टर दिनांक २६.५.२०१७ रोजीच्या मालमत्ता कर वसूली पावतीच्या रकमेच्या नोंदीनुसार त्या दिवशी पहिली पावती क्र.As/१८३९५ अशी असून त्याच दिवशीची शेवटची मालमत्ता कर पावती क्र.As/१८९७६ असा आहे म्हणजेच त्या दिवशी पावती क्र.As/८९२७२, दिनांक २६.५.२०१७ वॉर्ड कार्यालयातून जनरेट होणे ही बाब आक्षेपार्ह आहे.

२. वॉर्ड कार्यालयातील वसूली केंद्र / खिडकीवर प्रत्यक्ष संगणकावर तपासून पाहिले असता पावती क्रमांक As/८९२७२, दिनांक २६.५.२०१७ या पावतीची नोंद वेगवेगळ्या तीन ठिकाणी खालील प्रमाणे दिसून आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | As/८९२७२<br>दि.९.२.२०१८ | ३४२१/- | सुनिल नेमिनाथ इंद्राने,<br>वॉर्ड क्र.४ (H)<br>मालमत्ता क्र.H०००८७५६<br>मयुरपार्क. औरंगाबाद. |
| २ | As/८९२७२<br>दि.२६.५.२०१७ | १२२७/- | १)मिर्झा अहमद बेग<br>२) मिर्झा मोहम्मद बेग<br>३) मिर्झा रफत बेग<br>पिता मिर्झा खालेद बेग |
| ३ | As/८९२७२<br>दि.२६.५.२०१७ | १०९६२/- | श्री.एस.आर.बोरावके, सौ.सरोज<br>एस.बोरावके |

उक्त प्रमाणे वेगवेगळ्या तीन ठिकाणी म्हणजेच दिनांक १.४.२०१७ ते दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत एकाच वर्षाच एकाच पावती द्वारे वेगवेगळ्या नावाने नोंद असल्याचे दिसून येते.

३. मालमत्ताधारक विनोद बाबुलाल, जैस्वाल, मालमत्ता क्र.D००४१८००, राहणार एकनाथ नगर यांनी या वर्षाचा मालमत्ता कर पावती क्र.As/९५४६९, दिनांक ५.३.२०१८ रक्कम रू.३९३/- द्वारे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला. तथापि त्याची नोंद त्या दिवसाच्या पावत्यांच्या (कॅश रजिस्टरमध्ये) तपशिलामध्ये नसल्याचे निदर्शनास आले आहे.

४. वॉर्ड कार्यालयातील वसूल / खिडकीवर प्रत्यक्ष संगणकावर तपासून पाहिले असता पावती क्रमांक As/९५४६९, दिनांक ५.३.२०१८ या पावतीची नोंद वेगवेगळ्या तीन ठिकाणी खालील प्रमाणे दिसून आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | As/९५४६९<br>दि.५.३.२०१८ | ३९३/- | विनोद बाबुलाल जैस्वाल<br>मालमत्ता क्र.D००४१८००<br>एकनाथनगर, औरंगाबाद. (वॉर्ड क्र.९) |
| २ | As/९५४६९<br>दि.५.३.२०१८ | ३९३/- | विशाल रत्नाकर राऊत, वॉर्ड क्र.२ (G)<br>मालमत्ता क्र.G०००८८९७, जुनावाडा<br>गुलमंडी, औरंगाबाद. |
| ३ | As/९५४६९<br>दि.५.३.२०१८ | २०,०००/- | विशाल रत्नाकर राऊत, वॉर्ड क्र.२ (G)<br>मालमत्ता क्र.G०००८८९७,<br>धनादेश क्र.८६०७३२, दिनांक २०.२.२०१८<br>स्टेट बँक ऑफ इंडिया, औरंगाबाद. |

उक्त प्रमाणे वेगवेगळ्या तीन ठिकाणी म्हणजेच दिनांक १.४.२०१७ ते दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत एकाच वर्षात एकाच पावती द्वारे दोन वेगवेगळ्या नावाने नोंद असल्याचे दिसून येते.

विभागास उक्त बाबत खुलासा सादर करावा असे जा.क्र.मनपा/मुलेप/२०१८ /२३०, दिनांक २७.९.२०१८ अन्वये कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

## निष्कर्ष :

- तांत्रिक दोषांचे संबंधित कंपनी मार्फत तात्काळ निवारण होवून त्याच दिवशीच्या जमा रकमांमध्ये समाविष्ट केला गेला पाहिजे, जो आता होत नाही.
- वॉर्ड मध्ये जमा होणा-या दैनंदिन रकमांचे, बँक स्क्रोल व लेखा विभागातील cash scroll सोबत (Reconcillation) ताळमेळ घेतला गेला पाहिजे.
- कर भरणा प्रणाली मध्ये जर एखादी पावती त्याच पावती क्रमांकासह दोन वेळेस generate होत असेल ती त्वरीत वॉर्ड अधिकारी व system Manager यांच्या निदर्शनास आणली गेली पाहिजे.
- भविष्यात अशा प्रकारच्या घटना होवू नये यासाठी तात्काळ software मध्ये योग्य त्या सुधारणा केल्या गेल्या पाहिजे.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.
# लेखापरीक्षण विभाग
# आस्थापना -१ व २ *या विभागाच्या कामकाजाचा चौकशी अहवाल.*

मा.महापौर, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी पत्र क्र.मनपा/महापौर/२०१८/६३२, दिनांक ४.४.२०१८ अन्वये पत्र देवून १२ मुद्यांवर चौकशी करून अहवाल सादर करणे बाबत लेखापरीक्षण विभागास कळविले होते.

त्यानुषंगाने लेखापरीक्षण विभागाने पत्र क्र.मनपा/मुलेप/२०१८/५४, दिनांक ४.४.२०१८ अन्वये आस्थापना अधिकारी-१ व २ यांना लेखापरीक्षण पथकास माहिती उपलब्ध करून देण्याबाबत कळविलेले आहे.

आस्थापना विभागाने लेखापरीक्षण पथकास आस्थापना विभागातील अधिकारी/ कर्मचा-यांच्या कार्यकाळाची उपलब्ध करून दिलेली माहिती या सोबत **परिशिष्ट - A** वर जोडण्यात आलेली आहे.

मा.महापौर यांनी १२ मुद्यांवर आदेशित केल्याप्रमाणे प्राथमिक चौकशी पूर्ण करण्यात आली असून मुद्येनिहाय अहवाल पुढील प्रमाणे -

## १. कर्मचारी आकृतीबंध व सेवाभरती नियम :

उक्त प्रकरणांची संचिका तपासण्यात आलेली असून विविध अधिकारी/कर्मचारी यांनी सदरील संचिका सन २००८ पासून हाताळलेली आहे. सद्यस्थितीत संचिका आस्थापना-१ विभागात प्रलंबित आहे. सदरील प्रकरणात मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.४४६, दिनांक २.३.२००९, विषय क्र.९६२, दिनांक १७.३.२०१७ व विषय क्र.११९५ दिनांक १८.९.२०१७ अन्वये कर्मचारी आकृतीबंध व मॉडेल सेवा प्रवेश नियमामध्ये दुरूस्त्या सूचविलेल्या आहेत. मा.सर्वसाधारण सभेने वेळोवेळी सूचविलेल्या दुरूस्त्यानुसार अंतीम कर्मचारी आकृतीबंध व मॉडेल सेवा प्रवेश नियमाची सुधारित प्रत आस्थापना -१ विभागाकडे सद्यस्थितीत उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

तसेच सदरील संचिका २०१२ ते २०१४ या दोन वर्षात एकाच विभागात प्रलंबित असल्याचे दिसून आलेले आहे. सदरील संचिकेची झालेल्या वाटचालीबाबत अहवाल या सोबत **परिशिष्ट - B** वर जोडण्यात आलेला आहे. शासनाकडून औरंगाबाद महानगरपालिकेचा आकृतीबंध तसेच सेवाभरती नियमाबाबत मा.सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावानुसार झालेल्या दुरूस्तीसह सुधारित प्रस्ताव शासनाकडे पाठविणे बाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येवून सुध्दा औरंगाबाद महानगरपालिकेतील आस्थापना विभागाच्या दिरंगाईमुळे कर्मचारी आकृती बंध व सेवाभरती नियम शासन दरबारी सादर केल्या गेलेले नाही. प्रशासनातर्फे संचिकेतील सादरीकरणात / कार्यवाहीत झालेल्या दिरंगाईबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे उचित राहील.

महानगरपालिकेस कर्मचा-यांची निकड व कामाचे व्याप लक्षात घेता सुधारित आकृतीबंध व सेवाभरती नियम शासनाकडून त्वरीत मान्य करून घेणे उचित होईल. अन्यथा शासन निर्णय दिनांक १० नोव्हेंबर २००३ अन्वये स्पष्टपणे नमूद केल्यानुसार "औरंगाबाद महानगरपालिकेने यापुढे **शासनाच्या मान्यतेशिवाय** रोजंदारीवर, ठराविक वेतनावर अथवा अन्य मार्गाने कर्मचारी नियुक्त करू नयेत." याप्रमाणे कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. अशा स्वरूपाची शासनाकडून मान्यता घेणे आवश्यक ठरते.

## २. अनुकंपा तत्वावरील नेमणूका :

औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचा-याचे सेवेत असतांना निधन झाल्यामुळे त्यांचे जागी अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याकरीता दिनांक ६.१०.२०१६ रोजी मा.आयुक्त यांच्या समक्ष सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणी दरम्यान १३ उमेद्वारांची माहिती असलेला तक्ता मा.आयुक्तांसमोर आस्थापना विभागाने सादर केला.मा.तत्कालीन आयुक्त यांनी १३ उमेद्वारांपैकी ७ उमेद्वारांची अनुकंपा तत्वावर नियुक्ती देवून नियुक्ती आदेश निर्गमित केलेले आहेत. तद्नंतर दिनांक २४.१०.२०१६ रोजी ०२ उमेद्वारांना अनुकंपा तत्वावर नियुक्त्या दिलेल्या आहेत. या दोन उमेद्वारांच्या नावाचा समावेश उक्त १३ उमेद्वारांच्या यादीत नाही.

तद्नंतर दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तपशिल आस्थापना विभागाकडे मागविण्यात आला. संबंधितांनी उक्त प्रकरणात तयार केलेली यादी तसेच यापूर्वी देण्यात आलेले नियुक्ती आदेश याबाबतचे अनुषंगिक कागदपत्रे **परिशिष्ट - C** वर जोडण्यात आलेले आहे. दिनांक ६.१०.२०१६ रोजी मा.आयुक्तांनी सुनावणी घेवून सात कर्मचा-यांना नियुक्ती आदेश दिले व दिनांक २४.१०.२०१६ रोजी दोन कर्मचा-यांना अनुकंपा तत्वावर मा.आयुक्त स्तरावर नियुक्ती देण्यात आली. तद्नंतर पाच वेळा बैठका संपन्न होवून सुध्दा या बैठकांमध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतचा विषय विषय-पत्रिकेवर ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे महापालिका आस्थापनेवर पदे रिक्त असतांनाही पात्र उमेद्वारांना नियुक्त्यांपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. याबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

## ३. लाड समितीच्या शिफारशीनुसार करावयाच्या नियुक्त्या :

औरंगाबाद महानगरपालिकेत लाड समितीच्या शिफारशीनुसार नियुक्त्या देणे बाबत मा.तत्कालीन आयुक्त यांनी दिनांक २०.१०.२०१६ पर्यंत ५९ नियुक्त्या दिलेल्या आहेत. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जानुसार आस्थापना समितीकडे प्रकरणे प्रस्तावित होणे आवश्यक होते. सद्यस्थितीत एकूण ४२ प्रकरणे आस्थापना विभागाकडे प्रलंबित आहेत. दिनांक २०.१०.२०१६ नंतर पाच वेळा आस्थापना समितीच्या बैठका संपन्न झाल्या परंतू या बैठकीमध्ये सदरील विषय विषय पत्रिकेवर घेण्यात आलेला नाही. त्यामुळे लाड समितीच्या शिफारशीनुसार संबंधित वारसांना द्यावयाच्या नियुक्त्या प्रलंबित राहिलेल्या आहेत. याचा परिणाम संबंधित ४२ कुटुंब हे उदरनिर्वाहासाठी वंचित राहिलेले आहेत. याबाबत **परिशिष्ट -D** वर प्रलंबित अर्जदारांची यादी जोडण्यात आलेली आहे. प्रकरणांत आस्थापना विभाग व विभाग प्रमुखाकडून होत असलेल्या दिरंगाईबाबत जबाबदारी निश्चित करणे योग्य राहील.

## ४. परिविक्षाधिन कालावधी १०-१२ वर्षापासून खुला न करणे बाबत :

आस्थापना विभागामध्ये उक्त विषयाबाबत माहिती घेतली असता असे सांगण्यात आले की, कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी विहित मुदतीत खुला करण्यात आलेला आहे. ११२४ कर्मचारी भरतीमधील परिविक्षाधीन कालावधी खुला न झालेल्या कर्मचा-यांची यादी पुढील प्रमाणे

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | पंडीत दणके | माळी |
| २ | सखुबाई रतन साळवे | माळी |
| ३ | मल्हारी राघुजी साळवे (प्रस्तावित ) | माळी |
| ४ | चंदनसिंग चावरिया (प्रस्तावित) | मलेरिया मजूर |
| ५ | सुधाकर सांडू नवगिरे | सफाई मजूर |
| ६ | शेख फरीद (प्रस्तावित) | |
| ७ | शांतीलाल सोनवणे | पाणी पुरवठा मजूर |
| ८ | साळुंके | मजूर |
| ९ | राम कचरू कांबळे | सफाई मजूर |

उक्त कर्मचा-यांच्या परिविक्षाधिन कालावधी खुला न होण्यासाठी कर्मचारी जबाबदार आहेत किंवा आस्थापना विभाग जबाबदार आहे याबाबत विभागाने खातरजमा करावी.

## ५. निवृत्ती मुळे रिक्त झालेल्या पदांच्या माहितीबाबत :

सद्यस्थितीत महापालिका आस्थापनेवर शिक्षकांची संख्या वगळून खालील प्रमाणे मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे याबाबतचा गोषवारा -

| अ.क्र. | वर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वर्ग-१ | १८ | ९ | ९ |
| २ | वर्ग-२ | ८६ | ५१ | ३५ |
| ३ | वर्ग-३ | ९०४ | ५१९ | ३८५ |
| ४ | वर्ग-४ | ३१६५ | २९७६ | १८९ |
| | एकूण | ४१७३ | ३५५५ | ६१८ |

उक्त वर्गवारीनुसारचा गोषवा-याची सविस्तर माहिती (संवर्गनिहाय) **परिशिष्ट -E** वर जोडण्यात आलेली आहे. महापालिका आस्थापनेवर सद्यस्थितीत ६१८ पदे रिक्त असल्याचे दिसून येते. आस्थापना विभागाने पदोन्नतीने पदे भरण्यासंबंधी कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे कार्यरत कर्मचा-यांवर कामाचा बोजा वाढत आहे. तसेच नागरीकांची कामे विहित मुदतीत पूर्ण होत नसल्याने महानगरपालिकेबाबत नागरीकांचा रोष वाढत आहे. महापालिका आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांमधून वर्ग-३ व वर्ग-४ मधील रिक्त पदांची भरती करता येईल किंवा कसे याबाबत शासनाचे मार्गदर्शन मागविणे उचित राहील असे मत आहे.

## ६. शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची माहिती :

आस्थापना विभागाने शासनाकडे ११.५.२०१७ ,१८.१.२०१८, ८.२.२०१८, २२.२.२०१८, अन्वये मुख्य अग्निशमन अधिकारी, सहाय्यक संचालक नगररचना, मुख्य लेखाधिकारी, सहाय्यक आयुक्त आणि उपायुक्त या पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेले आहे. पत्रांच्या प्रती **परिशिष्ट - F** वर जोडण्यात आलेल्या आहेत.

## ७. अधिकारी /कर्मचारी यांच्या सुरू असलेल्या चौकशा व त्यावर नेमलेले चौकशी अधिकारी यांची सद्यस्थिती :

आस्थापना विभागातून प्राप्त माहिती नुसार दोषारोप पत्र दिले कार्यवाही अंतर्गत असलेली प्रकरणे -१०, चौकशी सुरू असलेली प्रकरणे -८, चौकशी पूर्ण व कार्यवाही अंतर्गत असलेली प्रकरणे -३ असे एकूण २१ आणि विभागीय चौकशीच्या अधिन कामावर रूजू करून घेतलेल्या परंतू चौकशी अहवाल अप्राप्त/प्रलंबित व अंतीम निर्णय न झालेली प्रकरणे १२ आहेत अशी एकूण ३३ प्रकरणे चौकशीची प्रलंबित आहेत. सदरील चौकशी कामी नियुक्त केलेले चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी इत्यादीची माहिती व निलंबित अधिकारी/कर्मचा-यांच्या गोषवा-याची माहिती **परिशिष्ट G** वर जोडण्यात आलेली आहे.

## ८. आस्थापना समितीची बैठक किती कालावधीत घेणे आवश्यक असते? अशी बैठक का घेण्यात आलेली नाही ?

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) प्रमाणे समितीची नियुक्ती झालेली आहे. दिनांक १८.४.२०१६ ते ८.११.२०१७ पर्यंत सात वेळा आस्थापना समितीची बैठक संपन्न झाली. तद्नंतर समितीची बैठक झालेली नाही.

## ९. संगणक ऑपरेटरची सन २००३ पासून मंजूर असलेली पदे भरण्याबाबत विभागाकडून झालेली दिरंगाई.

शासन निर्णय क्र.ए.एम.सी. १४२००/२२०३/प्रक्र१३८/२०००/न.वि.२४ दिनांक १० नोव्हेंबर २००३ अन्वये औरंगाबाद महापालिकेत विविध संवर्गातील पद निर्मिती बाबत शासनाने शासन निर्णयासोबत जोडपत्र अ मध्ये पदनिहाय पदांची संख्या वेतनश्रेणी नमूद केलेली आहे. शासन निर्णयामध्ये खालील अटी नमूद आहेत.

१. "औरंगाबाद महानगरपालिकेने यापुढे **शासनाच्या मान्यतेशिवाय** रोजंदारीवर, ठराविक वेतनावर अथवा अन्य मार्गाने कर्मचारी नियुक्त करू नयेत. "
२. सदर ११२४ पदांवर महानगरपालिका सेवेत गेली अनेक वर्षे रोजंदारीवर काम करीत असलेल्या कर्मचा-यांना सेवा ज्येष्ठतेनुसार या शासन निर्णयाच्या दिनांकापासून कायम स्वरूपी समाविष्ट करण्यात यावे व यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या आदेशान्वये तयार केलेली ज्येष्ठता यादी व या व्यतिरिक्त महानगरपालिकेने तयार केलेली ज्येष्ठता यादी यामधून सदर पदे भरावीत.

३. रोजंदारी कर्मचा-यांच्या सेवा नियमित करतांना सध्या जे कामगार महानगरपालिकेत दैनिक वेतनावर कार्यरत आहेत, त्यांचाच विचार करण्यात यावा व कामगारांचे उच्चतम वयोमान पार झालेले असल्यास व शैक्षणिक अर्हता पूर्ण नसल्यास त्यास शिथिलता देण्यात यावी.

४. सेवा ज्येष्ठता पदासाठी आवश्यक किमान अर्हता व शासनाने वेळोवेळी आरक्षणबाबत निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे.

उक्त शासन निर्णयात संगणक कक्ष या विभागात संगणक ऑपरेटर या पदासाठी ३०५०-४५९० या वेतनश्रेणी मध्ये तीन पदे भरण्यासंबंधी नमूद आहे. सदरील पदे भरण्यापूर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये समितीचे गठण करण्यात येवून दिनांक २२.१.२००४ रोजी समितीची बैठक संपन्न होवून संगणक ऑपरेटर च्या तीन रिक्त पदापैकी दोन पदे सर्वसाधारण संवर्गासाठी व एक पद अनुसूचित जातीसाठी आरक्षित होते. महानगरपालिका आस्थापनेवरील संगणक ऑपरेटर म्हणून दैनिक वेतनावरील कर्मचारी सिद्यीकी वसीऊर रहेमान यांची नियुक्ती १०.१०.२००० रोजी ६ महिन्याच्या कालावधीसाठी दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दैनिक वेतनावरील कर्मचारी सिद्यीकी वसीऊर रहेमान यांना महानगरपालिका सेवेत आस्थापना समितीने कायम केले. सद्यस्थितीत खुल्या संवर्गातून संगणक ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कर्मचा-याला पदोन्नती देण्यात आलेली असून आता चार पदे रिक्त असल्याचे निदर्शनास येते. (तसेच शासननिर्णय २०.४.२००७ अन्वये संगणक ऑपरेटर चे एक पद मंजूर करण्यात आलेले आहे.) असे एकूण ४ पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती. | - | ०१ |
| २) | अनुसूचित जमाती. | - | ०१ |
| ३) | खुल्या संवर्गासाठी आरक्षित आहेत. | - | ०२ |

शासनाचे पत्र क्र.औ.मा.पा.२००८/४६६/प्र.क्र.१२९/०८/ न.वि.२४, दिनांक १४.९.२००९ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेतील दैनिक /ठराविक वेतनावरील विविध संवर्गातील २४८ कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या सेवेत कायम करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कळविले आहे की, मा.सर्वोच्च न्यायालयाने उमादेवी विरूध्द कनार्टक सरकार या प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिकेतील रोजंदारी /दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या विविध संवर्गातील २४८ कर्मचा-यांना नियमित नियुक्ती देता येत नाही. असे सहसचिव नगरविकास विभाग यांनी उक्त पत्रकान्वये कळविले आहे.

## १०. १२ व २४ वर्षाचे कालबध्द वेतनश्रेणी निश्चित करण्याबाबत झालेली दिरंगाई.

उक्त बाबत दिनांक १८.४.२०१६ , दि.३०.८.२०१६, दि.१८.११.२०१६, दि.२०.४.२०१७ दि.२२.८.२०१७ या तारखांना आस्थापना समितीची बैठक संपन्न होवून पात्र कर्मचा-यांना १२ व २४ वर्षाची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. याबाबत पात्र अधिकारी/ कर्मचा-यांचा गोषवारा खालील प्रमाणे -

### प्रथम लाभास पात्र अधिकारी/ कर्मचारी

| कार्यरत /सेवानिवृत्त अधिकारी | मंजूर केलेली प्रकरणे | | कार्यरत /सेवानिवृत्त कर्मचारी | मंजूर केलेली प्रकरणे |
|---|---|---|---|---|
| कार्यरत अधिकारी | २० | | कार्यरत कर्मचारी | ११८४ |
| सेवानिवृत्त अधिकारी | ०१ | | सेवानिवृत्त कर्मचारी | ०६ |
| **एकूण** | **२१** | | **एकूण** | **११९०** |

### द्वितीय लाभास पात्र अधिकारी/ कर्मचारी

| कार्यरत /सेवानिवृत्त अधिकारी | मंजूर केलेली प्रकरणे | | कार्यरत /सेवानिवृत्त कर्मचारी | मंजूर केलेली प्रकरणे |
|---|---|---|---|---|
| कार्यरत अधिकारी | ०६ | | कार्यरत कर्मचारी | ६१ |
| सेवानिवृत्त अधिकारी | ०१ | | सेवानिवृत्त कर्मचारी | ४२ |
| **एकूण** | ०७ | | **एकूण** | **१०३** |

## ११. अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नतीचे प्रलंबित प्रकरणे :

औरंगाबाद महानगरपालिकेत अधिकारी/कर्मचा-यांच्या रिक्त व मंजूर पदावर पदोन्नती देण्याची प्रकरणे आस्थापना समितीसमोर ठेवण्यात येवून दिनांक १८.४.२०१६ नुसार विभागीय अधिकारी ,प्रमुख अग्निशामक आणि वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देण्याबाबत निर्णय घेवून आदेश निर्गमित करण्यात आले.

तसेच दिनांक १८.११.२०१६ च्या आस्थापना समितीच्या बैठकीत विभागीय अधिकारी आणि सार्वजनिक आरोग्य पारिचारिका या पदावर तदर्थ स्वरूपात (Adhoc) पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत. याबाबतच्या आदेशाच्या प्रती **परिशिष्ट - H** वर जोडण्यात आलेल्या आहेत. आस्थापना विभागाकडून दिनांक १८.११.२०१६ नंतर अद्यापपावेतो अधिकार/कर्मचारी पदोन्नती बाबतची प्रकरणे आस्थापना समितीसमोर ठेवण्यात आलेली नाही. परिणामी सेवानिवृत्तीनंतर रिक्त झालेल्या कर्मचा-याचे काम इतर कर्मचा-यांकडून नाईलाजाने करून घ्यावे लागत आहे. उपलब्ध कर्मचा-यांची संख्या पाहता जवळपास प्रत्येक कर्मचा-याकडे अतिरिक्त पदभार सोपविलेला आहे. याबाबत आस्थापना विभाग जबाबदार आहे.

## १२. आस्थापना विभागाचे संगणकीकरण करण्याबाबतची कार्यवाही :

आस्थापना-१ विभागा मध्ये संगणकाचा उपयोग आस्थापना विभागाची माहिती संकलित करणे, विविध विभागाशी पत्रव्यवहार इत्यादी कामासाठी केला जातो. प्रत्यक्षात विभागाचे संगणकीकरण अद्यापपावेतो झालेले नसल्याने संबंधित कर्मचा-याची माहिती At a Glance उपलब्ध होवू शकत नाही. संगणकावर होत असलेल्या कामाबाबतची माहिती **परिशिष्ट - I** वर जोडण्यात आलेली आहे.

उक्त प्रमाणे लेखापरीक्षण विभागास विविध १२ मुद्यांवर चौकशी करण्यासाठी आदेशित केल्यानुसार अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर करण्यात येत आहे.

**मुख्य लेखापरीक्षक**
महानगरपालिका,औरंगाबाद.